
म. ग्रं. सं. ठाणें
१९६७
विषय निबंध
सं. क्र. १७१८



REFBK-0015947

# इतिहासाचे तत्वज्ञान

सदाशिव आठवले

~~[illegible]~~
निवांत
अ.नं. २१९८२
१५।८।७०
१७१८

प्राज्ञमाला क्रमांक– ७

# इतिहासाचे तत्त्वज्ञान

लेखक

प्रा. सदाशिव आठवले

मूल्य पाच रुपये

प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

REFBK-0015947

प्रकाशक : म. शं. साठे, चिटणीस प्राज्ञपाठशाळामंडळ वाई जि. सातारा

( महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ पुरस्कृत )

मुद्रक : म. शं. साठे, मॅनेजर श्री प्राज्ञ प्रेस, वाई जि. सातारा

# प्रस्तावना

‘ इतिहासाचे तत्त्वज्ञान ” हे ग्रंथनाम वाचून कुणी विचारतील : हा विषय तरी काय आहे ? ह्याच्याशी आमचा संबंध तरी काय ? हा विषय म्हणजे काहीही गहन, गूढ असे नाही; आणि तुमचा, माझा – प्रत्येकाचाच ह्या विषयाशी निकटचा संबंध आहे एवढेच मी ह्या प्रस्तावनेत प्रारंभी सांगून ठेवतो. विषयाचे नेमके स्वरूप आणि व्याप्ती आणि मानवी जीवनातील त्याचे महत्व ह्यासंबंधी येथे काहीही विस्तार करीत नाही, पुढील सारा ग्रंथप्रपंचच मुळी तेवढ्यासाठी आहे.

ह्या विषयावर मराठीत कै. वि. का राजवाडे ह्यांनी प्रसंगोपात्त काही स्फुट लेखन केले. पहिल्या प्रकरणानंतरच्या संदर्भग्रंथांचे यादीत शेवटी दिलेल्या कै. दत्तोपंत आपटे स्मारक ग्रंथातील कै. प्रा. श्री. व्यं. पुणतांबेकर, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, श्री. दि. वि. काळे इत्यादी विद्वानांचेही ह्या विषयाशी संबंधित असे लेख उल्लेखनीय आहेत. त्या यादीत निर्देशिलेल्या श्री. घाटे, व श्री. केतकर ह्यांच्या छोटेखानी पुस्तकातून ह्या विषयाच्या एखाद्या – दुसऱ्या अंगाची थोडीबहुत चर्चा आढळते. तथापि माझे हे पुस्तक म्हणजे ह्या विषयाचा संक्षिप्त पण सर्वांगीण आणि समग्र असा आढावा घेणारा मराठीतील पहिलाच प्रयत्न आहे हे नम्रपणे सांगू इच्छितो.

भारतात आणि महाराष्ट्रातही इतिहासाचे अध्ययन पुष्कळ चालते. निरनिराळ्या कालखंडांतील राजकीय आणि सामाजिक घडामोडींच्या तपशिलांचे संशोधन आणि संकलन भरपूर होत असते. पण इतिहास ह्या ज्ञानप्रकाराच्या मीमांसेत इथल्या अभ्यासकांना रस आहे असे दिसत नाही. इतर भारतीय भाषांतही इतिहासाची मूलगामी तात्त्विक चर्चा करणारे महत्वपूर्ण असे काही लेखन झाले नसावे अशी माझी समजूत आहे. काही भारतीय लेखकांनी ह्या विषयावर इंग्रजीत लिहिण्याचा थोडाफार उद्योग केलेला दिसतो, पण असे ग्रंथ मोजायला एका हाताची सगळी बोटे लागतील की नाही शंकाच आहे. अशा स्थितीत माझ्या पुस्तकाने दुसरे काहीही झाले नाही आणि हा एक महत्त्वाचा अभ्यासविषय आहे एवढी जाणीव जरी थोड्याबहुत प्रमाणात निर्माण झाली तरी माझ्या श्रमांचे सार्थक झाले असे मी मानीन.

प्रत्येक प्रकरणाचे खाली संदर्भसाहित्याची यादी आहे, त्यासंबंधी थोडा खुलासा करणे आवश्यक आहे. प्रत्येक प्रकरणाच्या मांडणीसाठी, तसेच काही मुद्यांसाठी अथवा तपशिलांसाठी ज्या ग्रंथांचा मुख्यतः उपयोग केला त्यांची यादी तेथे तेथे दिली आहे. त्या ग्रंथांतील सर्वच मते मला मान्य आहेत असा ह्याचा अर्थ होत नाही. संदर्भ-ग्रंथांची यादी परिपूर्ण आहे असे म्हणताच यायचे नाही. मी गेली सतरा–अठरा वर्षे हा विषय वाचीत आहे. स. प. कॉलेज, पुणे, फर्ग्युसन कॉलेज पुणे, डेक्कन कॉलेज, पुणे, राजाराम कॉलेज, कोल्हापूर, एल्फिन्स्टन कॉलेज मुंबई, पुणे विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ, एशियाटिक सोसायटी, मुंबई आणि मराठी विश्वकोश कार्यालय, वाई ह्या सर्वांच्या ग्रंथालयांचा मी उपयोग केला. शिवाय खाजगी रीत्याही काही पुस्तके मिळविली. महाराष्ट्रात ( आणि मला वाटते, ‘ भारतात ’ असे म्हणायलाही हरकत असू नये ) ह्या विषयाचा अभ्यास करू इच्छिणाऱ्याला आवश्यक ते सर्व संदर्भग्रंथ मिळणे अशक्यच आहे. Louis Gottschalk ने संपादिलेल्या Generalization in the Writing of History ह्या पुस्तकात १९४६ ते १९६३ ह्या काळात प्रसिद्ध झालेल्या ह्या विषयातील सुमारे एक हजार पुस्तकांची सूची आहे. कोणाही जिज्ञासूने त्यातील किती पुस्तके भारतातील सर्व ग्रंथालयांतून मिळून जमविता येतील ह्याची चौकशी करून पहावी म्हणजे माझ्या म्हणण्याचा आशय ध्यानी येईल. परंतु असे आहे म्हणून लिहूच नये किंवा लिहिले तर ते उथळच असेल असे मी म्हणणार नाही. अधिक वाचनाने अधिक फायदा होईल हे जरी साधारणतः मान्य केले तरी योग्य दृष्टी आणि विषयाची चांगली उमज असलेले अभ्यासक ह्या देशात जेवढे संदर्भसाहित्य उपलब्ध आहे तेवढे सगळे किंवा त्यातलेही निवडक ते वाचून दर्जेदार लेखन करू शकतील अशी माझी धारणा आहे.

निरनिराळ्या प्रकरणातून काही वेळा तेच तेच संदर्भग्रंथ पुन्हा पुन्हा उल्लेखावे लागले आहेत. प्रकरणवार संदर्भसाहित्य द्यायचे म्हणजे हे अटळच आहे. तसेच निरनिराळ्या इतिहासविषयक सिद्धांतांच्या मूळ प्रवर्तकांचे ग्रंथ संदर्भग्रंथांचे यादीत बहुधा घातलेले नाहीत. कारण Collingwood, Barnes, Cohen वगैरेंची जी सुटसुटीत संकलनात्मक पुस्तके दिली आहेत त्यातून त्या प्रवर्तकांच्या मूळ ग्रंथांची माहिती सहज मिळू शकते. कोणाही अभ्यासकाचे Buckle, Carlyle, Gobineau Hegel, Marx, वगैरेंचे ग्रंथ मुळातून पाहिल्याखेरीज भागणारच नाही. तेव्हा ते

यादीत समाविष्ट केलेले नाहीत म्हणजे त्यांचा उपयोग केलेला नाही, किंवा करण्याचे कारण नाही असे कुणी मानू नये.

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळाच्या अनुदानातून हा ग्रंथ प्रसिद्ध होत आहे. मंडळाने दिलेल्या साहाय्याबद्दल मी आभारी आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी ह्यांनी हस्तलिखित अत्यंत काळजीपूर्वक वाचून काही उपयुक्त सूचना केल्या. ह्याखेरीज ह्या ग्रंथाचे कामी अनेक लहान–थोर मंडळींनी विविध प्रकारे मदत केली. त्या सर्वांचे नामनिर्देश करून आभार मानणे शक्य नाही; आणि त्याची जरूरी तरी काय ? नावे छापून जगजाहीर केली नाहीत म्हणून कोणी रागावून बसतील एवढे का हे संबंध कृत्रिम आहेत ?

सदाशिव आठवले

वाई
२–१–६७

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ४१९४२ वि. निबंध
क्रमांक १७०१८ नोंद दि. १६।३।६८

# अनुक्रमणिका

प्रकरण १ ले :
अर्थ, प्रकार आणि व्याप्ती . . . १–२२
प्रकरण २ रे :
कालचक्र आणि ईश्वरी सूत्र . . . २३–४०
प्रकरण ३ रे :
वंशश्रेष्ठत्वाचा सिद्धांत . . . . ४१–६२
प्रकरण ४ थे :
राष्ट्रीय अवतारकार्यांचे तत्त्वज्ञान . . . ६३–७५
प्रकरण ५ वे :
इतिहासाचे भूगोलनिष्ठ विवरण . . . ७६–८८
प्रकरण ६ वे :
सामाजिक-सांस्कृतिक गतिनियम . . . ८९–१०७
प्रकरण ७ वे :
इतिहासाचा आर्थिक अन्वयार्थ . . . १०८–१२६
प्रकरण ८ वे :
महापुरुषाचे कर्तृत्व आणि इतिहास . . . १२७–१३९
प्रकरण ९ वे :
ऐतिहासिक स्थित्यंतरांचे वास्तव स्वरूप . . १४०–१५८
प्रकरण १० वे :
इतिहासाचे दुरुपयोग . . . . १५९–१८४
प्रकरण ११ वे :
इतिहासाचे उपयोग . . . . १८५–२०१
सूची . . . . . २०२–२११

प्रकरण १ ले

# अर्थ, प्रकार आणि व्याप्ती

दा. क्र. १५८७८

## इतिहाससंबंधी प्रश्नचिन्ह :

आपण सर्वांनी शाळेत इतिहास घोकला आहे. आपल्यापैकी काहींनी महाविद्यालयात त्याचे आणखी थोडे अध्ययन केले असेल. चंद्रगुप्त, अशोक, शिवाजी, अकबर, औरंगजेब, तात्या टोपे, झांशीची राणी अशा कित्येक भारतीयांबरोबरच सीझर, अलेक्झांडर, नेपोलियन, जॉर्ज वॉशिंग्टन, हिटलर, लेनिन अशा परकीयांशीही आपण ओळखी करून घेतल्या आहेत. ह्या व्यक्ती केव्हा, कुठे जन्मल्या आणि मेल्या आणि त्यांनी कोणती कार्ये केली ह्याबाबतचे काही तपशील आपण पाठ केलेले आहेत. पानिपतचा संग्राम, अठराशे सत्तावनचा उठाव, फ्रेंच राज्यक्रांती, वॉटर्लूची लढाई अशा भारताच्या आणि भारताबाहेरील जगाच्या इतिहासातील काही घटनांची कारणे आणि परिणामही आपण मुखोद्गत केले आहेत. विद्यार्थीदशा संपल्यानंतरही काहींनी इतिहास वाचण्याचा छंद ठेवला असेल. ऐतिहासिक कादंबऱ्या, नाटके आणि चित्रपट ह्यांतूनही तो इतिहास पुन्हा पुन्हा आपल्याला धडकी देत असतो. मधेच केव्हातरी एखादा पुढारी व्याख्यानातून आपल्याला इतिहासाची आठवण देतो, “उठा, जागृत व्हा, तुमचा इतिहास तुम्हाला काय सांगतो आहे ? आपल्या थोर पूर्वजांचे स्मरण करा, त्यांच्यापासून स्फूर्ती घ्या आणि कामाला लागा.” इथे इतिहास नुसते तपशील नव्हे तर काही संदेश घेऊन येताना दिसतो.

परंतु कधीकधी कुणी “काय करायच्या आहेत त्या जुन्या पुराण्या गोष्टी ?” असा खणखणीत सवालही टाकीत असतात. इतिहास म्हणजे भूतकाळ, होऊन गेलेल्या गोष्टी. तेव्हा मुळातच असा प्रश्न विचारता येईल की त्या जुन्या पुराण्या हकीकती आम्हाला काय करावयाच्या आहेत ? आपला काय संबंध त्यांच्याशी ? आपल्या आजच्या जीवनाचे प्रश्न सोडवायला त्यांचा काही उपयोग होणार आहे का ? असल्यास तो किती आणि कसा ? आपल्या भूतकालाचे ज्ञान नसेल तर माणसाचे काही अडून राहील काय ?

वरील मूलभूत प्रश्नांची उत्तरे शोधणे भाग आहे. त्यासाठी माणसाचा इतका पिच्छा पुरविणारा तो इतिहास आहे तरी कोण आणि कसा हे आधी जाणून घ्यावे

लागेल. इतिहास म्हणजे काय आणि तो कशासाठी ह्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे हाती लागतीलच असे नाही. पण निदान ती आपल्याला शोधावयाची आहेत ह्याची जाणीव झाली पाहिजे. त्यासाठी योग्य दिशेने आणि योग्य पद्धतीने चिंतन व्हायला हवे. अशा चिंतनाला काही साहाय्य व्हावे एवढ्यासाठीच हा ग्रंथप्रपंच आहे.

**इतिहास : व्याख्या आणि विषयस्वरूप :**

इतिहासाविषयी बोलताना त्यात बोलणाराचा इतिहासविषयक दृष्टिकोन कळत न कळत कमी अधिक प्रमाणात येतच असतो. म्हणून "इतिहासावाचून मानवी जीवनाचा विचार करणे अशक्य" अशा शब्दात त्याची अपरिहार्यता सांगण्यापासून तर "इतिहास हे एक थोतांड आहे" म्हणून तो झटकून टाकण्यापर्यंतचे सर्व प्रकारचे अभिप्राय या विषयाबाबत देण्यात आलेले आहेत.

इतिहासाची व्याख्या करताना आपली तद्विषयक भूमिका त्या संदर्भात मुळीच न आणता अधिकात अधिक वस्तुनिष्ठ व्याख्या कशी करता येईल ते पाहिले पाहिजे. त्या दृष्टीने इतिहास या संस्कृत शब्दाचा व्युत्पत्तिसिद्ध अर्थ जो आहे तो स्वयंपूर्ण आहे, 'इति ह आस' म्हणजे 'असे झाले, याप्रमाणे घडले'. यात घडलेल्या सर्व गोष्टी आल्या, आणि अर्थात त्या घडल्या तशाच सांगितल्या गेल्या हेही इथे अभिप्रेत आहे. जे घडले ते सर्वच्या सर्व इतिहासाच्या कक्षेत न घेतल्यामुळे 'इतिहास म्हणजे भूतकालीन राजकारण' अशा प्रकारच्या संकुचित व्याख्या निर्माण होतात. भूतकालात राजकीय व्यवहार होताच, पण त्याबरोबर विविध प्रकारचे इतर सामाजिक व्यवहारही होते. एखाद्या कालखंडाचा इतिहास म्हणजे त्या कालातील मानवी जीवनाच्या सर्व अंगांचा आढावा असाच अर्थ झाला पाहिजे. जे जे घडले ते सर्वच इतिहास आहे. त्यातले आपल्याला काय हवे आहे या विचाराने घटनांची निवड करता येते, केलीही जाते. परंतु तसे करीत असताना आपण काय करीत आहोत याची नीट कल्पना पाहिजे. आपण ज्याचा आढावा घेत आहोत तो भूतकालीन जीवनाचा केवळ एक भाग आहे याची स्पष्ट जाणीव पाहिजे.

या मुद्याबाबत जॉन हरमन रँडॉल या अमेरिकन तत्त्ववेत्त्याने आपल्या 'Nature And Historical Experience' या पुस्तकात व्यक्त केलेल्या काही विचारांची मुद्दाम दखल घेणे आवश्यक आहे. तो म्हणतो. " मला पुष्कळदा असा प्रश्न पडतो की, सर्वसाधारणपणे इतिहास अशी काही वस्तु आहे का? माझी तर खात्री झालेली आहे की तशी काही चीज नाही. आमच्या महाविद्यालयांतून व विद्यापीठांतून इतिहासविभाग का असावेत व इतिहासाचे प्राध्यापक म्हणून ओळखली

जाणारी मंडळी तरी का असावीत याला चांगलेसे कारण देता येत नाही. अर्थात हे प्राध्यापक जे काही सांगतात त्यातून मला पुष्कळ मिळते, ही गोष्ट वेगळी. तथापि कोणत्याही शास्त्रशुद्ध पायावर उभ्या असलेल्या विद्याकेंद्रात वेगळ्या आणि स्वतंत्र इतिहासविभागाला जागा दिसत नाही. प्रत्येक ज्ञानशाखेला त्या त्या शाखेच्या इतिहासाची जरूरी आहे एवढेच. म्हणूनच इतिहासात काय यावे हा प्रश्नच माझ्या मते निरर्थक आहे. इतिहास हा नेहमी कशाचा तरी इतिहास असतो. ''

रँडॉलचे वरील मत मान्य करूनही हे लक्षात घेतले पाहिजे की कोणी अभ्यासकांनी विशिष्ट कालखंडातील जीवनाच्या सर्व अंगोपांगांचे ज्ञान करून घेतले असेल तर तें निरुपयोगीच झाले असे समजण्याचे कारण नाही. किंबहुना राज्यशास्त्र अभ्यासणारा केवळ राजकीय संस्थांचा इतिहास जाणीत असेल, कलाकौशल्यात रस घेणारा कलेचा इतिहास पहात असेल, अर्थशास्त्राशी संबंध ठेवणारा केवळ आर्थिक इतिहास पहात असेल तर या सर्वांना त्यांच्या क्षेत्रांना भिडणारी इतर क्षेत्रे कशी होती, त्यांचा परस्परांवर काय परिणाम होत होता व त्या विशिष्ट कालखंडात जीवनाचे सम्यक स्वरूप काय होते हे दाखविणारा एखादा अभ्यासक पाहिजे. तेव्हा इतिहासाचा प्राध्यापक किंवा इतिहासाचा विभाग ही एक विद्यापीठातील अडगळ आहे असे रँडॉलप्रमाणे मानण्याचे काही कारण दिसत नाही. त्याच्या निवेदनातून आपण फार तर एवढेच शिकू शकतो की सर्वांगिण इतिहासाचे अध्ययन करणारा हा प्रथमदर्शनी वाटेल तितका सर्वज्ञ नसतो, असूच शकणार नाही. तथापि ही मर्यादा मान्य केल्यानंतर सर्वसाधारण इतिहासाचा अभ्यास म्हणजे भूतकालीन जीवनातील घडामोडींचा सर्वांगीण अभ्यास ही एक ज्ञानाच्या क्षेत्रातील उपयुक्त आणि अटळ अशी बाजू आहे हे लक्षात घ्यावे.

इतिहासाच्या व्याख्येत 'असे असे झाले' असे मोघमपणे म्हटले तरी काय झाले व कसे झाले हे सांगणारा अभ्यासक त्या घटनांकडे पहाण्याची आपली दृष्टी त्यात थोडीबहुत आणणारच. काही अज्ञान, काही पूर्वग्रह व काही प्रमाणात भूतकालातील विचार व भावना समजण्याची माणसाची असमर्थतता यामुळे इतिहास-कथन हे खरोखरी अगदी जसे घडले तसेच्या तसे सांगितले अशा स्वरूपाचे होईल हे शक्य दिसत नाही. तथापि आदर्श स्वरूपात इतिहास म्हणजे काय, असा प्रश्न उपस्थित केल्यास जे घडले ते तसेच्या तसे सांगणे आणि जे घडले ते सर्व सांगणे असाच करावा लागेल.

## घटनांची निवड :

मात्र या आदर्शाचा फार काटेकोर अर्थ लावला तर इतिहासकथन अशक्य आहे अशी परिस्थिती दिसू लागेल. भूतकालातील सर्वच्या सर्व गोष्टी सांगणे म्हणजे

काय ? ते कसे शक्य होईल ? इतिहासात सगळेच येते. अभ्यासकाने आपल्याला काय पाहिजे ते ठरवावे लागते. अन्यथा इतिहास शब्दाला काही अर्थच उरणार नाही. १७६१ मध्ये काय घडले ? ह्या साली पानिपतावर मराठ्यांचा पराभव झाला. हा त्या वर्षीचा इतिहास असे आपण म्हणतो. पण ह्यावेळी आपण किती मर्यादित स्वरूपात हे विधान करीत आहोत हे पाहणे मोठे मनोरंजक होईल. भारताबाहेरच्या जगात त्या वर्षी असंख्य लहानमोठ्या घटना घडल्या. त्यांचा आपण विचार केला नाही. भारतातही अनेक ठिकाणी अनेक प्रकार त्या वर्षी झाले, तेही आपण लक्षात घेतले नाहीत. आपण पानिपत ह्या नावाच्या गावी मराठे आणि गिलचे ह्या दोन पक्षात झालेले युद्धच तेवढे निवडून घेतले. तेव्हा १७६१ साली पानिपत झाले ह्याचा खरा अर्थ असा की आपण इथे इतिहास म्हणजे भारताचा इतिहास, त्यातही महाराष्ट्राचा इतिहास, तो सुद्धा केवळ राजकीय इतिहास, आणि त्यातही सत्तास्पर्धेचे राजकारण अशा प्रकारे संकुचित होत होत आपली दृष्टी एका निश्चित व मर्यादित भागावरच स्थिर करीत आहोत. असे केल्याखेरीज गत्यंतरच नसते. अभ्यासविषयाच्या अनुरोधाने घटना निवडून बाजूला घ्याव्या लागतात. अठराव्या शतकातील गुजराथचा आर्थिक इतिहास पहावयाचा असेल तर तिसऱ्या शतकातील रोमच्या साम्राज्याची पाहणी करण्याचे कारण नाही आणि बंगाली वाङ्मयाच्या इतिहासाचा अभ्यास करताना प्राचीन मिसरमधील धर्मसंस्थेचा इतिहास जाणून घ्यायला नको. सर्वच्या सर्व घटना सांगायच्या म्हटल्यास एखाद्या विशिष्ट ठिकाणचा एखाद्या तासाचाही सबंध इतिहास लिहिता येणार नाही. तेव्हा आपण जेव्हा अमुक कालखंडातील अमुक मानवी समाजाचा समग्र इतिहास असे म्हणतो त्यावेळी तेथे घटनांची व प्रसंगांची काही एक निवड आपण केलेलीच असते. आणि निवड करावयाची म्हटल्यानंतर निवड करणाराचा नीरक्षीरविवेक त्यात आलाच. म्हणून जोपर्यंत भूतकालाचे कथन एखादा माणूसच करीत आहे तोपर्यंत त्याने केलेल्या घटनांच्या निवडीत आणि त्याच्या कथनात त्या माणसाची आवड व दृष्टी अभावितपणे येणारच. तेव्हा इतिहास म्हणजे भूतकालात जे जे घडले त्या सर्वांची हकीकत ही व्याख्या आदर्श म्हणून ठीक असली तरी इतिहास-लेखनाच्या, इतिहासकथनाच्या व्यवहारात त्या आदर्शाला फारसा अर्थ उरणार नाही.

तथापि, इतिहासाच्या अभ्यासकाने इतिहास म्हणजे जे जे घडले त्या सर्वांचा प्रामाणिक वृत्तान्त अशा शास्त्रशुद्ध व्याख्येपासूनच सुरुवात केली पाहिजे. आणि त्यानंतर जरूरीप्रमाणे आपले अभ्यासक्षेत्र संकुचित करावयास काहीच प्रत्यवाय नसावा.

मानवप्राण्याची ज्ञानजिज्ञासा इतकी विलक्षण आहे की पुष्कळदा कारण नसताना म्हणजे दैनंदिन जीवनात प्रत्यक्ष उपयोग होण्यासारखा नसतानासुद्धा तो

एखाद्या विषयात रस घेऊन त्याचा पाठपुरावा करीत असतो. तथापि बहुधा माणसाचे सर्व ज्ञानविषयक प्रयत्न हे कोणत्या ना कोणत्या उपयोगाच्या विचारातूनच निर्माण होऊन वाढीस लागलेले आहेत. इतिहासापुरते बोलावयाचे तर क्वचित केवळ आपल्या कुतूहलाच्या मागोव्याने माणूस प्राचीन काळची माहिती जमवीत आला असला तरी पुष्कळदा त्या प्राचीन काळच्या माहितीच्या आधाराने आपल्याला वर्तमानकाळी किंवा भविष्यकाळात आपले किंवा आपल्या समाजाचे काही कल्याण साधता येईल हीच प्रेरणा असते.

माणूस इतिहासाचा विचार करतो तेव्हा त्याचे लक्ष्य मानव हेच असते. माणसाप्रमाणे एखाद्या हत्तीला, वृक्षाला किंवा दगडालाही वाच्यार्थाने भूतकाळ आहेच. प्राणिशास्त्रज्ञाचे दृष्टीने हत्तीचा इतिहास, वनस्पतिशास्त्रज्ञाचे दृष्टीने वृक्षाचा भूतकाळ आणि भूस्तरशास्त्रज्ञाचे दृष्टीने दगडाचे जुने स्वरूप ह्याही गोष्टी अर्थपूर्ण आहेत. तथापि जेव्हा इतिहास विषयाचा ती एक ज्ञानशाखा म्हणन विचार होतो तेव्हा अभ्यासविषय म्हणून मनुष्यप्राणीच अभिप्रेत असतो. जीवनपद्धतीत प्रयत्नपूर्वक आणि जाणीवपूर्वक होत जाणारी स्थित्यंतरे ही फक्त मानवाचे बाबतीतच शक्य आहेत. मानवसमाज कोठल्या तरी विशिष्ट भौगोलिक स्थितीत रहातो. विशिष्ट भौगोलिक वातावरण निवडणे किंवा आपल्याला पाहिजे तसे बदलून घेणे हे नेहमीच माणसाच्या हातात असते असे नाही. त्याच प्रमाणे तो काही एका विशिष्ट सामाजिक वातावरणात असतो. हे वातावरण त्याच्यासाठी त्याच्या पूर्वीच्या पिढ्यांनी व काही अंशी त्याच्या तत्कालीनांनीही निर्माण करून ठेवलेले असते. ह्या नैसर्गिक आणि सांस्कृतिक परिस्थितीत तो काही एका प्रकारे वागतो. अस्तित्वात आहे त्याहून निराळी स्थिती आपण निर्माण करू शकलो तर आपणास अधिक सुखसमृद्धी मिळेल अशा काही कल्पनेने, गणिताने व आशेने तो धडपडत रहातो. ह्या धडपडीतूनच इतिहास निर्माण होतो. ह्या प्रयत्नात विजय असतात, पराजय असतात, हे सर्व यशापयश म्हणजे इतिहास.

## इतिहासाचे प्रकार :

वर म्हटल्याप्रमाणे इतिहासात रस घेणारा, मग तो इतिहासाचा लेखक असो किंवा नुसता वाचक असो, हा कोणत्या ना कोणत्या विशिष्ट हेतूने प्रेरित झालेला असतो व त्यानुसार विशिष्ट दृष्टीने भूतकाळाकडे पहात असतो व म्हणूनच इतिहासाचे असंख्य प्रकार पडतात.

आजपर्यंत झालेल्या एकंदर इतिहासलेखनाची पहाणी केली तर बरीचशी इतिहासावरील पुस्तके राजकीय इतिहास सांगणारी आहेत. इतिहास म्हणजे एक

राजा मरून किंवा पदच्युत होऊन दुसरा गादीवर येणे, युद्ध किंवा अंतर्गत बंडाळी होऊन सत्तांतर होणे, एखादा प्रदेश दुसऱ्या एखाद्या प्रादेशिक सत्तेच्या अंमलाखाली जाणे, दोन सत्तात किंवा दोन सत्तासंघांत युद्धे होणे इत्यादी स्वरूपाच्या राज्यविषयक आणि शासनविषयक घडामोडी असे मानले जाई. अजूनही पुष्कळ लोक तसेच मानताना दिसतात. सीलीसारख्या काही इंग्रज इतिहासकारांनीही इतिहास म्हणजे राजकीय इतिहासच अशी ठाम भूमिका घेतलेली होती.

मात्र ट्रेव्हेलियनसारख्या इंग्रज इतिहासकारांनी वरील भूमिका अमान्य केली. इतिहासातून राजकीय इतिहासाचा भाग जाणूनबुजून वगळून इतिहासलेखनात एक प्रकारे बंडच करण्याची जरूरी आहे असे त्याने सांगितले. राजकीय इतिहास इतका सांगितला गेला आहे आणि सांगितला जात आहे की, त्यावर उतारा म्हणून राजकीय बाजू अजिबात, किंवा जमेल तितकी जास्तीत जास्त टाळून फक्त सामाजिक इतिहास देण्याचा चंग त्याने बांधला.

सामाजिक इतिहास म्हणजे मानवसमाजाच्या दैनंदिन जीवनपद्धतीचा इतिहास. विशिष्ट व्यवसाय करणारा, विशिष्ट वर्गातला किंवा जातीतला, विशिष्ट धर्मपंथाच्या तत्त्वाप्रमाणे वागणारा किंवा निदान वागण्याचा प्रयत्न करणारा, विशिष्ट भाषा किंवा पोटभाषा बोलणारा, काही एका प्रकारचे खेळ खेळणारा व विशिष्ट प्रकारांनी वैयक्तिक व सामुदायिकरीत्या मनोरंजन करून घेणारा माणूस हा फक्त अमुक राज्याचा नागरिक आहे एवढे सांगितल्याने त्याची ओळख कशी पटेल ? इ. स. च्या दुसऱ्या शतकातील काही वर्षे सीझर सम्राटाच्या आधिपत्याखाली रोमचे नागरिक रहात होते आणि त्याच काळी भारताच्या काही भागातील नागरिक गुप्त सम्राटाच्या सत्तेखाली जगत होते एवढे सांगितल्याने त्याकाळच्या रोमच्या व भारतीय नागरिकांच्या जीवनात काय फरक होता ह्यावर काहीही प्रकाश पडत नाही. दुसऱ्या शतकातील रोमचा रहिवासी व पाटलीपुत्राचा रहिवासी ह्यांच्यात जो फरक आहे तो त्या प्रत्येकावर कुणाची शासकीय हुकमत होती हे सांगून मुळीच समजणार नाही. त्याचप्रमाणे सत्तांतर झाले तरीही दैनंदिन जीवनपद्धतीत फरक पडेलच असे नाही. अलेक्झांडरच्या स्वारीनंतर भारताच्या काही भागांत ग्रीकांची सत्ता स्थापन होऊन पुढे अनेक शतके टिकलीही. तथापि त्या भागांतील भारताचा नागरिक ग्रीक झाला नाही. हिंदु, बौद्ध, ग्रीक, मुसलमान, इंग्रज असे अनेक सत्ताधीश येथे होऊन गेले पण भारतीय नागरिकाच्या देवदेवता, पूजासमारंभ, सणवार इत्यादी कित्येक गोष्टी राज्यकर्त्यांनुसार बदलल्या असे झाले नाही. त्या शतकानुशतके जशाच्या तशा चालू राहिल्या. काही काही बाबतीत तर वाटल्यास राज्यकर्त्यांनी बदलावे, पण आम्ही बदलणार नाही असे

जणू आव्हानच भारतीय समाजाने दिलेले आहे. म्हणून राजकीय सत्तेपेक्षा अधिक खोल रुजलेल्या, कितीतरी अधिक प्रमाणात कायम स्वरूपाच्या आणि दैनंदिन जीवनात कितीतरी अधिक जिव्हाळ्याच्या अशा गोष्टी कमी लेखून फक्त अमुक राजा गादीवर आला, त्याने वीस वर्षे राज्य केले, तो वारला; त्याचेमागून त्याचा मुलगा तमुक हा गादीवर आला . . . . अशा तऱ्हेचे इतिहासकथन केल्याने काय मिळणार ? प्राचीन काल म्हणजे प्राचीन कालातील जीवन समजून घ्यावयाचे असेल तर ते सर्वांगांनी जाणले पाहिजे आणि म्हणूनच इतिहास म्हणजे सर्वसामान्य माणसाचा इतिहास, तो सर्वसामान्य माणूस ज्या एका समाजाचा घटक असेल त्या समाजाचा इतिहास, अशी भूमिका घेणे प्राप्त आहे.

मात्र ह्याचा अर्थ असा नव्हे की राजकीय इतिहास हा निरर्थक आहे. कोणत्याही समाजाचे शासन हे व्हावेच लागते. शासनाची पद्धती राजेशाही असो, मर्यादित राजेशाही असो, सैनिकशाही असो की विशुद्ध लोकशाही असो; कायदा आणि सुव्यवस्था ह्यासाठी काहीतरी एक प्रबल आणि कर्तुमकर्तुम सत्ता असलेली यंत्रणा असल्याखेरीज कोणताही समाज सुरळीतपणे चालणे व टिकून रहाणे अशक्य आहे. इतक्या महत्त्वाची जी राज्यसंस्था तिचा इतिहास अगदी निरूपयोगी कसा होईल ? राज्यसंस्था ही काही प्रमाणात समाजजीवनाचेच प्रतिबिंब असते. एखाद्या समाजात विशिष्ट काळी राजसत्ता होती आणि ती अमर्याद होती ह्याचा अर्थच असा की त्या समाजाला त्या काळी अमर्याद राजसत्ता हा शासनाचा प्रकार मान्य होता. तेव्हा राज्यसत्तेविषयी ती किती क्रूर व जुलमी होती वगैरे जे तपशील आपण जमवू ते एका अर्थाने त्या समाजाचाही इतिहास सांगतातच. त्यावेळी समाज किती सोशिक किंवा नेभळा आणि सत्त्वहीन होता ह्याचा तो एक पुरावाच होय. लोकांनी बंड करून जुलूम जबरदस्ती करणाऱ्या राजाला पदच्युत केले आणि दुसऱ्या कोणाला तरी गादीवर बसवले हा कथाभाग म्हणजे केवळ राजकीय इतिहास नव्हे, आणि सोईसाठी जरी त्याला तसे नाव दिले तरी समाज समजण्याचे दृष्टीने तो निरुपयोगी तर खासच नव्हे. लोकांनी बंड केले ह्याचा अर्थ त्या समाजात काही नवी प्रेरणा आली, नवी शक्ती आली, कार्यक्षम अशी संघटना निर्माण झाली आणि नवीन राजा गादीवर आणून आपल्याला कोणत्या तऱ्हेचा राज्यकारभार हवा हे त्या समाजाने स्वतःच्या हिंमतीवर दाखवून दिले. ह्या इतिहासभागाचे स्वरूप बाह्यतः एक सत्ता जाऊन दुसरी आली एवढेच असले तरी त्या स्थित्यंतरामागील घटना लोकांचा, समाजाचा इतिहास सांगतात.

राजकीय इतिहासाचे सोयीप्रमाणे आणखी पुष्कळ पोटभेद पाडता येतील. घटनात्मक इतिहास हा एक इतिहासाभ्यासकांना विशेष आकर्षित करणारा प्रकार आहे. ज्या नियमांप्रमाणे व रूढींप्रमाणे एखाद्या प्रदेशाची शासनव्यवस्था चालते ते

नियम व रूढी कोठून आले व कसे बदलत गेले, त्याचप्रमाणे त्या शासनव्यवस्थेची निरनिराळी अंगे कशी उद्भवली व कशी वाढीस लागली, कोणत्या प्रकारे बदलत गेली ह्या सर्व गोष्टींचा आढावा घटनात्मक इतिहासात घेतला जातो. पुष्कळदा राजकीय इतिहास व्यक्तिचरित्रांच्या स्वरूपात कथन केला जातो. ज्या व्यक्तींनी इतिहास घडविला किंवा समाजाने घडविलेला बदल ज्या व्यक्तींच्या हस्ते मूर्त स्वरूपात आला अशा व्यक्तींच्या जीवनचरित्रांच्या मागोव्याने घटना सुसूत्रपणे सांगता येतात. काही असले तरी घटनात्मक इतिहास काय, व्यक्तिचरित्रे काय किंवा राजकीय इतिहासाची आणखी एखादी तऱ्हा काय, सबंध राजकीय इतिहासच सामाजिक इतिहासाचा म्हणजे माणसाच्या संपूर्ण जीवनेतिहासाचा एक भाग आहे ही दृष्टी असली म्हणजे राजकीय इतिहास हा निरुपयोगी तर नाहीच पण संकुचितही होण्याचे कारण नाही. सामाजिक जीवनाच्या निवडून घेतलेल्या एका भागाचा तो इतिहास होईल इतकेच, आणि तसे करणे आवश्यकच असते.

एकंदर सामाजिक इतिहासातून कोणताही एक लहानसा भाग वेगळा काढून त्याचा इतिहास सांगणे शक्य असते. त्या समाजातील शेती, उद्योगधंदे वगैरे स्वरूपाचे उत्पादन व त्याचा विनियोग ह्याचा आढावा घेणारा आर्थिक इतिहास, कुटुंबसंस्थेचा इतिहास, त्या समाजातील शिक्षणपद्धतींचा इतिहास, धर्मपंथांचा इतिहास, चाली-रीतींचा इतिहास– जीवनाची कोणती ना कोणती बाजू उकलून दाखविणाऱ्या कोणत्याही अंगाचा इतिहास देता येईल. तो समाज जे वाङ्मय निर्माण करतो; चित्रकला, शिल्पकला, संगीत इत्यादी प्रकारच्या कलाक्षेत्रात जे मिळवितो, निरनिराळ्या शास्त्रांचा जो अभ्यास करतो त्या सर्व क्षेत्रांपैकी कोणत्याही एका भागाचा इतिहास निवेदन करणे शक्य आहे. वर्ण्य विषयाच्या अनुरोधाने त्याला सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक किंवा वैचारिक इतिहास असे म्हणण्यात येते. ही केवळ सोयीची बाब आहे. माणसाचे राजकीय जीवन आणि त्याचे सामाजिक किंवा धार्मिक जीवन ह्यामध्ये हवाबंद आणि अपारदर्शक अशी तटबंदी नसते. दुसऱ्या बाजूकडे न डोकावता माणसाची एक बाजू समजेल हे अशक्यच आहे. इतिहासाचा प्रकार ही केवळ अध्य-यनाची व्यवस्था आहे. म्हणूनच इतिहासकथनाचे क्षेत्र मर्यादित केले आणि दिशा ठरवून घेतली तरी कोणत्याही प्रकारच्या इतिहासात दृष्टी संकुचित होण्याचे काहीच कारण नाही.

**प्रादेशिक आणि सांस्कृतिक क्षेत्रे :**

समाज आणि त्याचा इतिहास हे शब्दप्रयोग वापरताना समाज म्हणजे तो निश्चित कोणता; सबंध मानवी समाज की त्याचा कोणता तरी एक विभाग, आणि

एखादाच विभाग वेगळा पाडून घेतला असेल तर तो कोणत्या तत्त्वावर हे सर्व स्पष्ट असले पाहिजे. समाज ह्याचा अर्थ मानवसमाज, सगळी मानवजात असा होऊ शकेल. तसे धरून जागतिक इतिहास किंवा मानवेतिहास, मानवजातीच्या प्रारंभापासून आजतागायत मानवाने केलेल्या वाटचालीचे प्रवासवर्णन, लिहिण्याचे अनेक प्रयत्न झालेले आहेत. तथापि बहुधा इतिहास म्हणजे कोणत्या तरी एखाद्या लहानशा मानव-गटाचा इतिहास असे कल्पूनच लेखन केले जाते. 'भारताचा इतिहास,' 'महाराष्ट्राचा इतिहास,' '.ज्यू लोकांचा इतिहास,' 'पारशी समाजाचा इतिहास,' अशा तऱ्हेच्या इतिहासाभ्यासात एक लहानसे प्रादेशिक किंवा सांस्कृतिक क्षेत्र निवडलेले असते. एखादे प्रादेशिक क्षेत्र, विशेषतः राष्ट्र, हे अभ्यासविषय घेऊन इतिहासकथन करणे हा ह्यांपैकी सर्वांत लोकप्रिय असा प्रकार आहे. एका राष्ट्राप्रमाणेच एकमेका-जवळ असलेली दोनचार राष्ट्रे, एखादे खंड असे अधिक विस्तृत क्षेत्रही घेता येईल; किंवा राष्ट्रातील एखादा लहानसा प्रांत, जिल्हा किंवा गाव असे अगदी लहान क्षेत्रही निवडता येईल.

इतिहासलेखनासाठी निवडलेला असा प्रदेश हा इतिहासलेखकाच्या आणि त्याच्या वाचकाच्या विशिष्ट गरजेतून आणि विशिष्ट मनोभूमिकेतून निर्माण होत असतो. आजच्या संस्कृतीत राष्ट्र हे एक निष्ठास्थान आहे. राष्ट्रीयता हे एक मूल्य आहे. आणि म्हणूनच राष्ट्रीय इतिहासात रस निर्माण होतो. अशा इतिहासामागे सद्यःकालीन भावना हीच प्रबल असते. पाकिस्तानचा भूतकाल असे जेव्हा म्हटले जाते तेव्हा पाकिस्तान म्हणून आज अस्तित्वात असलेला प्रदेश पायाभूत मानण्यात येतो आणि त्या प्रदेशात मानवसंस्कृतीच्या प्रारंभापासून आजतागायत जे जे घडले ते सर्व पाकिस्तानच्या इतिहासात म्हणून जमा होते. १९४७ पूर्वी जेव्हा पाकिस्तान अस्तित्वात नव्हते तेव्हा फक्त भारताचा इतिहास सांगण्यात येत होता आणि पाच हजार वर्षांपूर्वी होऊन गेलेली मोहेंजदडो संस्कृती भारताच्या इतिहासातील पहिले प्रकरण म्हणून वर्णिली जात होती. भारताच्या फाळणीने पाकिस्तान हे नवे राष्ट्र १९४७ मध्ये निर्माण झाले. ताबडतोब त्याला अतिप्राचीन इतिहास प्राप्त झाला. मोहेंजदडो हे गाव आणि तेथील उत्खनन पाकिस्तानी हद्दीत गेल्यामुळे ती संस्कृती म्हणजे पाकिस्तानचाच पूर्वेतिहास झाला आणि प्रसिद्ध पुरातत्त्ववेत्ता डब्ल्यू. एच्. व्हीलर हा मोहेंजदडोवरील आपल्या पुस्तकाला 'पाकिस्तानची ५००० वर्षे' असे नाव देऊन मोकळा झाला! ह्याच राष्ट्रीय भावनेतून इंग्लंडचा इतिहास, जर्मनीचा इतिहास, रशियाचा इतिहास आणि भारताचा इतिहास अशा प्रकारची इतिहास-पुस्तके तयार होतात. ह्यात इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स, रशिया वगैरे देशांच्या आजच्या चतुःसीमा लक्षात घेऊन ह्या प्रदेशात पूर्वी होऊन गेलेले सर्व काही आपलाच वारसा

म्हणून सांगितले जाते. एखादा देश आज स्वतंत्र राष्ट्र म्हणून अस्तित्त्वात असला तरी काही काळापूर्वी तशा राष्ट्रीयत्वाच्या जाणीवेने तो अस्तित्वात नसेलही हे लक्षात घेतले जात नाही.

राष्ट्रीयत्वाप्रमाणेच इतरही काही सांप्रतच्या मूल्यांच्या व निष्ठांच्या मागोव्याने इतिहासकथन करण्याचे प्रकार होत असतात. ह्या निरनिराळ्या प्रकारच्या स्वाभिमानांच्या प्रेरणेतून जे इतिहास निर्माण होतात त्यांचे स्वरूप बहुधा त्या स्वाभिमानाने निश्चित केलेले असते –भूतकालीन वस्तुस्थितीने नव्हे– हे लक्षात घेतले पाहिजे. म्हणूनच जातींचे इतिहास, धर्मांचे इतिहास, राष्ट्रांतर्गत लहान लहान प्रदेशांचेही इतिहास निर्माण होतात.

**स्वाभिमानमूलक इतिहास :**

इतिहासाचे क्षेत्र जेव्हा कथनाच्या सोयीसाठी मर्यादित केले जाते तेव्हा तो इतिहास सदोष होण्याची फारशी भीती नसते. इतिहासलेखकाला जेव्हा आपण काय लिहितो आहो ह्याची स्वच्छ जाणीव असते आणि तशा जाणीवेने जेव्हा तो आपल्या कथनाला मर्यादा घालतो तेव्हा फारसा घोटाळा होण्याचा संभव नसतो. पाकिस्तानचा एखादा इतिहासकार जेव्हा असे म्हणेल की आज पाकिस्तान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशात मानवाच्या आरंभापासून आजतागायत काय काय घडले एवढेच मी सांगतो आहे त्यावेळी तो इतिहास सदोष होऊ शकत नाही. त्याचप्रमाणे महाराष्ट्राचा इतिहास लिहिणारा जेव्हा अशी स्पष्ट भूमिका घेतो की, आज महाराष्ट्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भूभागात, भारतीय संघराज्यांपकी ह्या एक राज्यात पूर्वीपासून जे जे जसेजसे घडले ते ते मी तसेतसे सांगणार आहे तेव्हा तशा प्रकारच्या कथनाला कोणतीही हरकत असू नये. परंतु पुष्कळदा पाकिस्तानचा इतिहासकार किंवा महाराष्ट्राचा इतिहासकार आपल्या प्रदेशाचा इतिहास लिहावयास बसतो तेव्हा त्याने ह्या इतिहासापासून स्वकीयांत अभिमान जागृत करावयाचा आहे असे काही हेतू उराशी बाळगलेले असतात. साहजिकच ते इतिहासकथन सदोष आणि असत्य होऊ लागते. कारण सत्यकथन हे ध्येयच संपलेले असते आणि जागृती, स्वाभिमानाची जाणीव देणे वगैरे भलत्याच गोष्टी इतिहासकथनाच्या बौद्धिक, शास्त्रीय क्षेत्रात शिरलेल्या असतात.

तेव्हा अमुक भावना जोपासणारा, तमुक वृत्तीची वाढ करणारा, काही विशिष्ट प्रकारच्या कार्यास उत्तेजन देणारा, काही एका दृष्टिकोनाने एखाद्या ऐतिहासिक व्यक्तीच्या कार्याचे अथवा ऐतिहासिक घटनेचे खंडन अथवा मंडन करणारा अशा तऱ्हेचे इतिहासात प्रकारच असू शकत नाहीत. अशा तऱ्हेने इतिहास लिहिले जातात.

स्वाभिमानातून निर्माण झालेले इतिहास असे त्यांचे कौतुकही केले जाते. परंतु स्वाभिमानासाठी इतिहास नाही. कारण इथे काही मूलभूत प्रश्न विचारावे लागतील. स्वाभिमानातील 'स्व' म्हणजे कोण ? मी एकटा की माझे कुटुंब, की माझी जात ? माझा धर्म की माझा देश ? सोयीप्रमाणे 'स्व' ची व्याख्या होते आणि त्याच्या अनुरोधाने इतिहासाची जुळवाजुळव करून विशिष्ट समाज चेतविला जातो. हे निंद्य आहे, भयंकर आहे. 'स्व' म्हणजे माझी ब्राह्मण जात, मग इतिहासकाळी ब्राह्मणांनी केलेल्या चार चांगल्या गोष्टी घोकायच्या आणि चार हजार पापे झाकायची. तसेच 'स्व' म्हणजे स्वदेश म्हणजे भारत म्हणायचे, भारतात अशोक, अकबर, शिवाजी अशा तीन चार राजांनी लोककल्याण साधले तर तीन चार हजार हुकूमशहांनी अमानुष अत्याचार केले, असा इतिहास आहे. पण स्वाभिमान आणि राष्ट्रभक्ती म्हणून इतिहासातील त्या धनानंदाविषयी, त्या औरंगजेबाविषयी आणि त्या दुसऱ्या बाजीरावाविषयी काही बोलायचेच नाही किंवा जमल्यास अप्रामाणिकपणे चांगले बोलून पैसा, कीर्ती, प्रतिष्ठा मिळवायची असे प्रकार राजरोस होत असतात. ऐतिहासिक असत्याची हिडीस पिशाच्चे सामान्य माणसाच्या छातीवर खुशाल नाचत असतात. त्या छातीला काहीच होत नाही, कारण ती अभिमानाने तट्ट फुगलेली असते. असा गौरवशाली इतिहास पुष्कळदा आमची सांप्रतची दुःस्थिती झाकण्यासाठी रचला जातो, इतरांना आणि स्वतःला भ्रमात ठेवणारा असा इतिहास अजबच होय.

एवंच इतिहासाच्या प्रकारांविषयी जेव्हा आपण बोलतो तेव्हा कोणत्या तरी आज अस्तित्वात असलेल्या प्रादेशिक किंवा सांस्कृतिक गटाच्या जीवनाचे कोणते तरी एक अंग घेऊन त्यानुसार लिहावयाचे इतिहास एवढाच केला पाहिजे. भारतातील कुटुंबसंस्थेचा इतिहास अशा तऱ्हेचे एक अभ्यासक्षेत्र निवडले तर आज भारत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशापुरताच भूतकालाचा आढावा मर्यादित आहे आणि भूतकालातील इतर घडामोडी फक्त अनुषंगाने आवश्यक तेवढ्याच पाहून कुटुंबसंस्थेची स्थित्यंतरे वर्णावयाची आहेत अशी भूमिका असेल. असे जे क्षेत्र निश्चित केलेले असते ती एक वर सांगितल्याप्रमाणे सोयीची गोष्ट असते. तेथे अभिमानाचा प्रश्न नसतो. कथनाच्या आणि वर्णनाच्या सुकरतेसाठी, विषय समजण्याचे सोयीसाठी इतिहासाचे जागतिक आणि प्रादेशिक, तसेच राजकीय, सामाजिक, धार्मिक वगैरे कोणत्याही तऱ्हांनी प्रकार पाडावयास हरकत नाही.

### इतिहासाचे प्रयोजन :

इतिहासाचा प्रकार कोणताही असला, इतिहासकथनाचे कोणतेही कमी अधिक संकुचित क्षेत्र निवडलेले असले तरी ह्या ठिकाणी आणखी एक अत्यंत मलभूत असा

प्रश्न उपस्थित होईल तो असा की, भूतकालातील त्या माहितीचा माणसाच्या आजच्या जीवनाला काही उपयोग आहे काय ? केवळ दुसरा काही उद्योग नसल्यामुळे माझे वडील कसे होते , त्यांचे वडील कोण होते आणि काय करीत होते आणि पुढे त्यांचे पणजोबा मूळचे कोणत्या गावचे व काय व्यवसाय करणारे होते अशी कुतूहले कोणाला वाटली तर त्याने आपल्यापुरते पोटापाण्याचा व्यवसाय संभाळून किंवा वाटल्यास सोडूनही हवे तेवढे संशोधन करून आपले समाधान करून घ्यावे. परंतु सर्व समाजाला इतिहासाच्या ज्ञानाची गरज काय आहे ? असल्यास ती कितीशी ? शाळा कॉलेजातून इतिहासाचे अभ्यासक्रम असतात. अनेक वर्षे मुले मुली, सनावळ्या आणि वंशावळ्या घोकीत असतात. कोणा एका राजाने कधीकाळी केलेल्या सुधारणा पाठ करून परीक्षेत उत्तम प्रकारे यशही संपादितात. परंतु पुढील आयुष्यात त्यांचा त्या सगळ्या घोकलेल्या ज्ञानाशी कितपत संबंध येतो ? ते मुखोद्‌गत केले नसते तर बिघडले असते की काय ? कोठे काही आयुष्यात उणीव राहिली असती की काय ? भूतकालाच्या ज्ञानाची समाजाला निश्चितपणे काय गरज आहे ? तीनशे वर्षांपूर्वी किंवा तीन हजार वर्षांपूर्वी काय घडले हे माणसाला ठाऊक असलेच पाहिजे काय ? त्याने इतिहास वाचलाच पाहिजे काय ? नाही वाचला तर काय होईल ? दोन आणि दोन चार हे माहीत नसेल तर माणूस बाजारात फसेल , विजेची उपकरणे वापरताना कुठे हात लावू नये हे समजत नसेल तर धक्का बसेल– कदाचित मृत्यूच ओढवेल. पण समजा, शिवाजी महाराज १६८० साली निवर्तले हे कुणा महाराष्ट्रीयाला ठाऊक नसले तर काय होणार आहे ? १८१८ साली पेशवाई बुडाली हे कानावर आले नसेल तर कुठे काय बिघडणार आहे ?

ह्या सर्व प्रश्नांची उत्तरे द्यायलाच पाहिजेत. अन्यथा माणसांनी आजतागायत अतिशय कष्टाने जमा केलेले भूतकालाविषयीचे हजारो लाखो तपशील मातीमोलाचे म्हणावे लागतील ? तथापि ह्या ठिकाणी इतिहासाच्या उपयोगाचा हा प्रश्न फक्त उपस्थित करून ठेवणेच शक्य आहे. त्या प्रश्नाला अनेक उत्तरे संभवतात आणि ती सर्व ऐतिहासिक घटनांचे अर्थ लावण्याच्या अनेक पद्धतीतून निघतात. त्या विविध पद्धतींची मीमांसा केल्याखेरीज ह्या प्रश्नाचे उत्तर देता येणार नाही.

म्हणून इतिहासाचा अर्थ विशद करणाऱ्या निरनिराळ्या तत्त्वप्रणालींचा थोडा तपशीलवार विचार झाल्यानंतरच पुढे इतिहास विषयाच्या उपयोगाची, उपयोगशून्यतेची किंवा दुरुपयोगाची चर्चा शक्य होईल.

**अभ्यासविषय आणि अभ्यासक :**

अनादि आणि अनंत कालाचा एखादा लहानसा तुकडा पहाणे कुणालाही शक्य आहे. कुठल्याही सुजाण माणसाला आपल्या जीवनात व आपल्या भोवतालच्या

जगात निदान गेल्या दहा बारा वर्षात काय घडले हे बघता येते. जे जे घडले त्याचा अर्थ एकच लागेल आणि प्रत्येकाला तोच लागेल असे नाही. परंतु कुणीही व्यक्ती 'मी अठरा वर्षाचा होतो तो अठ्ठावीस वर्षांचा झालो, मधल्या काळात मी पदवीधर होऊन नोकरीला लागलो, आर्थिकदृष्टचा वडिलांवर अवलंबून होतो तो स्वतः मिळवू लागलो, मध्यंतरी केव्हातरी मी लग्न केले आणि पती ह्या नात्याने काही एक नवे जीवन जगू लागलो, त्यानंतर दोन मुलांचा पिता होऊन ती स्थिती काय असते, त्यातील आनंद व जबाबदाऱ्या काय असतात– ह्याचीही जाणीव मला झाली आहे.' अशा तऱ्हेने स्वतःच्या जीवनातील दहा वर्षांच्या काळातील एका मागून एक घडलेल्या घटना त्याला आठवतात आणि होत असलेले बदल जाणवतातही, समाजाचा एक घटक, राष्ट्राचा एक नागरिक ह्या नात्यांनी तो अगदी प्रत्यक्षपणे आपल्या वैयक्तिक जीवनाशी संबंध नसलेल्या परंतु अप्रत्यक्षपणे निश्चित संबंध असलेल्या अशा सर्व समाजावर व राष्ट्रावर परिणाम घडविणाऱ्या घटनाही पहात असतो. निर्विकार प्रेक्षक म्हणून नव्हे तर कमीअधिक प्रमाणात त्या घडामोडीत भाग घेणारा एक म्हणून तो त्या घटना अनुभवीत असतो, त्याचे बरेवाईट परिणाम भोगीत असतो. 'गेल्या दहा वर्षात मी ज्या राष्ट्राचा नागरिक आहे त्यावर दोन परराष्ट्रीय आक्रमणे झाली, युद्धात विजय मिळवून राष्ट्राचे स्वातंत्र्य व सार्वभौमत्व राखण्यासाठी इतरांबरोबर मलाही घस सोसावी लागली. काही सुखांचा त्याग करावा लागला, महागाईला तोंड द्यावे लागले, परंतु त्या आपत्तीतून माझे राष्ट्र बाहेर आले. त्यातून पुढे चांगले दिवस आले, मला आणि इतरांना अधिक सुखासमाधानाने आणि स्वाभिमानाने जगता येऊ लागले,' अशा तऱ्हेने झालेल्या घटना त्याला स्मरत असतात आणि त्यांचा तो काही एक अर्थही लावीत असतो.

कालप्रवाह अखंड चालू आहे. एका व्यक्तीला जास्तीत जास्त आपल्या आयुर्मर्यादेइतक्या कालाच्या घडामोडीतून –तेही काही घडामोडीतच– प्रत्यक्ष भाग घेता येईल. तेवढ्या मर्यादित कालखंडाचाच त्याला काही प्रमाणात तरी साक्षात असा प्रत्यय येऊ शकेल. परंतु गेल्या चाळीस पन्नास हजार वर्षांत मनुष्यप्राण्याच्या जीवनात ज्या असंख्य गोष्टी घडल्या असतील त्यापैकी एका माणसाने प्रत्यक्ष पाहिलेल्या घडामोडी कितीशा असणार? मानवेतिहासाच्या संपूर्ण कालखंडाचा विचार केला तर कुणीही एक व्यक्ती प्रत्यक्षात जेवढा इतिहास पहाते तो एकंदर समग्र इतिहासाच्या मानाने इतका कमी आहे की केवळ आकडयांच्या हिशेबाने तो लक्षातही घेण्याचे कारण दिसत नाही. भूतकालाविषयी, अगदी आरंभापासूनच्या कालाविषयी माणसाने माहिती जमा केलेली आहे. उत्खननात सापडलेल्या वस्तू, जुन्या वास्तूंचे अवशेष, जुन्या

मूर्ती, शिलालेख, पत्रव्यवहार –इत्यादी साधनांवरून जमा केलेली अशी ही माहिती असते. अर्थात ती अप्रत्यक्ष असते आणि माणूस आपल्या बुद्धीप्रमाणे त्यांची संगती लावून घेत असतो.

आता प्रत्यक्ष अनुभवाला येणारा इतिहास जर पाण्याच्या एका थेंबाच्या एका सहस्त्रांशाइतका असेल आणि एकंदर मानवेतिहास महासागराएवढा असेल आणि त्या महासागराचे ज्ञान केवळ काही कमी कधिक विश्वसनीय अशा पुराव्यांवरून जमा केलेले असेल तर एकंदरीत माणसाचे हे भूतकालाविषयीचे ज्ञान म्हणजे एक थोतांड वाटावे इतके हास्यास्पद नाही काय? ह्या इतिहासज्ञानाला काहीही अर्थ नाही असे का म्हणून नये? एका व्यक्तीचा स्वतःपुरताच अनुभव अतिशय थोडा असतो. प्राचीन कालाचा अर्थ लावताना असंख्य माणसांच्या विविध कृतींचा अर्थ आजचा माणूस हा आपले विचार आणि आपल्या प्रवृत्ती ह्यांना अनुसरूनच करीत असतो. कोणत्याही माणसाला अगदी जवळातल्या जवळच्या दुसऱ्या माणसाचे मनही संपूर्णपणे समजू शकत नाही. तेव्हा काळाने दोनचारशे किंवा दोन चार हजार वर्षे आपल्या मागे असलेल्या एखाद्या ऐतिहासिक व्यक्तीचे मन आपल्याला समजते असे कसे म्हणता येईल? भूतकालीन व्यक्तींच्या काही पुराव्यांनी उपलब्ध झालेल्या विचारांचा आणि कृतींचा अर्थ लावणारा आजचा माणूस हा आजची दृष्टी घेऊनच ते सर्व काही करीत असतो हे विसरून चालणार नाही. भूतकालाची माहिती देणारी साधने अपुरी आणि त्या भूतकालाचा अर्थ लावणारा माणूसही अपूर्ण आणि ह्यांच्या संयोगातून निर्माण होते ती भूतकालाची कथा. त्या कथेचे हे सत्य स्वरूप लक्षात घेऊनच ह्या इतिहासनामक विषयाचा विचार करावयाचा आहे हे प्रारंभीच स्पष्ट असावे.

### स्थित्यंतराची निर्विवाद्यता :

तथापि बुद्धीची देणगी असलेला मानवप्राणी आपल्या अनुभवातून इतर माणसांच्या जीवनाचे कमी अधिक प्रमाणात बरोबर किंवा चूक असे हिशेब मांडीत असतो. हे मनुष्येतर प्राण्यात शक्य नाही. ह्या बुद्धीच्या वैशिष्ट्यामुळेच मी पूर्वी कसा होतो, आता कसा झालो, तो तसा का झालो, निराळे काही घडले असते किंवा निराळ्या काही मार्गाने मी आपण होऊन गेलो असतो तर माझे जीवन बदलले असते की काय असे विचार, अशा चिकित्सा ह्या फक्त माणसापुरत्याच शक्य आहेत. अशाच तऱ्हेचे विश्लेषण आपल्या भोवतालच्या इतर माणसांचे संदर्भात व पूर्वी होऊन गेलेल्या सबंध मानवसमाजाचे संदर्भातही होऊ लागते. अनुभव घेणे, त्याचा अर्थ लावणे, त्याप्रमाणे बदलण्याचा प्रयत्न करणे हे फक्त मनुष्यप्राण्यालाच शक्य असल्या-

मुळे फक्त माणसालाच मनुष्यकृत घडामोडींनी भरलेला असा इतिहास असू शकतो. आणि त्या इतिहासाचा अन्वयार्थ लावण्याचा उद्योगही होत असतो.

इतर प्राणिमात्रांचे तुलनेने माणूस बुद्धिमान खरा, पण त्याच्या त्या बौद्धिक सामर्थ्यालाही मर्यादा आहेत. मानवी जगात अगदी प्रारंभापासून आजतागायत घडून गेलेल्या आणि आज भोवताली घडत असणाऱ्या एकंदर घटना किती ह्याची मोजदाद शक्य आहे काय ? एका माणसाला त्यांपैकी किती माहिती असतात ? किती माहीत असू शकतील ? अशा तऱ्हेने विचार केल्यावर माणसाच्या बुद्धीच्या सीमा ताबडतोब लक्षात येतात. 'आज सकाळी उठल्यापासन तुझ्या घरात काय काय घडले ते सगळे सांग ' असे रात्री अंथरूणावर पडायला निघालेल्या एकाद्या माणसाला विचारावे. तो काय सांगेल ? पंधरावीस अगदी ढोबळ गोष्टी तो सांगू शकेल. तोच प्रश्न त्या दिवसाचे संदर्भात त्या माणसाच्या बायकोला विचाराल तर नवऱ्याने सांगितलेल्या दोन चार गोष्टी तिला आठवणार नाहीत, तर त्याने न सांगितलेली एखादी गोष्ट ती सहजगत्या सांगून जाईल. पाच मिनिटांपूर्वी त्यांच्यासमोर त्यांच्या दोन मुलांची मारामारी झालेली असेल, दोघांनीही ती पाहिलेली असेल, सोडवलेली असेल, पण त्यात त्या दोन पोरांपैकी आधी कुणी कुणाला मारले ह्यावर पतिपत्नींचे एकमत होणार नाही. विस्मरण होते. घटनांचा गोंधळही होतो. आणि त्यात पुन्हा एखाद्या मुलाची मुद्दाम बाजू घ्यायचा हेतू असेल तर ती आणखीनच निराळी गुंतागुंत होऊन बसते. तथापि इतिहासाचा अर्थ लावणारांची ही वैयक्तिक मनोभूमिका थोडी बाजूला ठेवून ऐतिहासिक घटना किंवा समग्र इतिहास म्हणजे नेमके काय हे ठरविल्याशिवाय गत्यंतर नाही. इतिहासाचा अर्थ सांगणारे कोणतेही तत्त्वज्ञान विचारात न घेता किंवा घटनांचे अर्थ लावण्याच्या खटाटोपात न पडता निर्विवादपणे असे विधान करता येईल की, इतिहास म्हणजे एकामागून एक घडणाऱ्या घटना. एक राजा पदच्युत होतो आणि त्याच्या सिंहासनावर दुसरा कोणी बसतो. हे चांगले की वाईट ? जनतेच्या दृष्टीने कल्याणाचे की अकल्याणाचे ? प्रगतीचे की परागतीचे ? असे प्रश्न उपस्थित करा किंवा करू नका, घटना घडली हे खरेच. एक राजा पदच्युत होऊन त्याच्या सिंहासनावर दुसरा बसला असे निर्भेळ, केवळ वस्तुस्थितीनिदर्शक विधान निःशंकपणे करता येते. आधी असलेली राज्ये बुडतात, नवी निर्माण होतात, साम्राज्ये बांधली जातात आणि मोडलीही जातात, समाजांचे अभ्युदय होतात आणि ते नामशेषही होतात, क्रांत्या होतात, लढाया होतात, प्रचंड प्रमाणावर मनुष्यहानी होते. अशा मनुष्यनिर्मित गोष्टींबरोबरच वादळे, अनावृष्टी, महापूर, आगी, रोग अशा नैसर्गिक आपत्तीही येतात. तसेच उत्तम पीकपाणी, खनिज संपत्ती वगैरेमुळे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.

अनायासे अचानकपणे येणारी सुबत्ता ह्यांचाही परिणाम मनुष्यजातीवर होत असतो. ह्या सर्वांना काही क्रम किंवा नियमबद्धता आहे काय ? ह्यावर पुष्कळ वाद आहेत.

तथापि निर्विवाद असलेली गोष्ट एकच. ती म्हणजे एकामागून एक होणारी स्थित्यंतरे. माणूस कापसाचे, रेशमाचे, लोकरीचे, टेरेलिनचे वस्त्र केव्हातरी वापरीत नव्हता तो केव्हातरी वापरू लागला हे निश्चित. एका काळी माणूस बैलांच्या नांगराने शेत खणीत होता तो तेलासारख्या इंधनावर चालणारे ट्रॅक्टरसारखे यंत्र वापरू लागला हे नाकारता येत नाही. एका काळी आगगाडी, विमान वगैरे वाहतुकीची व प्रवासाची साधने नव्हती ती आज अस्तित्वात आहेत हे नाकबूल करणे अशक्य आहे. तसेच राजकीय जीवनात पूर्वी जगाच्या बहुतेक भागात सर्व सत्ताधीश राजे राज्य करीत होते तर आज जगाच्या बहुतेक सर्व भागात लोकशाही पद्धतीने राज्यकारभार चालू आहेत ही गोष्ट मान्य केलीच पाहिजे. सामाजिक व्यवहारात जगातील अनेक समाजात पूर्वी बहुपत्नीकत्व होते ते आता गेले आहे. एकत्र कुटुंबपद्धती अस्तित्वात होती त्या ऐवजी छोटी छोटी विभक्त कुटुंबे दिसत आहेत, धार्मिक आचारात केव्हातरी एकदा देवापुढे माणसाचे बळी दिले जात तसे आता दिले जात नाहीत, हीही वस्तुस्थिती आहे. तेव्हा इतिहासाच्या संदर्भात ज्याविषयी प्रश्नच पडू शकत नाही अशी गोष्ट म्हणजे स्थित्यंतर. आता हे स्थित्यंतर फक्त जीवनातल्या बाह्य स्वरूपातलेच आहे, एक जीवप्राणी म्हणून भूक, तहान, लैंगिक भावना इत्यादी मूलभूत विकार जे आहेत ते कोणत्याही काळी, कोणत्याही समाजात सारखेच असतात, असे म्हणता येईल. हे जरी मान्य केले तरी आपल्या निरनिराळ्या भुका भागविण्याच्या, निरनिराळ्या इच्छा पुऱ्या करून घेण्याच्या माणसाच्या पद्धती बदलतात, बदलत आहेत, ह्याबद्दल संशय रहात नाही. बदल – बाह्य स्वरूपातील बदल म्हणा हवे तर– हे एक उघड दिसणारे आणि सर्व वादांच्या पलीकडचे असे सत्य आहे, काहीतरी असते ते नाहीसे होते किंवा त्याचे रूप तरी पालटते, काही नसलेल्या गोष्टी नव्याने येतात किंवा जुन्याच गोष्टी नव्या स्वरूपात अवतरतात. पण काहीना काही घडामोड ही चालूच असते. ह्या घडामोडींचे अर्थ कसेही लावले तरी घडामोड नावाचे सत्य मानायलाच पाहिजे. इतिहासाचा दुसरा कोणताही अर्थ लागो किंवा न लागो, इतिहास म्हणजे बदल, इतिहास म्हणजे स्थित्यंतर, हे मान्य करूनच पुढे त्या विषयासंबंधी अधिक ऊहापोह व्हावा.

### स्थित्यंतराचा अर्थ :

जीवनात काही ना काही घडत असते. माणूस त्यातले काही पहात असतो आणि काही भाग कमी अधिक प्रमाणात प्रत्यक्ष अनुभवीत असतो. काही गोष्टी

एखाद्या माणसाच्या जीवनाशी प्रत्यक्ष संबंधित असतात तर बाकीच्या तो कमी अधिक तटस्थतेने किंवा उदासीनतेनेही पहात असतो. भोवताली जे जे घडते त्या-पाठीमागे काही तरी कारण असते असे एक गृहीतकृत्यच आहे. जिज्ञासू माणूस प्रत्येक घटनेचे कारण शोधित असतो, मात्र प्रत्येकाला एकच आणि एकमेव तेच कारण गवसत नाही, हे प्रत्यही दैनंदिन व्यवहारात दृष्टोत्पत्तीस येते. कुणी एक मुलगा परीक्षेत नापास झाला तर स्वतः तो मुलगा आणि आसपासचे लोक त्याविषयी किती प्रकारे बोलतात ते मुद्दाम पहाण्यासारखे आहे. मुलगा नापास झाला ही घटना वादातीत आहे, ते घडलेच आहे, त्याविषयी शंका नाही. पण त्याची कारणमीमांसा माणसागणिक वेगवेगळी येते. मुलगा स्वतः म्हणतो की ऐन परीक्षेचे वेळी मी आजारी पडलो त्यामुळे असे झाले. मुलाची आई म्हणते, ईश्वराचीच इच्छा नव्हती तेथे तो बिचारा काय करणार ? ज्योतिषाचा नाद असलेला मुलाचा काका म्हणतो की हा सारा मंगळाचा खेळ आहे. एक शेजारी म्हणतो त्या मुलाला पास होण्याइतकी बुद्धीच नाही. दुसरे शेजारी म्हणतात मुलगा हुषार आहे परंतु उनाड आहे, त्याने अभ्यासच केला नाही. आणि मुलाचे वडील म्हणतात परीक्षेपूर्वी दोन महिने तो एका मुलीच्या नादी लागल्या-मुळे त्याचे लक्ष उडाले आणि तो नापास झाला. ह्यातले खरे काय ? ते कसे ठरवा-वयाचे ? हा प्रश्न खरोखरी बिकट आहे, वरीलपैकी कोणतेही एक कारण असू शकेल किंवा त्या मुलाचे अपयश हे त्यापैकी दोन तीन कारणांचा मिळून झालेला एकत्रित परिणामही असेल.

व्यवहारात भोवताली प्रत्यक्ष घडणाऱ्या गोष्टींविषयी जशी कारणमीमांसा होते तशीच प्राचीन कालापासून निसर्गात व मानवी जीवनात घडणाऱ्या सर्वच घटनांची कारणमीमांसा माणूस करीत आला आहे. ती चिकित्सा अनेक प्रकारची झाली आहे. पाऊस कशामुळे पडतो ? समुद्रातील पाण्याची वाफ होऊन निर्माण झालेल्या ढगामुळे की, वरुणराजाला केलेल्या प्रार्थनेमुळे ? एखादा माणूस वेडया-सारखे का बरळू लागतो ? काही मानविक विकारामुळे की, पिशाच्चबाधेमुळे ? अशा अनेक प्रकारच्या प्रश्नांना निरनिराळ्या काळात, निरनिराळ्या देशी अनेक प्रकारची उत्तरे दिली गेली आहेत. बालक कसे जन्माला येते ह्याचे आज बहुधा सर्वांना माहीत असलेले उत्तर पूर्वी विविध प्रकारांनी दिले गेले. त्यात अमुक एका झाडाखालून स्त्री गेली किंवा अमुक एका पक्ष्याचे तिला दर्शन झाले की अपत्यसंभव होतो अशीही उत्तरे होती. वादळ, पाऊस, दुष्काळ किंवा सुकाळ, आग किंवा महापूर, सूर्यचंद्राची भ्रमणे, ग्रहणे, उल्कापात, धूमकेतूंचे दर्शन, इत्यादी निसर्गात घडणाऱ्या गोष्टी माणसाला दिसल्या. त्या प्रत्येक गोष्टीचे काही एक कारण त्याला सुचले. घटना

पहावयाच्या आणि त्याची कारणे शोधावयाची हे जिज्ञासू मानव सतत करीत आला आहे.

माणसाने आपल्या भोवतालच्या सामाजिक जीवनात घडणाऱ्या आणि त्याच्या माहितीप्रमाणे घडून गेलेल्या अशा सर्व गोष्टींची कारणे शोधण्याचा खटाटोप असाच सतत केलेला आहे. त्या प्रयत्नातून अनेक प्रकारची उत्तरे आलेली आहेत. सामाजिक जीवनात काही तरी बदल घडतो हे निश्चित. तो का घडतो ? कोण घडवितो ? ह्या प्रश्नांना तीन उत्तरे संभवतात. (१) बदल होतो, पण तो माणसाच्या हाती नाही. (२) बदल माणसाच्या हाती आहे, आणि (३) बदल थोडासा माणसाच्या हाती आहे, आणि थोडासा नाही. आता माणसाच्या हाती जर बदल नसेल तर तो कुणाच्या हाती आहे ह्यालाही अनेक उत्तरे आहेत. कुणी उत्तर दिले तो ईश्वराच्या हाती आहे. सर्व घडामोडी ईश्वरी इच्छेने चाललेल्या आहेत. ईश्वरी योजनेप्रमाणे सर्व होत आले आहे, होत आहे आणि होत राहील. ह्यातून पुढे आणखी प्रश्न उद्भवतात की ही ईश्वरी योजना काय आहे हे कळू शकेल काय ? कळत असल्यास कुणाला ? काही उत्तरांतून ईश्वराचा हा सर्वाधिकार नाकारण्यात आला आणि असे सांगण्यात आले की, सूर्यचंद्राची भ्रमणे, इतर ग्रहगोलांच्या गती, समुद्राच्या भरती ओहोटी ह्या सर्व गोष्टी जशा काही नियमांनी सतत चालू असलेल्या दिसतात त्याचप्रमाणे कोणत्या तरी नियमांनी मानवी व्यवहार अखंडपणे चालत असतात. हे नियम कसे ठरतात ? ते कोण तयार करतो ? का करतो ? असे आणखी कित्येक प्रश्न ह्यातून उद्भवतील. कुणी ईश्वर किंवा दुसरा कोणता वैश्विक नियम, असले काही न मानता भोवतालची भौगोलिक परिस्थिती जशी असेल त्याप्रमाणे माणसाचा इतिहास घडतो किंवा त्याच्या रक्तात जे विशिष्ट गुण असतील त्यानुसार त्याचे कर्तृत्व किंवा अकर्तृत्व ठरते अशी स्पष्टीकरणे दिली. काही विचारवंतांनी मानवी इतिहास बदलणारी वरील सर्व प्रकारची प्राकृतिक चिकित्सा नाकारली आणि माणसाच्या जीवनपद्धतीतील बदल माणूस स्वतःच घडवून आणतो असे प्रतिपादन केले. ह्यातही पुन्हा कुणी म्हणाले की मानवसमाजात जे विशेष बुद्धिमान पुरुषोत्तम असतात त्यांच्या नेतृत्वामुळे सर्व बदल घडतात तर कुणी म्हणाले बदल ही एकटचा दुकटचाने करण्याची गोष्ट नव्हे, सर्व समाज बदलतो आणि त्याच्यामागे सबंध समाजाचे कर्तृत्व असते. हे जे बदल होतात त्यांत काहींना पुनरावृत्ती दिसते, इतरांना ती दिसत नाही. काही विचारवंत इतिहास म्हणजे एकमेकींशी काही संबंध नसलेल्या यदृच्छया एकामागून एक घडत गेलेल्या घटना आहेत, आणखी काहीही नाही असे उत्तर देऊन मोकळे होतात.

ह्या ठिकाणी सांगावयाचे आहे ते एवढेच की, वाद नाही तो फक्त घटना घडते ह्याबद्दल. ती कशी घडते आणि का घडते ह्याबद्दल माणसांना आजतागायत असंख्य

उत्तरे सुचलेली आहेत, आणखीही सुचतील. इतिहासाचे वास्तव स्वरूप समजून घेण्यासाठी त्यांपैकी महत्त्वाच्या मीमांसांची ह्यापुढे थोडचा अधिक तपशीलांनी पहाणी करावी लागेल.

## इतिहासाचे तत्त्वज्ञान :

वर उल्लेखिलेली पहाणी हेच इतिहासाचे तत्त्वज्ञान होय. तत्त्वज्ञान ह्या शब्दामुळे गोंधळ होण्याचा संभव आहे, म्हणून स्पष्ट करणे आवश्यक आहे की ह्या ठिकाणी तो शब्द एखाद्या विषयासंबंधीची सर्व बाजूंनी केलेली चिकित्सा अशा सर्वसाधारण अर्थाने वापरलेला आहे. तत्त्वज्ञानात पुष्कळदा अभिप्रेत असलेला अंतिम सत्याचा निर्णय, गूढ शक्तीचे विवरण किंवा ईश्वरस्वरूपाचा बोध असा कोणताही अर्थ ह्या ठिकाणी घ्यावयांचा नाही. इतिहासाचे तत्त्वज्ञान म्हणजे पृथ्वीवरील मानवी जीवनाच्या स्थित्यंतरांसंबंधीच्या ईश्वरी योजनेचा आविष्कार अशी समजूत यूरोपीय विचारवंतांत शतकानुशतके रूढ होती. अशा कोणत्याही अर्थाने तत्त्वज्ञान शब्द येथे योजलेला नाही. ईश्वरी योजनेबरहुकूम सर्व गोष्टी घडत असतात, माणसाचे हाती काहीही नाही, सबंध इतिहास म्हणजे ईश्वरी इच्छेचा खेळ आहे हा इतिहासासंबंधीचा एक दृष्टिकोन झाला. परंतु माणसांचा इतिहास माणसे स्वतःच घडवितात, ईश्वर म्हणून कोणी नाही, असला तरी त्याचा मानवाच्या इतिहासाशी संबंध नाही असाही एक दृष्टिकोन असू शकतो आणि हेही एक इतिहासाचे तत्त्वज्ञानच. इतिहास माणसाला अत्यावश्यक आहे, त्यावाचून त्याला एक पाऊलही पुढे टाकता येणार नाही हे मत किंवा इतिहास पूर्णपणे निरर्थक आणि निरूपयोगी आहे हे मत – ह्या दोहीतही इतिहासासंबंधी काही तत्त्वज्ञान आहेच.

इतिहास कसा घडतो ? स्थित्यंतराचे स्वरूप काय असते ? स्थित्यंतरांमागे कोणकोणती कारणे असू शकतात ? नेहमी तीच किंवा तशीच कारणे असतात की प्रत्येक वेळी निरनिराळचा गोष्टी कारणीभूत होत असतात ? मानवी जीवनात जे बदल घडत जातात त्यात काही नियमबद्धता दिसते काय ? आजपर्यंत झालेले बदल लक्षात घेता भविष्यकालीन स्थित्यंतरांसंबंधी काही कल्पना करणे शक्य आहे काय ? आजपर्यंतच्या इतिहासाच्या अवलोकनावरून माणसाला काही शिकता येण्यासारखे आहे काय ? ह्या प्रश्नांच्या उत्तराचा शोध म्हणजेच इतिहासाचे तत्त्वज्ञान. हा मुद्दा मागे उल्लेखिलेल्या रँडॉलने खालील शब्दात स्पष्ट केला आहे. :

Speculative philosophies of history are concerned primarily with two problems. First, does the history of our Society exibit any discernible pattern ? What is the structure

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत

of the process of history revealed in the past of our society ? Secondly, what is the nature of historical causation ? What is the dynamic factor that has caused our history to have that pattern, and which, if it continues to operate the same way, will have similar consequences in the future ? These are important questions, and any critical reflection on history must consider them ( Nature and Historical Experience पृ. ३२–३३)

–ह्या उताऱ्यातील आशय वर आधीच स्पष्ट केलेला असल्याने पुन्हा शब्दशः भाषांतर देण्याची गरज नाही. ही वाक्ये उद्धृत करण्यातील हेतू हा की आता इंग्रजीतही इतिहासाचे तत्त्वज्ञान ( Philosophy of History ) हा शब्दप्रयोग व्यापक अर्थाने केला जातो हे ध्यानी यावे. लुडविग वॉन मायझेस ह्या लेखकाने तत्त्वज्ञान ह्या शब्दाला काही निश्चित अर्थ चिकटला आहे हे लक्षात घेऊन इतिहासाच्या अर्थासंबंधीच्या विचारासाठी इतिहासविषयक दृष्टिकोन (Point of View of History ) असा शब्दप्रयोग मुद्दाम केला आहे. ( Theory and History पृ. १६६) पण इंग्रजीत इतिहासाचे तत्त्वज्ञान ही शब्दयोजना वर विशद केल्या-सारख्या व्यापक अर्थाने वापरण्याचीही पद्धत आहे हे लक्षात घेणे आवश्यक आहे. तेव्हा ही केवळ शब्दाच्या निवडीची बाब आहे. एकदा आपण ह्या संदर्भात तत्त्वज्ञान म्हणजे काय हे पक्के ठरविले असल्यामुळे तो शब्द वापरून घोटाळा होण्याचे कारण नाही.

तेव्हा इतिहासाचे तत्त्वज्ञान म्हणजे इतिहासातील अर्थ –किंवा अनर्थही– पाहण्याची दृष्टी. इतिहासाचा अर्थ लावण्याचे प्रयत्न अनेक प्रकारांनी झाले आहेत, त्यांची तपासणी करीतच सत्याचा शोध घेत जाणे सोईचे होईल.

## सदर्भसाहित्य :

( 1 ) A History of Historical Writing
– Barnes H. E; ( Boxer edition ) New York, 1962
( 2 ) Ideas and Men
– Brinton, Crane; New York, 1950
( 3 ) The Modern Approach to Histry
– Buddha Prakash; Delhi, 1963
( 4 ) Attitudes towords History
– Burke, Kenneth, New York, 1937

(5) What is History?
- Carr E. H.; London, 1962
(6) The Meaning of Human History
- Cohen, Morris; (2nd ed.) Chicago, 1961
(7) The Idea of History
- Collingwood, R. G.; Oxford, 1946
(8) History, its Theory and Practice,
- Croce, Benedetto; New York, 1921
(9) The Pleasures of Philosophy
- Durant, Will (7th printing) New York, 1962
(10) Cosmos and History
- Eliade, Mircea; New York, 1959
(11) Approaches to History
-ed. Finberg H. R.; London, 1962
(12) Theories of History
- ed. Gardiner P.; Glencose, Illinois, 1959
(13) A Preface to History
- Gustavson, G. G.; New York, 1955
(14) Philosophy and History
- ed. Hook, Sidney; New York, 1963
(15) The Problem of History and Historiography
- Joshi, V. V.; Allahabad, 1946
(16) Freedom and History
- Lewis H. D.; London, 1962
(17) Theory and History
- Mises, L. V.; London, 1958
(18) The Poetry of History
- Neff- Emery; New York, 1947
(19) The Historians Business and other Essays
- Pares, Richard; Oxford, 1961
(20) The Poverty of Historicism
- Popper K. R; London, 1957
(21) Nature and Historical Experience
- Randall, J. H.; New York 1962

( 22 ) The Use of History
— Rowse A. L.; London, 1946
( 23 ) Understanding History
– Russell, Bertrand; New York, 1957
( 24 ) Introduction to the History of History
– Shotwell, J. T.; New York, 1939
( 25 ) The Varieties of History
– ed. Stern, Fritz; New York, 1960
( 26 ) The Interpretation of History
– ed. Strayer J. R; Princeton, 1943
( 27 ) Theory and Processes of History
– Teggart F. J.; Berkeley, 1941
( 28 ) A Study of History– Vol 1–13
– Toynbee, A. J.; London, 1956–60.
( 29 ) An Introduction to Philosophy of History
– Walsh, W. H.; London, 1961
( 30 ) Interpretations of History
– Widgery, A. G; London, 1961
(३१) दत्तोपंत आपटे स्मारकग्रंथ
– सं. भारतइतिहाससंशोधनमंडळ; पुणे १९४७
(३२) इतिहासातील अंतःप्रवाह
– केतकर द. वि.; पुणे, १९५७
(३३) इतिहास : शास्त्र आणि कला
– घाटे वि. द.; पुणे, १९५८

## प्रकरण २ रे

# कालचक्र आणि ईश्वरी सूत्र

### निसर्गचक्र आणि जीवनचक्र :

अन्न, वस्त्र, निवारा मिळविण्याच्या धडपडीत, अनेक अडचणींना तोंड देत असताना, निरनिराळ्या प्रकारच्या परिस्थितीत सापडत असताना आणि त्यातून बाहेर पडत असताना इतर प्राण्यांपेक्षा कितीतरी अधिक बौद्धिक सामर्थ्य असलेला मानव स्वाभाविकच इतर प्राण्यांना शक्य नसलेली एक गोष्ट सतत करीत होता. ती म्हणजे स्वतःच्या जीवनाविषयीचा विचार. तो नुसता जगत नव्हता, जगण्याविषयी चिंतनही करीत होता. माझे जगणे कशावर अवलंबून आहे, उद्या मला जिवंत रहाणे शक्य होईल काय, सहज शक्य होईल की आज काही तरतूद करून ठेवली तरच शक्य होईल अशा तऱ्हेच्या साध्या, सरळ व्यावहारिक प्रश्नांपासून तर मी कोण आहे, का जगतो आहे, माझ्या जीवनाचा अर्थ काय आहे अशा प्रकारच्या अगदी तात्त्विक किंवा आध्यात्मिक प्रश्नांपर्यंत सर्व प्रकारच्या शंका उपस्थित करून तो त्यांची उत्तरे शोधित होता.

रोज सकाळी सूर्य उगवतो, संध्याकाळी मावळतो, मग रात्र होते, रात्र संपते पुन्हा दिवस उजाडतो, असा दिवसरात्रीचा क्रम न चुकता सुरू रहातो. रात्री चंद्र दिसतो तो काही दिवस मोठमोठा होत जातो आणि काही दिवस लहानलहान होत जाऊन नाहीसाही होतो. दिवसरात्रीप्रमाणे पावसाळा, हिवाळा, उन्हाळा असे ऋतूही एकामागून एक नियमतिपणे येत असल्याचे माणसाच्या अनुभवास आले. त्यानुसार पीकपाण्याची व्यवस्था लावण्याचे तंत्रही त्याने बांधले. निसर्गात काही एक चक्रनेमिक्रम आहे हे माणसाला काही काळाच्या अनुभवाने उमगले. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनातही माणूस जन्माला येतो, रांगू लागतो, चालूबोलू लागतो, तारुण्यात येतो, वृद्ध होतो आणि मरतो अशा साधारणपणे ठराविक कालमर्यादेच्या ठराविक अशा अवस्था स्पष्टपणे दिसणाऱ्या होत्या. आणि ह्यावरूनच एकंदर मानवी जीवनाचेही असेच काही तरी निश्चित गतीने आणि निश्चित अवकाशातून फिरणारे चक्र असावे असे त्याला वाटणे स्वाभाविकच होते. हे कालचक्र केव्हा सुरू झाले आणि कुणी चालू केले हे त्यामागोमाग येणारे प्रश्न आहेत. दिवसरात्रीसारख्या, चंद्रसूर्या-

सारख्या, समुद्राच्या भरतीओहोटीसारख्या आणि उन्हाळ्यापावसाळ्यासारख्या गोष्टी आपण निर्माण करू शकत नाही हे जाणणाऱ्या माणसाने त्यांचे कर्तृत्व आपल्याहून अधिक सामर्थ्यशाली अशा कोणत्यातरी अन्य स्थानी कल्पिणे हेही साहजिकच होते. मानवी कल्पनेचे निरनिराळे खेळ झाले आणि त्यातून अद्‌भूत सामर्थ्य असलेली काही भूतपिशाच्चे आणि दैवदैवते निर्माण झाली. कधी सारे कर्तृत्व एका आणि एकाच सर्व शक्तिमान अशा परमेश्वराला देण्यात आले. कधी तर असाही कल्पनेचा विलास झाला की, देवादी शक्तीही मानण्याचे कारण नाही. विश्वाच्या सर्व व्यवहाराची व्यवस्था लावणारा एक नियम आहे. त्या नियमाची सत्ता सार्वकालिक आणि सार्वभौम अशी आहे, त्या नियमानुसारच विश्वाचे आणि विश्वांतर्गत माणसाचे सर्व व्यवहार नियंत्रित केले जातात. नियंत्रण करणारा कोणी एकच देव असो, अनेक देवता असोत की पिशाच्चे असोत की एखादा सर्वव्यापी नियम असो, ह्या सर्व कल्पनांच्या मागे एक सामान्य गोष्ट आहे ती अशी की माणसाचे भवितव्य माणसाच्या हाती नाही आणि त्याने केव्हा कोणत्या हालचाली करावयाच्या हे ठरलेलेच आहे. माणसाला जाणीव असेल किंवा नसेल पण प्रत्येक माणसाचे आणि मानवजातीचे भूत, वर्तमान आणि भविष्य निश्चित आहे. दिवसामागून रात्र, रात्रीमागून दिवस, उन्हाळ्यानंतर पावसाळा, पावसाळ्यानंतर हिवाळा तशी एका घटनेमागून दुसरी घटना, दुसऱ्या घटनेनंतर तिसरे स्थित्यंतर असा क्रम ठरलेलाच आहे आणि सूर्यचंद्राच्या गती किंवा ऋतूतील बदल जसे माणसाच्या हातातले नाहीत तसेच क्रमाने येणाऱ्या ह्या घटनाही माणसाच्या इच्छेने ठरत नाहीत. माणूस त्याबाबत काहीही करू शकत नाही. जे होणार ते होणारच, आणि ते तसेच होणार. आता अशा कल्पनांवर आधारलेला मानवी इतिहासाचा अर्थ निरनिराळ्या प्राचीन संस्कृतीत कसा लावला गेला हे काही थोड्या तपशिलात शिरून पहाणे उद्‌बोधक ठरेल.

### अतिप्राचीन दैववाद :

ईजिप्त, सुमेरिया इत्यादी प्राचीन संस्कृतींतून इतिहासाविषयी फार खोल आणि तपशीलवार विचार झालाच नाही. तथापि जो झाला त्यात मानवी जीवनातील घटनांचा अर्थ सामर्थ्यशाली देवादिकांच्या कृतींच्या संदर्भातच सांगितला गेला. राज्यांचे उदयास्त देवतांच्या मर्जी किंवा गैरमर्जीप्रमाणे ठरतात असा शोध सुमेरियाच्या इतिहासकारांनी लावला. देवादिकांच्या इच्छा आणि योजना धर्मगुरूंना मात्र कळतात अशीही एक सोईस्कर पुस्ती जोडण्यात आली. ईजिप्तमध्येदेखील देवतांच्या इच्छेनुरूपच मानवी इतिहास घडतो असे सांगण्यात येऊनच धर्मगुरूंनी व्रते, उद्यापने वगैरे व्यवस्थित केली म्हणजे देवतांकडून माणसांचे कल्याण साधून घेता येते अशीही युक्ती

सुचविली. परंतु ईजिप्तचे राजे–फारो– हेच मुळी मानवरूपातील ईश्वर तेव्हा इतिहासातील बदल फारोच्या खुषी-नाखुषीप्रमाणेच ठरतात असेही म्हणावयास हरकत नाही, अशी आणखी एक कल्पना देण्यात आली. बॅबिलोनियन लोकांनी ३००० वर्षांचे चंद्रदेवाचे एक युग कल्पिले होते. अशी बारा युगे म्हणजे विश्वाचे एक महासंवत्सर असे गणित त्यांनी मांडले. प्राचीनमय संस्कृतीच्या लोकांवरही ह्या युगकल्पनेचा पगडा होता. एक महान कालचक्र फिरते आहे, ते तसेच अनंतकाल फिरत रहाणार आहे, क्षुद्र मानवी प्राण्यांच्या क्षुल्लक हालचालींची काय मोजदाद करावयाची आहे अशीच मानवी जीवनाच्या इतिहासातील घटनांकडे बघण्याची दृष्टी ह्या प्रचंड कालचक्राच्या कल्पनेत दिसून येते.

तथापि माणसाला ह्या कालचक्राच्या भव्य कल्पना जेव्हा सुचत होत्या तेव्हा-पासूनच जवळ जवळ त्या चक्राची गती बदलेल, फेरे चुकतील अशीही भीती वाटत आलेली आहे. गेल्या वर्षी जसा आणि जेवढा पाऊस पडला तसा आणि तेवढा यंदा पडला नाही, गेल्या वर्षी खूप थंडी पडली, यंदा मुळीच नाही. दहा वर्षांपूर्वी जसे पीक आले होते तसे पुढे यंदापर्यंत एकदाही आले नाही अशा गोष्टीही माणसाला दिसत होत्या. म्हणूनच ह्याच्यामागे देवदेवतांची खुषीनाखुषी असली पाहिजे असा तर्क झाला, ह्याचबरोबर देवांचे मार्ग सुकर किंवा दुष्कर करण्याइतपत माणसांनाही शक्ती असावी अशी शंका आली. प्राचीनांच्या कल्पनेत कालचक्र आहे, पण ते देवांच्या आणि माणसांच्या पलीकडचे स्वयंभू, स्वयंसिद्ध, स्वयंप्रमाण असे नाही. देव– मानवांशी आणि त्यांच्या कृतींशी काहीही संबंध नसलेले असे ते चक्र नव्हते. ते चक्र देवर्निर्मित होते आणि ते नीट फिरण्यासाठी माणसांनी योग्य वेळी योग्य त्या कृती –पूजा, प्रार्थना, व्रते इत्यादी– करणे आवश्यक मानले गेले. देवाच्या मदतीला माणसांना धावावे लागे, मात्र तरीही माणसाने आपले भवितव्य पूर्णपणे आपणच घडवावयाचे आहे, त्याच्या इतिहासाचा निर्माता तोच आहे अशा तऱ्हेची कल्पना मात्र उपरोक्त प्राचीन संस्कृतींतून रूजलेली दिसत नाही.

### प्राचीन चिनी कल्पना :

प्राचीन चीनच्या साहित्यातही ही कालचक्राची कल्पना विस्ताराने मांडलेली आहे. टुंग चुंग शूने राजे व राज्ये ह्यांची स्थित्यंतरे निसर्गातील स्थित्यंतरांप्रमाणे आणि ग्रहगोलांनी दिलेल्या इषाऱ्यांनुसार होत असतात असे सांगितले. चुअँग-त्सु ह्याने प्रश्न टाकला, माणसाने काय करावे आणि काय करू नये हे प्रश्नच कशाला ? बदल होतील तसे होऊ देत. ते होणारच आहेत. एके ठिकाणी त्याने मजेदार उत्क्रांतीचा सिद्धांतही सांगितला आहे. त्याच्या समजुतीप्रमाणे पाण्यातील सूक्ष्म जंतूपासून जीवनाला

आरंभ होऊन अनेक प्रकारच्या वनस्पती आणि प्राणिरूपांनंतर घोडा आणि माणूस असे श्रेष्ठ जीवप्रकार निर्माण झाले आहेत. पुन्हा मागे मागे जात माणसाला पाण्यातील सूक्ष्म जंतूंचे स्वरूप प्राप्त होणार आहे, सूक्ष्म जंतू ते सूक्ष्म जंतू अशी ही जीवनाची चक्राकार गती अखंड चालणार आहे. मोन्शिअस ह्या तत्त्वज्ञाची अशी खात्री होती की एकदा व्यवस्था तर एकदा अव्यवस्था असे प्रकार होतील, पण दर पांचशे वर्षांनी एक कर्तबगार राजा जन्माला आलाच पाहिजे.

## प्राचीन इराणी कल्पना :

इतिहासाच्या गतीबद्दलच्या झरतुष्ट्रप्रणीत धर्मातील व इतर प्राचीन इराणी साहित्यातील कल्पनाही अशाच मनोरंजक आहेत. इराणी साहित्यातही कालचक्राची कल्पना सांगितलेली आहे. आपल्या –म्हणजे हिंदूंच्या– पुराणातील युग आणि कालचक्राच्या कल्पनांपेक्षा इराणी कालचक्राची कल्पना थोडी अधिक सुटसुटीत दिसते. आपल्याकडील युगे व त्यांचे काल ह्यांचे प्रमाण प्रचंड आहे आणि निरनिराळी युगे कधी हजारो तर कधी लाखो, कोटी वर्षांचीही आहेत, तर इराणी कल्पनेत बारा हजार वर्षांचे एक कालचक्र मानलेले आहे; त्याचे चार सारखे कालखण्ड मानून प्रत्येक युग तीन हजार वर्षांचे धरलेले आहे. ह्यातही विश्वचक्राशी म्हणजे ग्रहगोलांच्या स्थानांशी व गतींशी मानवी घडामोडींचा संबंध जोडण्यात आलेला आहेच. प्रत्येक युगाचे वैशिष्टच हे त्याच्या राशिस्थानावरून ठरविण्यात आले आहे. झरतुष्ट्राच्या व पुढील विचारवंतांच्या कल्पनांप्रमाणे मानव आणि त्याचा समग्र इतिहास ईश्वरनिर्मित आहे. परंतु ईश्वराच्या कार्यात अडथळे आणणारा कुणी एक राक्षस आहे. ईश्वर माणसाच्या भल्यासाठी, जगताच्या कल्याणासाठी स्वतः झटत असतो परंतु त्याला त्यासाठी जगाचे अहित चिंतणाऱ्या शक्तींशी दीर्घकाल लढा द्यावयाचा आहे. ह्या लढ्यात शेवटी परमेश्वराचा म्हणजे कल्याणकारी शक्तीचाच विजय व्हावयाचा आहे. त्या लढ्याचा निकाल, इराणी विचारांप्रमाणे आधीच ठरलेला आहे. अंतिम जय कोणाचा हे आधी पक्के माहीत आहे; आणि तरीही ही लढाई व्हावयाची आहे. ह्यात ईश्वराचा पक्ष न घेता राक्षसी पक्षाला मिळण्याचे स्वातंत्र्य माणसाला आहे, पण त्याच्या घोर परिणामांना त्याने स्वतःच्या जबाबदारीवर तयार व्हावे. म्हणजे झरतुष्ट्राच्या इतिहासाच्या तत्त्वज्ञानात चांगले म्हणजे काय हे सांगितले गेले, त्या चांगल्याला वाईटाशी झगडावयाचे आहे, हाही इशारा देण्यात आला, शेवटी त्या चांगल्याचाच जय नक्की आहे ही भविष्यवाणीही करण्यात आली आणि जरी माणसाला तत्त्वतः वाईट पक्षाला मिळण्याचे स्वातंत्र्य असले तरी अंतिम विजय चांगल्यालाच आहे हे निक्षून सांगितले गेल्यामुळे खरे म्हणजे वाईटाचा पक्ष घेण्याचे स्वातंत्र्य उरतच नाही.

तेव्हा इतिहासाची गती आणि अंत काय आहे हे पक्के सांगून माणसांच्या कृती त्या अनुरोधानेच व्हाव्यात आणि होणार असाच विचार झाला. इराणमध्ये काही दैववाद्यांनी असाही विचार मांडला की, माणूस चांगल्याच्या बाजूला असला काय किंवा वाईटाच्या बाजूला असला काय, इहलोकी त्याचे जे बरेवाईट व्हायचे ते त्याच्या कृतीप्रमाणे नव्हे. इथे दैवच बलवत्तर आहे. दैवात असतील ती सुखदुःखे त्याच्या वाटचास येणारच. चांगल्या कृतीचे फळ वगैरे जे मिळावयाचे ते सगळे मृत्यूनंतर, परलोकात. म्हणजेच ह्या विचाराप्रमाणे इहलोकीचे आपले भवितव्य आपण घडविण्याची माणसाची शक्ती मान्य केलेली नाही. इराणी कल्पनेप्रमाणे माणसाचा इतिहास हा ह्या पृथ्वीतलावर मुळी संपतच नाही. माणसाचा देह संपला तरी त्याच्या आत्म्याचे जीवन चालूच रहाते. त्याचप्रमाणे ह्या इतिहासाच्या तत्त्वज्ञानात समाजाचा आणि एकूण सामाजिक कृतींचाही फारसा संबंध येत नाही. झरतुष्ट्रप्रणीत धर्मात सामाजिक जीवनाची मूल्ये निश्चित सांगितलेली आहेत. त्या धर्माच्या आचारातही समाजनिष्ठा आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव उठून दिसणारी आहे. तथापि त्याच्या मूळ ग्रंथातील इतिहासभाष्य जे आहे ते मात्र दैववाद, त्या दैवानुसार इहलोकी प्रत्येक माणसाला अपरिहार्यपणे जगावे लागणारे जीवन, प्रत्येक व्यक्तीने इतिहासाची निश्चित अशी अखेर लक्षात घेऊन करावयाची कर्तव्ये वगैरे स्वरूपाच्या विवेचनावरच अधिष्ठित आहे. एकंदर कालचक्राची गती, त्या गतीची दिशा वगैरे सर्व ठरलेले आहे. त्या चक्राबरोबर माणसाने ठराविक गतीने फिरावयाचे आहे, अशाच स्वरूपाची ही इतिहासकल्पना आहे.

## ज्यू आणि ख्रिस्ती कल्पना :

पॅलेस्टाइनमधील ज्यू विचारवंत आणि नंतरच्या कालातील ख्रिस्तप्रणीत धर्म आणि तज्जन्य विवेचन ह्यातून आलेले इतिहासविषयक सिद्धान्तसुद्धा असेच ईश्वरी सूत्राच्या कल्पनेवर आधारलेले आहेत. ज्यू तत्त्वज्ञान्यांच्या मते मानवाचा आणि मानवाच्या इतिहासाचा परमेश्वर हा जनकच आहे. माणसाच्या इतिहासातील सर्व चढउतार, सर्व यशापयश हे ईश्वरी हस्तक्षेपानेच होत असतात. सर्व घटना त्या निर्मात्याच्या योजनेबरहुकमच घडावयाच्या आहेत. म्हणून त्याच्या आज्ञा पाळल्या पाहिजेत. त्या आज्ञा प्रत्यक्षात माणसांना कधी धर्मगुरूंमार्फत किंवा उपदेशकांमार्फत समजतील तर कधी राज्यकर्त्यांमार्फत समजतील. धर्मोपदेशक आणि राजे हे दोघेही ईश्वराचे अधिकृत प्रतिनिधीच आहेत. पुष्कळदा दुष्काळ, युद्ध वगैरे ज्या आपत्ती येतात त्यात ईश्वराचा हेतू माणसांना धडे शिकविण्याचा असतो. ईश्वरी आज्ञांचे उल्लंघन केले तर काय होईल ह्याची प्रात्यक्षिके तो सर्वशक्तिमान परमेश्वर दाखवीत

असतो. ही सगळी ईश्वरी योजना चक्रपर अशीच आहे. कोणे एके काळी सुवर्णयुग होते, त्यानंतर माणसाचे पतन झाले, माणूस घसरला; तिसरा कालखण्ड म्हणजे सावकाशपणे झालेल्या त्या घसरगुंडीचाच काळ. मग अवतार होईल, माणसांना पुन्हा योग्य तो जीवनमार्ग दाखविला जाईल, त्याचा उद्धार होईल आणि पुन्हा सुवर्ण-युग येईल : असा काही घटनाक्रम ज्यू विचारवंतांनी सांगितला आहे. त्यातल्या काहींनी काळवेळाचे अचूक भविष्यही वर्तवले , मात्र काहींनी अवतार नेमका केव्हा होईल हे सांगता येणार नाही अशी कबुली दिली. अवतार होणार हे निश्चित पण, एका ज्यू उपदेशकाच्या शब्दातच सांगावयाचे तर; तो अवतार रात्रीच्या चोरासारखा केव्हा अचानक येऊन माणसांना चकित करील ते मात्र सांगणे कठीण.

ख्रिस्ती इतिहासकल्पना ही बरीचशी ह्या मूळ ज्यू तत्त्वज्ञानावर आधारलेली असून त्यात आणखी ख्रिस्तमाहात्म्याची भर पडली आहे. ईश्वराने माणूस निर्माण केला पण त्या माणसाने पाप केले आणि अधःपात सुरू झाला. ख्रिस्ताचा अवतार ते पाप धुवून काढून माणसांना सन्मार्ग दाखविण्यासाठीच आहे. नंतर माणसाचा उद्धार होऊन माणूस पुन्हा ईश्वराकडे जाईल आणि ईश्वराला ठाऊक असलेला, ईश्वरानेच निर्मिलेला कालचक्राचा फेरा पुरा होईल. ह्या ठिकाणीही निरनिराळ्या अवस्थांचे निश्चित काल ठरविण्याचा यत्न झाला . सेंट ऑगस्टीन ह्या सर्व अवस्थांचे वर्णन करून सध्याच्या उद्धाराच्या अवस्थेचा काळ साधारणपणे एक हजार वर्षे असेल असे म्हणतो, पण लगेच सावधपणे सुधारणा करतो की, अगदी नक्की किती काळ ते मात्र तो प्रभूच जाणे.

ज्यूंच्या आणि ख्रिस्तानुयायांच्या इतिहासाच्या विवेचनातही माणसाला फारसे कृतिस्वातंत्र्य उरले आहे असे दिसत नाही. इतिहास घडविणारा तो प्रभू. इतिहास कुठल्या अवस्थांतून कसा पुढे सरकणार आहे हेही त्या आकाशातल्या बापाने आधीच आखून ठेवले आहे. भूत, वर्तमान, आणि भविष्य हे कालभेद अज्ञानी मानवाने केलेले, त्या सर्वसाक्षी परमेश्वराकडे असे कालभेद नाहीत. त्याची योजना पक्की आहे, न बदलणारी आहे. तेव्हा माणसाला त्याची आज्ञा पाळण्याखेरीज आणि त्याच्या योजनायंत्रातील एक लहानसे चाक होऊन फिरण्यापलीकडे काही उरत नाही. इराणी इतिहासकल्पनेच्या संदर्भात म्हटले त्याप्रमाणे उपदेशकांमार्फत, धर्मगुरूंमार्फत किंवा राजांमार्फत आलेल्या ईश्वराज्ञा न मानण्याचे स्वातंत्र्य माणसांना आहे पण त्याची फळे इतकी भयंकर सांगितली आहेत की ते तसे स्वातंत्र्य कोणता माणूस घेईल ? मेल्यानंतर उकळत्या रसात पडण्यापेक्षा , तापलेल्या तव्यावर उभे रहाण्यापेक्षा आणि रौरवनरकात पडण्यापेक्षा निमूट आपल्या देवाच्या आज्ञा पाळाव्यात हे बरे !

## ग्रीक आणि रोमन कल्पना :

प्राचीन ग्रीक लोकांनी विश्वाविषयी आणि मानवी जीवनाविषयी अनेक अंगांनी व अनेक दृष्टींनी विचार केला. अनेक ज्ञानशाखांचे क्षेत्रात ग्रीकांचे विचार तर्कशुद्ध, मूलभूत आणि पुरोगामी असे होते. रोमन लोक हे ग्रीकांच्या इतके ज्ञान-पिपासू नव्हते. ते अधिक व्यवहारी होते, तथापि रोममध्येही अनेक विचारवंतांनी ग्रीकांचे विविध विचार आत्मसात करून पुढे त्यांचा विस्तार केलेलेला आढळून येतो.

तथापि प्राचीन ग्रीसमध्येही एक सर्वशक्तिमान ईश्वर किंवा बहुधा अनेक देवदेवता मानवी घडामोडींचे नियंत्रण करतात, देवदेवतांच्या योजनाबरहुकूम इतिहास घडतो; त्या ऐतिहासिक घटना कधीकधी देव संपूर्णपणे स्वतःच्या सामर्थ्यावर तर कधीकधी पृथ्वीवरील पुरुषोत्तमांच्या साहाय्याने घडवून आणतात; अशाही कल्पना त्यांच्या पुराणातून आणि शास्त्रीय प्रबंधांतूनही मांडलेल्या आढळतात. १०८०० वर्षांचे किंवा १८००० वर्षांचे एक एक युग असते. त्या युगाला काही एक युगधर्म असतो, आणि माणसाची वागण्याची पद्धती ही कालवैशिष्ट्याने ठरत असते असे सिद्धान्त सांगण्यात आलेले आहेत. चालू युग हे त्या ग्रीक इतिहासकारांचे –किंवा पुराणकारांचे– मते लोहयुग आहे. ह्या लोहयुगाचे जे वर्णन ग्रीकांनी दिले आहे ते हिंदूंच्या पुराणातील कलियुगाच्या वर्णनासारखेच आहे. ह्या लोहयुगात भावाचा भावाला, सासऱ्याचा जावयाला, पाहुण्याचा यजमानाला– कुणाचाच कुणाला– भरवसा धरता येणार नाही. कोण कुणाचा कसा विश्वासघात करील हे सांगता यायचे नाही. माणसे अशीच वागणार. ही त्यांची प्रवृत्ती काही काळ अशीच रहाणार. कारण हे कालमहात्म्य आहे. येथे माणसाचा दोष नाही. परंतु ही परिस्थिती केव्हातरी सुधारणारच. कालचक्र फिरत आहे, पुन्हा सुवर्णयुग येणार आहे, तेव्हा माणसांनी चिंता करण्याचे कारण नाही. आणि तसेच चक्र फिरत आपोआप तशी स्थिती येणार असल्यामुळे, आकाशस्थ देवदेवता, किंवा ग्रहतारे ह्यांच्यामुळे ते नवयुग येणार असल्यामुळे माणसाने मुद्दाम त्यासाठी काही धडपड करायला हवी आहे असेही नाही.

इतर प्राचीन संस्कृतींप्रमाणेच ग्रीसमध्येही वरील सारख्या कल्पना आढळत असल्या तरी ह्या संदर्भात ग्रीकांची खरी कामगिरी थोडी निराळीच आहे. इतिहासाचे चक्र विशिष्ट वेगाने आणि गतीने फिरते आहे, फिरत रहाणार आहे. परंतु ते फेरे म्हणजे कोणा देवदेवतांच्या लहरीचे खेळ आहेत असे नव्हे. ते कालचक्र आणि त्याचे भ्रमण हे कुणालाही टाळता येणार नाही अशा निसर्गनियमाने बद्ध आहे, अशा तऱ्हेचे विचार ग्रीसमध्ये मांडण्यात आले. त्या कालचक्राच्या गतीचे गणित किंवा विज्ञान करण्यात आले.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत

पायथागोरस ह्या ग्रीक गणितवेत्त्याने प्रथम विश्वाविषयी असा सिद्धान्त सांगितला की, विशिष्ट नियमांनुसार सर्व ग्रहताऱ्यांचे आणि पृथ्वीचे भ्रमण चालू असते. कोणत्या तरी एका वेळी इतर ग्रहतारे आणि पृथ्वी ह्यांची स्थाने जी असतात व त्यांचे परस्परांपासून जे अंतर असते ती सर्व स्थिती जशीच्या तशी विशिष्ट काला-नंतर पुन्हा निर्माण होते. प्रत्येक वेळी हुबेहुब तसे होत असल्यामुळे अशी स्थिती प्राप्त होण्याचे वेळी पृथ्वीवरील सर्व सजीव निर्जीव वस्तूंची परिस्थिती पूर्वी होती तशीच्या तशी निर्माण होणे आवश्यक आहे, आणि म्हणून इतिहासाची तपशीलवार पुनरावृत्ती अपरिहार्य आहे. स्टोइक विचारवंतांनी ह्या पायथागोरसच्या कल्पनेचा पुष्कळ विस्तार केला आहे. त्यांनी केलेल्या विवरणाप्रमाणे पुन्हा एकदा प्लेटो येणार आहे, सॉक्रेटिस येणार आहे, प्रत्येक माणूस पुन्हा त्याच परिस्थितीत, त्याच घरात, त्याच बायका-मुलांसह आणि त्याच मित्रमंडळींसह एकदा जसे जीवन जगला तसेच पुन्हा जगणार आहे, पुन्हा पुन्हा जगणार आहे.

एपिक्यूरस व त्याचे अनुयायी ह्यांनी इतिहासाच्या कालचक्राचे एक प्रकारचे भौतिकशास्त्रच बनविले. विश्व म्हणजे एक भली मोठी पोकळी आणि त्यात वावरणारे अगणित परमाणू. ह्या परमाणूंच्या विविध आकारांनुसार, लांबीरुंदीप्रमाणे व वजना-प्रमाणे जगातील भिन्न भिन्न गोष्टी निर्माण होतात. शरीर आणि आत्मा हे देखील असेच परमाणुविशेष आहेत. परमाणूंच्या संघातामुळे जग निर्माण होते आणि त्या परमाणूंच्या विकेंद्रीकरणामुळे जग नाहीसे होते. हे पुन्हा पुन्हा होणार आहे, असेच होणार आहे. निराळे किंवा नवीन असे काही होण्याची शक्यताच नाही. एपिक्यूरस पंथाचा रोमन प्रणेता लुक्रेशस ह्याच्या मते इतिहास ही निश्चितपणे एक प्रगतीची कथा आहे. माणूस बोलू लागला, घरे बांधू लागला, कापड विणू लागला गाऊ-नाचू लागला आणि अशाच तऱ्हेने जीवनपद्धती सतत बदलत गेली आहे, पण एवढे मान्य करूनही लुक्रेशस पुढे म्हणतो की, ही प्रगती अशी सतत पुढे चालू राहील असे मात्र नाही. निसर्गनियमाप्रमाणे सर्वच नाशिवंत आहे. ही पृथ्वीही एके दिवशी संपुष्टात येणार आहे. तेव्हा नवा इतिहास घडविण्याची वगैरे भलती ईर्षा मनुष्यप्राण्याने का बाळगावी ?

### प्राचीन भारतीय कल्पना :

प्राचीन भारतीय वैचारिक साहित्यातही प्राचीन ग्रीक साहित्याप्रमाणेच अनेक तत्त्वज्ञाने आणि अनेक कल्पना निरनिराळ्या दृष्टींनी आलेल्या दिसतात. अनेकदा त्यातील विचारांची सूक्ष्मता आणि कल्पनेची झेप आश्चर्यचकित करून टाकणारी दिसते. प्राचीन भारतीयांनी इतिहासलेखन असे फारसे केलेच नाही. तथापि

इतिहासाविषयी , कालप्रवाहाविषयी, स्थित्यंतरे आणि त्यामागील सूत्रे ह्या अनुरोधाने पुष्कळ विवेचन ऋग्वेदकालापासून पुढे कित्येक शतके केलेले दिसते. इतर प्राचीन संस्कृतींप्रमाणे भारतातही दैवी शक्तीवर विश्वास होताच. निसर्गात बदल घडविणाऱ्या देवता मानवी जीवनाच्याही नियंत्रक होत्या. तेव्हा कर्ताकरविता परमेश्वर, माणसे म्हणजे त्याच्या हातातील बाहुली ही कल्पना आलीच. आपण काहीतरी करतो आणि त्यामुळे काहीतरी घडते असे माणसांना उगीच, अज्ञानामुळे वाटत असते. वस्तुतः परमेश्वरच सर्व करवितो. परमेश्वर हे जे करतो ते अज्ञ मानवांना धडे शिकविण्याचे हेतूने असेल; ते त्याच्या वैश्विक योजनेचा केवळ एक लहानसा भाग असेल किंवा त्या सगळ्या नुसत्या त्याच्या लीला असतील – काहीही असेल– परंतु सर्व गोष्टींच्या मागे परमेश्वरी सूत्र असते हा विचार प्राचीन भारतीय साहित्यात अनेक ठिकाणी, अनेक प्रकारे व्यक्त झालेला दिसतो.

आणि परमेश्वर हे जे सगळे घडवित आहे त्याची काही एक प्रदीर्घ योजनाही काहींच्या प्रत्ययास आली. त्यातून मन्वन्तर, कल्प, महायुग, युग आणि युगधर्म वगैरे तपशीलांचा विस्तार झाला. परमेश्वराने अमुक युगात, अमुक प्रकारेच माणसांना वागायला लावावयाचे असे ठरविलेले असते. त्यासाठी परमेश्वर पुन्हा पुन्हा मानवांच्या साहाय्याने आपल्या योजनेबरहुकूम कामे पार पाडीत असतो. मुळात युग शब्दाचा अर्थ पाच किंवा दहा वर्षांचा काळ एवढाच होता. परंतु पुढे युग म्हणजे हजारो लाखो वर्षांचा एक एक कालखंड असा अर्थ पुराणांनी रूढ करून टाकला. सत्य, त्रेता, द्वापार, आणि कलि ह्या चार युगांच्या कालावधीत माणसांची जीवनपद्धती त्या त्या युगाच्या धर्माप्रमाणेच ठरणार. पहिल्या सत्ययुगातील माणसे सत्प्रवृत्त असणारच. त्या काळात सर्व प्रकारची सुखसमृद्धीही दिसणारच. पुढे प्रत्येक युगात हळूहळू परिस्थिती बिघडत जाणार. नीतीची अवनती होत जाणार. आणि ऐहिक जीवनात दुष्काळ, रोगराई-सारख्या आपत्ती भोगाव्या लागणारच. ह्यातले काही चुकविता येणेच शक्य नाही. सध्या शेवटचे कलियुग चालू आहे. ह्या कलियुगात जी अनीति दिसते, परस्परां-विषयींचा जो अविश्वास दिसतो, जे एक प्रकारचे पतन दिसते आणि सर्व बाजूंनी दारिद्र्य दिसते ते सर्व दैवी योजनेचाच भाग आहे. माणसाच्या कर्तृत्वाला अवकाश फारच थोडा.

बौद्ध, जैन इत्यादी धर्मपंथांनी ब्राह्मणधर्माविरुद्ध काही बाबतीत बंड उभारले हे खरे. पण इतिहासाचा अर्थ लावण्यात त्या पंथातील विचारवंतांनी जुन्या कल्पनाच स्वीकारून त्यांना अधिकच विचित्र स्वरूप दिले. ब्राह्मणी ग्रंथांतील काळाचे मोजमाप हे अकल्पनीय अशा मोठ्या प्रमाणावर झाले होते, पण बौद्ध, जैन, आजीविक ह्यांनी

त्यावरही मात करून आपला काळाचा हिशेब असा दाखविला आहे की तो पाहून कुणीही थक्क व्हावे. एक युग म्हणजे ते केवढे हे सांगताना एक बौद्ध ग्रंथकार म्हणतो: एक चांगला शंभर हात लांब, तितकाच रुंद आणि तितकाच उंच असा भरीव, कुठेही खाचखळगा किंवा फट नसलेला मोठा धोंडा असावा, त्या धोंड्याजवळ दर शंभर वर्षांनी एकदा एका माणसाने यावे आणि नाजुक रेशमी रूमालाने एकदाच तो खडक पुसावा, अशा तऱ्हेने तो खडक पूर्णपणे झिजून जायला जो काळ लागेल तो एका युगाचे काळाचे मानाने कितीतरी कमी असेल. असे विलक्षण हिशेब, अशीच चमत्कारिक उदाहरणे घेऊन जैनांनी व आजीविकांनीही दिले आहेत.

ब्राह्मणी तत्त्वज्ञान आणि बौद्ध, जैनादी धर्मपंथ ह्या सर्वांनी कालाविषयी आणि मानवी जीवनातील स्थित्यंतरांविषयी जे विचार मांडले आहेत त्यातून काही एक कालचक्राची कल्पना सर्वांनीच गृहीत धरलेली होती असे दिसते. ब्राह्मणी तत्त्वज्ञानात बहुधा हे चक्र फिरविणारा कुणी परमेश्वर असतो तर बौद्ध आणि जैन इत्यादिकांच्या तत्त्वज्ञानात तसा कुणी परमेश्वर नसतो एवढाच काय तो फरक. परमेश्वर असो, नसो; कालचक्र विशिष्ट दिशेने, विशिष्ट पद्धतीने आणि विशिष्ट वेगाने फिरायचेच.

हिंदू, बौद्ध, जैन ह्या सर्वांनी ह्या कालचक्रातून सुटका करून घेता येईल असा मार्ग मात्र सांगितला आहे. तो मार्ग म्हणजे मोक्ष किंवा निर्वाण. सर्व सुखदुःखांच्या पलीकडे जाण्याची, सर्व अवस्थांच्या बाहेर पडण्याची आणि सर्व फेऱ्यातून मुक्त होण्याची गुरूकिल्ली म्हणजे मोक्ष. ज्या व्यक्तीने मोक्ष मिळविला किंवा निर्वाणपद प्राप्त करून घेतले तिचा ह्या सर्व कालचक्राशी काही एक संबंध येत नाही. तेव्हा ह्या कालचक्रातून बाहेर पडता येते; पण ते प्रत्येक व्यक्तीला स्वतंत्रपणे. एक व्यक्ती त्यातून बाहेर पडली तर ती स्वतःपुरता प्रश्न सोडविते, परंतु कालचक्राची गती किंवा दिशा बदलणे हे मात्र त्या व्यक्तीचे हाती नाही. ज्याची इच्छा असेल त्याने स्वतःपुरते त्या फेऱ्यातून निसटावे, परंतु ते कालचक्र ठराविक पद्धतीने फिरत रहाणारच. स्थूलमानाने भारतातील कालचक्राची कल्पना ही अशी दिसते.

**इस्लामी कल्पना :**

इस्लामी संस्कृतीच्या क्षेत्रातही अशीच ईश्वरनिष्ठ आणि कालचक्रनिष्ठ इतिहासमीमांसा आढळते. तथापि इस्लामी विचार मुख्यतः किंवा जवळजवळ सर्वस्वीच सर्वशक्तिमान आणि सर्वव्यापी ईश्वराच्या–अल्लाच्या– अनुरोधानेच मांडलेला आहे. चौदाव्या शतकातील इब्न खाल्दूनने निरनिराळी राज्ये नि सत्ता ह्यांचे उदय, वृद्धी व अस्त ह्यासंबंधी काही ठोकळ नियम सांगितले. प्रत्येक अवस्थेचा काल काय

असतो ह्याचे गणितही त्याने दिले. पण तोही कुराणप्रणीत अल्लाच्या सामर्थ्याविषयी शंका उपस्थित करू शकत नव्हता. परंतु हा इब्न खाल्दूनचा काही एक कालचक्र दाखविण्याचा लहानसा प्रयत्न सोडला तर कुराण व इतर प्राचीन इस्लामी साहित्य ह्यातून प्रसंगवशात जे इतिहासभाष्य आलेले दिसते ते सगळे ईश्वरी इच्छेच्या पायावर आधारलेले आहे. मानवी जीवनात समाजांच्या, राष्ट्रांच्या जीवनात बदल घडतात, स्थित्यंतरे होतात. पण ह्या घडामोडी बौद्ध किंवा जैन तत्त्वज्ञानाप्रमाणे किंवा ग्रीसमधील पायथागोरस वगैरेंच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे ईश्वराचा संबंध न आणता कोणत्या तरी वैश्विक नियमांचे अपरिहार्य परिणाम असतात अशा तऱ्हेचा विचार इस्लाममध्ये केव्हाही कुठेही मांडला गेला नाही. ईश्वर वगळून कशाचाच अर्थ लागणार नाही, लावताच येणार नाही. जगातील सर्व घडामोडींच्या मागचे एकमेव कारण म्हणजे अल्ला. त्या अल्लाला काही कृती करावयाची असेल तर तो त्यासाठी कारणे शोधीत बसत नाही तो ती करतोच. आणि म्हणून त्या ईश्वरी कृतींच्या कारणांचा शोध घेणे हेच मुळी पाप आहे. अर्थात असे असूनही कुराणाने जो सन्मार्ग सांगितला आहे त्याबरहुकूम जाणाऱ्या व्यक्तीला, समाजाला वा देशाला अल्ला सर्वतोपरी साहाय्य करतो, तर त्या मार्गाचा, म्हणजेच खुद्द अल्लाने दिलेल्या मार्गाचा, अनादर करणाराला तो शासन करतो अशाही कल्पना मांडल्या आहेत. काही असले तरी मानवी जीवनातील स्थित्यंतराचा, इतिहासातील घडामोडींचा अर्थ लावण्याचा खटाटोप हाच मुळी इस्लाममध्ये नामंजूर आहे. तसा प्रयत्न ही एक चूक आहे आणि एका प्रकारे तो एक अपराधही आहे.

### प्राचीन कल्पनांचे मूल्यमापन :

वर उल्लेखिलेल्या प्राचीन इतिहासविषयक विविध कल्पना पहाता असे लक्षात येते की, आजच्या वैज्ञानिक प्रगतीच्या काळात, बुद्धिवादी आणि तर्कनिष्ठ विचार-पद्धतींच्या कसोटीवर त्या बहुतेक सर्व जुन्या कल्पना टाकाऊच आहेत. जगाच्या निरनिराळ्या भागातील प्राचीन विचारवंत ज्या परिस्थितीत विचार करीत होते ती ध्यानात घेतली तर त्यांचे ते अडाणी आणि पोरकट वाटणारे विचार फारसे दूषणीय ठरू नयेत. भूतकालाच्या ज्ञानाची त्यांची साधने अतिशय मर्यादित होती. काही प्रमाणात विज्ञान होते पण, वैज्ञानिक पद्धती अशी बसली नव्हती. अशा स्थितीत केवळ चिंतनाने प्राचीन विचारवंतांना जे समजले ते त्यांनी मांडून ठेवले आहे, त्यातील अज्ञान हे आजच्या काळातील विचारवंताला व सामान्य माणसालाही उघड दिसणारे आहे. पुष्कळदा प्राचीन काळी इदिहासाविषयीच्या अशा कल्पना केवळ साहित्यिक कल्पना-रम्यतेतूनही निर्माण झाल्या. एखाद्या माणसाच्या जीवनावर काल्पनिक

कथा-कादंबरी तयार होऊ शकते तर सबंध मानवजातीच्या जीवनावर आणि मानवजात जेथे रहाते त्या पृथ्वीच्या आणि पृथ्वी ज्याचा भाग आहे त्या विश्वाच्या जीवनावरही अशी एखादी कल्पनारम्य दीर्घ कथा का लिहू नये ? तेव्हा प्राचीन कालचा पुष्कळसा इतिहास आणि अनुषंगाने आलेले इतिहासविषयक भाष्य म्हणजे तत्कालीन ललितसाहित्यच होय. ते साहित्य वास्तवतेपेक्षा अद्‌भुतरम्यतेने सजवणे प्राचीनांनी अधिक पसंत केले. पृथ्वीवरील घडामोडी आणि त्यांच्या नैसर्गिक कारणांविषयीचे अज्ञान ह्यातून देवाचे किंवा अनेक देवतांचे स्थान आणि महत्त्व निश्चित झाले. त्या देवदेवतांची कृपा आणि अवकृपा निर्णायक ठरल्या. देवासंबंधीच्या भक्तीतून आणि भीतीतूनही बऱ्याच प्रमाणात प्राचीन काळातील इतिहासाचे तत्त्वज्ञान आकारलेले आहे. ह्या खेरीज राजांनी आणि धर्मगुरूंनी स्वार्थासाठी, आपली सत्ता व आपले महत्त्व अबाधितपणे टिकविण्यासाठी, काही इतिहास सांगितला आणि त्याचा विशिष्ट अर्थही सांगितला. राजा हा ईश्वराचा प्रतिनिधी आहे, धर्मगुरू हा ईश्वराचा प्रेषित आहे, ईश्वराच्या आज्ञेने आणि योजनेबरहुकूम मानवी इतिहास घडावयाचा आहे. उपाध्याय आणि राजे हेच ती योजना जाणणारे आणि राबविणारे अधिकारी आहेत. ती ईश्वरी योजना काय आहे हे जेव्हा ह्या वर्गाकडून सांगण्यात आले तेव्हा स्वाभाविकच त्या विवेचनात अज्ञानाचे बरोबरीने त्यांच्या हितसंबंधांना सोईचे होतील असे तपशीलही भरपूर आले. तेव्हा प्राचीन काळच्या ईश्वरसूत्राधिष्ठित किंवा कालचक्राधारित अशा ज्या इतिहासविषयक कल्पना आहेत त्यांना काही कल्पना ह्यापलिकडे अधिक महत्त्व देण्याचे कारण नाही. मानवी इतिहासातील ते जुने इतिहासविषयक विचार आता इतिहासजमा धरावयास हरकत नाही.

## इतिहासविषयक कल्पना आणि प्रत्यक्ष इतिहास

प्राचीन काळी सर्व काही ईश्वर करतो आणि करवितो आणि सर्व काही एका विशिष्ट चक्रात ठराविक गतीने आणि वेगाने फिरणार आहे अशा तऱ्हेने कल्पना जरी मांडल्या गेल्या तरी त्या काळच्या समाजातील सर्व जीवन ह्या कल्पनांबरहुकूमच जगले जात होते असे मात्र मानण्याचे कारण नाही. जे घडायचे ते घडणारच आहे, मग आपण कुठल्याही प्रकारची धडपड कशासाठी करावयाची असे म्हणून प्राचीन लोक स्वस्थ बसून राहिले असे दिसत नाही. ईश्वराचे प्रतिनिधी जे राजे त्यांना सिंहासनावरून खाली ओढण्याचे प्रकार अनेकदा झाले. ईश्वराच्या प्रेषितांना, धर्मगुरुंना आणि उपाध्यायांना, सामान्य जनतेने अनेकदा ठोसे देऊन माणुसकीचा धर्म शिकविला. माणसांनी निरनिराळे शोध लावले; निरनिराळ्या चळवळी केल्या; शेतीचे, उद्योगधंद्यांचे वगैरे नानाविध प्रयोग केले, लढाया केल्या, साम्राज्ये उभारली,

शासनसंस्था निर्माण केल्या, सामाजिक जीवनाचे संकेत आणि कायदे तयार केले : ईश्वर आहे, तो सर्व काही त्याच्या योजनेप्रमाणे करील, आपल्याला चिंता करण्याचे कारण नाही असे मानून माणसे निष्क्रिय राहिली असे दिसत नाही. म्हणूनच जुन्या कालातील विशिष्ट इतिहासविषयक तत्त्वज्ञानाची आणि माणसाने घडविलेल्या प्रत्यक्ष इतिहासाची सांगड घालू नये. चार विचारवंत आपआपल्या परीने, आपल्या हौशीनुसार, बौद्धिक कुवतीनुसार किंवा स्वार्थानुसार काहीही सांगत राहिले तरी प्रत्यक्षात ते सर्वच्या सर्व आणि सर्व लोकांनी ऐकले असे मात्र नाही. बर्ट्रांड रसेलने अगदी स्वच्छ शब्दात ही वस्तुस्थिती सांगितली आहे. तो म्हणतो, "Nobody really worries much about what is going to happen millions of years hence. Even if they think they are worrying much about that, they are really deceiving themselves. They are worried about something much more mundane, or it may merely be a bad digestion; but nobody is really seriously rendered unhappy by the thought of something that is going to happen to this world millions and millions of years hence. ( Why I am not a Christian – पृ. ७ ) सर्वसामान्य माणूस भविष्याच्या चिंतेने हवालदील झाला असेल आणि ईश्वरी योजनेला स्मरून तो आपले जीवन जगला असेल असे मानणे अशक्य आहे.

## प्राचीन कालातील काही वेगळे विचार :

शिवाय वर प्राचीन काळातील ईश्वरी सूत्र आणि कालचक्र ह्यांच्या अनुरोधाने आलेल्या ज्या काही कल्पना थोडयाशा तपशीलवार सांगितल्या आहेत त्याहून निराळ्या कल्पना आणि निराळे विचार तेव्हा सांगितले जात नव्हतेच असेही नाही. चीनमधील हॅन-फी-त्से ह्याने ईश्वरी सूत्राचा आणि कालचक्राचा स्वीकार केला नाही. त्याने एक प्रकारचा सामाजिक सापेक्षतावाद सांगितलेला आहे. परिस्थिती बदलत असते, त्यानुसार निरनिराळ्या गरजा निर्माण होत असतात आणि त्यासाठी नवनवे विचार आणि नवनवी कार्ये ह्यांची आवश्यकता असते आणि हे सर्व माणसांनीच स्वतःसाठी करावयाचे असते असे विचार त्याने मांडले. प्राचीन भारतातही चार्वाकासारख्या नास्तिक विचारवंतांनी दैव-दैव अशा सर्वच कल्पना धुडकवून लावल्या. वेदोक्त धर्म मानणाऱ्या चाणक्यासारख्या राजनीतिज्ञानेही ऐतिहासिक घडामोडींविषयी ईश्वरी सूत्रांची किंवा कालचक्रांची कल्पना न मानता आपले स्वतंत्र विचार मांडले आहेत. एका सूत्रातून चाणक्य सांगतो की स्थित्यंतर पूर्णपणे दैवीही नसते किंवा पूर्णपणे मानवीही नसते. ते दोन्हीही ("दैवमानुषम् हि कर्म लोकं यापयति" ५.९६) असते.

ह्याठिकाणी मानवाच्या कर्तृत्वाची स्पष्ट दखल घेण्यात आली आहे. आणि येथे हेही मुद्दाम लक्षात घेतले पाहिजे की, चाणक्याच्या सूत्रातील " दैवम् " म्हणजे नशीब नव्हे की ईश्वरी इच्छाही नव्हे. ते काय आहे हे चाणक्यालाही माहीत नाही. तो एवढेच म्हणतो की, ज्याची आधी कल्पना येऊ शकत नाही ते दैवी, ज्याची कल्पना असते आणि जे माणसाच्या हातातले ते ' मानुषम् ' (अदृष्टकारितं दैवं । दृष्टकारितं हि मानुषम् ५.९६. )

**अर्वाचीन दैव-दैववाद :**

प्राचीन काळात ईश्वरीसूत्र, कालचक्र वगैरे कल्पना नाकारणारे काही विचारवंत निघाले ही जशी आश्चर्याची गोष्ट वाटते तितकीच किंवा त्याहूनही आश्चर्याची गोष्ट अशी आहे की ज्ञानाच्या ह्या प्रगत अवस्थेतही, आधुनिक काळातसुद्धा, मानवाचा पुष्कळसा भूतकाळ पुष्कळ विश्वसनीय साधनांनी बराचसा सत्य स्वरूपात पुढे आलेला असतानाही, अर्वाचीन काली असे काही विचारवंत निघाले आहेत की, ज्यांना ईश्वरी-सूत्राची आणि कालचक्राची कल्पना मान्य आहे. काळाप्रमाणे भाषा बदलली आहे, सिद्धान्त मांडण्याच्या पद्धती निरनिराळ्या झाल्या आहेत. नवीन विज्ञानाचा आणि वैज्ञानिक पद्धतीचा आधार घेऊन आणि कधी तसा आव आणून इतिहासाचे ईश्वरनिष्ठ किंवा कालचक्रपर असे काही तत्त्वज्ञान अलीकडच्या कालातही सांगितले गेले आहे, सांगितले जात आहे. ईश्वरीसूत्रावर आणि कालचक्रावर आधारलेल्या इतिहास-भाष्याचा आढावा पूर्ण करण्यासाठी प्राचीन काळातील तशा कल्पनांचा थोडासा मागोवा घेतल्यानंतर आता अशा प्रकारच्या काही नवीन कल्पनांकडे वळणे योग्य होईल.

परमेश्वराला सर्व कर्तृत्व देऊन, त्याला सर्व मानवी इतिहासाचा निर्माता, माणसांना तारणारा किंवा मारणारा असा जाहीर करून त्या अनुरोधाने इतिहास लिहिण्याची परंपरा आजतागायत टिकून राहिलेली दिसते. मध्ययुगात ख्रिस्ती चर्चचा आणि चर्चप्रणीत जीवनमार्गाचा विलक्षण पगडा जेव्हा जनमनावर होता तेव्हा तर सेंट ऑगस्टाइन, सेंट अॅक्वेनास वगैरे धर्मोपदेशकांनी ईश्वरनिष्ठ आणि बायबलप्रणीत असे इतिहासाचे तत्त्वज्ञान सांगितलेच. परंतु युरोपात पंधराव्या शतका-पासून पुढे बौद्धिक क्रांती झाली, धर्मसुधारणेची प्रचंड चळवळ झाली, औद्योगिक क्रांतीने नवे जीवन आणि नवे विचारविश्व निर्माण झाले तरीही बायबलच्या आधारे ईश्वरनिष्ठ असे इतिहासभाष्य केले जात राहिलेच. अलीकडच्या काळातील नेबूर हा अमेरिकन धर्मवेत्ता हा अशा प्रकारच्या विचारसरणीचे जिवंत प्रतिनिधित्व करीत आहे. नेबूरची इतिहासमीमांसेची पद्धती हीसुद्धा निष्ठापरच आहे. तो स्वतः म्हणतो की, इतिहासाचा ख्रिस्ती दृष्टिकोन जो आहे तो भूतकालात घडलेल्या प्रत्यक्ष घटनांच्या

विश्लेषणातून घटनांचे क्रम, त्यामागील धागेदोरे वगैरेच्या सूक्ष्म अभ्यासातून मुळीच समजून येणार नाही. तो दृष्टिकोन श्रद्धेतून निर्माण होतो. एकंदर ख्रिस्ती दृष्टिकोनाचे हेच रहस्य आहे. तेव्हा ह्याची चिकित्सा तरी कशी करावयाची ? प्राचीन धर्मग्रंथांचा आधार घेऊन त्यातील सोईस्कर असा भाग निवडून घेऊन प्राचीन ग्रंथांशी जुळणारे परंतु आधुनिक तार्किक विचारसरणीच्या कसोटीनेही बरोबर दिसेल अशा तऱ्हेचे इतिहासभाष्य केवळ ख्रिस्ती परंपरेतच आहे असे मात्र समजण्याचे कारण नाही. डॉ. राधाकृष्णन् वगैरे सारख्यांनी हिंदू परंपरेला शोभेल अशा तऱ्हेचे इतिहासभाष्य देऊन तशाच प्रकारचा उद्योग केला आहे.

कधी कधी ईश्वराचे जागी एखादे परमतत्त्व येते. इतिहासाच्या घडामोडीत कुठल्या तरी एका तत्त्वाचा विकास आहे, कोणत्या तरी गूढ शक्तीचा तो एक निश्चित दिशेने आणि निश्चित पद्धतीने होत जाणारा आविष्कार आहे असाही काही अर्थ सांगितला गेला. ह्या जातीच्या विचारात जर्मन तत्त्वज्ञ हेगेल ह्याची इतिहासमीमांसा बरीच लोकप्रिय झाली. अभ्यासकांना वर्षानुवर्षे हेगेलच्या तत्त्वज्ञानाचे आकर्षण वाटत राहिले. एक चैतन्य, एक परमतत्त्व, विशिष्ट संघर्ष आणि समन्वय पद्धतीने विकास पावत आहे, त्याच्या विकासाचे निश्चित टप्पे आहेत वगैरे स्वरूपाचे हेगेलचे तत्त्वज्ञान हे पद्धतीच्या बाबतीत पुढे कार्ल मार्क्सच्या इतिहासाच्या तत्त्वज्ञानालाही आधारभूत झाले. हेगेलच्या तत्त्वज्ञानाची थोडी अधिक तपशीलवार चर्चा पुढे योग्य ठिकाणी येईलच. प्राचीन विश्वशास्त्राधारित कालचक्रपर सिद्धान्तही पुढील कालात अगदी विसरले गेले असे नाही. ग्रहांच्या गतीचा आणि विश्वाच्या एकंदर व्यवस्थेचा मानवी जीवनाशी काहीतरी संबंध असावा ही कल्पना आजतागायत टिकून आहे. मानवी घडामोडीचा अर्थ लावताना ग्रह आणि त्यांचे कर्तृत्व लक्षात घेण्याची सवय सुटलेली नाही हे फलज्योतिषाचा लोकमनावरील जो पगडा आहे तो पाहता सहज लक्षात येते. व्यक्तींप्रमाणेच निरनिराळ्या देशांच्या आणि खंडांच्याही कुंडल्या मांडल्या जातात आणि अमुक काली पाकिस्तानचे काय होणार अशासारखी भविष्ये निश्चित सांगितली जातात.

परंतु अलीकडच्या काळात पूर्वीच्या मानाने ईश्वरावरचा, धर्मग्रंथांवरचा, ग्रहांच्या कर्तृत्वावरचा आणि परमेश्वराने किंवा ग्रहगोलादिकांनी आखून दिलेल्या चक्रावरचा विश्वास बराच कमी झाला आहे हेही खरे. अलीकडच्या काळात इतिहासाची काही एक नियमबद्धता, काही एक गती आणि दिशा वंशशास्त्र, भूगोलशास्त्र किंवा प्रत्यक्षात घडलेल्या हजारो वर्षांच्या घडामोडीतून दिसणारे मानवी जीवनाचे काही प्रवाह ह्यावर बसविलेली आहे. त्या सर्व मतप्रणालींचा परामर्श पुढील प्रकरणातून घ्यावयाचा आहे.

## ईश्वरसूत्र आणि कालचक्र कल्पनांचा फोलपणा :

ह्या प्रकरणात सांगितलेल्या ईश्वरनिष्ठ, निसर्गनिष्ठ अशा कालचक्रपर इतिहासभाष्याचा फोलपणा आता फार तपशीलात जाऊन उघड करण्याचे कारण उरलेले नाही. ईश्वर कर्ताकरविता आहे आणि त्याच्या इच्छेने सगळा इतिहास घडतो असे सांगणारांना काही प्रश्न विचारता येतील. जो ईश्वर हे सर्व करतो असे तुम्ही मानता त्याचे अस्तित्व सिद्ध झाले आहे काय ? समजा ईश्वराचे अस्तित्व सिद्ध झाले, तरी तो एवढा कर्तबगार आहे ह्याला पुरावा काय ? ईश्वर आहे आणि तो सर्वशक्तिमान आहे असे मानले तरी एवढे मोठे कालचक्र आणि मानवी जीवनचक्र निर्माण करण्याची त्याला जरूरी काय होती ? माणूस निर्माण करावयाचा, त्याला पाप करायला लावावयाचे, मग त्याला धडा द्यायचा वगैरे हे सगळे उद्योग ईश्वर कशासाठी करतो ? ह्या त्याच्या लीला किंवा खेळ आहेत असे मानले तर मग ईश्वर म्हणजे माणसांना हवे तसे नाचवून स्वतःची करमणूक करवून घेणारा कुणी एक खुशालचेंडू आहे असेच मानावयाचे की काय ? सर्वच गोष्टी जर ईश्वराच्या इच्छेने होत असतील तर तसे मानणारांनी माणसांना स्वस्थ बसून रहाण्याचा सल्ला का देऊ नये ? ईश्वरी प्रेरणेनेच जर सर्व घडते तर सत्कृत्य करणाराला बक्षीस आणि दुष्कृत्य करणाराला शिक्षा हे तरी काय म्हणून ? तसेच त्या परमेश्वराच्या योजनेविषयी निरनिराळ्या देशी आणि काली इतके भिन्न भिन्न तपशील कसे सांगितले जातात ? अनेक विचारवंतांनी अनेक प्रकारच्या योजनांचे आराखडे दिले आहेत, त्या सर्वांच्यात एकाच ईश्वरी योजनेविषयी एकवाक्यता का नसावी ? कुणी तरी एक जण योजना बरोबर सांगतो आहे आणि बाकीचे चुकीची देत आहेत असे म्हटले तर मग बरोबर योजना कुणाची ? अमक्याचीच बरोबर असे कुठल्या आधारावर ठरवावयाचे ? बरे, ती ईश्वरी योजना इतकी गूढ, आणि अगम्य असेल, कुणालाही कधी कळू शकणार नाही असा प्रकार असेल तर त्यासंबंधी विचार करण्याचे तरी कारण काय ? अशा तऱ्हेच्या प्रश्नांना ईश्वरी सूत्राच्या अनुरोधाने इतिहासाचा अर्थ सांगणारे भाष्यकार तर्कशुद्ध अशी उत्तरे देऊ शकणार नाहीत आणि म्हणूनच ते शेवटी हा विश्वासाचा प्रश्न आहे असे सांगून मोकळे होतात. कधी भरभराट दिसली तर ती ईश्वराची कृपा आणि अधःपतन दिसले तर ती ईश्वराने केलेली शिक्षा असाच अर्थ लावणाऱ्या नेबूरसारख्याला आपण काय उत्तर देऊ शकणार असे म्हणून विल्यम ड्रे सारखा इतिहासवेत्ता कपाळाला हात लावतो. ( Philosophy of History पृ. ९८-११२ )

विश्वव्यवहाराचे स्वरूप शास्त्रज्ञांना अद्यापही पूर्ण समजले नाही. परंतु ते काहीही असले तरी मानवी जीवनातील घडामोडींशी त्याचा संबंध लावण्याचा खटाटोप

मात्र निव्वळ व्यर्थ आहे. प्रत्यक्ष ऐतिहासिक घटना पाहिल्या तर सूर्य-चंद्र, उन्हाळा-पावसाळा-हिंवाळा ह्यासारखी नियमबद्धता सामाजिक जीवनाच्या घडामोडीत कधीच दिसलेली नाही. एक एक कालचक्र फार दीर्घ असते आणि चालू फेऱ्यातील सर्व घडामोडी दुसऱ्या फेऱ्यात पुनः जशाच्या तशा होतील असे मानायला पुरावा तरी काय ? एक कालचक्र २८००० किंवा ८४००० वर्षांचे किंवा असे काहीतरी असते ह्या गणिताला आधार काय ? कल्पनाविलास कितीही करावा; फार दूरच्या भविष्यकाळाविषयी तर खुशाल हवे ते बोलावे. मी आता ह्या ठिकाणी अमुक नावाचा माणूस, अमुक गावात, अमुक इमारतीत, अमुक खुर्चीवर बसून, अमुक एक लेखन करीत आहे हे सर्व असेच्या असे १७५१२ वर्षांनी हुबेहुब घडणार आहे असे काही मी म्हटले तर मला कोण अडविणार ? ते कोण केव्हा खोटे ठरविणार ? समजा १७५१२ वर्षांनी त्या वेळच्या कोणा संशोधकाला मी आज जे म्हणतो आहे त्यासंबंधीचे अस्सल कागदपत्र मिळाले आणि त्यावेळी तो पुराव्यानिशी माझी थापाड्या म्हणून संभावना करू शकला तरी आज माझे काय बिघडायचे आहे ? म्हणूनच प्रदीर्घ काळाचे एक चक्र कल्पिणे आणि मग त्यासंबंधी हवे ते तारे तोडणे ही एक अगदी निर्वास्तपणे करता येण्यासारखी गोष्ट आहे. तर अशा तऱ्हेच्या कालचक्राच्या कल्पना ह्या पोरकट आणि हास्यास्पद म्हणून सोडून देणेच बरे.

ह्या प्रकरणात ईश्वरपर आणि कालचक्रपर इतिहास-कल्पनांची दखल घेऊन त्यांचा विशेष गंभीरपणे विचार करण्याचे कारण नाही हे पाहिले. फलज्योतिषशास्त्र किंवा विश्वशास्त्र वगळून भौतिक स्वरूपाची कारणमीमांसा देऊन इतिहासाच्या नियमबद्धतेचे वंशशास्त्र, भूगोल, किंवा समाजशास्त्र वगैरेंच्या आधाराने जे विवेचन अलीकडच्या काळात झाले आहे व होत आहे ते मात्र अधिक काळजीपूर्वक तपासावे लागेल. अधिक काळजीपूवक असे म्हणण्याचे कारण हे की ह्या नवीन विवेचनातून ईश्वर किंवा कोणत्याही प्रकारचा गूढवाद न आणता तर्कशास्त्राची आणि विज्ञानाच्या पद्धतीची कास धरलेली असते. म्हणून त्यांची तेच कस लावून चिकित्सा करावी लागेल. पुढील प्रकरणातून क्रमशः तेच करावयाचे आहे.

## संदर्भ साहित्य

(1) Philosophies of History
– Cairns, Grace; London, 1963
(2) The Idea of History
– Collingwood R, G.; Oxford, 1946

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
निबंध

( 3 ) Enquiries into Religion and Culture
- Dawson, Christopher; New York, 1953

( 4 ) Cosmos and History
- Eliade, Mircea; New York, 1959

( 5 ) The Nature of Historical Explanation
- Gardiner Patrick; London, 1952

( 6 ) A Guide to Historal Method
- Garraghan G. J. and Delanglez J.; New York, 1957

( 7 ) Philosophy of History
- Dray, W. H; Prentice-Hall, 1964

( 8 ) Philosophy and History
- ed. Hook Sidney; New York, 1963

( 9 ) Faith and History
- Neibuhr, Reinhold; New York, 1949

( 10 ) The Exact Sciences in Antiquity
- Nevgebaver, Otto; Princeton, 1952

( 11 ) The Nature and Destiny of man ( 2 Vols. )
- Neibuhr, Reinhold; New York, 1941; 1943

( 12 ) Why I am not a Christian
- Russell, Bertrand; London, 1957

( 13 ) Reason in Religion
- Santayan, George; Collier Book edition, 1962

( 14 ) Introduction to the History of History
- Shotwell, James T.; New York, 1939

( 15 ) The Decline of the West ( 2 Vols. )
- Spengler, Oswald; New York, 1926

( 16 ) A Study of History ( Vol. 1-13 )
- Toynbee A. J.; London, 1956-60

( 17 ) Sociology of Religion
- Weber Max; ( Eng. tr. ) London, 1965

( 18 ) Interpretations of History
- Widgery A. G.; London, 1961

( 19 ) Encyclopaedia of Religion and Ethics ( Vols. 1-12 )
( Fourth impression ) New York, 1958-59

( 20 ) भागवतपुराण : स्कंद १२, अध्याय ३.

# प्रकरण ३ रे

# वंशश्रेष्ठत्वाचा सिद्धान्त

## आत्मगौरवाची प्राचीन परंपरा :

आपल्याला न रुचणारी, न पटणारी अशी गोष्ट एखाद्याने केली की करणाराविषयी नापसंतीचे उद्‌गार काढताना, "त्याची जातच तसली" किंवा "ते लोकच त्या प्रकारचे" असा काही एक समाजवाचक किंवा समूहवाचक उल्लेख केलेला अनेकदा ऐकू येतो. अशा वेळी बोलणारा एका सबंध मानवी गटावर शेरा मारीत असतो. तो गट विशिष्ट प्रांतात रहाणाऱ्या माणसांचा असेल किंवा जन्माच्या योगायोगाने हिंदु समाजासारख्या समाजात ब्राह्मण, मराठा, किंवा महार अशा एखाद्या जातीत जन्मलेला असेल. एका माणसाच्या कृतीचा अर्थ तो माणूस ज्या विशिष्ट गटाचा घटक आहे त्या गटाच्या विशिष्ट गुणदुर्गुणांशी अशा तऱ्हेने निगडित करण्यात गृहीत धरलेले असते ते हे की, त्या संपूर्ण गटाला, त्या गटाचे असे काही गुण आणि अवगुण असतात.

असे मानण्याची आणि त्याप्रमाणे वागण्याची परंपरा फार जुनी आहे. ऋग्वेदकालीन आर्य हे भारतातील मूळच्या रहिवाश्यांना दास किंवा दस्यू म्हणत. हे दास किंवा दस्यू चांगल्या आचारविचारांचे, चांगल्या मनाचे किंवा बुद्धिमान असे असणेच शक्य नाही, अशी आर्यांची खात्री होती. ती ऋग्वेदात व नंतरच्या भारतीय साहित्यातही वेळोवेळी प्रकट झालेली आहे. इंद्र हा माणसांना तारणारा आणि दस्यूंना मारणारा आहे (ऋग्वेद ८-९८-६) असे म्हणणाऱ्या आर्यांनी दस्यूंची माणसातही गणना केलेली नाही हे लक्षात घेण्यासारखे आहे. देवराज इंद्र हा आर्यांचा पक्षपाती आहे, तो आर्यांनाच तारणारा आहे आणि दस्यूंना मारणारा आहे (ऋग्वेद ३-३४-९ इ.) अशी भावना अनेक ठिकाणी व्यक्त झालेली आहे. पुढे मार्कंडेय, विष्णु, भविष्य, इत्यादी पुराणांतून भारतवर्ष हा पृथ्वीच्या इतर भूभागाहून काही विशेष आहे आणि म्हणून भारतीय जन्मतः इतरांचे मानाने काही विशेष पुण्यवान आहेत अशा तऱ्हेचा दावाही मांडलेला आहे. हा प्रकार फक्त प्राचीन भारतातच होता असे नाही. पहिल्या शतकातला एक रोमन लेखक सांगतो की, ब्रिटनमधून तुम्ही गुलामसुद्धा आणू नका; कारण ब्रिटनमधील माणसे मूलतःच अत्यंत मूर्ख आणि काहीही शिकायला असमर्थ,

निर्बुद्ध अशी आहेत. अकराव्या शतकात एका मूर पंडिताने श्वेतवर्णियांविषयी असेच उद्गार काढले आहेत. तो म्हणतो, की हे उंचेपुरे गोरे लोक अगदीच थंड आणि अडाणी आहेत; हुषारी किंवा शहाणपण हे त्यांच्यामध्ये काडीमात्र आढळणार नाही.

बहुतेक सर्व आदिवासी आपली विशिष्ट जमात ही मानवी जगतात काही विशेष आहे, इतर सर्वांपेक्षा श्रेष्ठ आहे असेच समजतात. न्यू गिनीच्या पापुअन लोकांसारख्या काही आदिवासी समाजात तर ही भावना अतिशय प्रखर आहे.

कोणत्याही देशाचा किंवा समाजाचा प्राचीन इतिहास अवलोकन केला तर बहुधा प्रत्येक ठिकाणी आम्ही ह्या विशिष्ट समूहात जन्माला आलेले लोक उरलेल्या मानव जातीपेक्षा सर्व बाबतीत अनेक पटींनी श्रेष्ठ आहेत असे मानून खुषीत रहाण्याची परंपरा आढळेल. ज्यू परंपरेत आपण ज्यू काही विशेष गुणवान् असल्याने ईश्वराने मुद्दाम निवडलेले, त्याचे लाडके असे लोक आहोत हा विचार प्रखरपणे दिसतो. स्वतःला सर्वश्रेष्ठ मानण्याची जपानी परंपराही जुनीच आहे.

आता असे असले तरी पूर्वीच्या काळात आपल्यासारखी किंवा आपल्याहून हुषार, कर्तबगार आणि गुणवान् माणसे अन्यत्रही असू शकतील ही जाणीव अगदी कधीच, कुठेच नव्हती असे मात्र नाही. प्राचीन ग्रीक इतिहासकारांच्या लिखाणातून ग्रीकांखेरीज इतरांची स्तुती आलेली आहे. वराहमिहिरासारखा भारतीय शास्त्रज्ञ भारतीयांप्रमाणेच यवनांतही बुद्धी आणि ज्ञान असू शकते आणि ते जेव्हा दिसेल तेव्हा योग्य त्या प्रमाणात यवनसुद्धा वंदनीय आहेत असे म्हणतो. अशाच तऱ्हेचे इतरांच्या संस्कृतीबद्दल, ज्ञानाबद्दल आणि कर्तृत्वाबद्दल आदरवाचक असे उद्गार जगभरच्या प्राचीन साहित्यातून काढून दाखविता येतील. तथापि अशा तऱ्हेच्या विचारांच्या मानाने स्वजातीच्या अभिमानाला पोषक असे उद्गारच कितीतरी अधिक प्रमाणात आले आहेत आणि जनमनावर अशा दर्पयुक्त विचारांचाच पगडा कितीतरी अधिक होता हेही तितकेच खरे.

### वंश सिद्धांत :

शास्त्रयुग आणि बुद्धिवादी विचार आल्यानंतरही स्वाभिमानपोषक विचारांची परंपरा चालूच राहिली. एवढेच नव्हे तर नव्या तर्कशास्त्राचा, नव्या विज्ञानाचा आधार घेऊन जातिश्रेष्ठत्वाचा किंवा वंशश्रेष्ठत्वाचा एक नवाच सिद्धान्त अलीकडच्या काळात मांडण्यात आला. इतिहासभाष्याचे दृष्टीने हा नवा सिद्धान्त तपासून पहाणे अत्यावश्यक आहे. नव्या वंशसिद्धांताप्रमाणे अमुक एक वांशिक गट विशेष गुणांनी युक्त, विशेष सामर्थ्यशाली असा मानला गेला. मग इतिहास म्हणजे ह्या वंशाचे कर्तृत्व असे समीकरण झाले. हा वंश जेथे जाईल तेथे निर्विवादपणे प्रगतीच होणार.

हा वंश शुद्ध स्वरूपात अस्तित्वात आहे तोपर्यंत मानवजातीची पावले सारखी पुढे पुढेच पडत रहाणार, ह्या वंशाची अधोगती म्हणजेच इतिहासाची परागती अशी तत्त्वे सांगण्यात येऊ लागली; संकराने हा वंश अशुद्ध झाला म्हणजे प्रगती मंदावणार आणि हा वंश नष्ट झाला की इतिहास संपला अशी धोक्याची सूचनाही आहे. अशा तऱ्हेने, एका विशेष सामर्थ्यशाली वंशाच्या कर्तबगारीच्या अनुरोधाने, इतिहासकथन बिनचुकपणे करता आले तर इतिहासातील सर्व घडामोडींचे रहस्यच समजले, सर्व मानवी व्यवहारांचे भूत, वर्तमान आणि भविष्यही उलगडून दाखविणारा एक मंत्रच मिळाला असे होईल. परंतु हे सर्व तो सिद्धान्त बरोबर आहे आणि आजपर्यंतच्या सर्व घडामोडी नीट लक्षात घेऊन बसविलेला आहे असे दाखविता आले तरच. असे आहे काय हे तपासून पहाण्यासाठी हा नवीन वंशसिद्धान्त काय आहे हे प्रथम बघावे लागेल. आणि ह्या सिद्धान्तानुसार एका विशिष्ट वांशिक गटाला इतिहासातील सर्व कर्तृत्व बहाल केलेले असल्यामुळे प्रत्यक्ष भूतकालीन घडामोडीत शिरण्यापूर्वी वंश म्हणजे काय, विशिष्ट वांशिक गट कसा ठरतो, त्या गटाचे असे विशिष्ट गुणधर्म असतात काय, असल्यास ते सिद्ध करता येतात काय आणि कसे अशा दृष्टींनी चिकित्सा करणे आवश्यक आहे.

## मानवजातीची वर्गीकरणे :

माणसांविषयी बोलताना गुजराथी लोक, डच लोक, मराठी भाषिक लोक अशा प्रकारचे उल्लेख आपण अनेकदा करीत असतो. इंग्लिश लोक अशा प्रकारच्या उल्लेखात इंग्लंड नावाच्या एका राज्याचे किंवा राष्ट्राचे सर्व नागरिक असा अर्थ अभिप्रेत असतो. मराठी भाषिक लोक असे जेव्हा म्हटले जाते तेव्हा ज्यांची मातृभाषा मराठी आहे आणि ज्यांनी मराठी ही आपली भाषा मानली आहे अशा सर्व लोकांचा एक गट गृहीत धरलेला असतो. इंग्लिश माणसे हा प्रयोग एका राष्ट्र-गटाचा द्योतक आहे तर मराठी माणसे हा प्रयोग भाषागट दर्शवितो. आता इंग्लिश लोक इंग्लिश नावाची भाषा बोलतात हे खरे आणि इंग्रजी भाषिक असा उल्लेख त्यांचे बाबतीत लागू पडतो हेही खरे. परंतु इंग्रजी भाषिक असा व्यापक शब्दप्रयोग केला तर त्यात इंग्लंडच्या रहिवाश्यांखेरीज अमेरिका, आस्ट्रेलिया इत्यादी प्रदेशांतील इंग्रजी भाषिकांचाही समावेश करावा लागेल. जेव्हा आपण भाषा किंवा प्रदेश ह्यावरून कोणत्याही एका मानवगटाचा उल्लेख करतो तेव्हा नेहमी त्या गटातील सर्व माणसांना लागू पडणारा व त्या गटातल्या माणसांखेरीज इतरांना लागू न पडणारा असा काही एक सामान्य प्रदेश किंवा भाषा गृहीत धरतो. ह्याप्रमाणेच वंश म्हणून एक वैशिष्ट्य गृहीत धरूनही मनुष्यजातीचे वर्गीकरण करण्यात आलेले आहे. ह्या ठिकाणी आधी

हे लक्षात घेतले पाहिजे की पुष्कळदा हा वंश शब्द चुकीने वापरला जातो. इंग्लिश वंशाचे लोक असे कधी कधी म्हटले जाते. पण ते बरोबर नाही. इंग्लिश हा प्रदेशवाचक किंवा भाषावाचक शब्द होऊ शकेल. परंतु इंग्लंडमध्ये किंवा इंग्रजी भाषा बोलणाऱ्यांमध्ये इतके भिन्नभिन्न वंशाचे लोक आहेत की इंग्लिश लोक हा प्रयोग वंशवाचक असा कधीही होऊ शकणार नाही. भारतीय लोक हा प्रयोगदेखील राष्ट्रवाचकच असू शकतो, वंशवाचक होऊ शकत नाही. पुष्कळदा आर्य वंशाचे लोक असे म्हटले जाते तेही चुकीचेच आहे. आर्य हा एक भाषाकुलाचा निदर्शक असा शब्दप्रयोग आहे हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

**वांशिक गट :**

आपल्याला ह्या ठिकाणी वांशिक वर्गीकरण आणि त्यावर आधारलेली इतिहासमीमांसा तपासावयाची आहे. तेव्हा प्रथम वंश म्हणजे निश्चित काय हे पहावे लागेल. मनुष्यजातीचे वंशानुसारी वर्गीकरण हे शरीरवैशिष्टयांवर आधारलेले आहे. त्याचा भूभागाशी किंवा भाषेशी मूलतः काही एक संबंध धरलेला नाही. कातडीचा वर्ण, डोळ्यांचा रंग, केसांचे वळण, ओठांची ठेवण, देहाची उंची, कपाळाची उंची, कवटीचे आकारमान व अंगावरील केस वगैरे शरीरवैशिष्टये एखाद्या मानवगटात बरीचशी ठराविक प्रकारची व बरीचशी सारखीच दिसली की त्या गटाला एक वंश म्हणावयाचे.

अशा तऱ्हेच्या वर्गीकरणाचे पुष्कळ प्रयत्न झाले. सध्या विशेष प्रचलित असलेले व सर्वसाधारणपणे मान्य झालेले जे वर्गीकरण आहे त्याप्रमाणे मनुष्यजातीचे तीन मुख्य वंश कल्पिलेले आहेत, पहिले कॉकेसॉइड वंशाचे लोक. हे वर्णाने गोरेपान किंवा बरेच गोरे असतात. ते उंचेपुरे असून त्यांचे केस तांबूस आणि डोळे निळे किंवा निळसर असतात. ह्यांच्या अंगावर भरपूर केस असतात. दुसरे मंगोलॉइड वंशाचे लोक रंगाने पिवळे धमक किंवा पिवळसर असतात. सरळ काळे केस, रुंद जबडा, काळेपिंगे डोळे, चपटे नाक, आणि अंगावर फार कमी केस ही त्यांची शरीरवैशिष्टये होत. तिसरे निग्रॉइड वंशाचे लोक रंगाने काळेकुट्ट किंवा बरेच काळे असतात, आणि बाहेर वळलेले जाड ओठ, रुंद सपाट नाक, पिंगट डोळे आणि राठ व लोकरीसारखे वळलेले केस अशी ह्यांची वैशिष्टये दिसतात. तिन्ही वंशांची ही प्रमुख वैशिष्टये आहेत खरी, परंतु पुन्हा प्रत्येक वंशातील निरनिराळ्या व्यक्तीत तीच वैशिष्टये कमी अधिक प्रमाणात दिसत असल्यामुळे ह्या तीन मुख्य वंशांचे आणखी पुढे कितीतरी पोटभेद किंवा उपवंश कल्पिलेले आहेत. त्या सर्व तपशीलात ह्या ठिकाणी शिरण्याचे फारसे कारण नाही.

## नॉर्डिकांच्या श्रेष्ठतेचा सिद्धान्त :

इतिहासभाष्याचा एक विशिष्ट सिद्धान्त तपासून पहाण्याचे दृष्टीने ह्या ठिकाणी कॉकेसॉईडमधील नॉर्डिक नावाच्या एका शाखेचे लोक हे मुख्यत: लक्षात घ्यावयाचे आहेत. वर कॉकेसॉइड वंशाची जी शरीरलक्षणे सांगितली ती सगळी पूर्णत्वाने किंवा आदर्श स्वरूपात ज्या एका शाखेत दिसतात ती कॉकेसॉइडमधील नॉर्डिक शाखा असे मानावयाचे. म्हणजेच नॉर्डिक माणूस हा अत्यंत गौर वर्णाचा, उंचापुरा, भव्य कपाळाचा, अंगावर भरपूर केस असलेला वगैरे असा असलाच पाहिजे. कमीजास्त लक्षणे झाली तर त्याला फार तर कॉकेसॉइड म्हणता येईल पण नॉर्डिक म्हणता येणार नाही. सध्या अशा नॉर्डिक प्रकारची माणसे मध्य यूरोपचा काही भाग, उत्तर इटलीचा काही भाग, नॉर्वेचा काही भाग ह्या ठिकाणी आढळतील. पोलंडमध्ये, रशियात आणि उत्तर आफ्रिकेतही नॉर्डिक सापडतील. कॉकेशस पर्वतावरील कुर्द लोकही ह्याच वंशाचे. हा वंश अनेक बाबतीत उरलेल्या मानवजातीपेक्षा श्रेष्ठ समजून त्या कल्पनेच्या आधारावर काही एक इतिहासदर्शन घडविण्यात आलेले आहे.

नॉर्डिक लोकांच्या श्रेष्ठत्वाचा सिद्धान्त हा प्रथम एकोणिसाव्या शतकात फ्रान्समध्ये गोबिनो ह्याने मांडला. इंग्लंडचा चेंबरलेन आणि अमेरिकेचा ग्रँट ह्या लेखकांनी हा सिद्धान्त उचलून धरून त्याचा पुढे बराच विस्तार केला. ह्या सर्वांच्या विचारात परस्परात काही किरकोळ मतभेद आहेत. परंतु वंशश्रेष्ठता आणि त्यानुसार इतिहासाचे कथन हे ह्या सर्वांनाच मान्य आहे. पुढे जर्मनीत हॅन्स गंथरसारख्या लेखकांनी ह्या सिद्धान्ताचा अधिकच प्रचार केला. पण ह्या सिद्धान्ताला आणि तदनुसारी इतिहासभाष्याला राजमान्यता आणि लोकमान्यता मिळाली ती जर्मनीमध्ये हिटलरच्या राजवटीत. राजकीय कारणासाठी हिटलरने व त्याच्या अनुयायांनी ह्या सिद्धान्ताचा स्वीकार केला आणि त्याचा झंझावती प्रचार केला. त्या प्रचारात सरळ सरळ विचारण्यात येई, "शरीराने कमी उंचीचे लोक बौद्धिक दृष्ट्या तरी कितीसे उंच असू शकतील ? " किंवा "अरुंद कपाळाच्या आणि लांबट डोक्याच्या माणसाच्या आतला मेंदू तो काय असणार ? " नॉर्डिक कोण आणि नॉर्डिकेतर कोण ह्याची कडक विभागणी करण्यात आली. ज्यू हे नॉर्डिकेतर म्हणून कमी दर्जाचे जाहीर करण्यात आले. नाझी राजवटीतील हिटलरी राजकारणाचा प्रमुख प्रचारक गोबेल्स एकदा म्हणाला, "काही लोक असा प्रश्न टाकतात की, तुम्ही ज्यूंना काय म्हणून हीन लेखता ? तीही माणसेच नाहीत काय ? मी म्हणतो, होय ज्यू माणसे आहेत, पण कोणत्या अर्थाने ? पिसवा ज्या अर्थाने प्राणीमात्र आहेत त्याच अर्थाने ज्यू ही माणसे आहेत ! " अशा प्रकारचा प्रचार इतक्या तऱ्हांनी होत होता आणि त्यातून

कित्येक सिद्धान्त असे काही नियत होते की ते कोणालाही हास्यास्पद वाटावेत. एक नमुना असा : कोणत्याही प्रकारचे शुद्ध उच्चार हे फक्त नॉर्डिक माणसेच करू शकतील, बाकीच्यांच्या भाषातून कठीण व सूक्ष्म असे उच्चार, असूच शकणार नाहीत. नॉर्डिकांच्या खेरीज इतरांच्या भाषा ह्या साधारणपणे पशुपक्षांच्या आवाजांशी मिळत्याजुळत्या असतात. असे अनेक तपशील देऊन वंशवादी इतिहासकारांनी सिद्धान्त मांडला की, नॉर्डिक लोक हेच उत्तम बुद्धीचे आणि प्रचंड कर्तृत्वाचे आहेत. जगाची प्रगती ही त्यांचे हातूनच होणार. संस्कृतीची आजपर्यंतची सर्व कमाई ही नॉर्डिकांच्याच यशाची कथा आहे. सर्व इतिहास म्हणजे दुसरे तिसरे काही नसून नॉर्डिक वंशाच्या कर्तबगारीची गोष्ट आहे.

## शारीरिक आणि बौद्धिक वैशिष्ट्ये :

वरीलसारख्या वंशविषयक सिद्धान्तात काही गोष्टी गृहीत धरलेल्या आहेत. पहिली अशी की, एका विशिष्ट मानवी गटात विशिष्ट शारीरिक वैशिष्टचे असतात त्याबरोबरच काही बौद्धिक वैशिष्टचेही येतात. आणि पिढ्यान्‌पिढ्या हे सर्व शारीरिक आणि बौद्धिक गुण टिकून रहातात.

जीवशास्त्रज्ञांनी केलेला आनुवंशिकतेचा आजपर्यंतचा जो अभ्यास आहे त्याच्या अनुरोधाने तपासून पहाता हा दावा टिकण्यासारखा नाही. एखाद्या विशिष्ट मानवी गटात काही विशिष्ट गुण असू शकतात असे मानले तरी कोणताही एक मानवी गट आपल्या सर्व वैशिष्टचांनिशी आज अस्तित्वात आहे, शंभर वर्षांपूर्वी होता, किंवा हजार-पांचशे वर्षांपूर्वी होता असे सिद्ध करता येणार नाही.एक विशिष्ट गट दुसऱ्या गटापासून पूर्णपणे निराळा राहिला असे दाखविता येणार नाही. उलट भिन्न भिन्न वांशिक गटांचा कमीजास्त बीजसंकर प्राचीन कालापासून अव्याहत होत आला आहे. असेच ऐतिहासिक पुराव्यांनी आणि जीवशास्त्रीय कसोटचांनी निर्विवादपणे दाखविता येईल. आणखी म्हणजे मुलामध्ये उतरणारे गुण हे माता व पिता ह्या दोघांपासूनही येतात, दोघेही त्याच विशिष्ट वंशगुणांची माणसे असतील असेही सांगता यावयाचे नाही आणि असली तरी पुढे असे की आनुवांशिकतेच्या शास्त्राप्रमाणे मूल हे आईबापांचे सर्वच्या सर्व गुण जसेच्या तसे कधीही घेत नाही, कोणतेही नवजात अर्भक हे कार्बनप्रत नसते. त्यात मातापित्यांचे काही गुणच अवतरत असतात. आणि ह्या संदर्भात आई-बापांच्या अर्भकामध्ये उतरणाऱ्या ज्या गुणांसंबंधी आपण बोलत आहोत ते फक्त शारीरिक वैशिष्टचांपुरतेच आहे. आईवडिलांची बौद्धिक किंवा मानसिक समर्थता किंवा असमर्थता ही देखील मुलात काही प्रमाणात येईलच, पण बुद्धिमत्तेचा विशिष्ट आविष्कार मात्र मुलांचे ठिकाणी तशाच प्रकारे दिसण्याचे काही एक कारण नाही.

म्हणजे बुद्धिमान जनकाचा मुलगा बुद्धिमान होईल हे खरे असले तरी काही कारणाने जनकाने आपली बुद्धिमत्ता गणितासारख्या विषयाचे अध्ययन करण्यात उपयोगात आणली असली तरी मुलगा तसाच हुषार गणिती होईल असे मुळीच नाही. निराळ्या परिस्थितीच्या फेऱ्यात सापडून ते मूलतः बुद्धिमान असे बाळ उत्कृष्ट दरोडेखोरही होऊ शकेल. ह्या संदर्भात येथे आणखी हेही लक्षात घेतले पाहिजे की, कमीअधिक प्रमाणात आनुवंशिकतेमुळे वंशाची अशी काही शारीरिक वैशिष्टये आजही दिसत असली तरी ह्या शरीरगुणांचा बौद्धिक दर्जाशी काहीही संबंध लागत नाही. इतिहासाच्या घडणीत जे कर्तृत्व परिणामकारक ठरते ते माणसाच्या बौद्धिक सामर्थ्यावर अवलंबून असते. गोरा रंग, कुरळे केस किंवा निळे डोळे अशा काही वैशिष्टयांवरून नव्हे. तेव्हा कातडीचा रंग, केसांचे वळण वगैरेवरून ठरणारी गटांची अशी काही वैशिष्टये असली आणि ती टिकून राहिलेली असली तरी त्या विशिष्ट शारीरिक गुणांबरोबरच काही बौद्धिक गुणही होते किंवा असतात असे सिद्ध झालेले नाही. आणि म्हणून ते टिकून राहिलेले आहेत की नाही हा प्रश्नही उद्भवत नाही. मानवजातीचे वंशानुसार निरीक्षण करून फार तर पिवळ्या रंगाची काही माणसे, काळ्या आणि पांढऱ्या रंगाची काही माणसे, काही उंच, काही ठेंगणी, काही अंगावर जास्त केस असलेली, काही कमी असलेली अशी काही वर्गीकरणे करणे शक्य होईल. पण ह्यातील प्रत्येक वर्गाशी बुद्धिमत्तेचा किंवा कर्तृत्वाचा एक विशिष्ट दर्जा जोडून देणे कसे शक्य होणार? उंच गोरा आणि म्हणून अर्थात विशेष बुद्धिमान माणूस अशा तऱ्हेचे विधान करणे प्रत्यक्ष दैनंदिन अनुभवाला पटणारे नाही आणि शास्त्रीय अभ्यासाच्या कसोटीलाही टिकणारे नाही.

विशिष्ट शारीरिक गुणांचा माणसाच्या प्रगत अवस्थेशी संबंध जोडण्याचा प्रयत्नही हास्यास्पद ठरतो. अरुंद कपाळ, हे अविकसित अशा मानवजातीचे लक्षण, तर, रुंद, उंच भालप्रदेश हे पूर्ण विकास झाल्याचे लक्षण अशा तऱ्हेने काही शोध वंशाभिमान्यांनी लावले. परंतु इतर वंशातील लोकही जेव्हा अशाच तऱ्हेच्या अभिमानाने बोलू लागतील तेव्हा त्यांनाही इतकेच हास्यास्पद शोध लावणे सहज शक्य आहे. मंगोलॉइड वंशातील जपानी लोक हे आपला वंश श्रेष्ठ मानतात. स्वतःला श्रेष्ठ मानणारे नॉर्डिक आपल्या गोऱ्या रंगाविषयी आणि उंच कपाळाविषयी जेवढ्या अभिमानाने बोलतात तेवढ्याच कौतुकाने ते स्वतःच्या अंगावरील भरपूर केसांविषयीही बोलतात; परंतु अंगावर केस नसलेले जपानी असे म्हणू शकणार नाहीत काय की अंगावर केस असणे म्हणजे उत्क्रांतीच्या टप्प्यात माकडांच्या अधिक जवळ असणे, आणि अंगावरील केस कमी कमी होत जाणे म्हणजेच अधिकाधिक प्रमा-

णात मानव होत जाणे होय ? आणि ह्या आधारावर आम्ही मंगोलॉइड जपानीच अधिक प्रगत आहोत असे त्यांनी का म्हणू नये ? ह्याला उंच कपाळाचे, गोऱ्या कातडीचे पण केसाळ असे आर्य किंवा नॉर्डिक काय उत्तर देऊ शकणार ?

एवंच, विशिष्ट शरीरगुणांवरून माणसाच्या विकासावस्थेचा विशिष्ट टप्पा ठरविता येणार नाही. त्या गुणांमुळे त्या मानव गटाला काही बुद्धिमत्ता आणि कर्तृत्वही बहाल करता येत नाही. फक्त शरीरवर्णनच अभिप्रेत असेल आणि ते करण्यासाठी शरीरवैशिष्टयांवर आधारलेले असे वर्गीकरण करून वर्णनाची सोय होत असेल तर माणसाने वंशभेद मानून वंशांचे भाषेत बोलायला काहीच हरकत नसावी. पण वर्गीकरण करून नंतर त्यांपैकी एका वर्गाच्या श्रेष्ठत्वाचा सिद्धान्त मांडला तर तो मात्र जीवशास्त्रास मान्य होणे शक्य नाही.

**वंशनिष्ठ इतिहासकथन :**

तथापि इतिहासासंबंधीचे तत्त्वज्ञान शेवटी प्रत्यक्ष इतिहास म्हणजे भूतकालीन घटना साकल्याने लक्षात घेऊनच तयार होते ना ? मग जीवशास्त्र काहीही म्हणत असले तरी प्रत्यक्ष इतिहास जर काही निराळे सांगत असेल तर ते कसे दृष्टिआड करता येईल ? आजपर्यंत जगात घडलेल्या सर्व महत्त्वाच्या कार्यांपैकी ऐंशी-नव्वद टक्के कार्ये जर एका विशिष्ट शरीरगुणयुक्त नॉर्डिकासारख्या वंशाच्या लोकांनीच पार पाडली असतील तर तोच एक त्यांच्या श्रेष्ठत्वाचा मोठा पुरावा नव्हे काय ? आणि एवढा मोठा पुरावा उपलब्ध असेल तर तुमचे जीवशास्त्र अपुरे आहे, तुमचे आनुवंशिकतेचे सिद्धान्तच चुकीचे आहेत असे आम्ही का म्हणू नये असे वंशवादी विचारू शकतील. खरे म्हणजे गोबिनो, चेंबर्लेन, ग्रँट वगैरे वंशवादी जीवशास्त्राच्या संशोधनात फारसे शिरलेच नाहीत. त्यांनी जे सिद्धान्त मांडले ते भूतकालीन घडामोडींचा आधार देऊनच. भूतकालातील घटनांचा त्यांनी काही एक अर्थ लावला आणि त्यातून विशिष्ट वंशाच्या लोकांच्या पराक्रमाची कथा कशी दिसते ते दाखविले. म्हणूनच वंशसिद्धान्तातील सत्यासत्यता ठरविण्यासाठी ह्यानंतर वंशवाद्यांनी सांगितलेली मानवी इतिहासाची कहाणी लक्षात घेऊन तिची चिकित्सा करणे क्रमप्राप्त आहे.

फ्रेंच वंशवादी गोबिनो ह्याने मानवजातीच्या इतिहासातील विविध संस्कृतींचा आढावा घेऊन असे मांडले की, विज्ञान, कला, सामाजिक जीवन वगैरे सर्व क्षेत्रात मानवाने आजतागायत जी जी प्रगती केली तिची परिस्थितिजन्य स्वरूपे वेगवेगळी असली तरी एकूण सर्व कर्तृत्वाचे श्रेय एकाच मानवगटाचे आहे. तो म्हणजे टयूटॉनिक वंश. ह्या वंशाच्या शाखा जेथे जेथे पसरल्या आहेत तेथे तेथे प्रगतीची घोडदौड झाली. टयूटॉनिक शाखेचे लोक श्वेतवर्णीय, कॉकेसॉईड वंशांतर्गत असून हे लोक पिवळ्या

व काळचा लोकांच्याहून मूलतःच वेगळे आहेत. तेव्हा सबंध मानवी इतिहासाचा अर्थ असा की, टच्यूटॉनिक वंशाचा संचार म्हणजेच संस्कृतीचा विस्तार, टच्यूटॉनिक वंशाचे अस्तित्व हीच प्रगतीची खूण आणि टच्यूटॉनिक वंशाचा नाश म्हणजेच मानवी संस्कृतीचा विनाश. गोबिनोच्या म्हणण्याप्रमाणे टच्यूटॉनिक वंश दोन प्रकारे नष्ट होऊ शकेल. एक म्हणजे इतरांच्या स्वाऱ्यांमुळे व त्यात होणाऱ्या हत्येमुळे. परंतु ह्याहीपेक्षा महत्त्वाचे दुसरे कारण असे की, टच्युटॉनिक वंश इतर कमी दर्जाच्या मानवजातींशी रक्ताची भेसळ होऊन कमजोर बनेल, कर्तृत्वशून्य होईल आणि संस्कृती संपुष्टात येईल. परंतु असा वर्णसंकर अटळ आहे असेही गोबिनो म्हणतो. वर्णमिश्रण होणारच, ते चुकविता येणार नाही आणि अर्थात मानवी संस्कृतीचा नाश हा ठरलेलाच आहे.

अमेरिकन वंशवादी ग्रँट ह्याचेही मत एका विशिष्ट मानवी वंशानेच आजपर्यंतची सर्व संस्कृतीची प्रगती केली असेच आहे. गोबिनोशी त्याचे किरकोळ मतभेद आहेत. इतिहासातील सर्व कर्तृत्व ग्रँट, नॉर्डिक ह्या गोऱ्या वंशाला देतो. नॉर्डिक आणि टच्यूटन ह्या संज्ञांच्या उपयोगात कधीकधी गोंधळ दिसत असला तरी हे शब्द पुष्कळदा समानार्थी वापरलेले आहेत.

## वंशनिष्ठ इतिहासकथनाची चिकित्सा :

गोबिनो, ग्रँट इत्यादींनी जो वंशसिद्धान्त सांगितला आहे आणि इतिहासातील दाखले देऊन त्याचा विस्तार केला त्यावर बेनेडिक्ट रूथ, टॉयन्बी, कून, मॉन्टेग्यु वगैरे विचारवंतांनी पुष्कळ टीका केली आहे. सर्व तपशीलात ह्या ठिकाणी शिरता येणार नाही. तथापि गोबिनो, ग्रँट वगैरेंनी जे दाखले दिले आहेत त्यांपैकी काही ते प्रत्यक्ष इतिहासातील घटना पाहून तपासून पहाणे उद्बोधक होईल.

नॉर्डिक वंश नाहीसा होणे किंवा इतर जमातीत मिसळून कमजोर होणे ही एक प्रकारची अवनती आहे. ह्याचे एक उदाहरण ग्रँटने दिले ते असे की, फ्रेंच राज्यक्रांतीमुळे फ्रान्समधील नॉर्डिक वंशाचा सरदारवर्ग नष्ट झाला. फ्रेंच राजकारणाची आणि सांस्कृतिक जीवनाची सूत्रे निकृष्ट वंशीयांच्या हाती आली, फ्रान्स आता संपला, त्याची प्रगती संपुष्टात आली, आता त्यापुढील फ्रान्समध्ये फक्त अंधार, असे ग्रँटचे म्हणणे. परंतु प्रत्यक्ष इतिहास काय सांगतो ? १७८९ नंतर काही काल फ्रान्सचे यूरोपभर साम्राज्य झाले. एकोणिसाव्या शतकात जगभर विस्ताराने सर्वात मोठे असे फ्रान्सचे साम्राज्य निर्माण झाले. सामाजिक संस्था, साहित्य, कला आणि विज्ञान ह्या सर्वच क्षेत्रात जगाला अनुकरणीय वाटाव्या अशा कित्येक गोष्टी फ्रान्सने १७८९ नंतरच्या कालात दिलेल्या आहेत. ग्रँटच्या मते इंग्लंड आणि अमेरिकेतही मिश्रणाने अवनती झाली आहे, परंतु

ह्या अशुद्ध अशा वंशांनीच जवळ जवळ आजतागायत जगाचे राजकीय आणि आर्थिक नेतृत्व केले ते कसे ? ग्रँटच्या मते इंग्लंडमधील लोक अमेरिकेतील लोकांच्या मानाने जास्त शुद्ध आहेत. पुन्हा प्रत्यक्ष इतिहासाचाच आधार घेऊन असे विचारता येईल की मग अलीकडच्या काळात शुद्ध इंग्लंडची पीछेहाट का झाली आणि त्यामानाने अशुद्ध अशा अमेरिकनांचे राष्ट्र अत्यंत सामर्थ्यशाली असे का बनले ? वांशिक दृष्टया अत्यंत शुद्ध अशा स्कँडिनेव्हियातील नागरिकांनी जगाला काय बरे दिले आहे ? मुद्दा चांगला स्पष्ट व्हावा म्हणून मुद्दाम वरील दोन तीन उदाहरणे अलीकडच्या इतिहासातील अशीच घेतली आहेत. गोबिनो, ग्रँट वगैरेंनी आपला सिद्धान्त आद्य ईजिप्शियन संस्कृती-पासून आधुनिक कालापर्यंतच्या सर्व मानवी इतिहासाची दखल घेऊन मांडलेला आहे. त्याला उत्तर देण्यासाठी त्या सर्व इतिहासाची तेवढ्या तपशीलांनी दखल घेण्याचेही कारण नाही. श्वेतवर्णीयांच्या ग्रीक, रोमन वगैरे प्राचीन संस्कृती, ताम्र-वर्णीयांच्या प्राचीन अमेरिकन संस्कृती, पीतवर्णियांची चीनची संस्कृती अशी काही उदाहरणे पाहिली की, कातडीचा अमुक वर्ण असलेले लोकच सांस्कृतिक प्रगति करू शकतात, शौर्य दाखवू शकतात असे नाही हे उघड दिसते.

प्राचीन भारतीय संस्कृतीचा इतिहासही हेच सांगतो. मोहेंजदडोची भव्य संस्कृती कुणी निर्माण केली ? ती संस्कृती अनार्यांची होती असे अनेक पंडितांचे मत आहे. आजच्या संशोधनावरून त्या संस्कृतीत आर्यांचा वाटा होता की नव्हता आणि असल्यास किती हे निश्चित सांगता येणार नाही. तेथील उत्खननात सापडलेल्या सांगाड्यावरून तेथील लोक भिन्न भिन्न शरीरवैशिष्टचे असलेले, विविध वंशांचे आणि वंशमिश्रणांचे असावेत असेच दिसते. अगदी प्राचीन कालापासून पाचसहा तरी निरनिराळे वांशिक गट भारतात होते ह्याचा पुरावा मिळतो. भारताच्या निरनिराळ्या भागात साहित्य, विज्ञान, कला वगैरे क्षेत्रात प्रगती झाली ती फक्त आर्यांनी म्हणजे भारतात आलेल्या नॉर्डिक शाखेनेच केली असे मुळीच नाही. वंश-संकर सतत चालू होता ह्याचेही भरपूर पुरावे मिळतात. वंशभेद पाहून इतिहास सांगावयाचा म्हटला तरी काही कर्तृत्व नॉर्डिक शाखेचे, काही इतर वांशिक गटांचे तर काही संकरजन्य पिढ्यांचे अशीच कथा सांगावी लागेल.

कृष्णवर्णियांनी आजपर्यंत एखादी मोठी संस्कृती निर्माण केलेली नाही हे खरे परंतु अनेक प्राचीन संस्कृती घडविणाऱ्यांच्या रक्तात निग्रॉइड अंश होताच आणि शर्यतीत आजवर अनेक कारणांनी मागे राहिलेले कृष्णवर्णीय आपली स्वतंत्र राष्ट्रे स्थापून नव्या उमेदीने नवे जीवन निर्माण करीत आहेत. दुसरे म्हणजे कृष्ण-वर्णीयांनी किंवा निग्रॉइड वंशवैशिष्ट्ये असलेल्यांनी जर आजपर्यंत एखादी मोठी

संस्कृती निर्माण केली नसेल तर त्याचबरोबर हेही लक्षात घेणे आवश्यक आहे की, वेद्द, तोडा, ऐनू, ईशान्य आफ्रिकेतील रानटी जमाती, कुर्दस्थानचे रहिवासी आणि अफगाणिस्तान, भारत आणि पाकिस्तान ह्यांच्या सरहद्दीवरील काही टोळीवाले हे सर्व लोक रंग, केस, डोळे वगैरेंसारख्या शारीरिक वैशिष्टयांनी टयूटन, नॉर्डिक अशा कॉकेसॉइड वंशांपैकी असूनही कृष्णवर्णीय निग्रोंइतकेच किंबहुना त्यांच्याहूनही अधिक असंस्कृत आहेत असे दाखविता येईल.

जगातील निरनिराळ्या संस्कृतीतून निरनिराळ्या काळी उदयास आलेल्या थोर कर्तबगार अशा व्यक्तींची जर पाहाणी केली तर असे दिसून येते की, गोरे, काळे; ठेंगणे, उंच; सरळ केसांचे, कुरळ्या केसांचे; अंगावर केस असलेले आणि नसलेले, निळ्या, काळ्या, पिंग्या सर्व प्रकारच्या डोळ्यांचे; चपटया आणि सरळ नाकांचे; अशा सर्व प्रकारच्या शरीरवैशिष्टयांचे महापुरुष निर्माण झालेले आहेत, हे सिद्ध करण्यासाठी प्राचीन आणि अर्वाचीन इतिहासातून दाखले शोधले पाहिजेत असे नाही. कुठल्याही दहा कर्तबगार माणसांची शारीरिक किंवा वांशिक वैशिष्टये लक्षात घेता हे सहज दिसते. किंवा एखाद्या लहान गावातील दहा बुद्धिमान माणसे ओळीने उभी केली आणि त्यांची शरीरवैशिष्टये तपासली तरीही बुद्धिमान किंवा कर्तबगार माणूस गोरा, काळा, सावळा, पिवळा , अरुंद कपाळाचा किंवा विस्तीर्ण भालप्रदेशाचा वगैरे कसाही असू शकतो हे ताबडतोब प्रत्यक्षच दिसेल. अशी वस्तुस्थिती दिसत असल्यामुळे मग चेंबरलेनसारख्या वंशवाद्यांनी उलटीच भूमिका घेतली. चेंबरलेन म्हणतो की, तुम्हाला कर्तृत्व दिसले ना, मग त्याठिकाणी जर्मन नॉर्डिक वंशच असला पाहिजे असे समजा, कर्तृत्ववान माणसाची शरीरवैशिष्टये काय पाहाता आणि त्याच्या वंशाची मुळे काय शोधता ? तो कर्तृत्ववान आहे म्हणजेच जर्मन नॉर्डिक आहे. येशू ख्रिस्ताएवढा मोठा माणूस ज्यू कसा असेल ? तो जर्मन नॉर्डिकच असला पाहिजे. आता अशा प्रकारच्या वावदूकपणापुढे काय करावे ? अमुक वांशिक गटात म्हणजे अमुक शरीरवैशिष्टये असलेल्या माणसात अमुक गुण असतात हे सिद्ध झाले तरच वंशवाद टिकेल. परंतु येथे अमुक गुण दिसले म्हणजे शरीरवैशिष्टये न पाहता तिथे नॉर्डिक वंशच जाणावा अशी भूमिका घेतल्यामुळे वंशसिद्धान्त कुठे राहिला ? ह्यात फार तर एवढेच म्हणता येईल की, चेंबरलेनने कर्तबगार माणसांसाठी जर्मन नॉर्डिक असे एक नवे नाव दिले, दुसरे काय ?

दा. क्र. १५९८५

### वंशवादाची पार्श्वभूमी :

तेव्हा प्रत्यक्ष ऐतिहासिक घटनांच्या आधारे एखाद्या वंशाचे जन्मजात श्रेष्ठत्व अजिबात सिद्ध होत नाही हे सहज समजण्यासारखे आहे. तर मग वंशाभिमान किंवा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.

वंशश्रेष्ठत्वाची कल्पना येते तरी कशी ? वंशवाद्यांनी आजवर विशिष्ट वंशाच्या मोठेपणाविषयी जे जे लिहिले ते त्यांचे लेखन, त्या लेखकांचे जीवन आणि त्याचप्रमाणे अशा वंशवादाला अनुकूल होईल अशा प्रकारची सर्वसाधारण माणसाची मनोवृत्ती ह्यातून वरील प्रश्नाचे उत्तर मिळेल.

सर्वसामान्य माणसाला पिढयान् पिढया चालत आलेले काळ्या माणसांचे काळे रंग, गोऱ्यांच्या गोऱ्या कातड्या दिसत होत्या. हे असे का ? असा प्रश्न विचारून खोलात शिरण्यापेक्षा हे असेच असते आणि असेच रहाणार असे सोपे सिद्धान्त सामान्य माणसाला स्वाभाविकपणेच सोईचे वाटतात. प्राचीन काळी तर शास्त्रीय दृष्टीच्या आणि शास्त्रीय संशोधनाच्या अप्रगत अवस्थेत, हे विशेषच खरे होते म्हणूनच जेरे-मियासारखा ज्यू तत्त्ववेत्ताही विचारतो "इथिओपियन माणसाला आपल्या कातडीचा रंग बदलता येईल काय ? कसे शक्य आहे ? चित्ता कधी आपल्या अंगावरचे ठिपके बदलू शकेल काय ? " नवीन शास्त्रीय ज्ञान सांगते, " होय, चित्ता ठिपकेही बदलू शकेल आणि इथिओपियन आपल्या देहाचा रंगही बदलू शकेल. "

पंधराव्या शतकापासून पाश्चिमात्यांनी शास्त्रीय प्रगतीच्या जोरावर व अन्य अनुकूल परिस्थितीमुळे जगाच्या बहुतेक सर्व भागांवर प्रभुत्त्व स्थापिले, त्यातून त्यांच्यामध्ये काही एक अहंभाव निर्माण झाला. त्यातून, ज्या अर्थी आपण मूठभर लोक संख्येने कितीतरी अधिक अशा लोकांवर राज्य करू शकतो त्याअर्थी आपल्यात काही विशेष गुण असले पाहिजेत अशी कल्पना निघाली. विशेष गुण असतील हेही खरे म्हणजे मान्य करता येईल, किंवा करावे लागेल. पण ते विशेष गुण जन्मजात असतात, रक्तातून येतात आणि कातडीच्या रंगावर अवलंबून असतात इत्यादी जे मानले गेले ते सारे मात्र कुतर्क होय. वाटेल त्या मार्गाने आपली सत्ता स्थापून पुढे निरनिराळ्या प्रकारांनी जितांना लुटणाऱ्या जेत्यांना आपल्या सर्व कृष्णकृत्यांना एक समर्थनही हवे होते, कुठल्यातरी तत्त्वाचे नैतिक पाठबळ मिळाले म्हणजे माणसाला पापे करणे सोपे जाते, सोईचे जाते, असे नैतिक समर्थन वंशश्रेष्ठतेच्या कल्पनेत मिळाले.

## वंशवादाचे राजकारण :

वंशश्रेष्ठतेचा सिद्धान्त मानून त्याचा अत्यंत पद्धतशीर व अत्यंत मोठ्या प्रमाणा-वरचा दुरुपयोग जर्मनीत हिटलरच्या नाझी राजवटीत करण्यात आला. वस्तुतः निरनिराळ्या युरोपीय समाजात ज्यू एवढे मिसळून गेलेले आहेत की शरीरवैशिष्टयांचा पुरावा देऊन ज्यू नॉर्डिकांहून वेगळे दाखविता आले नसते आणि म्हणूनच चेंबरलेन-सारख्या वंशवाद्याने अशी भूमिका घेतली की, ज्यूंची शरीरवैशिष्टये पहाण्याचेच कारण नाही, ते बाह्यतः कसेही दिसत असले तरी ज्याअर्थी त्यांनी इतिहासात ख्रिश्चन-

विरोध किंवा अशीच अन्य वाईट कृत्ये केली आहेत त्याअर्थी ती जमात अशुद्ध रक्ताची असली पाहिजे. हिटलरच्या राजवटीत एकामागून एक कायदे पास करून ज्यूंची ससेहोलपट करण्यात आली. ज्यूंचे नागरिकत्व रद्द करण्यात आले. ज्यू आणि इतर ह्यांच्यातील लग्नसंबंध बंद करण्यात आले. १९३५ मध्ये एके दिवशी सर्व ज्यू बालकांना प्राथमिक शाळेतून बाहेर ओढून काढण्यात आले. पुढे क्रमाक्रमाने ज्यूंचे सर्व शिक्षणच बंद करण्यात आले. पुढे ज्यूंची मालमत्ता व रोकड शिलकी जप्त करण्यात आल्या. त्यानंतर तर ज्यूंची सरसहा उघडउघड कत्तलच सुरू झाली. ह्या सगळ्या ज्यूविरोधी कृत्यांमागे नाझींचे हुकूमशाही राजकारण होते. राजकारणाला सोईचे पडतील असे कोणतेही सिद्धान्त केव्हाही सोईस्करपणे पुढे आणता येतात. ह्याचा चांगला पुरावा इटलीच्या राजकारणात मिळतो. जर्मनीत नाझी राजवट असतानाही इटलीचे आणि फ्रान्सचे जेव्हा सख्य होते तेव्हा इटालियन लोकांना फ्रेंच लोक आणि आपण एकाच रक्ताचे आहोत असे वाटत होते. परंतु आंतरराष्ट्रीय राजकारणाची चक्रे फिरली आणि इटलीला जर्मनीशी हातमिळवणी करावी लागली त्यावेळी त्याच इटालियनांचे रक्त एकाएकी बदलले आणि इटालियनांना जर्मन आणि आपण एकाच नॉर्डिक रक्ताचे आहोत असा शोध लागला. ह्यावरून लक्षात येईल की ज्याला शास्त्र आणि सिद्धान्त अशी मोठमोठी नावे दिली गेली ते दुसरे तिसरे काही नसून राजकारणाच्याच त्या विविध लीला होत्या.

## सामान्यांच्या भावना :

वर सुरुवातीस म्हटल्याप्रमाणे सर्वसामान्य माणूस अनेक कारणांनी अशा सिद्धान्तांना बळी पडत असतो. एक तर सामान्य माणसाच्या मर्यादित जगात आणि मर्यादित अनुभवविश्वात निराळी दिसणारी माणसे, निराळ्या चालीरीतींची माणसे ह्यांच्याविषयी स्वाभाविकच एक परकेपणाचा भाव असतो आणि इतर माणसे आपल्याहून निराळी आहेत म्हणजेच ती आपल्याहून निकृष्ट आहेत असे मानण्याने त्याची स्वाभिमानाची भावना पोसली जाते, तेव्हा आपल्याहून इतर लोक वेगळे म्हणजेच आपल्याहून नीचही असे समजण्याचा प्रघात हा जगभर सर्वत्रच आहे. गोरे, काळे, पिवळे, तांबडे, पिंगे ह्या सर्वच रंगाच्या कातडीचे लोक स्वतःला श्रेष्ठ मानू शकतात, आणि मानतातही. गोऱ्यांचा इतरांविषयीचा तिरस्कार तर सुप्रसिद्धच आहे, परंतु गोरेतरांनाही अनेक कारणांनी गोरे लोक क्षुद्र वाटतात –ह्याचेही पुरावे जगभरच्या साहित्यातून काढून दाखविता येतील. आणि गोऱ्यांविषयींच्या तिरस्काराची कारणेही मोठी मनोरंजक अशी दिसतील. इंग्लंडमध्ये पाहुणी म्हणून आलेल्या एका जपानी नटीला लंडनमधील तिच्या आतिथ्यशील यजमानाने ‘सर्व ठीक आहे

ना, बरं वाटतं ना,' वगैरे विचारले तेव्हा ती अभिनेत्री म्हणाली की, 'तुम्ही सर्व लोक चांगले आहात, उदार आहात हे सर्व ठीक आहे, पण मला तुमचा वास सहन होत नाही. तुम्हा सर्व लोकांना वाघ-सिंहाच्या अंगाला येते तशी दुर्गंधी येत असते.' मुख्यतः मांसाहारी असलेल्या अशा इंग्लिश लोकांच्या अंगाला काही वास येत असेल अशी त्या लोकांना आपआपसात कधी शंकाही येणार नाही. त्याची जाणीवच नाहीशी झालेली असते. परंतु मुख्यतः शाकाहारी अशा जपानी लोकांना तो वास जाणवतो आणि त्याचा उबगही येतो. गोऱ्या इंग्रजांविषयी अशी भावना फक्त पिवळ्या मंगोलॉइड लोकांचीच असू शकते असे नाही; कृष्णवर्णीयांचेही तसे होऊ शकते. दक्षिण आफ्रिकेत एका अत्यंत श्रीमंत आणि सुसंस्कृत अशा इंग्लिश बाईने एक निग्रो मुलगी आपल्या सेवेसाठी ठेवली. ती मुलगी काम फार चांगले करायची पण मालकिणीने बोलावल्यावर मालकिणीपासून पाचसहा फुटावर येऊन उभी राहिली की तावडतोब बेशुद्धच पडायची. ह्या प्रकाराची छाननी करण्यात आली तेव्हा असेच आढळून आले की त्या कृष्णवर्णीय मुलीला त्या गौरांगीचा वास सहन होत नसे.

तेव्हा सर्वसामान्य माणसाचे दृष्टीने अज्ञान, परकेपणाची जाणीव, अन्यप्रकारचे जीवन पाहाण्याच्या व जगण्याच्या संवयींचा अभाव आणि त्याच्या जोडीला आपण ज्या गटात वाढलो तोच गट इतरांपेक्षा श्रेष्ठ असे मानण्याची आत्मसंतुष्टता ह्यामुळे वंशसिद्धान्त पटण्यासारखे असतात. आक्रमक राष्ट्रीय आणि हुकूमशाही राजकारणात वंशश्रेष्ठतेच्या तत्त्वाच्या आधारे अन्य वंशांचा उच्छेद करण्याचा कार्यक्रम राजकारणी व्यक्तींना मोठा चांगला वाटतो. त्या कार्यक्रमाला योग्य ते तात्त्विक अधिष्ठान देणारी विद्वान मंडळी विकत मिळू शकतात किंवा चाबूक मारून लिहायला बसविता येतात. वंशवादाचा इतिहास थोडक्यात हा असा आहे.

### वंशभेदातील शास्त्रीय सत्य :

तर मग वंशभेद हा प्रकार निश्चितपणे आहे तरी काय ? त्यासंबंधी शास्त्रीय दृष्ट्या जातीत जास्त विश्वसनीय अशी स्थिती काय आहे ? प्रारंभी म्हटल्याप्रमाणे वंशभेदाविषयी बोलायचेच असेल तर ते शरीरवैशिष्ट्यांतील भेद आहेत आणि त्या पलीकडे फारसे काहीही नाही हे लक्षात घेतले पाहिजे. फारसे काहीही नाही असे म्हणण्याचे कारण हे की, बौद्धिक किंवा मानसिक गुणही आनुवंशिकतेने एका पिढीतून दुसऱ्या पिढीत उतरतात असेही दिसते; मात्र उतरतातच असे म्हणता येणार नाही. कारण मुलाच्या प्रगतीत त्याच्या आईवडिलांनी दिलेला बौद्धिक वारसा नक्की किती आणि भोवतालच्या परिस्थितीची अनुकूलता किंवा प्रतिकूलता निश्चित किती हे ठरविणे कठीण आहे, म्हणूनच अनेक शास्त्रज्ञांनी वंशावंशातील बौद्धिक भेद निश्चित

करण्याचे दृष्टीने निरनिराळ्या वंशांतील अनेक माणसांच्या चाचणीपरीक्षा घेऊन किंवा अन्य प्रकारे ज्या पहाण्या केल्या त्यातून निघालेले निष्कर्ष सबंध शास्त्रीय जगतास मान्य होत नाहीत. काही विशिष्ट वंशाचे लोक जर शतकानुशतकांच्या प्रतिकूल परिस्थितीमुळे आणि सांप्रतच्या भोवतालच्या परिस्थितीमुळेही अप्रगत राहिले असतील, त्यांना विकासाची संधीच मिळालेली नसेल तर ते तशा प्रकारची संधी मिळालेल्या प्रगत व विकसित होऊन बसलेल्या इतर गटांशी कोणत्याही बौद्धिक चाचणीत बरोबरी कशी करू शकतील ? म्हणूनच बौद्धिक वारसा एखाद्या विशिष्ट वंशात इतर वंशांपेक्षा जास्त आहे असे सिद्ध करता येत नाही. दुसरे असे की निरनिराळे वांशिक गट भिन्नभिन्न परिस्थितीत जगले आणि वाढले त्यामुळे निरनिराळ्या गटात बौद्धिक आविष्कार दाखविण्याचे, कर्तृत्व आणि पराक्रम दाखविण्याचे निरनिराळे प्रकार झाले. काही वंश शारीरिक शक्ती जास्त दाखवतील तर काही कलेसारख्या क्षेत्रात श्रेष्ठ असतील, असे ग्रँट हा वंशवादीसुद्धा कबूल करतो. प्राचीन ग्रीसचा इतिहास पाहिला तर स्पार्टा ह्या नगरराज्याचे लोक आणि अथेन्स ह्या नगरराज्यातील लोक ह्या दोघांच्या कमाईची तुलना करता असे दिसते की, स्पार्टाचे लोक युद्धकलेत अतिशय प्रवीण होते तर अथेन्सचे लोक साहित्य, कला, तत्त्वज्ञान इत्यादी अनेक क्षेत्रात, युद्धाखेरीज जवळ जवळ प्रत्येक क्षेत्रातच स्पार्टातील लोकांहून वरचढ होते. खुद्द वंशवाद्यांनी दिलेल्या माहितीप्रमाणेच स्पार्टाचे लोक शुद्ध नॉर्डिक वंशाचे होते तर अथेन्सचे लोक हे अशुद्ध, मिश्रित अशा प्रकारचे होते. म्हणजे अशुद्ध वंशाचे लोक ग्रीसच्या इतिहासात तरी शुद्ध नॉर्डिकापेक्षा हाणामारीच्या क्षेत्राखेरीज इतर प्रत्येक क्षेत्रात श्रेष्ठ असल्याचे दिसून आले.

वनस्पतिशास्त्रज्ञ आणि प्राणिशास्त्रज्ञ ह्यांनी विज्ञानाच्या आधारे निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळ्या परिस्थितीत जीववैशिष्ट्ये कशी ठरतात ह्यासंबंधी काही निष्कर्ष काढले आहेत. तेही मानववंशविचाराचे संदर्भात लक्षात घेण्यासारखे आहेत. विशिष्ट भौगोलिक परिस्थितीत, विशिष्ट हवामानात अनेक मानवेतर प्राणी रंग, आकार, शरीररचना, केस इ. बाबतीत काही विशिष्ट तऱ्हेने उत्क्रांत होत असतात. एका शास्त्रज्ञाने दाखविले आहे त्याप्रमाणे माणसांच्यात जेवढे वंश आणि उपवंश आहेत तेवढेच वंशोपवंश वानरांच्यात आणि माकडांच्यात दाखविता येतील. माणसांप्रमाणेच माकडांचेही नॉर्डिक माकडे, निग्रो माकडे वगैरे शब्दांनी वर्णन करता येईल. तेव्हा विशिष्ट परिस्थितीमध्ये विशिष्ट ठिकाणी एका गटातील मानवाने जे रंगरूप इत्यादी धारण केले ते कदाचित त्याला त्याच्या मर्कट पूर्वजांकडूनही मिळालेले असेल, म्हणजे निग्रो हा माणूस होण्यापूर्वीच काळा झालेला होता. परंतु

त्यामुळे निग्रो कमी बुद्धीचा मात्र ठरत नाही हे लक्षात ठेवले पाहिजे. कारण त्या काळचा शरीराचे आत मेंदूची बरीच वाढ झालेली असण्याचा संभव आहे, तर गोऱ्या माकडापासून उत्क्रांत झालेल्या गोऱ्या माणसांनी मेंदूच्या वाढीत प्रगती केलेली असेलच असे नाही. परिस्थितीमुळे माणसांची शरीरवैशिष्टचे आणि काही प्रमाणात स्वभाववैशिष्टचेही ठरतात एवढेच नव्हे तर आवडीनिवडीही ठरत असतात. रंगरूप काहीही असले तरी पर्वतप्रदेशात रहाणारे लोक जगभर बहुधा उंचेपुरे दिसतात. शारीरिक शक्ती आणि कामाचा उत्साह ह्याबद्दल प्रसिद्ध असलेल्या नॉर्डिक जर्मनांपैकी काही दक्षिण ब्राझिलमध्ये स्थायिक झाले आहेत आणि तेथे ते ब्राझिली लोकांइतकेच किंबहुना त्यांच्याहूनही थोडे अधिक निष्क्रिय आणि आळशी झालेले आहेत. अनेक वर्षे काळचा लोकांच्यात अगदी एकटयाने वावरल्यानंतर पुढे पुढे लिव्हिंगस्टोन ह्या गोऱ्या इंग्रजाला आपला गोरा रंग हा काही बरोबर नाही असे वाटू लागल्याची गोष्ट नमूद आहे. तेव्हा भोवतालच्या परिस्थितीमुळे माणसाचे शारीरिक, बौद्धिक, मानसिक व सामाजिक जीवन अशा तऱ्हेने आकारत असते की त्या आकारात काही मूळचा रक्तगुण असेल असे मानायला फारशी जागाच उरत नाही. म्हणूनच वंशांविषयी बोलायचे असेल तेव्हा आपण फक्त शारीरिक भेदांविषयी बोलत आहोत, त्याचा सांस्कृतिक भेदांशी काहीही संबंध नाही हे लक्षात घेतले पाहिजे. शरीरवैशिष्टचे ही आनुवंशिकतेने पिढयान्‌पिढया पुढे चालत राहिल्यामुळे कायम स्वरूपाची दिसतात हे खरे, पण म्हणून एका विशिष्ट गटाची एका काळी असलेली विशिष्ट संस्कृतीही पिढयान् पिढया तशीच राहिली आहे आणि राहील असे मुळीच म्हणता येणार नाही.

## वंशवादाविषयीची काही अधिकृत निवेदने :

१९३८ मधे नाझीवंशवादाचा भयानक परिणाम दृष्टोत्पत्तीस येऊ लागल्यानंतर अमेरिकेतील मानवशास्त्रज्ञांनी आणि मानसशास्त्रज्ञांनी त्याची गंभीर दखल घेतली आणि वंशवादी विचारांविरुद्ध आपली मते अधिकृतपणे जाहीर केली. त्यांचे ठराव खाली उधृत केले आहेत. त्याचप्रमाणे दुसऱ्या महायुद्धानंतर युनेस्कोपुरस्कृत संशोधकांनी वंशवादाचा सर्वांगीण अभ्यास करून त्याविषयीचा आपला अंतिम निर्णय दिला आहे. ती निवेदनेही खाली दिली आहे. उपरोक्त ठरावातील आणि निवेदनातील सर्व मुद्दे वरील लेखात इतस्ततः येऊन गेलेले असल्यामुळे त्याचे पुन्हा मराठीत वेगळे शब्दशः भाषांतर देण्याची गरज राहिलेली नाही.

## RESOLUTION OF THE AMERICAN ANTHROPOLOGICAL ASSOCIATION

### ( December 1938 )

Whereas, the prime requisites of science are the honest and unbiased search for truth and the freedom to proclaim such truth when discovered and known ; and,

Whereas, Anthropology in many countries is being conscripted and its data distorted and misinterpreted to serve the cause of an unscientific racialism rather than the cause of truth ;

Be it resolved, that the American Anthropological Association repudiates such racialism and adheres to the following statement of facts :

i ) Race involves the inheritance of similar physical variations by large groups of mankind, but its psychological and cultural connotations, if they exist, have not been ascertained by science.

ii ) The terms " Aryan " and " Semitic " have no racial significance whatsoever. They simply denote linguistic families.

iii ) Anthropology provides no scientific basis for discrimination against any people on the ground of racial inferiority, religious affiliation or linguistic heritage.

## PSYCHOLOGISTS' STATEMENT ( EXCERPTS )

### At The Annual Meeting Of The American Psychological Association ( December 1938 ).

In the experiments which psychologists have made upon different peoples, no characteristic inherent psychological differences which fundamentally distinguish so called "races" have been disclosed.

There is no evidence for the existence of an inborn Jewish or German or Italian mentality. Furthermore there is no

indication that the members of any group are rendered incapable by their biological heredity of completely acquiring the culture of the community in which they live. This is true not only of the Jews in Germany, but also of groups that actually are physically different from one another. The Nazi theory that people must be related by blood in order to participate in the same cultural or intellectual heritage has absolutely no support from scientific findings.

Racial and national attitudes are psychologically complex, and cannot be understood except in terms of their economic, political and historical backgrounds. Psychologists find no basis for the explanation of such attitudes in terms of innate mental differences between racial and national groups. The many attempts to establish such differences have so far met with failures. Even if successful, they would offer no justification for repressive treatment of the type now current in Germany. In the scientific investigations of human groups by psychologists no conclusive evidence has been found for racial or national differences in native intelligence and inherited personality characteristics. Certainly no individual should be treated as an inferior merely because of his membership in one human group rather than another.

( — Race and Racism – Benedict Ruth ह्या पुस्तकावरून. )

## THE UNESCO STATEMENT ON RACE
## ( 1950 )

"It is now generally recognized that intelligence tests do not in themselves enable us to differentiate safely between what is due to innate capacity and what is the result of environmental influences, training, and education. Whereever it has been possible to make allowances for differences in environmental opportunities, the tests have shown essential similarity in mental characters among all human groups. In short, given similar degrees of cultural opportunity to realise their

potentialities, the average achievement of each ethnic group is about the same. The scientific investigations of recent years fully support the dictum of Confucius ( 551–478 B. C. ) ' Men's natures are alike ; it is their habits that carry them far apart.''

### THE USESCO STATEMENT ON THE NATURE OF RACE AND RACE DIFFERENCES BY PHYSICAL ANTHROPOLOGISTS AND GENETICISTS ( 1952 )

" Studies within a single race have shown that both innate capacity and environmenal opportunity determine the results of tests of intelligence and temperament though their relative importance is disputed.

" When intelligence tests, even non–verbal, are made on a group of non–literate people, their scores are usually lower than those of more civilised people. It has been recorded that different groups of the same race occupying similarly high levels of civilization may yield considerable differences in intelligence tests. When however, the two groups have been brought up from childhood in similar environments, the differences are usually very slight. Moreover, there is good evidence that, given similar opportunities, the average performance ( that is to say, the performance of the individual who is representative because he is surpassed by as many as he surpasses ), and the variation round it, do not differ appreciably from one race to another.

"Even those psychologists who claim to have found the greatest differences in intelligence between groups of different racial origin, and have contended that they are hereditary, always report that some members of the group of inferior performance surpass not merely the lowest ranking member of the superior group, but also the average of its members. In any case it has never been possible to separate members of two groups on the basis of mental capacity,

as they can often be separate on a basis of religion, skin colour, hair form or language. It is possible, though not proved, that some types of innate capacity for intellecutal and emotional responses are commoner in one human group than in another, but it is certatn that, within a single group, innate capacities vary as much as, if not more than, they do between different groups.

" .... The normal individual, irrespective of race, is essentially educable. It follows that his intellectual and moral life is largely conditioned by his training and by his physical and social environnment.

" It often happens that a national group may appear to be characterized by particular social attributes. The superficial view would be that this is due to race. Scientifically, however, we realize that any common psychological attribute is more, likely to be due to a common historical and social background, and that such attributes may obscure the fact that, within different populations consisting of many human types, one will find approximately the same range of temperament and intelligence.

" The scientific material available to us at present does not justify the conclusion that inherited genetic differences are a major factor in producing the differences between the cultures and cultural achievements of different peoples or groups. It does indicate, on the contrary, that a major factor in explaining such differences is the cultural experience which each group has undergone ".

— Ashley Montagu च्या The Bio-Social Nature of Man ह्या पुस्तकावरून

मानवजातीचे मुख्य वंश किती मानावयाचे, प्रत्येक वंशाचे उपवंश किती धरावयाचे, एखाद्या वंशात पिढ्यान् पिढ्या जे गुण उतरतात असे वाटते त्यात आनुवंशिकतेचा नेमका किती भाग असतो असे कित्येक विलष्ट आणि विवाद्य प्रश्न वंश-

विचाराशी निगडित आहेत. जीवशास्त्रज्ञांचा आणि मानववंशशास्त्रज्ञांचा तो अधिक अभ्यासाचा विषय होऊ शकेल. त्याबाबत ह्या ठिकाणी अधिक तपशीलात जाणे हे अनुचित आणि औद्धत्याचेही होईल. ह्या ठिकाणी इतिहासविषयाचे संदर्भात विचार करताना शास्त्रज्ञांनी काढलेले निष्कर्ष लक्षात घेऊन आणि प्रत्यक्ष इतिहासाचा दाखला पाहून जे दिसते ते असे की, इतिहासाची रहस्ये उकलण्यासाठी, इतिहासातील घडामोडींचा अर्थ लावण्यासाठी, सर्व ऐतिहासिक घडामोडींमागील एकमेव सूत्र सांगण्याचे दृष्टीने जो एक वंशविचार सांगण्यात आला तो अजिबात मान्य करता येण्यासारखा नाही. इतिहासाचा अर्थ आणखी कोणत्या प्रकारांनी लागू शकेल आणि त्यात सत्यासत्य किती हे पुढे पहावयाचेच आहे, परंतु त्यापूर्वी इतिहासभाष्यात वंशपर विचाराला काहीही स्थान नाही एवढे ध्यानी घेणे अगत्याचे आहे.

## संदर्भ साहित्य


(1) A History of Historical Writing
– Barnes H. E.; New York, 1962

(2) Race, a Study in Superstition
– Barzun, Jacques; New York, 1965

(3) Race and Racism ( 5 th impression )
– Benedict, Ruth ; London, 1959

(4) Sociology and History
– ed. Cahnman W. J. and Boskot Alvin; London, 1964

(5) The Idea of History
– Collingwood R. G.; Oxfood, 1946

(6) The History of Man ( 2nd edition )
– Coon, Carleton ; London, 1962

(7) The Origin of Races
– Coon, Carleton; London, 1963

(8) The Pleasures of Philosophy ( 7th printing )
– Durant, Will ; New York, 1962

(9) Human Types
– Firth Raymond; New York, 1956

(10) Caste, Class and Occupation
– Ghurye, G. S.; Bombay, 1961

( 11 ) Up from the Ape
- Hooton, E. A. New York, 1959
( 12 ) Human Evolution
- ed. Korn Noel and Smith H. R.; New York, 1959
( 13 ) Configurations of Cultural Growth
- Kroeber, A. L.; Berkeley, 1944
( 14 ) Social Change
- Lapier, Richard ; New York, 1965
( 15 ) Nature and Types of Sociologial Theory
- Martindale D.; London, 1961
( 16 ) The Bio-Social Nature of Man
- Montagu, Ashley; London, 1956
( 17 ) Man's Most Dangerous Myth
Montagu Ashley ; New York, 1952
( 18 ) Principles of Genetics ( 5 th edition )
- Sinott E. W., Dunn L. C. and
Dobzhansky T.; London, 1953
( 19 ) A Study of History ( Vol. I )
- Toynbee A. J. London, 1956
( 20 ) Race
- ed. Thompson E. T. and Hughas E. C.;
Glencoe, Illinois, 1958

प्रकरण ४ थे

# राष्ट्रीय अवतारकार्यांचे तत्त्वज्ञान

## राष्ट्रीयत्व :

वंश म्हणून एक विशिष्ट मानवसमूह पायाभूत धरून मानवी इतिहासाची रचना कशी केली गेली हे मागील प्रकरणी पाहिले. काही इतिहासकारांनी वंशाऐवजी राष्ट्र नावाचा एक मानवी समूह गृहीत धरून इतिहासाची काही एक आखणी केली आहे. प्रत्येक राष्ट्राचा स्वतःचा असा एक स्वभाव आहे. त्या स्वभावानुसार त्या राष्ट्राला काहीएक कार्य करावयाचे असते. प्रत्येक राष्ट्राच्या इतिहासातील घटना नेहमी त्या राष्ट्रगुणांना धरूनच होत असतात आणि अशा तऱ्हेने सगळ्या जगाचा इतिहास घडत असतो. इतिहासाच्या गतीत कोणत्या राष्ट्राने कोणते कार्य करावयाचे आहे हे निश्चित असते, निश्चितपणे सांगताही येते आणि म्हणून मानवी इतिहासात प्रत्येक राष्ट्र कोणत्या मार्गाने जाणार आहे व त्या सर्वांचा साकल्याने काय परिणाम होणार आहे ह्याचे भविष्यही वर्तविता येते. जवळ जवळ वंशवादाइतक्याच आग्रहाने राष्ट्रवादी इतिहास सांगण्यात येतो.

राष्ट्र पायाभूत धरून मांडलेला इतिहासाच्या गतीचा हा सिद्धान्त तपासून घेण्यासाठी प्रथम राष्ट्र म्हणजे नक्की काय हे पहाणे आवश्यक आहे. आज ज्यांना राष्ट्र म्हटले जाते अशी भारत, पाकिस्तान, इंग्लंड, फ्रान्स वगैरे प्रकरणे आहेत तरी काय ? ही सर्व राज्ये आहेत, शासनसंस्था आहेत, प्रत्येकाचे एक स्वतंत्र सार्वभौम असे सरकार आहे. प्रत्येक राष्ट्राचे नागरिक आपापल्या सरकारचा कायदा मानतात आणि लोकशाही पद्धतीप्रमाणे तत्त्वतः आणि व्यवहारतःही कायदा करणारेही — प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे— स्वतः नागरिकच असतात. तथापि राष्ट्र म्हणजे केवळ एक सार्वभौम शासन नव्हे, राष्ट्र ह्या कल्पनेत त्याहून अधिक काहीतरी आहे. "मी भारतीय आहे" किंवा "मी फ्रेंच आहे" ह्या उद्‌गारात मी केवळ भारतातला किंवा फ्रान्समधला, त्या त्या सरकारच्या आज्ञा पाळणारा एक मतदार नागरिक आहे एवढेच अभिप्रेत नसते. "मी भारतीय आहे" म्हणजे इतर कोटयवधी जे भारतीय आहेत त्यांच्यापैकी, त्यांच्या सारखाच मी एक आहे आणि इतर कितीतरी कोटी अभारतीयांसारखा मी नाही अशी कमीअधिक तीव्रतेची भावना असते. 'मी भारतीय आहे'

ह्या म्हणण्यात मी भारताचा आहे हे जितके ठामपणे सांगितलेले असते त्याहूनही अधिक निश्चयाने मी पाकिस्तानी नाही हे जाहीर केलेले असते.

ही राष्ट्रीयत्वाची भावना कशी येते ? त्यामागे अनेक कारणे दिसतात. कधी एका भाषेमुळे, कधी एका धर्मामुळे, कधी समान अशा आर्थिक परिस्थितीमुळे, कधी सलग अशा भौगोलिक प्रदेशात वर्षानुवर्षे एकत्र राहिल्यामुळे, त्यातून निर्माण झालेल्या समान इतिहासामुळे, समान आपत्तीमुळे; कदाचित् वरीलपैकी दोनचार गोष्टींच्या एकत्र अस्तित्वामुळे ही एकतेची भावना निर्माण झालेली असते. वरील-पैकी एक किंवा अनेक गोष्टी असल्या म्हणजे राष्ट्र तयार झालेच पाहिजे असे मात्र नाही. सर्व हिंदू एका राष्ट्रात आहेत, परंतु सर्व मुसलमानांचे किंवा सर्व ख्रिश्चनांचे एक राष्ट्र होत नाही. इंग्लंडची आणि अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांची इंग्रजी ही एक भाषा असूनही भौगोलिक अंतरामुळे त्यांचे एक राष्ट्र होऊ शकत नाही. एका भाषेचे सर्व लोक भौगोलिक सलगता असली तरीही एकत्र येऊन एक राष्ट्र करतीलच असे नाही. स्वित्झर्लंडमधला जर्मन भाषिक विभाग जर्मनीला चिकटलेलाच आहे तथापि तो भाग जर्मनीत सामील होत नाही, स्वित्झर्लंडमधेच रहातो. खुद्द स्वित्झर्लंड ह्या राष्ट्राला स्वतःची अशी एक भाषाच नाही. आर्थिक दृष्टया फायदेशीर पडतील अशा हिशेबाने जर राष्ट्रे बनविली तर आजचे कोणतेच राष्ट्र आहे त्या अवस्थेत राहू शकणार नाही. परंतु राष्ट्रीय भावना अशा तऱ्हेच्या गणिताला पुरून उरलेली दिसते. तेव्हा शेवटी राष्ट्रीयत्व म्हणजे दुसरे तिसरे काही नसून ती एक भावना आहे, त्या भावनेमागे बौद्धिक अधिष्ठान आणि तर्कनिष्ठा दिसेलच असे नाही. इतिहासात अनेक कारणांनी निरनिराळी राष्ट्रे बनत गेली. वर्षानुवर्षे त्या घडणीत भाग घेतलेले, एकत्र काम केलेले लोक काही बंधनांनी एकमेकांशी जखडले गेले आणि स्वतःला राष्ट्र असे म्हणवू लागले. तथापि राष्ट्र ही काही अनादि आणि अनंत अशी मानवी संस्था नाही. राष्ट्रांच्या सरहद्दी बदलतात, राष्ट्रे नाहीशी होतात, नवी राष्ट्रे निर्माण होतात. अशा अनेक घटना पाहिल्या की, राष्ट्र हा सुद्धा फक्त मानवाच्या संघजीवनाचा एक प्रकार आहे; त्यापलीकडे काही नाही एवढे लक्षात यावे.

तथापि राष्ट्रीयत्वाची भावना काय असते हे पाहावयाचे असेल तर रड्यार्ड किप्लिंग ह्याची The Stranger ही कविता वाचावी. किप्लिंग म्हणतो, " माझ्या दाराशी आलेला परका प्रामाणिक असेल, सज्जन असेल पण तो माझी भाषा बोलत नाही आणि त्याचे मन मला समजू शकत नाही. मी त्याचे तोंड, त्याचे डोळे पाहू शकतो पण त्याच्या पाठीमागचा आत्मा मला दिसत नाही. मात्र माझी माणसे जी आहेत

ती माझे बरे करतील किंवा वाईटही करतील, पण मला समजू शकेल अशाच प्रकारचे असत्य ती बोलतील आणि मी जे खोटेनाटे बोलेन ते त्यांनाही उलगडेल. देवघेव करताना आम्हाला दुभाषी नकोत. ''

ह्या भावनेचा अर्थ अगदी सरळ आणि साधा आहे. माणसे बऱ्याच अंशी सवयीची गुलाम असतात. आपण ज्या प्रकारे जगलो, ज्या प्रदेशात वाढलो, जी भाषा बोललो, जे देव पूजिले ते सगळे तसेच करीत रहाणे सामान्यतः त्यांना आवडते. क्वचित केव्हा गंमत म्हणून परदेश, अन्यलोक, अन्य संस्कृती वगैरे पहावी असे त्यांना वाटते, परंतु परठिकाणी रहाणाऱ्या माणसाला काही कालानंतर घराची तीव्र ओढ लागतेच. कपडे, खाणपिणे ह्या सर्वच बाबतीत माणसांना स्वतःचे, परिचित असे, सवयीने पक्के झालेले असे, नेहमीचे जीवन हवे असते, त्यामुळे दुसऱ्या संस्कृतीतील माणसे विशेषशी न पटणे हे मनुष्यस्वभावाला धरून असेच आहे, आणि मग ह्याच्या जोडीला तुमची जगण्याची पद्धत आहे तीच विशेष चांगली आहे असे कुणी सांगितले म्हणजे सामान्य माणसाला ते विशेष पसंत पडते. कारण त्याला त्याच ठराविक प्रकारे जगावयाचे असते आणि कुणा विद्वानाने तीच पद्धत विशेष आहे, श्रेष्ठ आहे असा दिलासा दिला की त्याला एक विलक्षण समाधान मिळते.

## राष्ट्रगुण आणि राष्ट्रकर्तव्य :

राष्ट्रीयत्व हा संघजीवनाचा एक प्रकार आहे. असे वर म्हटलेच आहे. ह्या संघशक्तीने अनेक गोष्टी करता येतील. दुसऱ्या राष्ट्रावर आक्रमण करता येईल. परकीयांना लुटता लुबाडता येईल आणि जे मिळेल ते वाटून घेऊन प्रत्येकाला कमी अधिक प्रमाणात स्वार्थ साधता येईल. तेव्हा एका अर्थाने राष्ट्रीयत्व हे संघटित अशा स्वार्थाचेही तत्त्व आहे. कुणाही एकटचा माणसाला दुसऱ्या राष्ट्रावर स्वारी करून तेथून संपत्ती आणता येणार नाही. तीच गोष्ट सर्वांनी मिळून करावयाची. अशा तऱ्हेचा आक्रमक संघवाद नवीन आहे असे नाही, परंतु त्याचे राष्ट्रवादी रूप हे बरेच अलीकडचे म्हणजे अठराएकोणिसाव्या शतकातलेच आहे. ह्यावेळेपर्यंत यूरोपात अनेक राष्ट्रराज्ये निर्माण झाली होती तिच्यातून आक्रमक राष्ट्रवाद, नवा साम्राज्यवाद, निर्माण होत होता. यूरोपातील सत्तांनी आपापसात खूप युद्धखोरी केली. आणि आशिया आफ्रिकेतही सर्व प्रकारची अत्याचारी राजकारणे करून साम्राज्ये स्थापिली. हे सगळे अर्थातच नवीन यांत्रिक शक्तीच्या योगाने शक्य झाले. जे झाले त्यात राष्ट्रीय प्रमाणावरील स्वार्थ ह्यापलीकडे काहीही नव्हते. तथापि हा स्वार्थ नाही, हे अत्याचार नाहीत, हे आक्रमण नव्हे, आणि हे सगळे असे असले तरी ते योग्य आहे, न्याय्य आहे असे सांगणारे विचारवंत इतिहासभाष्यकार पुढे आले. जर्मनीत ड्रॉयसेन, फ्रान्समध्ये लॅमाराईट

आणि इंग्लंडमध्ये मेकॉले ह्यांच्यासारख्या अनेक लोकांनी राष्ट्रवादी भूमिकेतून आपापल्या देशांचे इतिहास लिहिले. ह्या परंपरेतून निर्माण झालेल्या इतिहासकारांनी आणि इतिहासभाष्यकारांनी अनेक शोध लावले. जर्मनीने जग जिंकले पाहिजे कारण ज्या वंशाचे ते राष्ट्र झाले आहे त्या वंशाचे ते नियोजित असे कार्यच आहे. फ्रान्सने साम्राज्य स्थापले पाहिजे, इंग्लंडने राज्यविस्तार केला पाहिजे कारण आशिया-आफ्रिकेतील मागासलेल्या काळ्या लोकांच्या उद्धाराची जबाबदारी परमेश्वराने श्वेतवर्णीयांवर टाकली आहे. ह्या ईश्वरदत्त कार्याचा संदेश फक्त त्या साम्राज्य-वाद्यांनाच पटला होता असे नव्हे तर ज्यांना गुलाम केले होते अशा राष्ट्रातील विचार-वंतांनाही तो पटला , खुद्द महाराष्ट्रातही अव्वल इंग्रजीच्या काळात असे मानणारे महाभाग होऊन गेले. अलीकडच्या काळात नाझी राष्ट्रवादालाही असेच नैतिक अधिष्ठान देण्यात आले. जर्मनीतील शुद्ध नॉर्डिकांखेरीज इतर लोक हे राज्य करायला नालायक आहेत; ते सामान्य प्रजाजन म्हणूनच जन्माला येतात आणि तसेच राहिले पाहिजेत. जर्मनांचा जन्मच राज्य करण्यासाठी आहे आणि त्यांनी ते केले पाहिजे. ते कुणालाच चुकविता येणार नाही, असे तत्त्वज्ञान सांगितले गेले. गोबिनोपासून सुरू झालेल्या आणि मागील प्रकरणी थोडे तपशीलवार पाहिलेल्या वंशवादावर नाझी राष्ट्रवाद उभारला होता. राष्ट्रवादी कधी वंशवादाचा आश्रय घेतात तर कधी सोईप्रमाणे अन्य आधार शोधतात. इटलीमध्ये मुसोलिनीने सांगितले की, इटलीने काय करावयाचे ते गत इतिहासानेच ठरविलेले आहे. एकदा रोमचे राजकीय साम्राज्य होते, नंतर रोमचे धार्मिक साम्राज्य झाले, तिसऱ्यांदा रोमला सर्वंकष स्वरूपाचे साम्राज्य करणेच भाग आहे. विसावे शतक हे इटलीच्या सामर्थ्याचे, इटलीच्या जगावरील आधिपत्याचे असेच ठरणार. रशियात साम्यवादी राज्यक्रांती झाली. वस्तुतः मार्क्सप्रणीत साम्यवादाला राष्ट्रवाद मान्य असण्याचेच कारण नाही. परंतु साम्यवादी रशियाला एक राष्ट्र म्हणून जगात काही एक कर्तव्य आहे आणि ते केल्याशिवाय गत्यंतर नाही अशी वृत्ती आणि कृती स्टॅलिनपासून आजपर्यंत सतत दिसते. प्रत्येक राष्ट्राचे काहीएक ईश्वरदत्त किंवा इतिहासदत्त असे कार्य असते आणि ते त्याने केलेच पाहिजे. किंबहुना ते केले जाणारच अशी जाणीव आशियाई राष्ट्रातही दिसून येईल. सन्यत्सेन या चिनी नेत्याने रशियाच्या सहकार्याने जगभर समाजवादी क्रांत्या करण्याचे चीनचे कालदत्त असे कार्य आहे असे मानले. आपला काही एक विशिष्ट राष्ट्रगुण आहे आणि त्याचा आविष्कार करून आपल्याला काही एक जागतिक कार्य करावयाचे आहे अशी भारतीयांतही भावना असावी. पाश्चिमात्य संस्कृती ही नुसती भौतिक आहे, यंत्रनिष्ठ आहे, तिला आत्मिक, आधिदैविक आधिष्ठान देण्याचे, नैतिक सामर्थ्य देण्याचे महाकार्य भारताला करावयाचे आहे असा दावा

विवेकानंद, अरविंदबाबू वगैरे आधुनिक संतांनी मांडला आणि पंडित नेहरूंसारख्यांच्या लिखाणापासून तो कोणत्याही विद्यार्थ्याने शाळेत केलेल्या एकाद्या भाषणापर्यंत तो पुन्हा पुन्हा कमी अधिक आवेशाने केलेला आढळेल. भारताची आधिदैविक, नैतिक अशी शक्ती म्हणजे निश्चितपणे काय आणि जगाला नेमके काय द्यावयाचे आहे ह्याचा नक्की बोध कुणाला कधी झाला आहे की नाही कोण जाणे !

**हेगेलची इतिहासमीमांसा :**

राष्ट्रवाद एका अगदी निराळ्या प्रकारे मांडला तो जर्मन तत्त्वज्ञ हेगेल याने. हेगेलने एक नवे इतिहासाचे तत्त्वज्ञान सांगण्याचा चंग बांधून गूढ आधिदैविक भाषेत घटनांचा काही एक अर्थ सांगितला. त्याच्या तत्त्वज्ञानात प्रारंभी तरी तो विचार राष्ट्रवादी इतिहासभाष्यात परिणत होणार आहे ह्याची कल्पनाही येत नाही. हेगेलची इतिहासमीमांसा तत्त्वज्ञानामधील पारिभाषिक संज्ञांनी खच्चून भरलेली, क्लिष्ट आणि अतिशय गुंतागुंतीची अशी आहे, त्यातून जे निघते ते अगदी स्थूलमानाने आणि साध्या भाषेत असे सांगता येईल : एक चैतन्य शक्ती किंवा दैवी शक्ती सर्वत्र भरून राहिलेली आहे. ते एकच सत्य आणि परमतत्त्व आहे. विश्वात दिसणारी अथवा भासणारी कोणतीही गोष्ट म्हणजे त्या दैवी शक्तीचाच एक आविष्कार होय. मानवी इतिहासातील सर्व घटना म्हणजे दुसरे तिसरे काही नसून ते त्या परमतत्त्वाचे विविध प्रकारांनी झालेले प्रगटीकरण आहे. त्या दैवी शक्तीच्या इच्छेने आणि तिच्या विशिष्ट योजनेनुसारच सर्व आविष्कार होत असतात. चैतन्यशक्तीला काही एका प्रकारे आपला विकास किंवा आपली स्थित्यंतरे घडवून आणावयाची आहेत आणि सबंध मानवी इतिहास म्हणजे त्या परमतत्त्वाचा, माणसाच्या हाताबाहेरील, समाजाच्या नियंत्रणापलीकडचा असा, आविष्कार आहे. माणसांना वाटत असते की, आपण आपल्या स्वतःच्या हेतूंप्रमाणे आणि स्वतःच्या योजनांनुसार पावले टाकीत आहोत परंतु तो भ्रम असतो. माणसे चैतन्यशक्तीकडून तिला पाहिजे त्याप्रमाणे हलविली खेळविली जात असतात.

त्या दैवी शक्तीची स्वतःच्या आविष्काराची काही एक पद्धती ठरली आहे. चैतन्यशक्ती प्रथम कोणत्या तरी एका क्रियेने किंवा कल्पनेने अंशतः प्रकट होते मग त्या क्रियेला किंवा कल्पनेला प्रतिक्रिया किंवा प्रतिकल्पना निर्माण होते. ह्या दोन्हींचा संघर्ष येतो आणि त्यातून समन्वय साधला जाऊन एक नवीन क्रिया किंवा कल्पना तयार होते. एक क्रिया, तिची प्रतिक्रिया आणि त्यांच्या संघर्षातून निघणारी समन्वयात्मक प्रक्रिया हे सर्व ऐतिहासिक घटनांचे सूत्र आहे. आदिकाळापासून जगाचा इतिहास हा ह्या विरोधविकासात्मक तत्त्वानुसार घडत आहे. हा असाच घडणार

आहे. ती ईश्वरी इच्छा आहे. तिच्यापुढे माणसांचे काहीही चालण्यासारखे नाही. त्या चैतन्यशक्तीच्या योजनेनुसार जो कर्तव्याचा वाटा व्यक्तीवर पडेल तो तिला उचलावा लागणारच.

कर्तव्याच्या वाटा व्यक्तीप्रमाणे राष्ट्रालाही उचलावा लागतो. राष्ट्रे ही चैतन्यशक्तीच्या कार्यक्रमात महत्त्वाची साधने आहेत. प्रत्येक राष्ट्राच्या बाल्या प्रौढावस्था, आणि मृत्यू इत्यादी अवस्था आहेत आणि त्या सर्व अवस्थांतून प्रत्येक राष्ट्राला गेलेच पाहिजे. विशिष्ट काळी, विशिष्ट राष्ट्राला ईश्वरी योजनेनुसार एक पूर्वनियोजित कार्य करावे लागते. तेच त्या राष्ट्राचे अवतारकार्य. हेगेलच्य, म्हणण्याप्रमाणे त्याच्या काळी म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीस प्रशियावर परमेश्वराने एक विशिष्ट जबाबदारी टाकली होती. मानव जातीला स्वतंत्र करण्याचे महत्कार्य प्रशियावर सोपवून टाकलेले होते, आणि हे यशस्वी रीत्या करण्यासाठी प्रशियन राज्याला बलवान्, सर्वसत्ताधिकारी असे होणे अपरिहार्यच होते. मानवांना स्वतंत्र करण्यासाठी त्यांच्या स्वातंत्र्यावर गदा आणून त्यांना जबरदस्तीने वागविणे प्रशियाला भागच होते, ते न्याय्यच होते. कारण प्रशियाचे अवतारकार्य आणि त्यासाठी प्रशियाने आखावयाची कार्यपद्धती ही दोन्ही ईश्वरी योजनेनुसारच होती.

## हेगेलच्या मीमांसेची चिकित्सा :

हेगेलचे वरील तत्त्वज्ञान तर्काला पटणारे नाही. काही एक चैतन्यशक्ती आहे ती विशिष्ट प्रकारे आविष्कार करीत आहे आणि करीत रहाणार आहे हे सगळे हेगेल सांगतो तसेच का मानावयाचे ? त्या ईश्वरी शक्तीला आविष्काराची क्रिया, प्रतिक्रिया आणि समन्वय अशी ही गुंतागुंतीची पद्धत का अवलंबावी लागते ? सर्वश्रेष्ठ, सर्व शक्तिमान परमचैतन्य शक्तीला जे काही करावयाचे आहे ते ती एकदमच का करीत नाही ? अशा तऱ्हेचे मूलभूत प्रश्न विचारता येतील. आणि पुढे प्रत्यक्ष इतिहासाचे दाखले घेऊन असे विचारता येईल की, हेगेलच्या काळापर्यंत मानवी इतिहासात ज्या घटना घडल्या होत्या त्या सगळ्या लक्षात घेऊन हेगेलने आपला सिद्धान्त मांडला काय ? तसे दिसत नाही. हेगेलने दिलेल्या इतिहासाच्या रचनेचा आढावा घ्यावयास येथे अवकाश नाही. तथापि त्याच्या प्रशियन राष्ट्रवादाचे संदर्भात पुन्हा काही प्रश्न निश्चित विचारता येतील. मानवांना स्वतंत्र करण्याची जबाबदारी परमेश्वराने प्रशियावरच का टाकली ? समजा टाकली असली तरी हेगेलला ते कसे कळले ? इतर कुणालाही समजू शकत नाही, परंतु हेगेलचा आणि परमेश्वराचा पत्रव्यवहार असल्यामुळे त्यालाच फक्त ते उलगडू शकते असे मानावयाचे की काय ? आणि पुढे प्रत्यक्षात प्रशियाने ती कामगिरी केली नाही ह्याला खुद्द इतिहासाचीच साक्ष आहे !

हेगेलच्या तत्त्वज्ञानाचा तत्कालीन वैचारिक जगतात बराच बोलबाला झाला, प्रशियन सरकारला तर हेगेलचे तत्त्वज्ञान एकदम पसंत पडले. प्रशियाच्या हुकूमशाही धोरणाला हेगेलने एक तात्त्विक अधिष्ठान दिले, कदाचित् ह्या तत्त्वज्ञानामागे हेगेल फ्रेडरिक विल्यमच्या नोकरीत होता हीही गोष्ट असेल असे के. आर. पॉपर सुचवितो, त्यातही सत्यांश नाही असे कसे म्हणावे ? परंतु प्रशियन राजाखेरीज प्रशियन प्रजेलाही हे तत्त्वज्ञान आवडणारेच होते. मूळ ईश्वरयोजना, परमशक्तीचा आविष्कार, त्या आविष्काराची क्रिया –प्रतिक्रिया– समन्वय अशी पद्धती वगैरे सगळे जंजाळ जरी सामान्य प्रशियन माणसाच्या आवाक्यातले नसले तरी शेवटी हेगेल, प्रशियन सरकार आणि प्रशियन लोक हे काहीतरी महत्कार्यासाठी अवतरलेले आहेत असे म्हणतो एवढ्यावरच जनतेने खूष व्हायला काहीच हरकत नव्हती. पुष्कळांना क्रिया-प्रतिक्रिया-- समन्वय अशा एका घट्ट चौकटीत बसविलेली इतिहासमीमांसा सुटसुटीत आणि सोईची वाटली. इतिहासातील लक्षावधी घटनांचा अर्थ लावणे सोपे झाले. चुकले तरी बिघडत नाही परंतु सोपे असणे सोयीचे असते. म्हणूनच पुढे कार्ल मार्क्स-सारख्या अध्यात्म आणि ईश्वरी शक्ती झुगारून देणाऱ्या विचारवंतालाही हेगेलची विश्लेषणपद्धती एकदम पसंत पडली. ईश्वराऐवजी दुसरे काही एक आधिभौतिक परमतत्त्व कल्पून मार्क्सने आपले ऐतिहासिक तत्त्वज्ञान दिले. त्याची दखल पुढे योग्य जागी घेतली जाईलच. परंतु ह्या प्रकरणाचे संदर्भात हेगेलपासून स्फूर्ती घेऊन पुष्कळदा सरळ सरळ तर पुष्कळदा अनाकलनीय गूढ भाषेत एक एक विलक्षण राष्ट्रवादी इतिहासाभाष्ये यूरोपभर सांगण्यात आली हे ध्यानी घेणे जरूरीचे आहे.

## राष्ट्रवैशिष्टय आणि राष्ट्रस्वभाव :

पुष्कळदा राष्ट्रवाद गोबिनोपासून मिळालेल्या वंशविचारान्वये मांडण्यात आला. मूळ वांशिक श्रेष्ठतेचा विचारच कसा अशास्त्रीय आहे आणि त्यामुळे त्यावर आधारलेला राष्ट्रवाद कसा टाकावू आहे वगैरे विवेचन विस्तृतपणे मागील प्रकरणी केलेच आहे.

वंशवाद, ईश्वरेच्छा ह्यांपैकी कशाचा तरी आधार घेऊन किंवा न घेताही राष्ट्रवादी तत्त्वज्ञान मांडता येणे शक्य आहे. तसा प्रयत्न अनेक विचारवंतांनी केला आणि असे म्हटले की, पाठीमागची कारणे काहीही असोत, ती कारणे सांगता येवोत किंवा न येवोत परंतु प्रत्येक राष्ट्राला त्याचा असा काही स्वभाव आहे, त्या राष्ट्राचे असे काही गुणधर्म आहेत आणि म्हणूनच ते राष्ट्र मानवी इतिहासाच्या गतीत एका विशिष्ट प्रकारे कार्यप्रवण होणार अशा तऱ्हेचे अनेक विचार मांडण्यात आले आणि राष्ट्रगुणांचा विचार न करता किंवा राष्ट्रगुण बदलू शकतील असे मानून इतिहास सांगता येणे अशक्य आहे असे सूचित केले गेले.

अठराव्या शतकात फ्रान्समध्ये व्हाल्तेअर याने राष्ट्रविशिष्ट अशा गुणांचे काही विवरण केले. त्याच सुमारास हर्डर ह्या जर्मन विचारवंतानेही राष्ट्रीय गुणासंबंधी असेच काही विचार व्यक्त केले. ह्या सर्व भाष्यकारांच्या विवेचनात एक कायम सूत्र होते ते असे की प्रत्येक राष्ट्राला व्यक्तीसारखाच त्याचा असा एक स्वभाव असतो आणि तो स्वभाव सोडून वागणे जसे व्यक्तीला शक्य नाही तसेच राष्ट्रालाही जमणार नाही. व्हाल्तेअर किंवा हर्डर या विचारवंतांनी राष्ट्रगुणाचे हे तत्त्वज्ञान हेगलच्या आधिदैविक योजनेच्या किंवा गोबिनोच्या वंशशास्त्राच्या पूर्वीच सांगितले होते हे मुद्दाम लक्षात घेण्यासारखे आहे. त्या राष्ट्रगुणांच्या मागे काही कारणे असतील, ती सांगता येतील किंवा न येतील, परंतु प्रत्येक राष्ट्राचा त्याचा असा एक गुणसमुच्चय असतो आणि त्यानुसार त्या त्या राष्टाचा इतिहास आणि म्हणून पर्यायाने जगाचा इतिहास घडत असतो; असा हा विचार आहे. पुढे इंग्लंड, इटली, अमेरिका, भारत वगैरे निरनिराळ्या राष्ट्रांतून असेच विचार मांडण्यात आले. राष्ट्राच्या जीवन-पद्धतीतच काय पण त्याच्या साहित्यातही , त्या साहित्याचे प्रकार कितीही विविध असले तरी, एकच राष्ट्रीय स्वभाव प्रतीत होत असतो असे हेन्री मोर्ले ह्याने म्हटले आहे. पॉटर म्हणतो की, राष्ट्रे अस्तित्वात येतात तीच मुळी ते राष्ट्र बनवणारे लोक एका संस्कृतीचे, एका जीवनपद्धतीचे आणि एका स्वभावाचे असतात म्हणून. ( Generalisations in the writing of History. पृ. ९५ )

आता वर राष्ट्रीय स्वभाव म्हणून जो उल्लेखिला आहे त्याबाबत एक गंमत अशी दिसते की, कुठल्याही राष्ट्राच्या स्वभावाविषयी खुद्द त्या राष्ट्रातील लोक जे म्हणतात ते आणि इतर लोक जो अभिप्राय देतात तो ह्यात फार तफावत पडते. आज अमेरिका हे एक अग्रेसर राष्ट्र आहे. परंतु कित्येक इंग्रजादी लेखकांनी अमेरिकेला स्वतःचा असा राष्ट्रगुण किंवा संस्कृती काहीही नाही असे पुन्हा पुन्हा जाहीर केले आहे. ह्यावर खुद्द अमेरिकनांनी भडकून उठून काहीही असले तरी आमच्या इंग्रजी टीकाकारांपेक्षा आम्ही कितीतरी अधिक सुसंस्कृत आहोत असे ओरडून सांगितले. ( Generalisation in the writing of History पृ. २ )

इंग्लिश लोकांविषयी भारतात काय काय समजुती व्यक्त केल्या गेल्या आणि भारतीयांविषयी इंग्रजांनी कोणकोणते उद्गार काढून ठेवले आहेत ते पाहिले तर असे दिसते की, ह्या अभिप्रायांमागे इतिहासाच्या अभ्यासापेक्षा शत्रुत्वभावाची चेतना हीच खरी अधिक प्रबळ होती. तिच्या मुळाशी साम्राज्यवाद आणि तज्जन्य सामुदायिक अहंकार दिसतो. कित्येक शतके युद्धमान असलेल्या फ्रान्स आणि

जर्मनी ह्या दोन राष्ट्रांतील व्यक्तींनी परस्परांना कोणतीही शिवी देण्याचे बाकी ठेवलेले नाही.

आता हा जो राष्ट्रीय स्वभाव म्हटला जातो ह्यात खरोखरी राष्ट्रीयत्व किती आणि मूलभूत मनुष्यत्व किती हे आधी पाहिले पाहिजे. दोन गटांतील दोन माणसे पूर्णतया भिन्न दिसतील इतके वेगळे असे राष्ट्रीयत्व असू शकेल काय ? राष्ट्रीयत्वाच्या ह्या कल्पनेवर तत्त्ववेत्त्यांनी दोन प्रकारे हल्ले केले आहेत. एक असे की, माणसे ही सगळीकडे सारखीच असल्यामुळे राष्ट्रीय तत्त्वानुसार त्यांचे वर्गीकरण करणे बरोबर नाही आणि दुसरे असे की, प्रत्येक व्यक्तीला काही तपशीलात तिचे असे इतके स्वतंत्र व्यक्तिमत्व असते की सर्वसाधारण असा एक राष्ट्रीय गुणाचा शिक्का तिच्यावर कधीच मारता येणार नाही. इंग्रज लोक हे स्वभावतःच अत्यंत दुरभिमानी आणि उद्धट असे असल्यामुळे ते आपल्याखेरीज उरलेल्या सर्व मानवजातीकडे तुच्छतेने पहातात आणि इंग्रज प्रवासी हा कुठेही गेला तरी आपल्या उर्मट वागण्यामुळे स्वतःला अप्रिय करून घेतो असे इमर्सनने म्हटले आहे. परंतु खरोखरीच प्रत्येक इंग्रज माणसाचे बाबतीत हे खरे आहे काय ? स्वतःला मोठे मानणे, इतरांना तुच्छ लेखणे आणि ह्या भावनेतून वागणुकीत काही एक उद्दामपणा येणे हे स्वभावगुण कोणत्याही राष्ट्रातील पाच पन्नास व्यक्ती निवडून त्यांचे ठिकाणी आहेत हे दाखविता येईल. ह्या भारतात, आपल्या आसपासही अशी कित्येक माणसे फिरताना आढळतील.

दुसरे म्हणजे एका विशिष्ट प्रकारची सारख्याच स्वभावाची माणसे एका ठिकाणी घेऊन त्यांचे राष्ट्र बनविण्यात आले आणि म्हणून त्या राष्ट्राचा असा एक स्वभाव तयार झाला असेही म्हणता येणार नाही. कारण आज आपण जी राष्ट्रे पहातो ती अनेक प्रकारांनी बनली आहेत. राजघराण्यातील लग्ने, युद्धे, अशा कारणांनी अनेक राष्ट्रांच्या सरहद्दी बदलतात, तीन चार निरनिराळ्या भाषांचे लोक राजकीय कारणा-मुळे एकत्र येतात आणि एकत्र रहायला शिकतात. त्यांना त्या एकत्र राहण्याची सवय होते. ह्याउलट एकच भाषा बोलणारे एकाच धर्माचे आणि सारखेच हितसंबंध असणारे लोक राजकीय कारणामुळेच एकमेकांपासून वेगळेही झाले आहेत. तेही आपापल्या ठिकाणी कधी कुरकुरत तर कधी न कुरकुरता रहायला सरावले. तेव्हा माणसातील निरनिराळ्या प्रकारचे समान धर्म पाहून त्याप्रमाणे माणसांचे गट पाहून कुणा योजकाने राष्ट्रे बनविली आहेत असे मुळीच नाही. आणि म्हणूनच एका सत्तेखाली असलेल्या एखाद्या मानवसमूहाला काही समान असा स्वभाव असेल असे मानता येणार नाही.

आणि म्हणूनच केव्हा तरी तत्कालीन परिस्थिती पाहून राष्ट्रीय स्वभावाविषयी जे म्हटले जाते ते काही काळाने निराळचा परिस्थितीत संपूर्णपणे चुकीचे ठरते असे अनुभवास येते. शंभर-दीडशे वर्षांपूर्वी जर्मन हे कोणत्या ना कोणत्या ध्येयांच्या मागे धावणारे तत्त्ववेत्ते, कवी, संगीतज्ञ आणि कलावंत असे मानले जात. त्यांना अव्यवहारी मानले जाई आणि व्यापारधंदा करायला पूर्णपणे नालायक असाही त्यांच्यावर शिक्का-मोर्तब होई. परंतु प्रत्यक्ष इतिहास असा आहे की, अलीकडच्या काळात जर्मन लोक फारसे कवी, तत्त्वज्ञ राहिले नाहीत आणि व्यापारधंद्यात इतर यूरोपीय राष्ट्रांना चांगली जाणवावी अशी प्रगती त्यांनी केली आहे. इंग्रज लोकांविषयी व्हाल्तेअर म्हणाला होता की, इंग्रज हे त्यांच्या देशाभोवतालच्या समुद्रापेक्षाही अधिक खवळणाऱ्या अशा स्वभावाचे आहेत. ह्याउलट फ्रेंच माणसे मात्र शांत आणि घिम्या स्वभावाची आहेत पण व्हॉल्तेअर नंतर हळू हळू इंग्रज हे स्थिर आणि शांत स्वभावाचे तर फ्रेंच हे माथेफिरू अशी कीर्ती जगभर झाली. "पूर्व ती पूर्वच राहाणार आणि पश्चिम ती पश्चिम रहाणार" असा कवितेतून घोष करणाऱ्यांना पौर्वात्य जपानचा कायापालट स्वतःच्या डोळचांनी पहावा लागला. जपानचे पूर्णपणे पश्चिमीकरण झाले.

## भारताचे राष्ट्रीय कर्तव्य :

भारताच्या राष्ट्रगुणाविषयी भारतीयेतरांच्या आणि खुद्द भारतीयांच्याही मोठचा विलक्षण कल्पना दिसतात. भारतात कोणत्याही प्रकारची संस्कृती नाही आणि इथे सुसंस्कृत जीवन निर्माण होण्याचाही संभव नाही अशी अत्यंतिक मते काही परकीयांनी व्यक्त केली होती. भारताने स्वातंत्र्य मिळविण्यात आणि स्वातंत्र्योत्तर काळात निरनिराळचा क्षेत्रात प्रगती साधण्यात जे सामर्थ्य दाखविले आहे ते लक्षात घेता वरील सारखी टीका किती निरर्थक आहे हे ताबडतोब समजावे. त्याचप्रमाणे भारताच्या राष्ट्रगुणांविषयी बोलताना बहुधा सर्व अभारतीय समीक्षकांनी भारत हे ऐहिक दृष्टी नसणारे, चिरंतन पारलौकिक सुखाकडे दृष्टी लावून बसणारे निवृत्तिपर असे राष्ट्र आहे असे पुन्हा पुन्हा म्हटले आहे. परंतु एखादे राष्ट्र पिढचान् पिढचा केवळ निवृत्तिपर असे असू शकत नाही हे ते राष्ट्र अस्तित्वात आहे एवढचावरून सिद्ध होते. निवृत्तिपर तत्त्वज्ञान स्वीकारून, सर्व ऐहिक सुखोपभोगांकडे पाठ फिरवून जगण्याचा जो प्रकार आहे तो भारतात काही लोकांनी अवलंबिला त्याचप्रमाणे भारताबाहेरही ठिकठिकाणी अनेक माणसांनी तसे जीवनप्रयोग केले आहेत. भारताच्या प्राचीन काळी काही विचारवंतांनी निवृत्तिमार्ग सांगितला असेल, परंतु माणसांच्या तोंडची भाषा वेगळी आणि प्रत्यक्ष जीवन वेगळे असा प्रकार नेहमीच असतो. तेव्हा इहलोकींचे जीवन व्यर्थ आहे असे म्हणत म्हणतच भारतीयांनी राज्ये, साम्राज्ये केली, ग्रंथनिर्मिती केली

आणि सर्व प्रकारचे इहलोकीचे उपभोग घेतले. तेव्हा भारतासारख्या कोणत्याही राष्ट्राला ते निवृत्तिपर आहे किंवा अशासारखा एखादा स्वभाववाचक शेरा मारून निकालात काढणे प्रत्यक्ष इतिहासाला धरून होणार नाही.

दुसऱ्या बाजूने खुद्द भारतीय विचारवंतांचे स्वतःच्या राष्ट्रीय गुणांबद्दलचे व स्वतःच्या अवतारकार्याविषयीचे तत्त्वज्ञानही पुष्कळदा असेच विलक्षण आढळून येते. इतर जगाशी तुलना करता भारताची नैतिक शक्ती काही आगळी आहे असा भोळा भाव वर एके ठिकाणी म्हटल्याप्रमाणे देशातील थोरामोठ्यांपासून पोरासोरांपर्यंत सर्वांचेच ठिकाणी दिसतो. ह्याबाबतही असे विचारता येईल की, भारताचे असे वेगळे नैतिक मूल्य काय आहे ? भारतातील माणसे इतर देशातील बहुतेक व्यक्तींपेक्षा नैतिक दृष्ट्या अधिक श्रेष्ठ आहेत असे म्हणायला काही तरी आधार आहे काय ? उलट येथील लांचलुचपत वगैरे प्रकार पाहून कुणी उलटप्रकारचे विधान केले तर तेही सहजगत्या खोडता येईल असे नाही. म्हणूनच भारतीयेतरांनी काय किंवा स्वतः भारतीयांनी काय भारताच्या विशिष्ट राष्ट्रगुणांविषयी सरसहा एखादे विधान केले तर ते भारताच्या आजपर्यंतच्या इतिहासातील घटनांशी सुसंगत असू शकणार नाही. परकीयांनी केलेली निंदा, किंवा परकीयांनी केलेली अज्ञानमूलक स्तुती ही जेवढी अनैतिहासिक आणि अशास्त्रीय तेवढीच आमची स्वतःची आत्मस्तुती किंवा आत्मनिंदाही अनैतिहासिक आणि अशास्त्रीय ठरेल.

## राष्ट्रीयत्वाच्या सिद्धान्तातील धोका :

तेव्हा मानवी इतिहासाचा उलगडा करण्याची राष्ट्रगुणाधिष्ठित अशी जी एक पद्धती आहे ती वंशवादाइतकीच चुकीची असल्यामुळे भूतकालीन घटनांचा अर्थ लावण्यासाठी तिचा स्वीकार करता येणार नाही. मुळात हा दृष्टिकोन केवळ बौद्धिक अध्ययनातून असा आलेलाच नाही. त्याचा जन्म राष्ट्राभिमानाचे पोटी झालेला आहे. असे देशभक्तीपर इतिहासलेखन अशास्त्रीय तर असतेच, आणि शिवाय मानवजातीचे कल्याणाचे दृष्टीने अंती घातकही ठरते. हा मुद्दा शेवटच्या प्रकरणात थोडा अधिक स्पष्ट करावयाचा आहे. ह्या ठिकाणी ह्या संदर्भात हर्बर्ट बटरफील्डचा खालील इषारा मनन करण्यासारखा आहे. तो म्हणतो,

" .... The historian is in the habit of inserting some of his present-day prejudices into his reconstruction of the past; or unconciously he sets out the whole issue in terms of some contemporary experience. He has what we might call the modern 'set-up' in his mind .... The historian can even

deepen and magnify present-day prejudices by the mere fact that he so easily tends to throw them back and project them on to the canvas of all the centuries. And the more the historian seeks to please his generation or serve his government or support any cause save that of truth, the more he tends to confirm his contemporaries in whatever they happen to want to believe, the more he hardens the age in its favourite and fashionable errors".

( History and Human Relations पृ. १६२–६३ )

( "भूतकाळ पुन्हा उभा करताना इतिहासकार आपल्या काळातील आपले स्वतःचे पूर्वग्रह त्यात आणीत असतो. त्याच्या मनावर वर्तमानकालाचा पक्का ठसा असतो आणि, कदाचित् अजाणतेपणे असेल पण, सद्यःकालीन अनुभवविश्वातून त्याची भूतकालाची कथा आकारू लागते. एखादा वर्तमानकालीन दुरभिमान इतिहासकार खूप तीव्र आणि खूप मोठा करून दाखवू शकतो, कारण शतकानुशतकांच्या इतिहासाचा विस्तीर्ण पट त्याला आपले चित्र रेखाटण्यासाठी उपलब्ध झालेला असतो. आपल्या जनतेला किंवा आपल्या सरकारला संतुष्ट करण्याचा किंवा सत्याखेरीज दुसऱ्या कोणत्याही विशिष्ट तत्त्वाचा पाठपुरावा करण्याचा जितका जितका अधिक खटाटोप इतिहासकार करील तितका तितका तो आपल्या समकालीनांना अतिशय प्रिय असलेल्या पण चुकीच्या अशा श्रद्धा इतिहासाचा दाखला आणि दिलासा देऊन बळकट करीत असतो.")

## संदर्भसाहित्य :

( 1 ) History and Human Relations
- Butterfield, Herbort ; London, 1951
( 2 ) Man on His Past
- Butterfield, Herbort ; Cambidge, 1955
( 3 ) What is History ?
- Carr, E. H ; London, 1962
( 4 ) The Meaning of Human History
- Cohen M. R ; Chicago 1961
( 5 ) Generalizations in the writing of History
- ed. Gottschalk, Louis ; Chicago 1963

( 6 ) Contemporary World Politics
- Hill, Norman; Now York 1954
( 7 ) Nationalism
Kohn, Hans ; New York 1955
( 8 ) The Idea of Nationalism
- Kohn, Hans ; New York 1961
( 9 ) Reflections on Modern History
- Kohn, Hans ; New York 1963
(10) Palitical Thought since World War II
- ed. Stankiewicz P.; London' 1964
(11) Varieties of History
- Stem, Fritz ; New York, 1960
(12) Theory and Processes of History
- Teggart F. J. ; Berkeley, 1941

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ४१९४२ वि: निबंध
क्रमांक ७७१८ नों. दि: २६।३।६०

प्रकरण ५ वे

# इतिहासाचे भूगोलनिष्ठ विवरण

## भूगोलनिष्ठ विवरणाचे स्वरूप :

ह्या प्रकरणाचे संदर्भात भूगोल शब्द बऱ्याच व्यापक अर्थाने घ्यावयाचा आहे. मराठीतील भूगोल ह्या शब्दात एखाद्या प्रदेशाचे स्थान, डोंगर, दऱ्या, मैदाने, वाळवंटे, समुद्र, नद्या, तलाव इत्यादींनी बनलेली त्या प्रदेशाची रचना, त्याच्या नैसर्गिक सीमा, त्यात वाढणाऱ्या वनस्पति आणि तेथे जगणारे पशुपक्षी वगैरे मिळून होणारी संपूर्ण नैसर्गिक परिस्थिती अभिप्रेत आहे. एका अर्थाने मनुष्यप्राणी हा सुद्धा त्या महान् निसर्गाचाच एक भाग आहे. परंतु आपल्या विवेचनात आपण त्याला वेगळा काढीत आहोत. आता असे पहावयाचे आहे की, मानवाच्या भोवतालची जी एकूण नैसर्गिक किंवा भौगोलिक परिस्थिती असते तिचा मानवी जीवनावर काय परिणाम होतो ? हा परिणाम निरपवादपणे नेहमी होतोच काय ? समान भौगोलिक परिस्थितीचा परिणाम समानच असतो काय ? परिणाम होत असेल तर तो किती प्रमाणात आणि तो सतत त्याच प्रमाणात होतो काय ? आदिकालापासून आजपर्यंत तसाच होत आला आहे काय ? की तो बदलला आहे ? म्हणजेच दुसऱ्या शब्दात मानवी इतिहासाच्या घडणीस भौगोलिक परिस्थिती किती आणि कशी कारणीभूत होते ?

काही गोष्टी अगदी उघड दिसणाऱ्या अशा आहेत. जेथे जमीन म्हणजे कुठलीही वनस्पती वाढत नाही असे वाळवंटच आहे, जेथे पाणी मिळत नाही, कदाचित् मिळाले तरी माणसांना प्यावयास जेमतेम पुरेल न पुरेल इतकेच मिळेल तेथे शेती किंवा बागायती होणेच शक्य नाही. जवळपास कित्येक मैल समुद्र नसेल तर मच्छिमारी अशक्य आहे आणि तेथील लोकांना माशांची चवही माहीत असणे अशक्य आहे. समुद्रपार दूर देशी जाण्याची महत्त्वाकांक्षा अशा प्रदेशातील लोकांना शिवणारही नाही. कोकणात मच्छीमारी किंवा मिठागराचा जो उद्योग दिसतो तो समुद्रसान्निध्यामुळे आहे. असे उद्योग खानदेशात किंवा वऱ्हाडात असणेच शक्य नाही. अशा प्रत्यक्ष दिसणाऱ्या परिस्थितीमुळे माणसांचे जीवन नैसर्गिक परिस्थितीनुसार घडते असा विचार अगदी स्वाभाविकपणे सुचण्यासारखा आहे. अगदी प्राचीन साहित्यातही निसर्गामुळे आमचे जीवन घडते आणि निसर्गामुळेच ते अमुक प्रकारचे घडते असे विचार मांडलेले आढळतील. इ. स. पूर्व चौथ्या शतकापासून तर आज तागायत गेली

अडीच हजार वर्षे, पुष्कळ इतिहासभाष्यकार हाच भूगोलनिष्ठ विचार कमीकधिक आग्रहाने मांडत आलेले दिसतात.

## प्राचीन ग्रीकांचे विचार :

ग्रीसमध्ये हिप्पोक्रेटस् ह्याने इ. स. पूर्व चौथ्या पाचव्या शतकात भौगोलिक परिस्थितीने मानवी जीवन कसे घडते ह्याचे काहीसे तपशीलवार विवेचन केलेले आहे. एखाद्या प्रदेशात ऋतुमानानुसार कधी फार थंड तर कधी फार गरम असे बदल हवेत होत असतील आणि शिवाय तो भूभाग डोंगराळ खडकाळ असा असेल तर तेथील माणसे शरीराने धिप्पाड होतात. आणि त्या परिस्थितीत टिकून रहाण्यास आवश्यक असे धैर्य, काटकपणा हे गुण त्यांचे अंगी बाणतात. जमीन चांगली सुपीक, पाणी जवळपास आणि मुबलक आणि हवा समशीतोष्ण आणि आल्हाददायक अशी स्थिती असली की माणसे वातुळ शरीराची, आळशी, मंद, निरुत्साही आणि सत्वशून्य झालीच म्हणून समजावे. अशा तऱ्हेने नैसर्गिक परिस्थितीतील भिन्नतेमुळे माणसांचे किती भिन्नभिन्न प्रकार पडतात ते हिप्पोक्रेटसने दाखवून दिले आहे. इतर ग्रीक विचारवंतांनीही हिप्पोक्रेटसप्रमाणेच नैसर्गिक परिस्थिती आणि मानवी जीवनाची पद्धती ह्यांचे संबंध जुळवून पुढे काही सिद्धान्त मांडले आहेत. ग्रीकांनी प्राचीन काली जी प्रगती साधली ती ग्रीसमध्ये आहे तशा फार थंड नव्हे आणि फार उष्ण नव्हे अशा सुसह्य आणि सुखद हवेमुळेच होऊ शकते असे ॲरिस्टॉटलचे म्हणणे आहे. ह्याठिकाणी हेही लक्षात घेण्यासारखे आहे की, अशाच हवेमुळे रोम खरी प्रगती साधू शकते असे व्हिट्रुव्हिअससारख्या रोमन इतिहासकाराालाही वाटले. आणि प्रगतीला पोषक अशी हवा फक्त अरबस्तानात आहे म्हणून फक्त अरब मोठे कर्तृत्व गाजवू शकतात असे अरब इतिहासकार इब्न खाल्दून ह्यांचे मत झाले. माणसांच्या विविध प्रकारच्या शारीरिक ठेवणी, त्यांच्या कर्तृत्वाची क्षेत्रे, त्यांच्या सामर्थ्याच्या मर्यादा, त्यांची स्वभाववैशिष्टचे आणि त्यांच्या बऱ्यावाईट संवयी हे सगळे त्यांना मिळणारा सूर्यप्रकाश, त्यांच्या अंगावरून वाहणारे वारे, त्यांच्या पोटात जाणारे अन्नपाणी आणि त्यांना नेहमी भोवताली दिसणारा निसर्ग ह्यावरून ठरत असते, असे काही विचार प्लेटोनेही मांडले.

## मॉंटेस्क्यूचे निवेदन :

पुढे अठराव्या शतकात मॉंटेस्क्यूने असे मांडले की मानवी इतिहासाच्या घडणीत खुद्द माणसांचे कर्तृत्व फारसे महत्त्वाचे नाही. मोठे मोठे पराक्रम करणारे महापुरुष इतिहास घडवित नसतात. कितीही प्रचंड अशी लढाई होऊन गेली तरी ती समाजाचे

जीवन फार बदलीत नाही. ह्या सर्व गोष्टी गौण आहेत. राष्ट्राच्या अभ्युदयाची किंवा अधोगतीची ती कारणे नव्हेत. ती विशिष्ट भूमी आणि तिथले हवामान अशासारख्या स्थिर स्वरूपाच्या कारणांमुळेच मानवी इतिहासावर दीर्घ काळ टिकणारा किंवा चिरकालीन असाही परिणाम घडत असतो. इतिहास बराचसा भौगोलिक कारणांनीच घडतो. दुसरी घटक कारणे नाहीतच असा आग्रह माँटेस्क्यू धरीत नाही. पण भौगोलिक परिस्थिती सर्वात अधिक महत्त्वाची आणि जवळजवळ निर्णायक अशीच तो मानतो हे खरे. थंड हवेच्या प्रदेशातील लोक अधिक उत्साही आणि उद्योगी असतात आणि उष्ण हवेच्या प्रदेशातील लोक निरुत्साही आणि आळशी बनतात असे त्याचे निरीक्षण आहे. हिंदूंचे एक ठळक उदाहरण घेऊन माँटेस्क्यूने आपल्या सिद्धांताचा विस्तार केला आहे. हिंदुस्थानातल्यासारख्या असह्य उष्णतेच्या प्रदेशात कसले काम होणार ? म्हणूनच हिंदूंनी हे जीवन व्यर्थ आहे, ह्या जगात काहीही अर्थ नाही, परलोक खरा, मोक्ष सत्य आणि निवृत्ती हेच जीवनतत्त्वज्ञान अशासारखा निष्क्रियतेला पोषक असा वेदान्त सांगितला आहे. उत्तरेकडच्या रानटी टोळयांनी अकरा वेळा आशियाई लोकांवर स्वाऱ्या करून त्यांना नेस्तनाबूत केले असा इतिहास सांगून माँटेस्क्यू पुढे असा नियमही सांगतो की, भिन्न भिन्न नैसर्गिक परिस्थितीमुळे उत्तरेकडील लोक नेहमी जेते आणि दक्षिणेकडील सदा जित असाच इतिहास घडणार, असाच इतिहास पुन्हा पुन्हा दिसणार.

### बकलचे निवेदन :

एकोणिसाव्या शतकात इंग्लंडमध्ये बकल ह्यानेही भौगोलिक परिस्थितीच्या परिणामकारकतेविषयीही बरेच विवेचन केले. प्रत्येक देशातील लोकांची जीवनकथा तेथील हवा, अन्न, पाणी आणि भोवतालचा निसर्ग ह्यांनी घडवलेली असते. बकललाही प्राचीन हिंदूंचे स्मरण झाले. भारतातील लोक श्रद्धाळू, निसर्गपूजक असे का झाले ? आणि यूरोपात निसर्गाच्या पूजा करण्याऐवजी त्यालाच आपल्या सेवेला लावण्याची ईर्षा का निर्माण व्हावी ? बकल असे सांगतो की, प्राचीन हिंदू ज्या निसर्गाच्या सान्निध्यात रहात होते तो इतका भव्य आणि दिव्य होता की त्याला पाहून कुणीही नतमस्तकच व्हावे. ह्याउलट युरोपियनांच्या भोवतालची सृष्टी अशी निर्जीव आणि दरिद्री की तिला आपल्या कह्यात आणण्याकडेच त्यांचा स्वाभाविकपणे कल व्हावा. मात्र असा सर्वसाधारण सिद्धान्त मांडताना बकलने एक चांगली सावधगिरी राखली आहे. आपल्या विवेचनास तो अशी पुस्ती जोडतो की प्राकृतिक परिस्थिती ही सतत अशीच निर्णायक महत्त्वाची रहाते असे नाही. भौगोलिक परिस्थितीनुसार प्राचीन काली इतिहास घडत गेला हे खरे. पण प्राचीन कालापुरतेच हे जास्त खरे आहे हे लक्षात घेतले पाहिजे.

बुद्धिमान आणि कल्पक मानव हळूहळू निसर्गाला आपल्या काबूत आणतो आणि आपल्या हिताचे दृष्टीने त्याला नियंत्रित करण्याचे तंत्र बसवीत पुढे जात असतो. मानव जसजसा समर्थ होईल तसतसे नैसर्गिक परिस्थितीचे हे महत्त्व कमी होत जाईल. प्रत्यक्षात तसेच होत आले आहे. माणसाच्या प्राचीन इतिहासाचा अर्थ नैसर्गिक परिस्थितीच्या अनुरोधाने उघड करून दाखविता येईल, पण त्याचा अर्वाचीन इतिहास समजून घेताना मात्र त्या नैसर्गिक परिस्थितीखेरीज ती परिस्थिती बदलून, वळवून घेणारा माणूसही समजून घ्यावा लागेल.

**रॅटझेल आणि हंटिंग्टन :**

अलीकडच्या काळात रॅटझेल, हंटिंग्टन वगैरेंनी भूगोलकेंद्रित असे काही इतिहास-भाष्य केले आहे. रॅटझेलने आपले विश्लेषण मॉंटेस्क्यू, बकल ह्यांचेहून थोडया निराळ्या दृष्टीने केले आहे. रॅटझेल हवामानाचा आणि माणसांच्या उद्योगांच्या आणि सवयींच्या प्रकारांचा संबंध तपशीलवार दाखवितो. त्याच्या म्हणण्याप्रमाणे उष्ण हवेच्या प्रदेशातील माणसांना घरात बसणे अशक्य असते. ती मोकळ्या हवेत बाहेर पडतात. बाहेर पडल्यावर त्यांच्या त्याच कारणाने बाहेर पडणाऱ्या इतरांशी गाठी पडणे अपरिहार्य असते. ह्यामुळे ती माणसे अधिक समाजाभिमुख आणि समाजप्रिय अशी बनतात. ह्याच कारणामुळे अशा प्रदेशात स्त्री-पुरुषांमधील लैंगिक आकर्षणही अधिक प्रमाणात असते. त्यातून चित्र, गान, नृत्य इत्यादींत रस निर्माण होऊन माणसे कलाप्रेमी बनतात. थंड हवेच्या प्रदेशात कामाचा उत्साह इतका असतो की तेथील माणसात सारखे काहीतरी करावे, नवे नवे उद्योग शोधावे आणि अधिकाधिक काहीतरी मिळवीत रहावे अशी सतत ईर्षा रहाते. ह्यातून नवनवी वैज्ञानिक तंत्रे वाढीस लागतात. कलाकुसरींत वेळ दवडणे त्यांना पटत नाही. संपत्ती वाढविण्याकडेच सारी शक्ती लागते. बहुतेक वेळ घरात चार भिंतींच्या आत राहिल्याने तेथील माणसे माणुसघाणी, समाजविन्मुख आणि स्वयंकेन्द्रित अशी बनतात. आणि अविरत चाललेल्या स्पर्धेमुळे ती व्यक्तिवादी तत्त्वज्ञान सांगू लागतात, आचरू लागतात.

रॅटझेलने पुढे नाईल, गंगा, होएँगहो, यांगत्से, तैग्रीस, युफ्रेटिस, टायबर इत्यादी नद्यांचे काठी भरभराटीस आलेल्या अनेक संस्कृतींचे दाखले देऊन नदी ही इतिहासात किती महत्त्वाची आहे, ती संस्कृतीची कशी जननी आहे हे विशद केले आहे. इतिहासातील अलीकडच्या काही घटनांचे अर्थही रॅटझेल नद्यांच्या अनुरोधाने उलगडू पहातो. रशियाच्या नद्या आहेत त्याहून उलट दिशेने वहात असत्या तर रशियाने कॉन्स्टॅंटिनोपलसाठी एवढ्या लढाया कशाला केल्या असत्या ? असे तो विचारतो. अशी उदाहरणे घेऊन रॅटझेल नैसर्गिक परिस्थितीचा इतिहासावर होणारा बरावाईट परिणाम

सांगतो खरा, पण तोही भूगोलाने इतिहासाचा संपूर्ण अर्थ उलगडतो असे मानीत नाही. तथापि पर्वतासारख्या स्वाभाविक भिंतींनी राष्ट्रे किंवा समाज वेगळे पडतात; तसेच एक भूमी हा एकतेचा भक्कम पाया असतो असे काही सर्वसाधारण नियम मात्र तो देतो.

हंटिंग्टनने आधुनिक वनस्पतिशास्त्राचे संशोधन आणि त्याची पद्धती उपयोजून जगाच्या इतिहासातील शेकडो वर्षांच्या पर्जन्यमानाचा आलेख तयार केला आणि वृष्टी आणि अवर्षण ह्यांनुसार संस्कृतीची उन्नती आणि अवनती चालू रहाते असे एक गणित मांडून दाखविले.

## भूगोलनिष्ठ इतिहासभाष्याची चिकित्सा :

हिप्पोक्रेटस्पासून हंटिंग्टनपर्यंत वरीलप्रमाणे मानवी इतिहासाचा भूगोलाच्या भाषेत अन्वयार्थ लावण्याचा जो उद्योग झाला आहे तो इतर अनेक इतिहासभाष्यकारांना आणि अन्य क्षेत्रातील अभ्यासकांनाही मान्य होण्यासारखा नाही. टॉयन्बी, ड्यूरंट, कोहेन इत्यादी ग्रंथकारांनी हा भौगोलिक सिद्धान्त इतिहासातील अनेक दाखले देऊन खोडून काढलेला आहे.

प्राचीन ग्रीक, रोमन वगैरे इतिहासभाष्यकारांनी आणि माँटेस्क्यू आदिकरून अर्वाचीन भाष्यकारांनी जमीन, पाणी, हवामान वगैरेनी बनलेल्या विशिष्ट नैसर्गिक परिस्थितीतच माणूस सांस्कृतिक प्रगती साधतो असे म्हटले आहे. प्राचीन काळी ईजिप्त, मेसापोटेमिया, भारत, चीन, अमेरिकेचा काही भाग वगैरे ठिकाणी मोठ्या मोठ्या संस्कृती होऊन गेल्या. अर्वाचीन काळात मुख्यतः यूरोपमध्ये नेत्रदीपक असा सांस्कृतिक विकास झाला आणि अगदी अलीकडच्या काळात अमेरिकेच्या संयुक्त संस्थानात सर्व प्रकारची भरभराट दिसून येते. ह्या सर्व ठिकाणी जी भौगोलिक परिस्थिती होती ती समान होती काय ? तशीच परिस्थिती असलेल्या सर्व ठिकाणी तसाच इतिहास घडला काय ? असे प्रश्न उपस्थित करून त्याची उत्तरे शोधल्यावरच इतिहासाच्या भूगोलानुसारी अन्वयार्थाचे खरे मूल्यमापन होऊ शकेल.

## भौगोलिक परिस्थिती आणि प्राचीन संस्कृती :

प्राचीन ईजिप्तमध्ये ज्या भौगोलिक परिस्थितीमुळे एक महान् संस्कृती वाढली असे समजण्यात आले तशीच परिस्थिती जॉर्डन खोऱ्यात असूनही तेथे मात्र काहीच निर्माण होऊ शकले नाही असे इतिहास सांगतो. नद्यांचे महत्त्व प्राचीन आणि अर्वाचीन भूगोलवेत्ते दाखवितात. नदी ही संस्कृतीच्या निर्मितीसाठी हमखास उपकारक ठरते असे रॅटझेलसारखे अर्वाचीन विचारवंतही मांडतात. अनेक प्राचीन संस्कृती नद्यांचे

अस्तित्वात आल्या आणि भरभराटीस पावल्या हे खरेच. पण नदी असली की त्या काठी सांस्कृतिक जीवन निर्माण झालेच पाहिजे असे शास्त्र मात्र सांगता यावयाचे नाही. अमेरिकेतील रिओग्रंड आणि कोलोरॅडो ह्या नद्यांच्या खोऱ्यातील परिस्थिती हुबेहुब ईजिप्तसारखीच असूनही प्राचीन काळी तेथे कसलाच सांस्कृतिक विकास झालेला दिसत नाही. हवामान, आणि नैसर्गिक परिस्थिती समान असूनही इतिहास मात्र भिन्न भिन्न घडले अशी आणखी कितीतरी उदाहरणे दाखविता येतील. अँडियन पठारावर जे हवामान आणि जो निसर्ग होता तसाच पूर्व आफ्रिकेच्या पठारावरही होता. पण अँडियन समाजाने सुधारणेची काही एक उंची गाठली आणि पूर्व आफ्रिकेतील जमाती मात्र रानटी अवस्थेतच राहिल्या, मय ही संस्कृती ज्या नैसर्गिक परिस्थितीत भरभराटीस आली तशीच तंतोतंत परिस्थिती जपानच्या ज्या भागात होती तेथे मग तशीच एखादी संस्कृती का वाढली नाही? तसेच अमेरिकेतील ही मय संस्कृती ज्या वातावरणात झाली तसेच वातावरण मिळालेले कंबोडियातील लोक मात्र काहीही कमाई करू शकले नाहीत. कंबोडियात पुष्कळ उशीरा बाहेरून हिंदूंनी काही संस्कृती नेऊन लावली पण खुद्द त्या लोकांनी निर्माण केलेले असे कंबोडियात काहीही नाही म्हटले तरी चालेल. भौगोलिक दृष्ट्या अमेरिकेची संयुक्त संस्थाने पुष्कळशी पश्चिम युरोपातील निरनिराळ्या राष्ट्रांसारखीच आहेत पण संयुक्त संस्थानात तेथील मूळच्या लोकांनी स्वत: केलेला असा काही पश्चिम युरोपातील राष्ट्रांसारखा विकास इतिहास दाखवीत नाही. रशिया आणि कॅनडा ह्यांची नैसर्गिक स्थिती बरीचशी सारखीच, पण ह्या दोन राष्ट्रांचे इतिहास किती भिन्न! अॅनॅटोलियाचे पठार आणि इराण ह्यांची भौगोलिक परिस्थिती सारखीच होती, आणि दोन्ही ठिकाणाहून सुमेरियाच्या संस्कृतीशी संपर्क येणे हेही सारखेच शक्य होते, पण अॅनॅटोलियात हिट्टाइट लोकांनी जे कर्तृत्व दाखविले ते इराणी लोकांना जमले नाही. पुढे शेकडो वर्षांनी इराणमध्ये काही संस्कृती निर्माण झाली पण ती अगदी निराळी. मय संस्कृतीच्या सान्निध्याने मेक्सिकोमध्ये काहीएक संस्कृती तयार झाली परंतु मेक्सिकोसारखेच हवामान असलेल्या मध्य अमेरिकेच्या डोंगराळ भागातील लोकांवर मात्र मयांच्या संस्कृतीचा, किंवा कोणत्याच संस्कृतीचा, काही एक परिणाम झाला नाही.

## हवा, पाणी, अन्न आणि संस्कृति :

अॅरिस्टॉटल, व्हिट्रुव्हिअस, व्हेजिटीयस् इब्न खाल्दून वगैरे प्राचीन इतिहासकारांनी असे सिद्धान्त मांडले की, फार थंड प्रदेशात माणसाची बुद्धी गारठून जाते आणि फार उष्ण प्रदेशात सूर्य माणसाचे सर्व सामर्थ्य शोषून घेऊन त्याला सुकवून टाकतो आणि म्हणून मध्यम हवेतच प्रगती शक्य आहे. पण गंमत अशी की मध्यम

हवा किंवा संस्कृतीला पोषक, उपकारक अशी हवा निरनिराळ्या इतिहासकालीन निरनिराळ्या प्रदेशात, विशेषतः स्वदेशात, दिसली. इब्न खाल्दूनला सांस्कृतिक विकासासाठी अरबस्तानची वैराण भूमी ही फार योग्य वाटली हे मुद्दाम लक्षात घेण्यासारखे आहे.

वर उल्लेखिलेल्या इब्न खाल्दूनने अरबस्तानात का प्रगती झाली ह्याचे आणखी एक मनोरंजक रहस्य सांगितले आहे. अरबस्तानामध्ये अन्नाची कमतरता. कमी खाण्यामुळे बुद्धी तीव्र होते आणि प्रगतीला योग्य अशी परिस्थिती मिळते असे इब्न खाल्दूनचे म्हणणे आहे. अन्नाच्या प्रकारावरून माणसाची मनोवृत्ती आणि कृती होत असते असे प्लेटोनेही म्हटले आहे, अशा प्रकारच्या मतांना गिबनने दिलेले उत्तर फारच समर्पक आहे. मुख्यतः दुधावर जगणाऱ्या हूण आणि तार्तर लोकांनी जगात जे भीषण हत्याकांड केले ते लक्षात घेऊन अन्नाचा आणि माणसाच्या स्वभावधर्माचा कुणी संबंध जोडू नये असे गिबनने स्पष्टपणे सुचविले आहे.

हवापाण्यामुळे माणसाच्या वृत्तीवर, बुद्धीवर, आणि कर्तृत्वावर होणाऱ्या विशिष्ट परिणामांचा सिद्धान्त माँटेस्क्यू वगैरेंनी काही विशेष उदाहरणे देऊन उचलून धरला. उष्ण हवेतील लोक अधिक कल्पक असे सांगून माँटेस्क्यूने प्राचीन भारताचेच उदाहरण घेतले. प्राचीन भारतातील लोक पुष्कळ कल्पक होते ह्यात शंका नाही, पण सर्वच क्षेत्रात आश्चर्यकारक प्रगती करून दाखविणारे प्राचीन अथेन्सचे नागरिक कमी कल्पक कसे म्हणायचे ? प्राचीन काळातच बंदुकीच्या दारूचा आणि छापखान्याचा शोध लावणारे चिनी हे कल्पक नाहीत काय ? माँटेस्क्यूने पुढे एके ठिकाणी असेही म्हटले आहे की, उष्ण हवेच्या प्रदेशातील लोक जास्त परंपराप्रिय असतात आणि त्यांचे कायदे सौम्य असतात. जगाच्या निरनिराळ्या भागातील इतिहासाचे काही तपशील जरी पाहिले तरी असा सर्वसामान्य सिद्धान्त किती चुकीचा ठरेल हे सहज लक्षात येईल. राजेशाही आणि उमरावसभा आजतागायत टिकवून धरणारे इंग्रज लोक कमी परंपराप्रिय आहेत काय ? उष्ण हवेच्या प्रदेशातील लोकांचा कायदा सौम्य असतो असे मानणाऱ्यांनी भारत, आफ्रिका वगैरे ठिकाणच्या प्राचीन आणि अर्वाचीन इतिहासातील शिक्षांचे प्रकार अवश्य लक्षात घ्यावेत. क्षुल्लक गुन्ह्यासाठी हातपाय तोडणे, नाक कापणे, हत्तीच्या पायाखाली देणे, कडेलोट करणे, जिवंत जाळणे असे कितीतरी प्रकार उष्ण हवेच्या प्रदेशातील लोकांच्या कायद्यातून आणि चालीरीतींतून दिसून येतात. बकल वगैरे विचारवंतांनीही हवामानाचा, निसर्गाचा आणि माणसाच्या जीवनाचा कुठली तरी एकदोन उदाहरणे घेऊन असाच संबंध दाखविण्याचा जो प्रयत्न केला आहे तोही समग्र मानवी इतिहास पाहिला म्हणजे टिकण्यासारखा

नाही हे लक्षात येते. बकलच्या विचारातून एक अगदी साधा मुद्दा घेतला तरी ह्याची प्रतीती येईल. भोवतालच्या भव्य निसर्गामुळे प्राचीन हिंदू कवी झाले असे बकल सांगतो परंतु प्राचीन भारतीय आर्यांच्या भोंवती होता तितकाच सुंदर किंवा त्याहूनही अधिक सुंदर असा निसर्ग जगाच्या इतर कितीतरी भागातून असल्याचे सहज दाखविता येईल. त्या ठिकाणचे सृष्टिसौंदर्य काव्याविना वाया गेले आहे. दुसऱ्या एका विचारवंताने हवामानाचा आणि माणसाच्या धर्मकल्पनांचाही असाच संबंध जोडून असे उदाहरण दिले की, अरबस्तानच्या वाळवंटात भोवताली काहीच दिसत नसल्यामुळे ईश्वर एक असला पाहिजे असा विचार सुचून तेथे एकेश्वरवादी धर्म आणि तत्त्वज्ञान येणे सरळच आहे. असेच बोलायचे तर वाळवंटात भोवताली पहायला दुसरे काहीच नसल्यामुळे आकाशाकडे पाहून जितके ग्रहतारे दिसतात तितके देव असले पाहिजेत अशी कल्पना का येऊ नये, असे एक टीकाकार विचारतो ते तरी मग तर्कदुष्ट कसे म्हणता येईल ? महंमदापूर्वी अरबी लोक बहुदेवपूजक होतेही !

**नैसर्गिक सीमांची परिणामकारकता :**

रॅट्झेलने भौगोलिक परिस्थितीचे इतर काही तपशील आधारभूत धरून आणखीही सिद्धान्त मांडले आहेत. नैसर्गिक सीमा असलेला एकसंघ असा प्रदेश असला म्हणजे एकतेची भावना निर्माण होते असे तो म्हणतो. परंतु अनेकदा माणसाची भावना भौगोलिक सीमा भेदून पलीकडे जात असते हेही इतिहास दाखवितो. ब्रिटनबाहेर पडलेल्या आफ्रिका, आस्ट्रेलिया, कॅनडा, न्यूझीलंड इत्यादी प्रदेशातील लोकांनी अंतराचे दृष्टीने खूप दूर जाऊनही मायभूमीशी व तेथील आपल्या बांधवांशी निष्ठा कायम ठेवली, ब्रिटिश साम्राज्यात जी एक भावनिक एकता वर्षानुवर्षे दिसली आणि पुष्कळ प्रमाणात अजूनही दिसत आहे ती भौगोलिक सीमांच्या पलीकडची आहे. भौगोलिकदृष्ट्या बंगाल आणि पंजाब ह्या ठिकाणी सर्व लोकांचे ठिकाणी एकतेची भावना असावयास काहीच हरकत नव्हती पण धर्मभावना प्रादेशिक एकतेहून प्रबळ ठरली, पाकिस्तानची निर्मिती झाली आणि दोन बंगाल आणि दोन पंजाब अस्तित्वात आले. ह्या उलट आल्पस्च्या रांगांनी स्वित्झर्लंडचे बरेच तुकडे पडायला हरकत नव्हती. तेथे एक प्रकारचे संघराज्य झाले खरे, पण राष्ट्रीय एकतेची भावना आल्पस्च्या भिंती अडवू शकल्या नाहीत. आणखी एक विलक्षण उदाहरण हॉलंड आणि बेल्जम ह्या दोन राष्ट्रांचे दाखविता येईल. ह्या दोन राष्ट्रांमध्ये दोघांना कायम दूर ठेवू शकतील अशा मोठ्या नैसर्गिक हद्दी नाहीत पण तरीही अगदी निराळ्या कारणांनी ही दोन वेगवेगळी राष्ट्रे अस्तित्वात आली. त्यांना एकत्र आणण्याचा प्रयोगही झाला पण तो फसला.

## हंटिंग्टनचा निर्णायक निसर्ग :

इतिहासाचे भौगोलिक स्पष्टीकरण देणाऱ्या हॅटिंग्टन ह्या विद्वानाने तर आधुनिक वैज्ञानिक पद्धती वापरून अगदी शास्त्रीय सिद्धान्त देण्याचा प्रयत्न केला. वनस्पतिशास्त्राची पद्धती वापरून जुन्या वृक्ष वनस्पतींचा किंवा त्यांच्या अवशेषांचा अभ्यास करून त्याने प्रथम काही प्रदेशांच्या पर्जन्यमानाच्या इतिहासाचे आलेख काढले आणि राष्ट्राची प्रगती किंवा अधोगती ही वृष्टी किंवा अवर्षण ह्यांवरून ठरत असते असे गणित मांडले हे सांगितलेच आहे. परंतु हंटिंग्टनचे हे निष्कर्ष वैज्ञानिक पद्धतीत टिकणारे नाहीत आणि प्रत्यक्ष इतिहासानेही पटणारे नाहीत. वनस्पतिशास्त्राची जी पद्धती त्याने वापरली तिच्या अचूकपणाची ग्वाही खुद्द शास्त्रज्ञही देऊ शकत नाहीत आणि अवर्षण असतानाही प्रगती चालू राहिली तर पर्जन्यमान समाधानकारक असूनही प्रगती झालेली नाही असे प्रत्यक्ष इतिहासावरून दाखविता येईल. उदाहरणार्थ इ. स. पूर्वीच्या चौथ्या शतकाच्या पहिल्या अर्धात इराणची संस्कृती चांगली भरभराटीत होती पण ह्या काळात कित्येक वेळा इराणमध्ये पाण्याचा दुष्काळ होता असे वाङ्मयीन पुराव्यावरून दाखविता येईल. इराणमध्ये आलेले अॅलेक्झांडरचे सैनिक कित्येक दिवस पाणी पाणी करीत होते असे तत्कालीन आधारावरून स्पष्ट दिसते.

तोच वैज्ञानिक पद्धतीचा साचा वापरून हंटिंग्टनने संस्कृतीच्या निर्मितीसाठी आणि विकासासाठी काय काय पाहिजे ह्याची एक तपशीलवार रूपरेखा तयार केली. समशीतोष्ण हवा, वर्षभराच्या काळात योग्य प्रकारे पडलेला मुबलक पाऊस, वादळी वाऱ्यांपासून सुरक्षितता, सूर्याच्या प्रखरतेपासून जमिनीचे आणि जीवांचे रक्षण करणारी छाया देणारे मेघ आणि नदीकाठची सुपीक अशी भूमी अशा प्रकारचे वातावरण असले की माणसांना आपल्या अन्नपाण्याच्या प्राथमिक गरजांसाठी कष्ट करावे लागत नाहीत. साहित्य, कला, विज्ञान इत्यादी क्षेत्रात कर्तृत्व गाजवायला त्यांना अवसर मिळतो. अशी परिस्थिती मिळाली म्हणून प्राचीन ईजिप्तमध्ये वैभवशाली संस्कृती झाली. ईजिप्तमधील हवामान बदलले त्याबरोबर तेथील संस्कृतीही संपुष्टात आली. कालांतराने जगाच्या निरनिराळ्या भागात जेथे जेथे तसे आदर्श वातावरण निर्माण झाले तेथे तेथे– पश्चिम आशिया, ग्रीस, रोम, कॉन्स्टॅन्टिनोपल वगैरे ठिकाणी– संस्कृती जन्माला आल्या आणि वाढल्या, आणि जसजशी नैसर्गिक परिस्थिती प्रतिकूल होत गेली तसतशा कोसळल्या. मानवाचा इतिहास असाच घडत असतो.

आता हंटिंग्टन जी नैसर्गिक परिस्थिती आणि तीत होणारे बदल म्हणतो तेच मुळी अंशतः मानवनिर्मित असू शकतात. मिळालेल्या परिस्थितीचा उपयोग

न करता माणूस मागासलेला कसा राहू शकतो ह्याची काही उदाहरणे मागे दिलीच आहेत. कधी कळत न कळत तो निसर्गाने दिले असेल तेही घालवून बसतो. जंगले साफ करणे, शेळ्यामेंढ्या पाळणे अशासारखे उद्योग अंती जमिनीची निर्मितीक्षमता कमी करतात. कालव्यांनी पाणी खेळवून जमिनीतून अन्नोत्पादन करता येते हे खरे, पण त्या पसरलेल्या पाण्याचे बाष्पीभवन होऊन खाली क्षार उरतात आणि चांगल्या जमिनींची खारट होऊन जातात असेही प्रकार घडलेले आहेत. पॅलेस्टाइनमध्ये प्राचीन काळी पुष्कळ पाऊस असे. रोमनांसाठी जहाजे बांधण्यासाठी तेथील वृक्ष तोडून जंगले साफ करण्यात आली, परिणामी पाऊस नाहीसा झाला, जमीन नापीक झाली. हे माणसाने आपल्या हातानेच करून घेतले आहे. गवतपाला ओरबाडून खाणाऱ्या शेळ्यामेंढ्या सुपीक जमिनींची दुर्दशा करून सोडतात. इल्बेरियन द्वीपकल्प, ग्रीस, पॅलेस्टॉइन वगैरे ठिकाणच्या जमिनी नापिक होत जाण्याचे हे एक कारण आहे. म्हणूनच युगोस्लाव्हियात टिटोच्या सरकारने शेतकऱ्यांवर शेळ्यामेंढ्या पाळण्याचे बाबतीत पुष्कळ बंधने घातली आहेत. कालव्यांनी खारवट बनलेली आणि शेवटी नापिक झालेली जमीन हे यूफ्रेटिसच्या खोऱ्यातील संस्कृती नष्ट होण्याचे एक मोठे कारण घडले. हे सर्व एका अर्थाने नैसर्गिक आघात खरे पण ती विशिष्ट नैसर्गिक परिस्थिती-सुद्धा पुष्कळदा स्वतः माणसानेच आपल्या चुकीच्या कृतींनी निर्माण केलेली असू शकते, एवढेच येथे दाखवावयाचे आहे. रिचर्ड लापिअर ह्याने हा मुद्दा अशी पुष्कळ उदाहरणे घेऊन स्पष्ट केलेला आहे. ( Social change पृ. २१९–२२२ ).

अत्यंत प्रतिकूल नैसर्गिक परिस्थितीतही माणूस आपल्या इच्छाशक्तीने आपल्या गरजांसाठी धडपडत असतानाच साहित्य, कला, विज्ञान वगैरे क्षेत्रात कर्तृत्व गाजवीत असताना दिसतो. त्यासाठी हंटिंग्टन म्हणतो तशी निसर्गाची अनुकूलता असलीच पाहिजे असे मुळीच नाही. प्राचीन अश्मयुगातील मानवाने अत्यंत बिकट जीवन जगत असतानाच गुहेतील भिंतीवर सुंदर चित्रे काढून ठेवली. अरबस्तानच्या वाळवंटात विचार पुष्कळ पिकले. हंटिंग्टनने घेतले आहे ते ईजिप्तचे उदाहरण पाहिले तरी तेच दिसते. निसर्ग अनुकूल असताना जशी ईजिप्तमध्ये एक संस्कृती विकसित झाली तशीच इ. सनाच्या सातव्या शतकापासून अकराव्या शतकापर्यंत निसर्ग प्रतिकूल असतानाही दुसरी एक संस्कृती त्या ठिकाणी रुजली आणि वाढली.

## भूगोलनिष्ठ इतिहासभाष्याचे मूल्यमापन :

वर जी चर्चा केली आहे त्यात इतिहासाचा भूगोलपर अर्थ लावणाऱ्यांपैकी काही निवडक विद्वानांची निवडक मतेच तेवढी दिली आहेत. त्याचप्रमाणे ती मते इतरांनी कशी खोडली आहेत ह्याचेही पुढे दिग्दर्शन केले आहे. हे विवेचन संपूर्ण

आणि तपशीलवार असे झालेले नाही हे उघडच आहे. आणि तसे करण्याचे फारसे कारण आहे असेही नाही. वरील धावत्या आढाव्यात भूगोलसिद्ध इतिहास सांगणारे कोणत्या दृष्टीने आणि पद्धतीने इतिहास वाचतात आणि ते वाचन कसे अपुरे किंवा एकांगी असते एवढे जरी दिसले तरी पुरे आहे.

परंतु ह्या सर्व विवेचनाचा असा अर्थ नव्हे की, भूगोलाचे दृष्टीने इतिहासाचा अभ्यास करणाऱ्यांनी जे जे सांगितले आहे ते ते सगळे व्यर्थच आहे. भौगोलिक स्पष्टीकरण देणारांनी मानवी जीवनावर बरावाईट परिणाम घडवू शकतील अशा काही घटकांकडे अभ्यासकांचे लक्ष वेधविले हे खरेच. विशिष्ट प्राकृतिक परिस्थितीमुळे विशिष्ट प्रकारचेच सांस्कृतिक जीवन बनले पाहिजे हा आग्रह मान्य करू नये, तथापि विशिष्ट प्राकृतिक परिस्थितीत जास्तीत जास्त काय शक्य होईल आणि कोणत्या गोष्टी अजिबात शक्य होणार नाहीत अशा स्वरूपाच्या मर्यादा निश्चित दाखविल्या जातात. आणि एखादी संस्कृती, तिची उन्नती आणि तिची अधोगती समजून घेण्यासाठी ज्या अनेक घटक कारणांकडे लक्ष पुरविले पाहिजे त्यांपैकी नैसर्गिक परिस्थिती हे एक कारण असते किंवा असू शकते हा विचार निश्चित महत्त्वाचा आहे.

इतिहासाचा भूगोलनिष्ठ अर्थ सांगणारांनी दुसरी एक मोठी कामगिरी केली ती अशी की, मानवी जीवनातील घडामोडींचा अन्वयार्थ लावण्यासाठी त्यांनी आपल्या भोवतालच्या खऱ्याखुऱ्या प्रत्यक्ष अस्तित्वात असलेल्या वातावरणाकडे पाहिले. त्यांनी केलेली कारणमीमांसा भौतिक स्वरूपाची आहे; काल्पनिक असे कालचक्र किंवा गूढ, अज्ञात अनाकलनीय अशी दैवी शक्ती ह्यांच्या भाषेत इतिहासाचा अद्भूत अर्थ सांगण्याचे जे उद्योग आहेत त्यापेक्षा इतिहासाचा सभोवतीच्या नैसर्गिक परिस्थितीच्या अनुरोधाने अर्थ उलगडण्याचा प्रयत्न अधिक तर्कशुद्ध आहे.

तरीपण भौगोलिक परिस्थिती ही इतिहासाच्या घडणीत निर्णायक अशी ठरू शकत नाही. विशिष्ट परिस्थिती असते हे एक सत्य झाले, पण त्या परिस्थितीचा उपयोग करणारी, न करणारी, किंवा अमुक एका पद्धतीनेच उपयोग करणारी माणसे हे दुसरे सत्य आहे, आणि ते अधिक महत्त्वाचे आहे. अत्यंत नापीक जमिनीत अतिशय कष्टाने सोने पिकवतील अशीही माणसे असतात तर भरपूर पाणी, सुपीक जमीन, चांगली हवा वगैरे असूनही वर्षानुवर्षे आळसात वेळ दवडणारी माणसेही दिसतात. तेव्हा परिस्थिती कशी आहे ह्यापेक्षा तिचा उपयोग कसा केला जातो ह्यावरून इतिहासाची गती ठरत असते. तो उपयोग करणारे लोक अमुक प्रकारेच का वागतात ह्याची उत्तरे अनेक आहेत. त्या लोकांच्या संवयी, त्यांच्या सामाजिक चालीरीती, त्यांना मिळणारे नेतृत्व, योगायोगाने घडणाऱ्या काही गोष्टी अशा अनेकविध कारणांनी

एकाद्या मानवगटाची कार्याची दिशा आणि व्याप्ती ठरत असते. विशिष्ट नैसर्गिक परिस्थिती हे अनेकांपैकी एक कारण असेलही पण ते एकमेव कारण नाही हे लक्षात घेतले पाहिजे. लोखंड, पेट्रोल वगैरे काही खनिजसंपत्ती आहे म्हणून काही देश भर-भराटीत आहेत हे खरे. परंतु जगाच्या इतर भागात भूगर्भात तशी खनिज संपत्ती नाही हे कशावरून ? खनिज संपत्ती आपल्या प्रदेशात आहे की नाही हे उकरून पाहिल्याशिवाय कळायचे कसे ? आणि ज्यांना उकरायची इच्छाच नाही त्यांना जमिनीच्या पोटात पडलेल्या बहुमोल ठेव्याचा उपयोग कसा व्हायचा ? अनुकूल परिस्थिती असूनही माणसाची प्रगती होत नाही त्याचप्रमाणे अत्यंत प्रतिकूल परि-स्थितीत आपल्या कल्पकतेने नवीनवी साधने शोधून , नवनव्या वाटा हुडकून मानवी समाज प्रगती साधतात हेही इतिहास दाखवितो. तेव्हा भौगोलिक परिस्थितीने तिहासाचा प्रकार ठरतो आणि तो नेहमी तसाच ठरला पाहिजे असे मानण्याचे कारण नाही. म्हणूनच इतिहास आणि भूगोल ह्यांच्या संबंधीचा भरपूर ऊहापोह केल्यानंतर मॉरिस कोहेन शेवटी म्हणतो :

" The essential fact is that the environment of every human being and the context of every human act contains human and non-human elements inextricably interwined. Only as we realise that the events of human history include both mind and matter as polar components can we escape the grosser errors of those who would spin the world out of ideas and those who look to earth, fire and water to explain all human phenomana ".

— ( The Meaning of Human History पृ. १७१ )

## संदर्भसाहित्य :

( 1 ) The Meaning of Human History
– Cohen, Morris ; Chicago, 1961

( 2 ) The Idea of History
– Collingwood R. G. ; Oxford, 1946

( 3 ) The Pleasures of Philosophy
– Durant, Will ; New York, 1962

( 4 ) Social Change
– Lapiere, Richard T ; New York, 1965
( 5 ) Theory and Processes of History
– Teggart F. J. ; Berkeley 1941
( 6 ) The environmental Basis of Society
– Thomas, Franklin ; Century, 1925
( 7 ) A Study of History ( Vol. 1–13 )
– Toynbee A. J. ; London, 1956–60

---

## प्रकरण ६ वे

# सामाजिक-सांस्कृतिक गतिनियम

### सर्वव्यापी इतिहास :

पहिल्या प्रकरणात सांगितल्याप्रमाणे मानवाचा इतिहास म्हणजे पूर्ण अर्थाने भूतकाळात मनुष्यसमाजाच्या जीवनात जे जे घडले त्या सर्वांची समग्र कथा असेच धरले पाहिजे. इतिहासकार एखादा विशिष्ट कालखंड आणि विशिष्ट भूभाग निवडून घेतात आणि त्याप्रमाणे इतिहास सांगावयास सज्ज होतात. 'एकोणिसाव्या शतकातील यूरोप' ह्यात एका विशिष्ट शंभर वर्षांच्या काळाचा आणि पृथ्वीवरील यूरोप नावाच्या एका खंडात घडलेल्या घटनांचाच तेवढा इतिहास सांगावयाचा आहे हे स्पष्ट झाले.

पण इतिहासकार स्वतःवर एवढ्याच मर्यादा घालून घेऊन थांबत नाहीत. पुढे त्या भूभागातील आणि त्या कालखंडापुरताही माणसाच्या समग्र जीवनाचा इतिहास देण्याऐवजी तेथील राज्यसंस्थेचा, राजकीय इतिहासातील घडामोडींचाच तेवढा इतिहास आम्ही देऊ अशी भूमिका घेतात. आणि बहुधा अशी भूमिका स्पष्ट न करता 'इतिहास' असा व्यापक शब्द वापरतात, पण सांगतात फक्त राजकीय इतिहासच. एकोणिसाव्या शतकापासून ह्याविरुद्ध जोरात आवाज उठू लागला. अर्थात त्यापूर्वी व्यापक इतिहासकथनाची कुणाला कल्पनाच नव्हती असा मात्र अर्थ नव्हे. ग्रीसमध्ये हेरोडोटस ह्या आद्य इतिहासकारालाही इतिहास किती अंगांनी पाहिला पाहिजे ह्याची जाणीव होती. पुढच्या काळात जगाच्या निरनिराळ्या भागातील कित्येक इतिहासकारांनी ती दृष्टी ठेवलेली दिसून येईल. मात्र ह्याचबरोबर इतिहास म्हणजे राजवाड्यातील हालचाली, राजेराण्यांच्या भानगडी, गुप्त कट, सत्तांतरे आणि लढाया ह्यांच्याच तपशीलवार हकीकती – ह्यापलीकडे काहीही नाही– असे मानणारे इतिहासकार आजही आहेतच.

इतिहासाकडे पहाण्याची ही निराळी सामाजिक दृष्टी कोणत्या कारणांनी आली त्याच्या इतिहासात येथे शिरावयाचे नाही. ती दृष्टी देणारांनी इतिहासाचे जे नवे स्वरूप सांगितले ते लक्षात घेतले तरी पुरे. इतिहास म्हणजे सबंध समाजाचा इतिहास, राजघराण्याचा इतिहास नव्हे. इतिहास सर्व लोक मिळून प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे घडवीत असतात. सरकारी धोरणे आणि कायदे ह्यांच्याइतकेच किंवा त्याहूनही

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ७१९७२ वि: निबंध

अधिक महत्त्व लोकांच्या सवयी आणि चालीरीतींना असते. समाजाच्या प्रगतीचे मोजमाप एखाद्या लढाईतील विजयाने ठरवावयाचे नसते. अशा प्रकारचा हा दृष्टिकोन आहे. आता ह्या दृष्टीने इतिहास सांगितला तर त्याचे रंगरूप वेगळे होईल हे उघडच आहे. तो इतिहास अधिक वास्तव आणि मानवी जीवनातील घडामोडींची अधिक चांगली कल्पना देणारा असा होईल ह्यातही शंका नाही.

**समाजगतीचे नियम :**

परंतु प्रस्तुत ग्रंथाच्या विषयाचे अनुरोधाने महत्त्वाचे आहे ते वेगळेच. वरील-सारखी व्यापक इतिहासाची योजना देणारांनी प्रत्यक्ष नवीन इतिहास कोणते दिले किंवा त्यांच्या प्रेरणेने कोणते नवीन इतिहासग्रंथ निर्माण झाले ह्यापेक्षा इतिहासाचे, भूतकालीन मानवी व्यवहारांचे, जे निरनिराळे अर्थ त्यांनी लावून दिले त्यांची चिकित्सा झाली पाहिजे.

ऐतिहासिक घटनांच्या मागे देव, दैव किंवा काही वैश्विक योजना अथवा कालगती असते, इतिहास निरनिराळ्या मानवी वंशांच्या जन्मजात गुणांनी घडत असतो आणि भोवतालची नैसर्गिक परिस्थितीच विशिष्ट प्रकारचा इतिहास निर्माण करीत असते ही मते आपण तपासली आहेत आणि तशासारखे कोणतेही सिद्धान्त बांधता येत नाहीत असे पाहिले आहे.

आता गेल्या सुमारे शंभर वर्षांच्या काळात वरीलसारख्या सामाजिक दृष्टीच्या इतिहासकारांनी आणखी काही अगदी नवीन पद्धतींनी इतिहासातील नियमबद्धता दाखविण्याचा यत्न केला आहे. मानवी समाज गतिमान आहे. तो समाज किंवा एखादा विशेष सामाजिक गट कुठून निघतो, कुठल्या अवस्थांतून जातो आणि शेवटी त्याचे काय होते ह्याचे संपूर्ण चित्र काही इतिहासभाष्यकार देतात. समाजाच्या गतीचे हे नियम ठरलेले आहेत. चाकोरी आधीच खणलेली आहे आणि काळाच्या रथाची चाके त्यातूनच बिनचूकपणे जाणार आहेत असे ते मानतात. ते नियम कुणी केले ? ती चाकोरी कुणी पाडून ठेवली ? अशा प्रश्नांना निरनिराळ्या भाष्यकारांची निर-निराळी उत्तरे आहेत. त्यांची चर्चा खाली येईलच. परंतु चालीची दिशा आणि वेग आधीच ठरलेली आहेत आणि घटना घडण्यापूर्वीच सांगता येण्यासारखी आहेत हे सूत्र मात्र त्या सर्वांच्याच भाष्यातून दिसते. असे सिद्धान्त कोणत्या तऱ्हेने मांडले जातात आणि ते कितपत पटण्यासारखे आहेत हे आता पहावयाचे आहे. अर्थात ह्या ठिकाणी ह्या पंथाचा संपूर्ण ऐतिहासिक आढावा घ्यावयाचा नाही. अशा तऱ्हेने विचार मांडणारांपैकी काही ठळक भाष्यकारांचे सिद्धान्त लक्षात घेऊन त्यांची समीक्षा केली तरी सामाजिक गतिनियम सांगणारांच्या पद्धती काय असतात आणि

इतिहासाचा अर्थ उलगडण्याचे दृष्टीने त्याचा काय उपयोग होऊ शकेल ह्याची कल्पना येईल.

### व्हिकोचा दृष्टिकोन :

समाजशास्त्रीयदृष्टचा इतिहासाचा अर्थ उलगडण्याचा पहिला प्रयत्न दोन अडीचशे वर्षांपूर्वीच झाला. त्याहीपूर्वी तशा प्रकारच्या काही कल्पना अगदी प्राचीन ग्रीक आणि भारतीय इतिहासकारांच्या लेखनातूनही आढळतील. परंतु पहिला पद्धतशीर प्रयत्न म्हणून इटालियन इतिहासकार व्हिको ह्याच्या १७२५ साली प्रसिद्ध झालेल्या 'न्यू सायन्स' ह्या पुस्तकाचाच उल्लेख करावा लागेल. व्हिको हा फार सूक्ष्म आणि शोधक बुद्धीने लिहिणारा इतिहासकार झाला. त्याच्या कालातील इतिहास-लेखनविषयक अनेक चुकीच्या कल्पनांवर आणि भ्रामक आग्रहांवर त्याने टीका केली. भूतकालाविषयी लिहिताना जे जे पूर्वी होऊन गेले ते ते सारे भव्य, दिव्य, उज्वल असे दाखविण्याची जी प्रवृत्ती असते ती व्हिकोला मान्य नव्हती. भूतकालातही सर्व प्रकारचे दारिद्रय दिसू शकेल असे त्याने प्रतिपादिले. विशेषतः स्वराष्ट्राविषयी लिहि-ताना आपल्या राष्ट्राविषयी पक्षपाती भूमिका घेऊन तेथील भूतकालाचा अवास्तव बडेजाव माजविण्याचा मोह इतिहासकारांना होत असतो. हे अयोग्य आहे असे व्हिकोने स्पष्ट बजावले. सांस्कृतिक इतिहास लिहिताना होणाऱ्या अनेक गफलती त्याने दाखवून दिल्या. पुष्कळदा अमुक कल्पना किंवा अमुक शोध ह्या लोकांनी त्या लोकांपासून उचलले अशासारखी विधाने व्हिकोला मान्य नसत. अनेक बाबतीत कितीतरी कल्पना व शोध निरनिराळ्या ठिकाणी स्वतंत्रपणे येऊ शकतात असा विचार त्याने मांडला. पौराणिक किंवा पारंपरिक इतिहासात आणि दंतकथात ऐतिहासिक माहिती असू शकते आणि ती नीट पारखून घेऊन त्यांचा योग्य तो उपयोग झाला पाहिजे अशा तऱ्हेचे इतिहासरचनेला उपयुक्त असे कितीतरी नवीन विचार त्याने दिले. व्हिकोचे हे कार्य इतिहासलेखनाच्या इतिहासात मान्य झाले आहे.

परंतु आपल्या विषयाचे दृष्टीने ह्या ठिकाणी महत्त्वाचा आहे तो त्याचा इति-हासाच्या प्रवाहाविषयीचा दृष्टिकोन. ह्याबाबत व्हिकोच्या कल्पना अगदी नवीन होत्या. इतिहासाचे ज्ञान म्हणजे संपूर्ण भूतकालाचे समग्र ज्ञान. ते माणसाला होऊ शकते असे तो म्हणे. व्हिकोच्या विचारसरणीप्रमाणे निसर्गाचे ज्ञान माणसाला होणार नाही, कारण निसर्ग ही परमेश्वराची निर्मिती आहे. पण मानवी इतिहास हे माणसाचे कर्तृत्व आहे, ती माणसाची निर्मिती आहे आणि म्हणून तो इतिहास माणसाला पूर्णपणे उलगडेल. म्हणजे त्याच्या मते एखादी गोष्ट त्याच्या निर्मात्यालाच समजते किंवा निर्माण केलेली असल्यास ती समजण्यात काहीही अडचण येत नाही.

व्हिकोला, तो एक माणूस असल्यामुळे, इतिहासाचा अर्थ साकल्याने लागतो आहे. तो अर्थ सांगताना व्हिकोने प्रथमतः जी भूमिका घेतली ती अशी की, इतिहास म्हणजे माणसांनी निर्माण केलेल्या सर्वच सामाजिक संस्थाचा इतिहास. समाजाने निर्माण केलेली शासनसंस्था, भाषा, समाजाच्या चालीरीती, समाजाचा धर्म, आणि कायदा ह्या सर्वांमिळून त्या समाजाचा इतिहास घडत असतो. व्हिकोचे हे म्हणणे निश्चितपणे इतिहासासंबंधी नवी व्यापक दृष्टी देणारे असे आहे. इतिहास म्हणजे निव्वळ राजवाडयातील उलाढाली असे न समजता तो समाजजीवनाच्या सर्व अंगांचा इतिहास आहे हे लक्षात घेण्याविषयीचा व्हिकोचा आग्रह प्रागतिक स्वरूपाचा आहे ह्यात शंका नाही.

माणसाचा इतिहास माणसाला कळू शकेल आणि इतिहास म्हणजे समाजाच्या समग्र जीवनाचा आढावा अशासारख्या भूमिका घेऊन व्हिकोला पुढे प्रत्यक्षात तो इतिहास कसा दिसला ? त्याला मानवी इतिहासाच्या निश्चित अशा अवस्था दिसल्या. प्रत्येक संस्कृति विशेषतः आणि सर्व मानवसमाज साधारणतः त्या ठराविक अवस्थांतून जात असतो. पहिल्या अवस्थेत आवश्यकता म्हणून माणसे काही गोष्टी निर्माण करतात. सर्व गरजा भागल्या की थोडी सुखाकडे प्रवृत्ती होते. थोडा सुखोपभोग मिळाला की समाज चैनी बनतो. त्या चैनीतून अनाचार उद्भवतात, माणसे धुंद आणि वेडी बनतात आणि त्यातून ज्या कृती होतात त्यांची परिणती विनाशातच होते. इतिहासाचे काही मुख्य टप्पे किंवा मुख्य वळणेही व्हिकोने दाखविली आहेत. देवयुग, वीरयुग, आणि लोकयुग असे मोठे कालखण्डही तो कल्पितो. प्रत्येक कालखंडाची वैशिष्टये सांगतो. व्हिकोचे म्हणणे असे की, ह्या अवस्थांचे पूर्ण ज्ञान असल्याखेरीज कोणत्याही संस्कृतीचा इतिहास समजू शकणार नाही. ग्रीकच्या इतिहासातील होमरचा काळ आणि मध्ययुगीन यूरोप ही दोन्ही दोन ठिकाणची वीरयुगे आहेत, इतिहासातील ह्या दोन ठिकाणच्या वर उल्लेखिलेल्या दोन कालखण्डातील इतिहासात संपूर्ण साम्य आढळते. ते साम्य व्हिकोने तपशीलवार दाखवून दिले आहे.

## व्हिकोच्या भूमिकेची चिकित्सा :

व्हिकोने सांगितलेल्या इतिहासाच्या सर्व तपशीलात शिरावयास येथे अवकाश नाही परंतु होमरकालीन ग्रीसमधील जीवन आणि मध्ययुगीन युरोपातील सरंजामशाहीतील जीवन ह्या दोहोंची आर्थिक बैठक इतकी वेगळी आहे आणि ह्या दोन कालात जीवनाविषयी वाङ्मयातून व्यक्त झालेल्या कल्पना इतक्या निराळ्या दिसतात की, हे दोन कालखण्ड काही समान धर्म दाखवितात असे का मानावे तेच समजत नाही. व्हिकोने निर्माण केलेले असे कालखण्ड आणि अशा समान अवस्था इतिहासातील सर्व घटना तपासून पहाता टिकणार नाहीत अशी त्याला स्वतःलाही

जाणीव असावी, कारण एके ठिकाणी तो म्हणतो की, समाज जेव्हा अनाचार आणि विनाश ह्या अवस्थेला पोहोचतो तेव्हा कधी असे होते की भवितव्यता त्याला सावरायला धावते. कधी ऑगस्टससारखा एखादा समर्थ सम्राट गादीवर आणून किंवा संकटातून तारणारी अशी एखादी परकी सत्ता लादून भवितव्यतेद्वारा तो समाज तारला जातो. आता ह्याचा अर्थ काय करावयाचा ? भवितव्यता म्हणजे काय ? परमेश्वर का ? तसे असेल तर सर्व काही तो ईश्वर करतो किंवा करवितो, माणसांनी उगाच कसली गडबड करू नये किंवा कशावर विचारही करू नये असे पूर्ण देवनिष्ठ तत्त्वज्ञान का स्वीकारू नये ? व्हिकोला भवितव्यता म्हणजे देव असाच अर्थ अभिप्रेत नव्हता. भवितव्यता हीसुद्धा समाजाच्या जीवनाचा जो एक निश्चित असा गतिमार्ग आहे, त्याचाच एक भाग आहे असे तो म्हणतो. पण म्हणजेच हे सर्व तर्कदुष्ट होत आहे. समाजाच्या गतीची दिशा जर पक्की ठरली आहे, होणाऱ्या गोष्टी जर नक्की होणार आहेत, त्या अटळ आहेत तर त्या रोखणारी ही भवितव्यता कोण ? त्या गतीचाच ती एक भाग आहे म्हणजे काय ? तसे असेल तर मग तो भाग गृहीत धरून इतिहासाच्या योजनेचे अगदी निराळे असे विवरण का होऊ नये ? व्हिकोच्या इतिहासभाष्यातून ह्या प्रश्नांची उत्तरे मिळणार नाहीत.

प्रत्यक्ष इतिहासही व्हिकोने वर्णिलेल्या अवस्था दाखवित नाही. कित्येक रानटी समाज अजूनही जीवनाला आवश्यक तेवढ्याच गोष्टी मिळवीत आजतागायत त्या गरजेच्या अवस्थेत राहिलेल्या आहेत. व्हिको म्हणतो त्याप्रमाणे सुख, चैन, अनाचार, आणि विनाश अशा सर्व प्रकारातून त्या जमाती जायलाच तयार नाहीत. अर्वाचीन पाश्चिमात्य संस्कृती औद्योगिक क्रांतीनंतर थोड्याच काळात चैनीच्या अवस्थेला आली. पण तिची चैन चालूच आहे. ह्या चैनीतून विनाश निघणार आहे अशी लक्षणे कुठे दिसत आहेत ? अनेक संस्कृती चैन, अनाचार वगैरे अवस्था येण्यापूर्वीच निसर्गनिर्मित किंवा मानवनिर्मित अशा महापूर, युद्ध, दुष्काळ वगैरेसारख्या आपत्तींनी गारद झाल्या. त्यांना सगळ्या अवस्थांतून फिरवून आणण्याची जबाबदारी व्हिकोला किंवा भवितव्यतेला कुणालाच पेलणारी नव्हती, तेव्हा प्रत्यक्ष भूतकालाचे अवलोकन केले की, व्हिकोचा अवस्थाबद्ध असा इतिहास मान्य करता येणे शक्य नाही हे उघड आहे. व्हिकोने इतिहासाकडे पहाण्याची सामाजिक दृष्टी दिली हे खरे. पण समाजाच्या प्रगतीची जी एक नियमबद्धता सांगण्याचा प्रयत्न त्याने केला तो मात्र प्रत्यक्ष इतिहासाला किंवा तर्काला धरून नाही.

**स्पेंग्लरचा सिद्धान्त :**

व्हिकोनंतर जवळ जवळ दोनशे वर्षांनी , पहिल्या महायुद्धाच्या काळात स्पेंग्लर ह्या जर्मन विचारवंताने मानवी समाजाच्या –किंवा समाजांच्या– त्याच्या काळापर्यंतच्या

भूतकालाची पहाणी करून काही निष्कर्ष काढले. त्याचे सगळे निष्कर्ष एकाच सर्वव्यापी सूत्रात बसविता येतात. ते सूत्र समाजाचा भूतकाल, वर्तमानकाल आणि भविष्यकालही सांगते. आपल्या " द डिक्लाइन ऑफ द वेस्ट " ह्या पुस्तकात सुरुवातीलाच तो म्हणतो की, मानवाच्या भावी इतिहासाचे, पुढे घडणाऱ्या बारीकसारीक गोष्टींचे खडान् खडा भाकीत वर्तविणे शक्य आहे आणि ते मीच प्रथम करणार आहे. अर्थात ह्या क्षेत्रातील आपणच पहिले फलज्योतिषी आहोत हा त्याचा दावा बरोबर नाही. ग्रीक इतिहासकारांपासून अनेकांनी त्याच्यापूर्वी हा भविष्यकथनाचा उद्योग केलेला आहे, तरी पण इतिहास म्हणजे समाजाचा इतिहास, समाज स्वतः घडवीत असलेला आणि समाज तो काही दृढ अशा नियमानुसार बनवीत असलेला इतिहास अशी भूमिका घेऊन सबंध समाजाची भविष्यकुंडली मांडण्याचा प्रयत्न करणारा स्पेंग्लर हा पहिला इतिहासकार आहे हे निदान काहीअंशी खरे मानण्यास हरकत नाही.

प्रथमतः म्हणजे स्पेंग्लर सबंध मानवी समाजाला एक आणि एकच इतिहास आहे असे धरीत नाही. प्राचीन ईजिप्तपासून तर आधुनिक पाश्चिमात्य संस्कृतीपर्यंत आठ निरनिराळ्या संस्कृती तो मानतो. ह्या सर्व संस्कृती एकमेकींपासून अगदी भिन्न आहेत. त्यांची शरीरेही वेगळी आहेत आणि त्यांचे आत्मेही स्वतंत्र आहेत. प्रत्येक संस्कृतीची विशिष्ट अशी जीवनपद्धती आहे. त्या त्या संस्कृतीच्या जीवनसाधनात, जीवनतत्त्वज्ञानात, सत्यसृष्टीत आणि कल्पनासृष्टीत तो तो वेगळा छाप स्पष्ट दिसतो. एका संस्कृतीतील माणसाला दुसरीतील जीवन कधीच समजणार नाही असे तो म्हणतो. मात्र गंमत अशी की तो स्वतः एका विशिष्ट संस्कृतीत वाढलेला असूनही इतर सात संस्कृतींचा समग्र आढावा घ्यायला सज्ज होतोच !

सर्व संस्कृती एकमेकींहून अगदी निराळ्या असल्या तरी प्रत्येक संस्कृतीचा जीवनमार्ग एकच आहे आणि तो निश्चितही आहे. ह्या आठ संस्कृती म्हणजे आठ पुरुषच आहेत. मानवी जीवनात ज्या अवस्था असतात त्या वरील प्रत्येक संस्कृतिपुरुषाच्या जीवनात अनिवार्यपणे येतात. ह्या अवस्थांतून जाणे प्रत्येक संस्कृतीला भागच आहे. ते चुकविता येणार नाही. ह्या अवस्था हुबेहुब माणसाच्या शरीरधर्मासारख्याच आहेत. प्रत्येक मानवी शरीर ज्याप्रमाणे जन्म, बाल्य, तारुण्य, प्रौढत्व, वार्धक्य आणि मृत्यू ह्या अवस्थांतून जाते त्याच प्रकारे प्रत्येक संस्कृतीला आपला जीवनमार्ग आखावा लागतो. माणसाचे आयुष्य काही पाऊणशे शंभर वर्षांचे असेल तसे संस्कृतीचे आयुष्यमानही ठरलेले आहे. प्रत्येक संस्कृती सुमारे हजार वर्षे जगून प्राणोत्क्रमण करते. मानवी आयुष्यात बालपणाची वागणूक, तारुण्यातील वर्तन, प्रौढत्वातील मनोवृत्ती आणि वार्धक्यातील स्थिती ह्या गोष्टी स्पष्ट दिसतात आणि

पटतात. संस्कृतीच्या आयुष्यक्रमातही बालसुलभ उत्साह, तारुण्यातील कर्तृत्व, प्रौढावस्थेतील संयम आणि वृद्धावस्थेतील थंडपणा असे सर्व प्रकार दाखविता येतात, आणि अेखाद्या विशिष्ट कालाची अवस्था पाहून ती बाल्याची खूण आहे की प्रौढत्वाची खूण आहे हे ठरवून साधारणतः ती संस्कृती केव्हा गतप्राण होईल ह्याचे गणितही मांडता येते. उदाहरणार्थ, जेव्हा नैसर्गिक अशा आपल्या समाजाच्या किंवा राष्ट्राच्या अभिमानाचे जागी मानवी एकता किंवा आंतरराष्ट्रीयत्व अशा कल्पना येऊन त्यांची पकड बसते, जेव्हा काळजाला पटणाऱ्या श्रद्धेच्या धर्माचे जागी शास्त्रशुद्ध अधर्म येतो, जेव्हा कष्टाने हक्क संपादून ते भोगण्याच्या ईर्षे-ऐवजी नैसर्गिक हक्कांची ओरड सुरू होते आणि जेव्हा स्त्रीकडे माता म्हणून पहाण्याऐवजी कामिनी म्हणून नजर वळते त्यावेळी म्हणजे ह्या सर्व आणि अशा इतर अनेक खुणा पटतात त्यावेळी ( आपल्या प्राचीन पुराणातून कलियुगात माणसांची बुद्धी कशी फिरते आणि ती कशी बेतालपणे वागू लागतात ह्याचे जे रसभरीत वर्णन आहे ते स्पेंग्लरच्या ह्या कल्पनांशी ताडून पहाणे मोठे मनोरंजक होईल ) ही संस्कृती अधोगतीला लागली आहे, तो संस्कृतीपुरुष शेवटचे श्वास घेतो आहे असे खास समजावे.

स्पेंग्लर कोणतीही शास्त्रीय पद्धती मानीत नाही, मानवी इतिहास समजून घेण्यासाठी शास्त्राचा उपयोग नाही असे तो स्पष्टपणे सांगतो. मानवाचा इतिहास उपमेने, तुलनेनेच उलगडावा लागेल आणि शरीर आणि मानवी इतिहास ह्यातील साम्य, हे एक त्रिकालाबाधित सत्य आहे असा त्याचा आग्रह आहे.

## स्पेंग्लरच्या सिद्धान्ताचे समीक्षण :

आता ह्या ज्या अवस्था स्पेंग्लरने सांगितल्या आणि प्रत्येक संस्कृतीला त्या अवस्थातून त्याच निश्चित पद्धतीने गेले पाहिजे असा जो सिद्धान्त त्याने मांडला त्याबाबत प्रथम असे विचारता यईल की, हे असे का घडते ? प्रत्येक संस्कृतीने ह्याच पद्धतीने जगले आणि मेले पाहिजे हे कोणी ठरवले ? स्पेंग्लर आपल्या विवेचनात परमेश्वर आणीत नाही. परंतु माणसांचा इतिहास माणसांच्या हाती आहे असेही त्याला मान्य नाही. मानवी इतिहास ही देवाच्या आणि माणसाच्या दोघांच्याही शक्तीपलीकडची गोष्ट आहे. तो इतिहास नियमाचा गुलाम आहे. त्या गूढ अशा नियमानुसारच इतिहास घडणार पण हा नियम कोठून आला ? कोणी दिला ? ह्याचे स्वच्छ उत्तर स्पेंग्लरजवळ नाही.

पण ह्याबाबत एक असे म्हणता यईल की, शेकडो हजारो वर्षांच्या प्रत्यक्ष इतिहासावरून जर एखादा नियम निघत असेल तर तो कोणी केला, का केला अशा

मूलभूत प्रश्नांच्या भानगडीत न पडतासुद्धा तो मानावयास हरकत नसावी अशी भूमिका घ्यायला हरकत नाही. परंतु मग लगेच पुढचा प्रश्न असा की, प्रत्यक्ष इतिहासावरून तसा नियम दिसतो काय ?

स्पेंग्लरने कल्पिलेल्या आठ संस्कृती घेतल्या आणि त्यांचे इतिहास वरवर जरी पाहिले तरी स्पेंग्लरचा सिद्धान्त कुठेच प्रत्ययास येत नाही. प्राचीन भारताची संस्कृती तीनचार हजार वर्षे तरी बव्हंशी भारतीय अशा स्वरूपात टिकली. आजही तिच्यातले भारतीयत्व अगदीच गेले आहे असे नाही. प्राचीन चीनच्या संस्कृतीविषयीही हेच म्हणता येईल. आणि त्याचप्रमाणे अर्वाचीन पाश्चिमात्य संस्कृती कोणत्या ना कोणत्या स्वरूपात निदान गेली हजार वर्षे तरी अस्तित्वात आहे, आणि ती मरणाच्या पंथाला लागली आहे असे मुळीच दिसत नाही. संस्कृतीच्या अवनतीच्या म्हणून ज्या खुणा स्पेंग्लर सांगतो त्याही त्या स्वरूपात मान्य करणे अशक्य आहे. राष्ट्रीयत्वाच्या जागी आंतरराष्ट्रीयत्व येणे हे लक्षण परागतीचे की प्रगतीचे ? साधा भोळा विश्वास जाऊन त्याजागी शास्त्रीय चिकित्सा आली तर माणसाची प्रगतीच होणार नाही काय ? मानवजातीची सध्याची सर्वांगीण भरभराट ही तार्किक, शास्त्रीय विचारसरणीतूनच झालेली नाही काय ? संस्कृतीच्या एका अवस्थेत स्त्रीकडे माता म्हणून पाहिले जाते आणि दुसऱ्या अवस्थेत कामिनी म्हणून पाहिले जाते अशी सर्वसाधारण विधाने करणेही बरोबर नाही. समाजातील स्त्रीच्या स्थानाबद्दल समाजाची मते बदलत आली आहेत, बदलत जातील; परंतु माता आणि कामिनी ह्या दोन्ही भूमिका स्त्रीला कराव्या लागतात आणि त्या दोन्ही भूमिकांची, संस्कृती कोणत्याही अवस्थेला असली तरी, पुरुषाला जाणीव रहाणारच.

प्रत्येक संस्कृतीचे शरीर वेगळे असते आणि आत्माही वेगळा असतो हाही विचार पटणारा नाही. मानवजातीच्या अगदी प्रारंभीच्या इतिहासापासून आजतागायत सांस्कृतिक देवाण घेवाण एवढी झालेली आहे आणि एवढी होत आहे की, स्पेंग्लरने कल्पिलेल्या आठ संस्कृती म्हणजे आठ अगदी स्वतंत्र एकेमेकांची ओळखही नसणारी अशी माणसे आहेत हे पटू शकणार नाही. कित्येक मूलभूत गोष्टी सर्व संस्कृतीमधून सारख्याच दिसतील, आणि म्हणूनच लैला-मजनूची प्रेमकथा भारतात समजू शकते, दुष्यंत-शकुंतलेच्या प्रेमाचा उलगडा जर्मनांना होऊ शकतो आणि रोमिओ आणि ज्यूलियट ह्यांच्यातील प्रणयभावना आफ्रिकेतील नीग्रोनाही कळते. साहित्य, चित्रकला, तत्त्वज्ञान इत्यादी अनेक क्षेत्रात निरनिराळ्या संस्कृतीतून किती तरी समान आविष्कार दिसतात. ह्या गोष्टी उघड उघड दिसणाऱ्या अशा असूनही स्पेंग्लर म्हणत राहिला की, एका संस्कृतीचे मन दुसऱ्या संस्कृतीहून सर्वस्वी वेगळे असते. साहित्य आणि कलाच नव्हे तर स्पेंग्लरच्या म्हणण्याप्रमाणे एका संस्कृतीचे गणितशास्त्रही दुसऱ्या संस्कृतीच्या

गणितशास्त्राहून वेगळे मानले पाहिजे. संस्कृतीची ही भिन्नता दाखविण्यासाठी स्पेंग्लरने प्रत्यक्ष ऐतिहासिक सत्यांचा कसा चुराडा केला ह्याचे एकच उदाहरण घेतले तरी पुरे. त्याच्या मते प्राचीन ईजिप्तच्या संस्कृतीचे वैशिष्टच म्हणजे तेथील लोकांचा कालविषयक दृष्टिकोन. काल हा ईजिप्तच्या लोकांच्या दृष्टीने फार महत्त्वाचा आणि तो जिंकला पाहिजे अशी त्यांची ईर्षा आहे. ती इतरत्र कोठे दिसणार नाही. उदाहरणार्थ ग्रीक-रोमन संस्कृतीत ही कालदृष्टी अजिबात नाही. म्हणूनच स्पेंग्लर म्हणतो ईजिप्तमध्ये जशी पिरॅमिडच्या रूपाने व अन्य प्रकारे असंख्य थडगी दिसतात तशी रोममध्ये आढळणार नाहीत. आता हे धादांत खोटे आहे. रोमन सम्राट हॅड्रीयन ह्याचे थडगे शतकानुशतके पोपचा एक किल्ला होऊन राहिलेले होते. रोम शहराबाहेरच्या रस्त्यांच्या बाजूंनी जेवढ्या थडग्यांच्या रांगाच रांगा आहेत अशा जगात दुसरीकडे आढळणार नाहीत. ह्या उदाहरणावरून लक्षात येईल की स्पेंग्लरने इतिहासावरून आपला सिद्धान्त बांधला नाही तर आधी सिद्धान्त बांधून त्याच्या समर्थनासाठी खरा खोटा हवा तसा इतिहास सांगितला. तेव्हा स्पेंग्लरने सबंध समाजाचा इतिहास समग्रपणे पहाण्याची दृष्टी दिली असली तरी एका दृढ अशा समाजगतीच्या नियमात सर्व इतिहास बसविण्याचा जो प्रयत्न त्याने केला आहे तो हास्यास्पद आहे. तर्काच्या आणि प्रत्यक्ष ऐतिहासिक घटनांच्या कसोटीला तो टिकणारा नाही.

## टॉयन्बीचे भाष्य :

सुप्रसिद्ध इंग्रज इतिहासकार टॉयन्बी ह्याने १९३४ ते १९५४ ह्या काळात "ए स्टडी ऑफ हिस्टरी" हा आपला प्रचंड ग्रंथ बारा खंडात लिहून प्रसिद्ध केला. त्याच्या ह्या व इतर काही पुस्तकातील निवेदनावरून असे दिसते की टॉयन्बीला इतिहासप्रवाहाविषयीचे कोणतेही सर्वसाधारण नियम काढावयाचे नाहीत. इतिहासाची पुनरावृत्ती होते आणि झालीच पाहिजे असा आग्रहही त्याला धरावयाचा नाही. इतिहासात आधी सांगता येणार नाहीत आणि ठरविता येणार नाहीत अशा घटना घडतात असेही मानायला तो तयार आहे असे दिसते.

परंतु टॉयन्बीने आपल्या बारा खंडातून आणि इतर काही पुस्तकांतून गेल्या हजारो वर्षांच्या मानवी इतिहासाचा जो आढावा घेतला आणि त्याचे जे विश्लेषण केले ते वाचले म्हणजे वरील परिच्छेदात दिलेले टॉयन्बीचे स्वतःच्या भूमिकेविषयीचे निवेदन अगदी चुकीचे दिसते. टॉयन्बी सांगत असलेली स्वतःची भूमिका आणि त्याच्या इतिहासभाष्यात त्याने प्रत्यक्ष केलेली समीक्षा ह्यातील तफावत पाहिली म्हणजे टॉयन्बीमधे अप्रामाणिकपणा नसला तरी गोंधळ मात्र खास आहे असे म्हणावे लागते.

मानवी इतिहासाचा आढावा घेताना टॉयन्बी प्रथम जगाच्या इतिहासात एकवीस समाज किंवा संस्कृती होऊन गेल्या असे कल्पितो. स्पेंग्लरच्या आठ संस्कृती होत्या, ती संख्या टॉयन्बीच्या इतिहासदर्शनात वाढली आहे. अशा एकवीस संस्कृती कल्पून पुढे प्रत्येक संस्कृतीचा इतिहास कसा घडत जातो हे त्याने तपशीलवार दाखविले आहे, प्राचीन रानटी अवस्थेतून बाहेर पडून एखादा संस्कृती असलेला समाज कसा निर्माण होतो ? ह्या ठिकाणी टॉयन्बीने आधी ह्या प्रश्नाच्या चुकीच्या उत्तरांचा समाचार घेतला. जन्मजात वांशिक गुणामुळे किंवा भोवतालच्या नैसर्गिक, भौगोलिक परिस्थितीमुळे आपोआप हा बदल घडतो अशासारखे विचार त्याने पुष्कळ प्रमाणे देऊन खोडून काढले आणि मग स्वतःचा सिद्धान्त दिला. त्याचा सिद्धान्त असा की, नैसर्गिक परिस्थिती, आणि कधी मानवनिर्मित परिस्थितीही एखाद्या समाजाला काही आव्हान देते. ते आव्हान तो समाज स्वीकारतो आणि त्या आव्हानास उत्तर म्हणून टिकून रहाण्यासाठी आणि प्रगती साधण्यासाठी तो समाज जे कर्तृत्व दाखवितो ती त्याची संस्कृती.

अशा तऱ्हेने संस्कृती अस्तित्वात आल्यानंतर तिची स्वतःची अशी काही जीवनपद्धती तयार होते. ती इतर कोणत्याही संस्कृतीपेक्षा वेगळी असते. हाही विचार अर्थातच स्पेंग्लरच्या विश्लेषणासारखाच दिसतो. तपशीलात फरक आहेत एवढेच. वरीलप्रमाणे निर्माण झालेली प्रत्येक संस्कृती काही आपत्तीतून, संघर्षातून पुढे जाते. काही एका मर्यादेपर्यंत ती प्रगती करते आणि मग तिच्या अधोगतीला सुरुवात होते. एक सर्वंकष असे राज्य आणि एक सर्वव्यापी असा धर्म प्रत्येक संस्कृती तयार करीत असते. परंतु हे दीर्घ काल टिकत नाही. संस्कृतीचे विघटन सुरू होते. कधी त्या संस्कृतीच्या क्षेत्रातील जनतेच्या अंतर्गत बंडाळीमुळे तर कधी बाहेरील रानटी आक्रमणामुळे हे विघटन घडेल, परंतु विघटन आणि त्याच्यानंतरचा नाश चुकविता येणार नाही. टॉयन्बीने कल्पिलेल्या एकवीसपैकी एकवीसच्या एकवीस संस्कृतींना अशा अवस्थांमधून जावे लागले आहे. प्रत्येक संस्कृती वेगळी असेल परंतु सर्व संस्कृतींच्या जीवनेतिहासात विलक्षण समानता टॉयन्बीला दिसते. स्पेंग्लरने आठ संस्कृतीच्या संदर्भात ह्याहून पुष्कळ दृढ शब्दात परंतु हेच म्हटले होते, हे सजह लक्षात येण्यासारखे आहे.

## टॉयन्बीच्या इतिहासभाष्याची चिकित्सा :

आता टॉयन्बीने ज्या एकवीस संस्कृती गृहीत धरल्या त्या म्हणजे खरोखरी एकवीस स्वतंत्र जीवनपद्धतींचे, एकमेकींहून सर्वस्वी वेगळ्या अशा जीवनपद्धतींचे नमुने आहेत काय ? जगाच्या इतिहासाकडे पाहून त्याचे सर्व तपशील लक्षात घेऊन

बरोबर एकवीस सांस्कृतिक गट पडतात असे दाखवता येईल काय ? टॉयन्बीने एकवीस कोनाडे घेतले आणि हाताशी असलेल्या किंवा मुद्दाम निवडून घेतलेल्या माहितीचे एकवीस भाग पाडून एकेका कोनाडयात एक एक भाग ठेवून दिला. एखाद्या कार्यालयात सोयीसाठी जशा फायली करतात तशाच प्रकारचे हे मानवी इतिहासाचे "फायलिंग" आहे. कार्यालयात 'अ' नावाच्या माणसाची फाईल असते त्यात 'अ' विषयीचे पुष्कळ कागद असतात परंतु सर्वच असतील असे नाही. 'अ' ज्या विशिष्ट कार्याशी संबंधित असतो त्या कार्याबद्दलची विषयवारीने तयार केलेली दुसरी फाईल असेल. 'अ' चे काम समजण्यासाठी ती दुसरी आणि इतर कित्येक 'अ' नावाच्या नसलेल्या फायली पहाव्या लागतील. आणि कोणत्याही फायलीत सापडणार नाहीत अशीही 'अ' ची पुष्कळ कृत्ये असतील. तेव्हा कार्यालयातील ह्या फायली जशा कृत्रिम असतात आणि संपूर्ण सत्य समजण्याचे दृष्टीने अपुऱ्या असतात तसेच टॉयन्बीने निर्माण केलेले हे संस्कृतीचे कप्पेही वाटतात. उदाहरणार्थ, टॉयन्बीच्या एकवीस संस्कृतींमध्ये भारतीय (Indic) आणि हिंदू अशा दोन संस्कृती कल्पिलेल्या आहेत. त्याचे मते गुप्तपूर्वकालीन संस्कृती आणि गुप्तोत्तर संस्कृती ह्या दोन वेगळया आहेत. वस्तुतः वेदकालापासून मुसलमानी आक्रमणापर्यंतचा भारताचा इतिहास इतका गुंतागुंतीचा आहे आणि एक कालखण्ड दुसऱ्या कालखण्डात अशा तऱ्हेने शिरलेला आहे आणि मिसळलेला आहे की त्या इतिहासाचे असे खंड पाडणे अशक्यच आहे हे भारतीय इतिहासाच्या कोणत्याही विद्यार्थ्याच्या सहज लक्षात येईल. परंतु आपण ठरविलेल्या एका विशिष्ट तऱ्हेने टॉयन्बीला आपल्या फायली तयार करावयाच्या असल्यामुळे भारतीय इतिहासातील तपशिलांकडे त्याने पूर्ण दुर्लक्ष केले आहे. प्राचीन ग्रीस, रोम इत्यादी संस्कृतींचे इतिहासही टॉयन्बीने असेच भोळेपणाने किंवा जाणूनबुजून विकृत स्वरूपात दाखविले आहेत, हेही अनेक अभ्यासकांनी दाखवून दिले आहे. उदाहरणार्थ ग्रीसमध्ये ज्या काळात त्या संस्कृतीची अवनती सुरू झाली होती असे टॉयन्बी समजतो त्याच काळात तेथील लोकांनी अनेक क्षेत्रात अनेक प्रकारची अद्वितीय कर्तबगारी करून दाखविलेली आहे. आपल्या सिद्धान्तात बसविण्यासाठी टॉयन्बी , इलियड आणि ओडिसी ह्यांचा काळ सहा शतकांनी पुढे मानतो. ट्रॉय येथील उत्खननांविषयी संपूर्ण अज्ञान दाखवितो किंवा पांघरतो. ( The Intent of Toynbee's History पृ. ७५–९४ ) त्याने दिलेल्या एकवीस संस्कृतींच्या इतिहासातून एकवीसशे तरी चुकीचे तपशील विद्वानांनी दाखवून दिले आहेत. ते पाहता असे दिसते की, टॉयन्बीने संस्कृतीच्या उदयास्तांची काही एक चाल अगोदर बसविली आणि पुढे सोयीच्या पडतील

त्याप्रमाणे एकवीस संस्कृती निर्माण केल्या आणि त्या एकवीसांबाबत सोईस्कर तेवढेच तपशील दिले.

प्रत्यक्षात प्रत्येक संस्कृतीचा उदय आणि विकास कसा होतो हे दाखविण्यासाठी त्याने जी उदाहरणे घेतली आहेत तीही तपशीलात टिकणारी नाहीत. पीटर गेल याने दाखविलेले एकच उदाहरण घेतले तरी पुरे. आपला आव्हान आणि त्यास उत्तर हा पहिला नियम विस्तारपूर्वक स्पष्ट करण्यासाठी टॉयन्बीने हॉलंडचे उदाहरण घेतले. हॉलंडचा अभ्युदय होण्याचे टॉयन्बीचे मते खरे कारण हे की, हॉलंड हा समुद्रसपाटीखालचा देश असल्यामुळे तेथील लोकांना आक्रमक सागराविरुद्ध समर्थपणे उभे रहावे लागले. त्यातून त्यांना जो आत्मविश्वास आला आणि त्यांनी जो निर्धार दाखविला तेच हॉलंडच्या उज्वल इतिहासाचे रहस्य. परंतु गेलने दाखवून दिल्याप्रमाणे हॉलंडच्या प्रगतीला रोमनांसारख्या हॉलंडबाहेरील लोकांचा खूपच हातभार लागला आणि प्रत्यक्ष हॉलंडमध्ये ज्यांनी संस्कृती निर्माण करण्याचे सामर्थ्य दाखविले ते लोक सागराचे आक्रमण अनुभवणारे किनाऱ्यावरचे लोक नव्हते तर किनाऱ्यापासून खूप दूर आणि आत असलेले असे लोक होते. ह्याखेरीज हॉलंडच्या अभ्युदयात हॉलंडचे जे भौगोलिक स्थान आहे आणि त्यातून अनायसे जो लाभ होतो त्याचा विचारही टॉयन्बीने केला नाही. ( Theories of History पृ. ३१५-३१७.)

आपल्याला पाहिजेत तशा एकवीस संस्कृती कल्पून आणि त्यासंबंधी सोईस्कर असे ऐतिहासिक तपशील निवडून घेऊन टॉयन्बीने प्रत्येक संस्कृतीच्या उदय, विकास आणि अस्तासंबंधी काही एक सर्वत्र लागू पडणारे गणित मांडले. त्या गणिताविषयी त्याची इतकी खात्री होती की, आपल्या 'स्टडी ऑफ हिस्टरी' च्या सहाव्या खंडाच्या शेवटी कोणत्याही संस्कृतीच्या भविष्याची कुंडली मांडून दाखविणे शक्य आहे असा विश्वास त्याने प्रकट केला. प्रत्येक संस्कृतीचे आयुर्मान सुमारे आठशे वर्षे असते असाही त्याच्याकडे हिशेब होता. ह्या भूमिका त्याने पुढे पुढे थोड्या बदलत्या घेतल्या. पाश्चिमात्य संस्कृती सोळाव्या शतकापासून विनाशाकडे वाटचाल करीत आहे आणि विनाश अटळ आहे असा सूर त्याने काही काळ काढला. पण नंतरच्या काळात त्याला विनाश टाळण्याचा मार्ग दिसतो. तो मार्ग म्हणजे एक नवा धर्म, विश्वधर्म. संस्कृतीची प्रगती आणि अधोगती कशी होते हे आजवरच्या इतिहासावरून पक्के दिसते. सध्याच्या पाश्चिमात्य संस्कृतीविषयीही तसेच झाले असते. परंतु नव्या विश्वधर्माच्या विश्वासामुळे आपण तरू शकतो, दयाळू परमात्मा आपल्याला तारील असे अखिल मानवजातीला टॉयन्बी सांगतो. म्हणूनच पीटर गेलसारखे टीकाकार उपरोधाने पण स्पष्टपणे सांगतात की, टॉयन्बी हा इतिहासकार नाही, तो एक ईश्वराचा प्रतिनिधी

९५८६

आहे, प्रेषित आहे. त्याला वाटल्यास नमस्कार करावा परंतु त्याचे सामाजिक सांस्कृतिक इतिहासाचे स्पेंग्लरच्या पद्धतीचे तत्त्वज्ञान मात्र मानण्याचे कारण नाही. ( Encounters in History –पृ. ३०५ )

## सोरोकिनची इतिहासमीमांसा :

टॉयन्बीप्रमाणेच सोरोकिन ह्यानेही अलीकडच्या काळात मानवी इतिहासाचा– निरनिराळ्या प्रदेशातील सामाजिक जीवनाच्या स्थित्यंतरांचा– अभ्यास करून काही निष्कर्ष काढले. त्याच्या म्हणण्याप्रमाणे समाजाच्या जीवनात अशी एक अवस्था असते की, जेव्हा माणसे धार्मिक प्रवृत्तीची, आत्मिक आनंदाची आकांक्षा बाळगणारी, गूढवादी अशी असतात; परंतु अशा प्रकारचे जीवन आत्यंतिकतेने जगणे शक्य नाही. ह्या प्रकारच्या जीवनपद्धतीला मर्यादा आहे आणि ती गाठली की समाजाची संघ-शक्ती परिवर्तन घडवून आणते आणि समाज एक प्रकारच्या विकारी जीवनाकडे झुकतो. त्या विकारप्रधान जीवनपद्धतीत माणसे व्यवहारवादी बनतात. निरनिराळ्या नैसर्गिक, भौतिकशास्त्रांची कास धरून ती सुखोपभोगांच्या मागे लागतात, भोगमय जीवनाचा अतिरेक होतो, त्याचे अपरिहार्य असे वाईट परिणाम जाणवू लागतात आणि समाजजीवनाची मूल्ये आणि आचार ह्यात पुन्हा परिवर्तन होऊन ऐहिक जीवनातील भोगलालसा कमी होते आणि माणसे आत्मिक आनंदाचा आणि अध्यात्मिक सत्यांचा अनुभव घेऊ लागतात. ह्या दोन टोकांच्या मध्ये काही अंशी आधिभौतिक तर काही अंशी आध्यात्मिक अशा प्रकारच्या संमिश्र जीवनपद्धतींचेही टप्पे येतात. अशा प्रकारे प्रथम एक आध्यात्मिक जीवनपद्धतीची अवस्था ( Ideational ) त्यामागून ऐहिकतेकडे काहीशी वळलेली अशी एक स्थिती ( Idealistic ) आणि त्यानंतर पूर्णतया ऐहिक जीवनाची अवस्था ( Sensate ) आणि पुन्हा पुन्हा आलटून पालटून ह्याच अवस्था अशा तऱ्हेने हे चक्र फिरत रहाते, किंवा घड्याळाच्या लंबकाप्रमाणे काही वेळ ह्या बाजूला, काही वेळ मधे, आणि मग त्या बाजूला, पुन्हा पलट खाऊन काही वेळ मधे आणि मग ह्या बाजूला असे हे सामाजिक अवस्थांचे हेलकावे चालू रहातात.

हे कसे घडते ? ह्याच्या मागची शक्ती कोणती ? सोरोकिनच्या मते ह्याच्या-मागे बाह्य अशी कोणती शक्ती नाही. समाजाच्या संघशक्तीने हे सारे घडते. पण तरीही ती संघशक्ती हे बदलाचे कारण आहे असे सोरोकिन मानीत नाही. ते बदलाचे साधन आहे. विशिष्ट अवस्थेला विशिष्ट परिस्थिती पोचली की इष्ट तो बदल घडून येण्यासाठी संघशक्तीचे हे साधन आपोआप तयार होते. पण मग ह्या परिवर्तनाच्या मागचे मूळ कारण तरी काय ? ह्यावर सोरोकिनचे उत्तर असे की, तो समाजगतीचा अंगभूत असा एक नियम आहे. पण म्हणजे काय हा प्रश्न शिल्लकच रहातो !

**सोरोकिनच्या सिद्धान्ताची समीक्षा :**

टॉयन्बीप्रमाणे सोरोकिननेही आपल्या सिद्धान्ताच्या पुष्टीसाठी पुष्कळ ऐतिहासिक दाखले घेतले. यूरोपमध्ये मध्ययुगात आध्यात्मिक अवस्था शिगेला पोचलेली दिसते तर सध्याच्या काळातील अमेरिका ही विकारी अवस्थेच्या टोकाला पोचली आहे अशी उदाहरणे सोरोकिन देतो. अशा तऱ्हेच्या विधानात उघडउघड आपल्या सोयीसाठी काही गोष्टी निवडून घेतल्या आणि आपल्या सिद्धान्तात बसू न शकणाऱ्या तपशीलांकडे दुर्लक्ष केले हे दिसतेच. यूरोपच्या मध्ययुगीन समाजात धार्मिक वृत्ती होती हे खरे परंतु त्याच काळात स्वार्थमूलक अत्याचार आणि लढाया किती झाल्या असतील ह्याची गणतीच नाही. यंत्राचा शोध किंवा शास्त्राची प्रगती ही विकारी अवस्थेचीच द्योतक मानली पाहिजे असे म्हणणेही पटणारे नाही. सध्याच्या अमेरिकन संस्कृतीत सुखोपभोग आणि चैन आहेत हे निश्चित, पण म्हणून तेवढेच आहे आणि दुसरी मानवी मूल्ये नाहीतच असे मानण्याचे कारण नाही. व्यक्तिस्वातंत्र्य किंवा लोकशाही अशी मूल्ये मानणे आणि ती टिकविण्यासाठी आणि वाढविण्यासाठी प्रसंगी सर्व ऐहिक सुखांचा त्याग करण्याची तयारी ठेवणे हा काय नुसता भोगवाद होतो ? रशियाने तर आध्यात्मिक तत्त्वज्ञान अगदी अधिकृतपणे सोडले आहे असे म्हणता येईल. पण तेथेही तेथील लोकांना पटणाऱ्या क्रांतीसारख्या मूल्यांसाठी त्याग करावा लागतो आणि केला जातोही. अमेरिकेची संस्कृती व आधुनिक युरोपची संस्कृती ही आता पुन्हा आध्यात्मिकतेकडे झुकू लागली आहे असे समजायलाही पुरावा नाही.

नैसर्गिक गरजा भागविणे भागच आहे, आद्य असा शरीरधर्म कुणाला चुकला आहे ? परंतु आपल्यासारख्याच आपल्या भोवतालच्या इतर शेकडो माणसांनाही त्यांच्या गरजा भागवावयाच्या आहेत ह्या सार्वत्रिक जाणिवेतून नीतिनिमय निघतात. "आपला आणि ह्या विशाल विश्वाचा संबंध काय ?" अशा तऱ्हेच्या कुतूहलातून तऱ्हेतऱ्हेच्या ईश्वरविषयक कल्पना निघतात. हे सर्व समाजातून सर्व काळी घडू शकेल. ज्यांना सोरोकिन आध्यात्मिक आणि आधिभौतिक अशी नावे देतो त्या दोन्ही प्रकारच्या कल्पना आणि दोन्ही प्रकारची जीवनपद्धती आणि त्यांची अनेकविध मिश्रणे कोणत्याही समाजात केव्हाही दिसतील. त्यांचे प्रमाण बदलेल. सोरोकिन-प्रमाणे कदाचित अमुक संस्कृतीत अमुक काळी आध्यात्मिक विचार विशेषत्वाने होते असे विधानही करता येईल. पण म्हणून त्या संस्कृतीचे त्या काळचे सर्व जीवन आध्यात्मिक होते असे मात्र म्हणता येणार नाही. हे सिद्ध करण्यासाठी तत्कालीन वैचारिक व ललितवाङ्मयाचा पुरावा दिला तरी तो पुरणार नाही. समाजाने निर्माण

केलेल्या साहित्याचा, तत्त्वज्ञानाचा आणि त्या समाजातील प्रत्यक्षातल्या जीवनाचा नेहमी संबंध असेलच असे नाही. ज्यावेळी काही तत्त्वज्ञ 'जग मिथ्या आहे, मरणातच खरा मोक्ष आहे' असे तत्त्वज्ञान सांगत होते त्याचवेळी समाज जोमाने शेती, व्यापार, उद्योग वगैरे करीत होता, मोठमोठी कलाकौशल्याची कामे उभी होत होती हे आपणास प्राचीन भारताच्या इतिहासावरून दिसते. त्याचप्रमाणे जेव्हा ऐहिक सुखवाद सांगितला जात असतो तेव्हा तो सांगणारांना आपल्या कर्तव्यांची जाणीव नसतेच असे नाही. आणि तसेच, जरी समाजातील काही चार दोन लोक उच्छृंखलपणाचे विचार मांडीत असले, काही चार दोन ठिकाणी बीभत्स लेखन केले जात असले आणि संभोगांचे दर्शन देणाऱ्या शिल्पाकृती निर्माण होत असल्या तरी उरलेला सर्व समाज तशाच प्रकारचे जीवन जगत असतो असा निष्कर्ष काढणे बरोबर होणार नाही. सोरोकिनला विशिष्ट आध्यात्मिक किंवा आधिभौतिक जीवनप्रकारांचे प्रतिबिंब त्या त्या ठिकाणच्या साहित्यातून, तत्त्वज्ञानातून, सामाजिक संस्थांतून, कलाकौशल्यातून, क्रीडा आणि मनोरंजनाच्या प्रकारातून वगैरे सर्वच ठिकाणी उमटलेले दिसते. वादासाठी त्याला जे दिसते ते तसेच आहे असे मानले तरीही प्रत्यक्ष समाजाचे जीवन तसेच होते असे मुळीच म्हणता येणार नाही.

दुसरे असे की ऐहिक संस्कृती पराकोटीला पोचली, माणसे स्वार्थी आणि अनिर्बंध झाली, सर्व प्रकारचे नीतिनियम सुटले, स्त्रीपुरुषसंबंधात आणि अन्य सामाजिक व्यवहारातही स्वैरता आली तरी त्यातून प्रथम अध्यात्मपर आणि नंतर संपूर्णपणे आध्यात्मिक अशा अवस्थांकडेच समाज जाईल असे गणित मांडायला तर्काचा किंवा आतापर्यंतच्या मानवी इतिहासाचा आधार नाही, सुखलोलुपता फार वाढली आणि सामाजिक मूल्ये पूर्णपणे धुडकावली जाऊ लागली तर तो समाज दुसऱ्या अवस्थेत न जाता एकदम अखेरच्या अवस्थेला म्हणजे मृत्यूच्या अवस्थेला पोचणेही शक्य आहे. किंवा असेही शक्य आहे की तो समाज सोरोकिन समजतो तशी आध्यात्मिक मूल्ये न आणताही इष्ट त्या ऐहिक सुधारणा करून स्वतःला सावरू शकेल.

व्हीको, स्पेंग्लर आणि टॉयन्बी ह्यांच्याप्रमाणे सोरोकिनही मानवी इतिहाससंबंधी जे काही सर्वसाधारण सिद्धान्त सांगू पहतो आहे ते प्रत्यक्ष भूतकालीन घटनांच्या कसावर टिकत नाहीत. ह्या सर्वांचेच मानवी प्रगतीसंबंधीचे नियम प्रत्यक्ष इतिहासातून आपोआप निघत नाहीत. काही घटना व काही तपशील पाहून नियम स्फुरले आणि मग ते सिद्ध करण्यासाठी पोषक तेवढे पुरावे गोळा केले असाच प्रकार सर्वत्र झाला आहे. ह्या संदर्भात पॉपरने जो एक इषारा दिला आहे तो मुद्दाम लक्षात घेण्यासारखा आहे. त्याचे म्हणणे असे की, तुम्ही काढलेल्या मानवी इतिहाससंबंधीच्या सिद्धांतास

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत

पोषक पुरावे केव्हाही मिळू शकतील. तसे काही पुरावे सादर करण्याने काहीही हाती लागत नाही. तुम्हाला नियम सिद्ध करावयाचा असेल तर त्या नियमाला विरोधी जाणाऱ्या घटना मानवी इतिहासात मिळता कामा नयेत, हा खरा कस आहे. ( The Open Society and its Enemies. Vol. II, Chap. 25 ).

**प्रगतिवाद्यांचा दृष्टिकोन आणि त्याची चिकित्सा :**

व्हीकोपासून सोरोकिनपर्यंत पुष्कळ विचारवंतांनी इतिहासाचा काही चक्रनेमिक्रम दाखविण्याचा यत्न केला. त्यांचे हे प्रयत्न निष्फळ आहेत हे आतापर्यंत पाहिले. अठराव्या शतकापासून आजतागायत कॉम्टे, स्पेन्सर, जॉन स्टुअर्ट मिल, वेल्स, इत्यादी काही विचारवंतांनी मानवी इतिहासाचे सर्वांगीण परिशीलन करून त्याच्या गतीसंबंधी निराळेच तत्त्व प्रस्थापित करण्याचा यत्न केला आहे. त्यांनी क्रमविकासाचे किंवा प्रगतीचे सिद्धान्त मांडले. ह्या पंथातील विचारवंतांचे मते इतिहास म्हणजे चक्रगती नव्हे. इतिहासात नेहमी एकातून दुसरे, दुसऱ्यातून तिसरे अशा क्रमाने सतत पुढचे असे काही तरी साधले जाते. इतिहास म्हणजे नेहमी पुढे पुढे नेणारी अशी वाटचाल आहे. पुढले पाऊल हे नेहमी प्रगतीचे असते. हा विचारही फार पूर्वीपासून मांडला जात होता. डार्विनच्या जीवशास्त्रातील क्रमविकासाच्या सिद्धान्ताचा परिणाम असा झाला की, सर्वच सामाजिक शास्त्रे डार्विनचा सिद्धान्त प्रमाणभूत किंवा पायाभूत मानून तसाच क्रमविकास आपआपल्या विषयाच्या क्षेत्रातही पाहू लागली. सूक्ष्म जीवापासून सुरुवात होऊन ज्याप्रमाणे विविध प्रकारचे जीवनप्रकार अस्तित्वात आले; मर्कटातून जशी मानवजाती निर्माण झाली त्याचप्रमाणे मानवी समाजाचीही उत्क्रांती होत आली आहे, पुढे होणार आहे. ह्या प्रगतीविषयक विचाराबाबतही पुन्हा मूलभूत प्रश्न टाकता येतील. ते असे : प्रगती होईल म्हणजे काय होईल ? जे जे बदल घडतील त्यांना प्रगतीच म्हणावयाचे काय ? पुढे ही प्रगती कशी होईल, म्हणजे कोण व का करील ? ह्या प्रश्नांना प्रगतिवाद्यांकडे ठराविक उत्तर आहे ते हे की, काही तरी बदल करणे, प्रगती करणे हा माणसाचा स्वभावच आहे. परंतु हे उत्तर पटणारे नाही. साधारणतः माणसाचा स्वभाव आहे ते आहे त्या स्वरूपातच ठेवण्याचा, परंपराप्रिय, नवे काही तरी करून धोका न पत्करण्याचा असा दिसतो हेही इतिहासावरून आणि वर्तमानकालीन समाजाच्या वागणुकीवरून दाखविता येईल. बहुधा प्रत्येक बदल, प्रत्येक सुधारणा ही एखाद्या दुसऱ्या व्यक्तीकडून किंवा एखाद्या लहानशा गटाकडून पुरस्कारिली गेली, मग तिला खूप विरोध झाला आणि ती अजिबात मानली गेली नाही किंवा अंशतः मानली गेली किंवा पूर्णपणे मान्य झाली असे सर्व प्रकार दिसतात. मानवी इतिहासात प्रगती झालीच नाही असे नाही. परंतु प्रगती झाली असे जेव्हा

आपण म्हणतो तेव्हा प्रगती म्हणजे काय ह्याची आपली काहीएक कल्पना असते, तीच सर्वांची असेल असे नाही. तसेच आजच्या दृष्टिकोनातून जी एक गोष्ट प्रगतीची वाटते ती कदाचित् एखाद्या भावी आपत्तीचे बीजही असू शकेल. कमी अधिक वेगाने आणि निरनिराळ्या प्रकारांनी मानव समाज 'बदलतो' एवढेच मानवी इतिहासासंबंधी जास्तीत जास्त म्हणता येईल.

एखाद्या सामाजिक संस्थेविषयी, साहित्यप्रकाराविषयी किंवा एखाद्या ललितकलेच्या क्षेत्रातील प्रयोगाविषयी विवेचन करताना पुष्कळदा त्या बाबतीतील मानवजातीच्या आरंभापासून तर आजतागायतचा विकास सांगण्याची पद्धत आहे. परंतु तर्कशुद्ध बोलावयाचे तर ह्या ठिकाणी विकास हा शब्द वापरता येणार नाही. आणि त्याचप्रमाणे आजपर्यंतच्या इतिहासाने त्या विशिष्ट क्षेत्रात अमुक एक प्रवास केला आणि आता ह्या टप्प्यावर येणे क्रमप्राप्तच होते अशा तऱ्हेचा निष्कर्षही काढता येणार नाही. समाजाची गती अशी नियमबद्ध नाही आणि चालीची दिशाही ठरलेली नाही. अगदी प्राचीनकाळी नास्तिक विचारवंत होते तर आजही भोवताली श्रद्धाळू माणसे दिसतील. आणि समाजातील प्रत्येक व्यक्तीचे आणि सर्व व्यक्तींनी बनलेल्या समाजाचे विचारस्वातंत्र्य आणि कृतिस्वातंत्र्य लक्षात घेता समाजबाह्य तर नव्हेच पण समाजांतर्गत अशी सुद्धा एक शक्ती समाजाचा इतिहास ठराविक वेगाने व आखलेल्या दिशेने चालवीत असते असे म्हणता यावयाचे नाही. बदल होत असतात हे खरे पण प्रगतीच होईल अशी हमी देता येत नाही. समाज सतत प्रगतिशील राहील असे मानणारे विचावंत माणसाच्या अपूर्णतेची, त्याच्या अज्ञानाची, स्वार्थी वृत्तीची, दुष्ट प्रवृत्तीची आणि तर्कविसंगत कृतींची पुरेशी दखल घेत नाहीत. माणूस इतर प्राण्यांचे मानाने पुष्कळ बुद्धिमान आहे हे खरेच पण तो खऱ्या अर्थाने बुद्धिवादी आहे असे मात्र म्हणता यावयाचे नाही. आपल्या हितासाठी तो धडपडत राहील. पण आपले हित कशात आहे हे त्याला नेहमी कळेलच असे नाही. आपला आणि समाजाचा संबंध काय आहे आणि आपले कल्याण समाजाच्या कल्याणाशी कशा प्रकारे निगडित आहे ह्याचीही स्पष्ट कल्पना प्रत्येक व्यक्तिमात्राला असेल असे नाही. त्यामुळे व्यक्तींच्या किंवा गटांच्या हातून अविचाराने अनेक प्रकारच्या विघातक, विध्वंसक गोष्टी घडत रहाण्याचा नेहमीच संभव असतो. म्हणूनच मनुष्यप्राणी आहे तसा लक्षात घेतला तर मानवी इतिहास ही एक प्रगतीची कहाणी आहे आणि ही प्रगती अशीच पुढे चालू रहाणार आहे असे म्हणण्याचे धाडस कोणी करणार नाही. प्रगती व्हावी ही सदिच्छा आहे. पण ती होणारच असे मानून स्वस्थ रहाणे हा बेसावधपणाच होईल. आजपर्यंतची कमाई माणूस एका फटक्यानिशी उधळू शकेल असे फिशर म्हणतो ते अर्थपूर्ण आहे. ("The fact of progress is written plain and large on the page

of history. But progress is not a law of nature. The ground gained by one generation can be lost by the next" -History of Europe, Vol. I, Preface ).

## संदर्भसाहित्य :


( 1 ) Ideas and Men
- Brinton, Crane ; New York, 1950

( 2 ) The Idea of Progress
Bury, J. B ; London 1921

( 3 ) Sociology and History
- ed. Cahnman W. J. and Boskott; Alvin; London, 1964

( 4 ) Philosophies of History
— Cairns, Grace; London 1963

( 5 ) The Idea of History
- Collingwood, R. G.; Oxford 1961

( 6 ) Approaches to History
- Finberg, H. P. R; London, 1962

( 7 ) History of Europe, Vol. I
- Fisher H. A. L. ; London, 1960

( 8 ) Theories of History
- ed. Gardiner, Patrick; Glencose, Illinois, 1959

( 9 ) The Revolt of the Masses
- Gasset, Jose Ortegay; New York, 1932

( 10 ) The Intent of Toynbee's History
- ed. Gargan, Edward; Chicago, 1961

( 11 ) History as a System
- Gasset Jose Ortegay.; New York, 1961

( 12 ) Encounters in History
- Geyl, Pieter; London, 1963

( 13 ) The Logic of Social Enquiry
- Gibson, Quentin; London, 1960

( 14 ) Patterns of Progress
- Kallen, Florace, M. ; New, York 1950

( 15 ) Social Change
– Lapier Richard T; New York 1965
( 16 ) Nature and Types of Sociologial Theory
– Martindale D.; London 1961
( 17 ) The Open Society and its Enemies
– Popper, K. R.; London, 1945
( 18 ) Social and Cultural Dynamics ( Vols. 1–4 )
– Sorokin, P.; New York, 1937–41
( 19 ) Modern Historical and Social Philosophies
– Sorokin, P.; New York 1963
( 20 ) The Varieties of History
– ed : Stern, Fritz; New York; 1960
( 21 ) A Study of Histoy ( Vols. 1–13 )
– Toynbee A. J.; London 1956–60

## प्रकरण ७ वे

# इतिहासाचा आर्थिक अन्वयार्थ

### अर्थशास्त्रीय दृष्टिकोन :

एकोणिसाव्या शतकात इतिहासाकडे पहाण्याचे जे विविध दृष्टिकोन हिरीरीने मांडण्यात आले त्यांपैकी इतिहासाचा आर्थिक बाजूने अर्थ लावण्याचा जो यत्न झाला तो सर्वात महत्त्वाचा मानला पाहिजे. कारण नवीन विज्ञानयुगात, औद्योगिक क्रांतीच्या काळात ह्या विचाराची पकड नव्या पिढ्यांवर सर्वात अधिक बसली. त्या ऐतिहासिक तत्त्वज्ञानाविषयीचे आकर्षण अजूनही फार मोठ्या प्रमाणावर टिकून आहे. अर्थात एखाद्या तत्त्वज्ञानाची लोकप्रियता आणि आकर्षकता ह्या काही त्या तत्त्वज्ञानाच्या अचूकपणाच्या खुणा नाहीत. असे एखादे तत्त्वज्ञान समाजव्यवहारात खूप परिणाम-कारक झालेले असले तरीही तर्कदृष्ट्या ते बरोबर आहे असे होत नाही. जनतेला अत्यंत पसंत पडलेली विचारसरणी शास्त्रीय दृष्ट्या अर्थशून्य असू शकते. तरीही ती परिणामकारक असेल तर ती परिणामकारक आहे एवढेच म्हणणे बरोबर होईल; ती परिणामकारक आहे आणि म्हणून ती बरोबर आहे असा कुतर्क मात्र मांडता येणार नाही.

इतिहासाला, मानवी घडामोडींना, भौतिक बाजू असतात, माणसांच्या कृती त्यांच्या आर्थिक गरजांतून आणि हितसंबंधातून निर्माण होत असतात हा विचार एकोणिसाव्या शतकात एकदम नव्याने आणि प्रथमच सांगण्यात आला असे मुळीच नाही. परंतु एवढे निश्चित की, जीवनाच्या आर्थिक बाजूचा बराच खोलवर विचार करून तपशीलवार विवेचनाने इतिहासाचा हा अर्थ प्रथम एकोणिसाव्या शतकात जर्मन तत्त्वज्ञ कार्ल मार्क्स ह्यानेच दिला. म्हणूनच पुष्कळदा इतिहासाचा आर्थिक अन्वयार्थ हा इतिहासाचे मार्क्सवादी तत्त्वज्ञान ह्याच नावाने अधिक ओळखला जातो. मार्क्सने सांगितलेली तत्त्वे आणि अंगिकारलेली पद्धती ह्यांचे धागे दोरे मार्क्सपूर्वीच्या कित्येक विचारवंतांच्या विचारातून काढून दाखविता येतील. परंतु काहीही असले तरी इतिहासाचा आर्थिकदृष्ट्या केलेला उलगडा हा मार्क्सच्या नावानेच मोडतो. त्या विवेचनाशी मार्क्सचे नाव निगडित होणे स्वाभाविकच आहे, न्याय्यही आहे, आणि म्हणूनच प्रथम मार्क्सने आपले इतिहासाचे भौतिक, आर्थिक विश्लेषण कशा प्रकारे केले हे थोड्याशा विस्ताराने पहाणे आवश्यक आहे.

## मार्क्सचा सर्वंकष सिद्धान्त :

कार्ल मार्क्स हा भूतवादी होता. जडसृष्टीपलीकडचे कोणतेही परमतत्त्व, कोणत्याही रूपातला परमेश्वर आणि ह्या विश्वाबाहेरची कोणतीही कर्तुमकर्तुम अशी शक्ती कार्ल मार्क्सला मान्य नव्हती, अर्थातच त्याच्या इतिहास-विवेचनात ईश्वरी इच्छा किंवा ग्रहगोलांनी निश्चित केलेली इतिहासाची गति किंवा गूढ असे काही कालचक्र येण्याचा संभवच नाही. ज्या ज्या घटना घडतात त्यांच्यामागे भौतिक कारणेच असतात, त्यापलीकडे आणखी काही असत नाही.

माणसाच्या ऐहिक जीवनाची आर्थिक बाजू ही सर्वांत अधिक महत्त्वाची आहे. माणसाच्या गरजा आणि त्यातून निर्माण होणारी परिस्थिती ह्यामुळे सर्व इतिहास घडतो. ह्या गरजा म्हणजे पोटाच्या गरजा. त्या पोटाभोवती विशिष्ट कालातील विशिष्ट समाजाचे सर्व जीवन फिरत असते; आणि सर्व समाजात सर्व काळी तसेच होते.

परंतु मार्क्स एवढे सर्वसाधारण ढोबळ विधान करून थांबलेला नाही. मानवी इतिहासाच्या परिशीलनाने त्याला मानवी इतिहासात कोणती स्थित्यंतरे होतात, ती कशी होतात ह्यासंबंधीचे काही नियम सापडले आहेत असा त्याचा दावा आहे. ह्या नियमांनुसार आजपर्यंतचा मानवी इतिहास घडला आहे आणि ह्यापुढे घडणार आहे. मार्क्सच्या इतिहासभाष्याने सबंध भूतकालाचा नियमबद्ध असा अर्थ लागतो. आणि भविष्यातील घडामोडींचेही स्वरूप अगदी स्वच्छ दिसते.

## हेगेल आणि मार्क्सची इतिहासमीमांसा :

इतिहासभाष्याची जी विशिष्ट पद्धती मार्क्सने स्वीकारली आहे ती हेगेलपासून उचललेली आहे. क्रिया, प्रतिक्रिया, ह्या दोन्हींचा संघर्ष आणि नंतरचा समन्वय अशा पद्धतीने इतिहासाची पावले पुढे पुढे पडत राहतात असे हेगेलने म्हटले. आणि ह्या घडामोडी म्हणजे दुसरे तिसरे काही नसून चैतन्यशक्तीचे, परमतत्त्वाचे निरनिराळे आविष्कार आहेत असा हेगेलला साक्षात्कार झाला होता. कार्ल मार्क्सला ते परमतत्त्व किंवा ती चैतन्यशक्ती मान्य होण्यासारखी नव्हती. जाणीव किंवा चैतन्य ह्या गोष्टी जड सृष्टीच्या अगोदर अस्तित्वात असू शकत नाहीत. जड सृष्टीच्या बाहेरही त्यांचे अस्तित्व नाही. म्हणून कोणती तरी एक अदृश्य गूढ शक्ती मानायला मार्क्स तयार होणे शक्य नाही. तरी पण हेगेलने क्रिया, प्रतिक्रिया संघर्ष आणि समन्वय अशी जी एक मानवी इतिहासातील घडामोडींची चाल सांगितली ती मात्र मार्क्सला पटली आहे. काही एक स्थिती असते. त्या स्थितीला विरोधी अशी अन्य स्थिती निर्माण होते. ही दुसरी स्थिती निर्माण व्हावी अशा तऱ्हेचे वातावरण पहिल्या स्थितीतच

असते. त्यांचा संघर्ष अटळ असतो. त्या संघर्षातून समन्वय होणे हेही अपरिहार्य असते अशा तऱ्हेने ठराविक अवस्थांतून , त्याच ठराविक संघर्षाच्या पद्धतीने मानवी समाज जाणार आहे.

एक कोणती तरी क्रिया, तिच्यात अस्तित्वात असलेल्या काही परिस्थितीमुळे अपरिहार्यपणाने येणारी प्रतिक्रिया, त्यांचा संघर्ष वगैरे सर्व मार्क्सला प्रतीत झाले ते समाजातील वर्गकलहाच्या रूपाने. कोणत्याही समाजाची रचना अर्थव्यवहारानुसारी असते. समाजाच्या गरजा; अन्न, वस्त्र, निवारा इत्यादी निर्माण करण्याचे काम समाजातील एखादा वर्ग आपणाकडे घेतो. तो वर्ग समाजाला आवश्यक अशा वस्तू निर्माण करून पुरवितो. परंतु त्याचबरोबर हा वर्ग निर्मितीची सर्व साधने आपल्या ताब्यात घेतो आणि त्याद्वारा समाजातील सर्व व्यवहारावर आपले वर्चस्व बसवितो. तेव्हा समाजात अशा तऱ्हेने सर्व अर्थव्यवहारावर नियंत्रण ठेवणारा मूठभर धनिकांचा एक वर्ग आणि त्यांनी कोणत्या ना कोणत्या प्रकारे गुलाम केलेली बाकीची सर्व जनता असे दोन वर्ग पडतात. ह्या दोहोंमध्ये संघर्ष होणे टळत नाही. त्या संघर्षातून जो वर्ग पिळला गेलेला असतो तो विजयी होतो. आणि नवा विजयी वर्ग आणि पुन्हा ह्यांच्या पिळवणुकीला बळी पडणारी जनता अशी नवी वर्गरचना अस्तित्वात येते. प्राथमिक समाजांचे अपवाद वगळता, आतापर्यंतचा मानवी इतिहास अशा तऱ्हेच्या एकामागून एक झालेल्या वर्गसंघर्षांचा इतिहास आहे.

### अखेरचा वर्गसंघर्ष :

एकोणिसाव्या शतकापासून जो वर्गकलह सुरू आहे तो भांडवलदार आणि श्रमजीवी कामगार ह्या दोघांमधला आहे. पूर्वीची सरंजामशाही व जमीनदारी ह्यांच्याविरुद्ध लढून नवा औद्योगिक भांडवलदारांचा वर्ग उदयास आला. आता हा भांडवलदारांचा वर्ग आणि पुढे जो निश्चित उदयास येणार आहे तो कामगारांचा वर्ग ह्यात संघर्ष चालू आहे. ह्या लढ्यात कामगार हमखास यशस्वी होणार आहेत.

भांडवलदार आणि कामगार ह्यांच्यातील लढा पूर्वीच्या वर्गकलहापासून मार्क्सच्या मते, निराळा आहे. कारण हा, त्याला समजलेल्या इतिहासाप्रमाणे, शेवटचा वर्गकलह आहे. सर्व आरिष्टांचे मूळ म्हणजे खाजगी मालमत्ता. आतापर्यंतच्या वर्गकलहातून एक जाऊन दुसरा येणे म्हणजे मालकी बदलणे एवढेच होत होते. ह्या शेवटच्या वर्गकलहात मालकीच्या तत्त्वावरच, खाजगी मालकी ह्या संस्थेवरच, प्रहार करण्यात येणार आहे. कुणाकडे तरी असते आणि कुणाकडे तरी नसते ह्यामुळेच सगळे लढे होतात ना ? अशी समाजरचना जर अस्तित्वात आली की तिच्यात म्हटले तर कुणीही मालक नाही आणि म्हटले तर सगळेच मालक आहेत तर भांडणाचे

मूळच नाहीसे होईल आणि पुढे कोणत्याही प्रकारच्या संघर्षाची गरजच उरणार नाही. खाजगी मालकी नष्ट झाली की समाजात वर्गच उरत नाहीत, वर्गच नाहीत तर वर्गकलह कुठला ? ह्या शेवटच्या वर्गकलहातून जे निघणार आहे ते म्हणजे वर्ग-विहीन समाजरचना. हा नवा समाज पूर्वीच्या सर्व समाजांहून सर्वच बाबतीत निराळा होईल. उदाहरणार्थ ह्या नव्या समाजात राज्यसंस्थेची सुद्धा आवश्यकता उरणार नाही. कारण विरोधी हितसंबंध असले, कुणीतरी मालक असले आणि त्यांना आपल्या मालकीच्या वस्तूंचे शस्त्रबलाने रक्षण करावयाचे असले तरच शासनसंस्थेची गरज उद्भवते. जिथे खाजगी मालमत्ता नाही आणि जिथे वर्गकलह नाहीत आणि एका वर्गाला दुसऱ्या वर्गाविरुद्ध शक्तीचा वापर करावयाचा प्रश्नच उद्भवत नाही त्या ठिकाणी राज्यसंस्थेसारख्या दंडयंत्रणेची गरजच संपते. आणि म्हणून शेवटच्या वर्ग-कलहानंतर जो समाज अस्तित्वात येणार आहे तो वर्गहीन असेल तसाच राज्यविहीनही असेल. त्यात खाजगी मालमत्ता नसेल. त्यात वर्गकलह नसतील. प्रत्येकजण आपल्या सामर्थ्याप्रमाणे काम करील आणि समाजाच्या एकंदर निर्मितीतून आपल्याला आवश्यक तेवढ्याचा उपभोग घेईल. कोणत्याही प्रकारच्या संघर्षाचे प्रयोजनच रहाणार नाही, पृथ्वीवर स्वर्ग अवतरेल असे स्वप्न मार्क्सने रंगविले आहे.

## मार्क्सवादाचे परीक्षण :

कामगारांचा भांडवलदारांविरुद्धचा लढा, त्याचा कार्यक्रम, क्रांतीचे तंत्र आणि दिशा, संघटनेच्या पद्धती वगैरे संबंधीचे जे विवेचन मार्क्सने केले आहे त्याचा आढावा घ्यावयास येथे अवकाश नाही. मार्क्सने स्वतःच म्हटल्याप्रमाणे त्याला जे जे सांगावयाचे होते ते समाजात इष्ट बदल घडवून आणण्यासाठी सांगावयाचे होते. त्याच्या मते तत्त्ववेत्त्यांनी आतापर्यंत जगाचा अर्थ सांगण्याचा उद्योग केला. आपला प्रयत्न त्याच्यात बदल घडवून आणण्याचा असला पाहिजे. तत्त्वज्ञान नेहमी आपण कसे आहोत हे शोधण्याच्याच मागे लागलेले दिसते. आपण कसे झाले पाहिजे हा विचार तत्त्वज्ञानाला शिवलेला दिसत नाही, तो आता झाला पाहिजे. मार्क्सचा दृष्टिकोन पूर्णतया व्यवहारी होता. समाजात बहुजनांना सुखी करण्यासाठी आवश्यक तो बदल घडवून आणण्या-साठी त्याची तळमळ आणि धडपड होती. आणि त्याचे सारे तत्त्वज्ञान ह्या हेतूने प्रेरित झालेले आणि त्या दृष्टीने पाहिजे तसे ठाकून ठोकून सारखे केलेले असे असणेही स्वाभाविक होते.

आता मार्क्सला क्रांती करावयाची होती तर त्याने त्यासाठी चालू परिस्थितीत काय दोष आहेत, कोणते अन्याय आहेत आणि ते कसे दूर झाले पाहिजेत ह्यावर कसाही प्रचार करून संघटना उभारावयास व हिंसकअहिंसक कोणत्याही मार्गांनी त्याला

इष्ट वाटत होता तो बदल घडवून आणण्याचा प्रयत्न करावयास काहीच हरकत नव्हती. तेवढेच करून तो थांबला असता तर कदाचित् इतिहासभाष्याच्या विवेचनात त्याचे नाव आणण्याचेही कारण पडले नसते. परंतु समाजात जो बदल करावयाचा आहे तो म्हणजे इतिहासातील एक अपरिहार्य अशी अवस्था आहे, तो होणारच आणि तो विशिष्ट पद्धतीनेच होणार; कारण इतिहासाच्या गतीचा तो नियमच आहे, असे एक सूत्रच मार्क्स आणि त्याचा सहकारी ह्या दोघांच्याही प्रतिपादनातून आग्रहाने येत असल्यामुळे प्रश्न थोडा निराळा होतो.

( "The final causes of all social changes and political revolutions are to be sought, not in men's brains, not in man's better insight into eternal truth and justice, but in the modes of production and exchange. They are to be sought not in the *philosophy* but in the *economics* of each particular epoch" – Fredaride Engels, p. 125)

त्याचप्रमाणे मार्क्सच्या इतिहासचिकित्सेची महती सांगताना एंगल्स म्हणतो :

" All the historical phenomena are explicable in the simplest possible way–with sufficient knowledge of the particular economic condition of Society....History was for the first time placed on its real basis.... that men must first of all eat, drink, have shelter and clothing.... before they can fight for domination, pursue politics, religion, philosophy etc."

p. 150

– Marx–Engels, Selected works–Vol. II.

अशा तऱ्हेने त्याने क्रांतीचा संदेश दिल्यामुळे इतिहासाच्या विद्यार्थ्याला मार्क्सने सांगितली आहे तशी इतिहासाच्या गतीला नियमबद्धता आहे की काय हे तपासून पहाणेच भाग आहे.

### माणसाच्या जीवनप्रेरणा :

मार्क्सच्या आणि त्याचे बरोबरीने काम करणाऱ्या एंगल्सच्या भाष्यात ऐतिहासिक घटनांमागे मुख्यतः, किंबहुना सर्वस्वी, आर्थिक कारणेच असतात असे स्पष्टपणे प्रतिपादलेले आहे, माणसाच्या कोणत्याही हालचालीमागे त्याचा काही तरी हितसंबंध असतो, आणि स्वतःच्या हिताच्या विचारात सुग्रास मिळविण्याचा आणि सुखासमाधानाने रहाण्याचा विचार प्रमुख असतो हे नाकारता येणार नाही. सामान्यतः

माणसे आपल्या आर्थिक स्वार्थाच्या अनुरोधाने धडपडत असतात असे एक सर्वसाधारण विधान मान्य करावयास हरकत नाही. तथापि ह्या बाबतीतही इतर अनेक दृष्टींनी विचार करणे आवश्यक आहे. समाजातील अगदी प्रत्येक माणूस प्रत्येक वेळी आपल्या आर्थिक हितसंबंधांचाच विचार करतो काय ? तसेच आर्थिक हितसंबंध म्हणजे निश्चित काय ? माणसाच्या सुखामागे धावण्याच्या जीवनात केवळ पोटा-पाण्याचा विचार नसतो, त्याबरोबर इतर काही बाबींचाही विचार केला पाहिजे असे मार्क्सवादी विचारवंतांनाही जाणवले. फ्रॉइड, अॅडलर वगैरेंनी दिलेल्या नव्या मानसशास्त्रीय विचारांनुसार मूळ मार्क्सवादी विवेचन थोडे अधिक व्यापक करणे आवश्यक आहे, असे विचारही पुढे आले. फ्रॉइडच्या मते मनुष्यमात्राच्या पुष्कळ हालचाली लैंगिक आकर्षण आणि आकांक्षा ह्यामुळे ठरत असतात तर अॅडलरच्या मते मनुष्यप्राण्यात कोणत्या ना कोणत्या प्रकारची सत्ता संपादण्याची महत्त्वाकांक्षा असते. मनुष्य पोटाच्या विचाराबरोबरच आपल्या लैंगिक सुखाचा आणि काहीतरी सत्तास्थान मिळवून विशेष प्रकारे मानाने जगण्याचा विचारही तेवढ्याच तीव्रतेने करीत असतो. असेही शक्य आहे की एखादा माणूस आपल्या प्रणयजन्य आकर्षणापायी आर्थिकदृष्ट्या आपले नुकसान करून घेईल, किंवा कधी सत्तास्थान मिळविण्यासाठी पोट आणि प्रेम या दोन्ही गोष्टी विसरेल. प्रत्येक माणसाची स्वतःच्या सुखाची कल्पना इतकी वेगवेगळी असते आणि पुष्कळदा अशी संमिश्र स्वरूपाची असते की फक्त आर्थिक हितसंबंधानेच त्याची कृति ठरेल असे म्हणता येणार नाही. शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ, कलावंत वगैरेंची जीवने पाहिली तर असे दिसते की पुष्कळदा वरील तिन्ही प्रकारचे वैयक्तिक स्वार्थ बाजूला सारून किंवा विसरून ती माणसे ज्ञानाच्या मागे किंवा एखादी सुंदर कलाकृति निर्माण करण्याच्या मागे लागलेली असतात. अशी उदाहरणे अपवादात्मक असली तरी सबंध समाजाच्या हालचालीमागचे सगळे धागेदोरे समजून घ्यावयाचे असतील तर त्यांची दखल घेतल्यावाचून कोणत्याही विचाराला पूर्णता येणार नाही. परंतु तरीही सर्वसाधारणपणे आर्थिक विचाराने आणि आर्थिक हिताच्या मागोव्याने माणसांच्या कृति ठरतात आणि ऐतिहासिक घटनांमागील ही वस्तु-स्थिती लक्षात घेतली पाहिजे हे जे मार्क्सने मांडले आहे ते बऱ्याच अंशी खरे आहे.

## अर्थमूल इतिहासाचे स्वरूप :

कार्ल मार्क्स आणि एंगल्स यांचा आर्थिक हितसंबंधावरील भर बराचसा मान्य केला तरी पुढे त्यांनी आर्थिक इतिहासाची जी रूपरेखा सांगितली तिचे तपशील मात्र मान्य करणे कठीण आहे, आर्थिक कारणांनी जो इतिहास घडतो त्याचे प्रत्यक्ष

स्वरूप कसे असते ते मार्क्स आणि मार्क्सवादी उत्पादनव्यवस्था ही मूलभूत धरून स्पष्ट करतात.

जमीनदार किंवा सरंजामदार आणि कुळे किंवा भूदास, तसेच भांडवलदार आणि मजूर अशा तऱ्हेचे वर्ग समाजात का पडतात? मार्क्सचे उत्तर असे की ह्या वर्गरचनेच्या मागे त्या त्या समाजाची आर्थिक उत्पादनव्यवस्था हे आणि एकमेव हेच कारण असते. विशिष्ट समाजाच्या धर्म, चालीरीती, राज्ययंत्रणा, कला, साहित्य इत्यादी सर्वच गोष्टी आर्थिक उत्पादनव्यवस्थेची जी यंत्रणा असते तिच्या बरहुकूम ठरत असतात. ह्या ठिकाणी अगदी साधा आणि सरळ प्रश्न असा विचारता येईल की, उत्पादनव्यवस्था हे मूळ कारण जरी काही काळ वादासाठी मान्य केले तरी ही उत्पादन-व्यवस्था येते कोठून? संपूर्ण सांस्कृतिक जीवनाचे कारण उत्पादनव्यवस्था असेलही, पण विशिष्ट उत्पादनव्यवस्थेचे कारण काय? इतिहासावरून स्पष्ट दिसते ते असे की उत्पादनव्यवस्थाच मुळी माणसांनी निर्माण केलेली असते, त्यामागे माणसाची बुद्धी असते, प्रयोगशीलता असते, संशोधनवृत्ती असते. मार्क्सने उत्पादनव्यवस्था मूळ मानली पण त्या व्यवस्थेमागील प्रयत्नशील मानवाची अजिबात दखल घेतली नाही. पुष्कळदा अचानक लागलेल्या एखाद्या शोधानेही उत्पादनव्यवस्थेत क्रांती होऊ शकते, अशा तऱ्हेचे योगायोग किंवा अपघात यांनाही मार्क्सच्या इतिहासदर्शनात जागा नाही.

आर्थिक इतिहासविचारातील कार्ल मार्क्सच्या वर्गरचनेचा आणि वर्गसंघर्षाचा भागही काळजीपूर्वक पाहिला पाहिजे. विशिष्ट उत्पादनव्यवस्थेमुळेसमाज दोन वर्गात भागला जातो असे मार्क्स मानतो. काही प्रमाणात ते बरोबरही आहे. समाजातील उत्पादनाची साधने आणि त्याची एकूण व्यवस्था एका वर्गाने आपल्या ताब्यात घेणे आणि त्या जोरावर इतरांना आपल्या हुकमतीखाली आणणे हे शक्य आहे, तसे घडतेही, परंतु इथेही असा प्रश्न विचारता येईल की, ज्यांच्यापाशी सर्व काही आहे आणि ज्यांच्यापाशी अगदी काहीही नाही असे दोनच ठळक वर्ग समाजात पडतात काय? काही लोक असे असतील की ज्यांनी उत्पादनव्यवस्थेत स्वतःसाठी विशिष्ट स्थान मिळविलेले असेल, काही लोक असे असतील की ज्यांना काहीच मिळविणे शक्य झाले नाही. परंतु ह्या दोघांच्यामध्ये आणखी कितीतरी वर्ग येऊ शकतील. थोडेसे आहे, काही ह्या प्रकारचे आहे तर काही त्या प्रकारचे आहे, आणि आहे त्यातून अधिक मिळण्याचा संभव आहे, अशा मधल्या अवस्थांत कितीतरी माणसे आणि गट येतील. अतिशय श्रीमंत किंवा भांडवलदार आणि अतिशय गरीब किंवा कामगार ह्यांच्यात संघर्ष सुरू झाला तर मधल्या निरनिराळ्या अवस्थांतील हे अनेक गट कोणत्या बाजूला

जातील हे सांगणे कठीण आहे. कोणाचा विजय झाल्याने आपला फायदा आहे ह्याचा विचार करूनच ते आपली बाजू निवडणार आणि त्यांनी केलेला विचार हा नेहमीच अचूक असेल असेही म्हणता यावयाचे नाही. असे अनेक लहान गट असतात आणि त्यांच्या धोरणांनी आणि कृतींनी इतिहासात गुंतागुंत होत असते ह्याची जाणीव मार्क्सच्या आणि मार्क्सवाद्यांच्या लिखाणातही दिसून येते. तथापि हे सगळे छोटे छोटे गट हळू हळू दोन ठळक वर्गात विलीन होणारच आणि शेवटी दोन वर्गातील संघर्ष अशीच परिस्थिती निर्माण होणार असा सिद्धान्त ते मांडतात. परंतु मनुष्य-स्वभाव आहे तसा लक्षात घेतला तर नेमके असेच होईल असे छातीठोकपणे कधीच सांगता यावयाचे नाही.

तेव्हा मानवी इतिहास पुष्कळ अंशी आर्थिक हिताहिताच्या विचाराने घडत असतो, इतिहासामागील प्रेरणा बरीचशी आर्थिक असते हे जरी काही प्रमाणात मान्य केले तरी त्या आर्थिक इतिहासाचे स्वरूप मार्क्सने म्हटल्याप्रमाणे उत्पादन-व्यवस्था मूलभूत मानून आणि विशिष्ट वर्गरचना आणि वर्गकलह कल्पून स्पष्ट होऊ शकत नाही.

### घटनांची आर्थिकेतर कारणे :

इतिहासातील प्रत्येक घटनेचे मूळ कारण आर्थिक हिताचेच असते हेच प्रथम पूर्णतया मान्य करता येणार नाही. इतिहासातील अनेक घटना अशा आहेत की त्यांची कारणे जीवनाच्या आर्थिक बाजूहून अन्यत्र शोधावी लागतील. माणसामध्ये स्वतःच्या प्रतिष्ठेची भावना, धर्माविषयीचा अभिमान अशा गोष्टी इतक्या प्रबळ होऊ शकतात की त्या ठिकाणी आर्थिक फायद्याचा विचार सुटतो आणि इतर कोणते तरी मार्क्स मानीत नसलेले कारण प्रबळ ठरते. रामायण आहे त्या स्वरूपात इतिहास नाही हे आपल्याला ठाऊक आहे. परंतु तो इतिहास असता तर रावणाने सीता पळविली एवढ्या कारणाने राम-रावणामध्ये तुंबळ युद्ध होणे अगदी सहज शक्य आहे, मानवी स्वभावास ते धरूनच आहे. रावणाच्या सीलोन राज्यात चहासारख्या काही आर्थिक महत्त्वाच्या गोष्टी होत्या आणि त्यासाठी सीता पळविल्याचे निमित्त करून रामाने सीलोन मिळविण्याचा घाट घातला, सीता ही त्या दृष्टीने महत्त्वाची नव्हे, निमित्तमात्र आहे, अशा तऱ्हेने कोणी इतिहासाचा अर्थ सांगू लागले तर ते हास्यास्पद होईल. दुसऱ्या प्रदेशातील संपत्तीवर वाकडी नजर ठेवून ती बळकावण्याचे दृष्टीने हल्ला करणे हे जसे इतिहासात घडेल तसेच आपल्या पत्नीवर दुसऱ्या प्रदेशाच्या राजाने वाकडी नजर ठेवली म्हणून त्याचेविरुद्ध युद्धाला सज्ज होणे हेही इतिहासात घडेल. बेल्जम हॉलंडपासून वेगळे झाले ते भाषाभिमानाने. पाकिस्तान स्वतंत्र राष्ट्र म्हणून जन्माला

आले ते तीव्र धार्मिक भावनेमुळेच. ह्या दोनही प्रकरणांचा आर्थिकदृष्टया विचार केला तर बेल्जम आणि पाकिस्तान ह्या दोघांचेही त्यांच्या कृतींनी नुकसानच झालेले आहे. पण हा विचार झाला नाही. आर्थिक हिताच्या गणितापेक्षा दुसरी कोणती तरी भावना अधिक प्रभावी ठरली. मध्ययुगात मुसलमान आणि ख्रिस्ती ह्यांच्यामध्ये कित्येक धर्मयुद्धे झाली. त्या युद्धांमुळे यूरोपच्या आणि आशियाच्याही इतिहासात कितीतरी क्रांतिकारक बदल झाले. परंतु त्या धर्मयुद्धांचे मूळ कारण म्हणजे काहीतरी आर्थिक हितसंबंध होता असे मुळीच दाखविता येणार नाही. जेरूसलेमला जाणाऱ्या भाविक ख्रिस्ती यात्रेकरूंना मुसलमान लोक छळीत हे एकमेव कारण त्या धर्मयुद्धांमागे होते.

## मार्क्सप्रणीत वर्गसंघर्ष :

मार्क्सने कल्पिलेली वर्गरचना आणि त्यातून निघणारे विशिष्ट प्रकारचे वर्गकलह हे देखील प्रत्यक्ष इतिहासातूनच निघत नाहीत. मार्क्सच्या आधुनिक इतिहासाच्या विश्लेषणाच्या अनुरोधाने ह्या संदर्भात काही शंका उद्भवतात. समाजात एका विशिष्ट अवस्थेत पिळणारे आणि पिळले जाणारे असे दोन वर्ग असतात असे जरी वादासाठी काही वेळ मानले तरी प्रत्यक्ष इतिहासाने वर्गकलहाचे काही वेगळेच स्वरूप दाखविले आहे. मध्ययुगीन सरंजामशाहीत जमीनदार हे पिळणारे होते आणि जमिनीच्या वीतभर तुकडयाला चिकटून बसलेले लक्षावधि भूदास शेकडो वर्षे पिळले जात होते पण सरंजामशाहीविरुद्ध भूदासांनी लढा दिला नाही. सरंजामशाहीचा निःपात केला तो औद्योगिक क्रांतीने उदयास आलेल्या नव्या धनिक वर्गानेच. आता ह्यापुढचा जो वर्गकलह आहे तो ज्यांनी एकदा सरंजामशाहीचा निःपात केला ते भांडवलदार आणि कामगार ह्यांच्यामधला आहे असे मार्क्सचे प्रतिपादन आहे. परंतु मागील वर्गकलहाचे उदाहरण लक्षात घेता हा नवीन लढा भांडवलदार आणि कामगार ह्या दोन वर्गामध्येच सरळ सरळ होईल असे मानायला काय आधार आहे ? तिसराच एखादा वर्ग कशावरून उदयास येणार नाही ?

आणि वर्गकलहामध्ये पिळले जाणारे पिळणारांचा बीमोड करणार अशी मार्क्स हमी देतो ती तरी कुठल्या आधारावर ? दोन वर्गांमध्ये संघर्ष होईल आणि दोन वर्ग अमुकच असतील येथपर्यंतसुद्धा मार्क्सवाद आणि तदंतर्भूत इतिहासविवेचन मानले तरी चालू वर्गकलहात अंतिम विजय हमखास कामगारांचाच आहे ही मार्क्सची भविष्यवाणी का मानावयाची ते समजत नाही. दोन वर्गांमध्ये जो संघर्ष व्हावयाचा आहे ती एक प्रकारची लढाई आहे, लढाईत कोणाचा जय होईल हे आधी सांगता येणे शक्य नसते. भांडवलदार पिळणारे असूनही समर्थ असतील, परिस्थिती त्यांना

अनुकूल अशी असेल तर पिळल्या जाणाऱ्या कामगारांची बाजू कितीही न्याय्य असली तरी कामगार विजयी होतील असे म्हणता यावयाचे नाही. अंती न्यायाचाच विजय होतो हे तत्त्व ईश्वरावर श्रद्धा ठेवणाऱ्यांनी फार तर मानावे. जडवादी मार्क्सवाद्यांनी हे ओळखले पाहिजे की जय शेवटी सामर्थ्याचा होतो. कुठली बाजू न्यायाची आणि कुठली अन्यायाची हा मुद्दाच लढाईत गैरलागू असतो.

**मार्क्सवाद आणि प्रत्यक्ष इतिहास :**

कार्ल मार्क्सने दिलेली सबंध मानवी भूतकाळाची रूपरेखा आणि त्याने वर्तविलेली भविष्ये इतिहासाने कशी खोटी पाडली आहेत ह्याची फार उदाहरणेही देण्याचे कारण नाही. जिथे मार्क्सवादी क्रांती झाली असे मानले जाते त्या रशियाच्या इतिहासाचे एकच उदाहरण ह्या संबंधात पुरेसे होईल. मार्क्स आणि एंगल्स ह्यांच्या विवेचनाप्रमाणे औद्योगिक क्रांतीनंतर विशेष उद्योगप्रधान अशा देशात जागृत झालेल्या औद्योगिक कामगार वर्गाकडून समाजवादी स्वरूपाची क्रांती व्हावयास पाहिजे होती. परंतु प्रत्यक्षात तशा प्रकारची क्रांती झाली ती औद्योगिक विकासाचे दृष्टीने इंग्लंड, जर्मनी वगैरेंचे मानाने पुष्कळ मागासलेल्या अशा रशियात. मार्क्स-एंगल्सची ज्या औद्योगिक कामगार वर्गावर मोठी भिस्त होती तसा वर्गच रशियात अस्तित्वात नव्हता. रशियात क्रांती केली ती शेतकऱ्यांनी. सरंजामशाही समाजव्यवस्थेखालील हा शेतकरी वर्ग म्हणजे क्रांती करायला अगदी नालायक असे मार्क्स-एंगल्स मानीत. परंतु रशियातील शेतकऱ्यांनी त्या महान् विचारवंतांना न जुमानता काय करायचे ते केलेच.

**मार्क्सवाद आणि नेतृत्व व योगायोग :**

१९१७ साली रशियात झालेली क्रांति लेनिनच्या नेतृत्वाशिवाय होऊच शकली नसती असे ट्रॉट्स्की, लेनिन वगैरेंच्या लिखाणांवरून आणि रशियाच्या इतिहासाच्या इतर साधनांवरून स्पष्ट दिसते, परंतु एखाद्या कर्तबगार नेत्यामुळे रशियन राज्यक्रांतीसारखी मोठी घटना घडू शकते हेही मार्क्सवादी इतिहासभाष्यात बसणारे नाही. विशिष्ट परिस्थिती निर्माण झाली की नेते आपोआप तयार होतात असे मार्क्स आणि मार्क्सवादी मानतात. सीझर, नेपोलियन, हिटलर वगैरे सर्व त्या त्या काळच्या गरजांतून, परिस्थितीतून निर्माण झाले हे मानता येण्यासारखे नाही. फ्रान्स-मधील राज्यक्रांतीच्या अराजकानंतर नेपोलियनसारखा नेता पुढे आला आणि त्याने शांतता व सुव्यवस्था स्थापून जनतेला दिलासा दिला म्हणून जनतेने त्याला सत्तेवर बसविले आणि त्याचे नेतृत्व मुकाटयाने कबूल केले हे खरे. परंतु राज्यक्रांतीच्या गोंधळानंतर नेपोलियन जन्माला आलाच पाहिजे असे मात्र कसे सांगता येईल ? पुढे कित्येक वर्षे नेता न मिळणे, अराजक चालू रहाणे आणि एखाद्या परकी सत्तेने

फ्रान्स गिळंकृत करणे असेही घडणे शक्य होते. एखादी घटना घडून गेल्यानंतर ती तशी घडणे अटळच होते अशी भूमिका घेऊन सोयीस्कर असे विवेचन करणे नेहमीच शक्य असते. परंतु शतकानुशतके गोंधळ आणि अराजक चालू राहूनही परिस्थिती सावरायला एकही नेता पुढे आला नाही असे भारत, चीन, इत्यादी कित्येक राष्ट्रांच्या इतिहासात घडलेले आहे. शिवाय शांततेसाठी आणि सोयीसाठी भुकेलेल्या जनतेने कुणाला तरी आपला नेता म्हणून मानावयाचे ठरविले आणि त्याच्या हाती सर्व सत्ता सुपूर्त केली तरी पुढचा इतिहास हा जो माणूस अधिकारावर आला त्याच्या विशिष्ट व्यक्तिमत्त्वानुसार घडू लागतो. फ्रेंच राज्यक्रांतीनंतर परिस्थिती सांभाळणारा नेता फ्रेंच जनतेला पटला असता हे जरी मान्य केले तरी विलक्षण वैयक्तिक महत्त्वाकांक्षा असलेल्या नेपोलियनऐवजी दुसरा एखादा नेता पुढे आला असता आणि त्याचे व्यक्तिमत्त्व निराळे असते तर फ्रान्सचा पुढील इतिहास निश्चितच निराळा झाला असता. विशिष्ट प्रकारच्या परिस्थितीनंतर एखादा सर्वाधिकारी येणे आणि लोकांनी त्याची सत्ता बिनतक्रार मानणे हे घडतेच असे जरी म्हटले तरी अशा तऱ्हेने अधिकारावर येणारा माणूस काय हिंमतीचा आणि कोणत्या वृत्तीचा असेल हा शेवटी योगायोगाचा भाग आहे. नेतृत्वाच्या आणि महापुरुषाच्या कर्तृत्वाचा हा मुद्दा पुढील प्रकरणी थोडा विस्ताराने स्पष्ट करावयाचा आहे.

परंतु मार्क्स-एंगल्सच्या इतिहासविवेचनात योगायोग तर मुळीच बसत नाहीत. विशिष्ट उत्पादनव्यवस्था असली तरी विशिष्ट प्रकारची वर्गरचना तयार झालीच पाहिजे, त्यातून विशिष्ट प्रकारचा वर्गकलह निर्माण झालाच पाहिजे आणि त्या संघर्षात विशिष्ट वर्गाचा जयही हमखास झाला पाहिजे अशा तऱ्हेच्या इतिहास-प्रपंचात योगायोगाला स्थान कोठून असणार? ह्याही ठिकाणी मार्क्स-एंगल्सची रचना काहीही असली तरी प्रत्यक्ष मानवी इतिहास अनेक योगायोग दाखवितो एवढेच म्हणता येईल. पुन्हा फार तपशीलात न शिरता आणि फार उदाहरणे न घेता रशियाच्या राज्यक्रांतीचेच एक प्रकरण घेतले तरी पुरे. रशियाच्या राज्यक्रांतीतील लेनिनच्या कर्तृत्वाच्या भागाची दखल घेऊन बर्ट्रांड रसेल म्हणतो की लेनिनला जर्मनीतून रशियास यावयास मिळाले म्हणूनच रशियन राज्यक्रांती झाली. ज्या दिवशी लेनिनने संबंधित जर्मन अधिकाऱ्याकडे रशियास जाण्याची परवानगी मागितली त्या दिवशी सकाळपासून जर तो जर्मन अधिकारी पोटदुखीने हैराण झालेला असता आणि वैतागाने लेनिनला 'जा' च्या ऐवजी, 'जाऊ नको' म्हणाला असता तर रशियन राज्यक्रांती झाली असती की काय ह्याचा विचारच केला पाहिजे. वैयक्तिक कारणामुळे, योगायोगाने काय घडू शकते आणि मानवी इतिहास कुठे भरकटू शकतो ह्याचे रसेलने आणखी एक मनोरंजक उदाहरण दिले आहे. इंग्लंडचा राजा आठवा हेन्री ॲन बोलिन ह्या सुंदर स्त्रीच्या

प्रेमात पडला नसता तर आज अमेरिका अस्तित्वात नसती. ह्यातली कारणपरंपरा अशी : रोमच्या पोपने आठव्या हेन्रीला ॲन बोलिनशी लग्न करण्यास संमति दिली नाही म्हणून इंग्लंडचे आणि पोपचे संबंध तुटले, म्हणून पोपची कोणतीही कृती आठव्या हेन्रीला मान्य होईना. म्हणूनच पोपने स्पेन आणि पोर्तुगालला अमेरिका खंड देऊ केले ते आठव्या हेन्रीने मानले नाही. जर आठवा हेन्री ॲनच्या प्रेमात न पडता तर त्याचे पोपशी भांडण झाले नसते, इंग्लंड कॅथलिकपंथीय आणि पोपच्या आज्ञेतले असे राष्ट्र राहिले असते, पोपची योजना त्याने मानली असती आणि अमेरिका म्हणजे स्पेनच्या साम्राज्याचाच एक भाग अशीच राहिली असती. ही उदाहरणे थोडीशी चमत्कारिक दिसतात खरी पण निरनिराळ्या कारणांनी मानवी इतिहासात अशा काहीही गोष्टी घडण्याचा संभव असतो एवढेच रसेलला दाखवावयाचे आहे. ( Understanding History पृ. ९–५६ )

**अपुरा मार्क्सवाद :**

मार्क्सप्रणीत इतिहासभाष्य चुकीचे आहे आणि प्रत्यक्ष ऐतिहासिक घटनांशी त्यांची सांगड घालता येत नाही ह्याची सर्वात अधिक जाणीव खुद्द लेनिनलाच झाली असावी. यशस्वीपणे कृती केल्यानंतर ही घटना मार्क्सच्या विवेचनामध्ये बसविता येणार नाही हे लक्षात घेऊन लेनिनने काही भर घालून आणि काही मुरड घालून मार्क्सचे इतिहासाचे तत्त्वज्ञान नव्याने मांडले. मार्क्सच्या इतिहासभाष्याप्रमाणे नव्या क्रांतीकार्यात शेतकऱ्यांना जागा नव्हती. लेनिनने तर शेतकऱ्यांच्या पाठिंब्यावरच रशियन राज्यक्रांतीचा चमत्कार घडवून आणला होता. नव्या इतिहासाच्या तत्त्वज्ञानात ह्या शेतकऱ्यांना जागा करून देणे लेनिनला भागच होते. शेतकरीही क्रांती करू शकतात, मात्र त्यांना योग्य नेतृत्व मिळाले पाहिजे अशी पुस्ती लेनिनने मार्क्सवादाला जोडली. ह्यातील 'योग्य नेतृत्व' ही बाबसुद्धा मुद्दाम लक्षात घेण्यासारखी आहे. यशस्वी क्रांतीनंतर मार्क्सवादी तत्त्वांनुसार रशियाची पुनर्रचना करण्याचा प्रश्न पुढे ठाकला तेव्हा त्या संबंधात मार्क्सच्या लिखाणातून कोणतेही मार्गदर्शन मिळत नाही, अशी स्वच्छ कबुली लेनिनने दिली, आणि साम्यवादाचे स्वप्न साकार करण्यासाठी कामगारवर्गाच्या सत्तेची हुकूमशाही म्हणजेच कामगार पक्षाची आणि पक्षाच्या नेत्याची वैयक्तिक हुकूमशाही अशा प्रकारचे पुष्कळ नवे विवेचन लेनिनने केले. पक्ष, पक्षनेता ह्यांची स्थाने व अधिकार वगैरे गोष्टी मार्क्सच्या भविष्यपुराणात क्वचित कुठे सुचविल्या गेल्या असतील पण लेनिनने सांगितल्या त्या स्वरूपात मुळीच आलेल्या नव्हत्या. रशियन राज्यक्रांती ही मार्क्सच्या इतिहासविवेचनाला धरून आहे हे दाखविण्यासाठी लेनिनला खूपच बौद्धिक कसरती कराव्या लागल्या.

मार्क्स-एंगल्सच्या इतिहासभाष्यात इतिहासाच्या प्रत्यक्ष प्रवाहात आर्थिक हितसंबंध आणि त्यानुसार घडणाऱ्या घटना ह्याखेरीज अन्यही गोष्टी येऊ शकतात ह्याची कुठे कुठे थोडीशी दखल आहे. परंतु इतिहासाचा प्रवाह एकंदरीत ठराविक दिशेने आणि ठराविक पद्धतीनेच वहात जाणार आणि अखेरच्या भांडवलदार आणि कामगार ह्यांच्या वर्गसंघर्षानंतर वर्गहीन समाज अस्तित्वात आला की मगच तो वहाण्याचा थांबणार हा आग्रह कुठेही सुटलेला नाही. आपले विवेचन एकांगी आणि अत्याग्रही स्वरूपाचे होऊ नये ह्याची काळजी मार्क्सने मधून मधून घेतली आहे. सामाजिक चालीरीती, संस्कार, सवयी, नेतृत्व इत्यादींमुळे इतिहासाच्या प्रवाहाला वेगळे वळण लागण्याचा संभव असतो ह्याचीही जाणीव त्याच्या लेखनातून क्वचित दिसते. एंगल्सने तर आपल्या आयुष्याच्या अखेरीअखेरीस एके ठिकाणी स्वच्छ लिहून ठेवले आहे की त्याने क्रांतीविषयी जे सिद्धांत मांडले होते ते कोलमडण्याच्या मार्गावर आहेत. रस्त्या-रस्त्यातून दंगे करून आणि चौकाचौकातून हुल्लडबाजी करून क्रांती घडवून आणण्याचा आमचा मार्ग आता निरर्थक ठरेल असे वाटते. कारण कामगारांचे प्रतिनिधी लोक-सभेवर जाऊन त्यांच्या हिताचे कायदे करतील असेही शक्य होईलसे वाटते आहे. हातात प्रत्यक्ष शस्त्र घेण्याचे कारण उरलेले नाही. कारण मतदानाचे मोठे हत्यार आता कामगाराचे हाती आलेले दिसते. अशा तऱ्हेने मार्क्स आणि एंगल्स ह्या दोघां-च्याही लिखाणातून त्यांनी स्वतःच आपली मते बदलल्याचे, आपल्या मतांना मुरड घातल्याचे, अपवाद सांगितल्याचे असे पुरावे काढता येतील. तथापि इतिहासाच्या प्रवाहाला जवळजवळ निश्चित अशी गति आणि दिशा आहे आणि अंतिम ध्येयही पक्के आहे ही विचारसरणी मात्र त्यांनी कधीही सोडली नाही.

## मार्क्सवादी इतिहासमीमांसा आणि प्रत्यक्ष इतिहास :

पुढील काळात जगात पुष्कळ ठिकाणी साम्यवादी पक्ष स्थापन झाले. साम्यवादी क्रांत्याही होण्याची तयारी होऊ लागली आणि त्याबरोबर मार्क्सवादी विचारांचाही पुष्कळ प्रचार झाला. देशोदेशीचे मार्क्सवादी विचारवंत नवे तत्त्वज्ञान बोलू लागले नवा इतिहास सांगू लागले. हे मार्क्सवादी खुद्द मार्क्सपेक्षाही अधिक हटवादी आणि अधिक आग्रही असल्याचे पुष्कळ वेळा दिसते. आपल्या विवेचनाला मुरड घालायला मार्क्स-एंगल्स तयार झाले असते पण नवे मार्क्सवादी मात्र तयार होणार नाहीत.

तथापि, काहीही असले तरी पूर्वी अनेकदा म्हटल्याप्रमाणे इतिहाससंबंधीचा एखादा दृष्टिकोन, एखादी विचारसरणी, कितीशी ग्राह्य किंवा अग्राह्य आहे ह्यासंबंधीचा पुरावा शेवटी प्रत्यक्ष ऐतिहासिक घटनातच शोधावयाचा असतो. मार्क्सचे प्राचीन इतिहाससंबंधीचे भाष्य सोडून दिले आणि अलीकडच्या काळातील भांडवलदार

आणि कामगार ह्यांच्यातील वर्गकलहावर आधारलेली इतिहासमीमांसा तेवढीच तपासून पहायचे ठरविले तरीही मार्क्सने दाखविलेली दिशा ही एकमेव दिशा नाही; त्याने सांगितलेला मार्ग तो एकच मार्ग नाही आणि त्याने केलेली भाकिते खरी ठरतात असे नाही हे सगळे दिसून येईल. खाजगी मालमत्ता नष्ट न करताही समाजात प्रत्येकाला त्याच्या गरजेप्रमाणे आणि लायकीप्रमाणे मिळेल अशी रचना अशक्य नाही असे अनेक ठिकाणच्या प्रगतीवरून आज स्पष्ट दिसत आहे. भांडवलशाही नष्ट करावयाची असेल किंवा निदान तिच्यावर नियंत्रणे बसवायची असतील तर त्यासाठी रक्तपात किंवा सशस्त्र क्रांती झालीच पाहिजे असे शास्त्र नाही असेही इतिहासात अनेकदा दिसून आले आहे. आज जगात कित्येक देशात साम्यवाद आला आहे. त्याचे प्रकार वेगवेगळे आहेत. साम्यवाद आणण्याच्या पद्धतीही वेगवेगळ्या होत्या. ही साम्यवादी राष्ट्रे कुठे जाणार आहेत ते कळायला काहीही मार्ग नाही. साम्यवादावाचून तरणोपायच नाही असेही म्हणता यावयाचे नाही. प्रत्येक भांडवलशाही समाज विशिष्ट अवस्थेतून जाईल; तिथे विशिष्ट प्रकारची क्रांती होईल; नंतर विशिष्ट साच्याची कामगार हुकूमशाही अस्तित्वात येईल आणि तिची गरज संपली की अंती एक वर्गविहीन आणि राज्यविहीन असा समाज निर्माण होईल अशा तऱ्हेचा मार्क्सवादी इतिहास प्रत्यक्ष प्रत्ययास येत नाही. प्रत्यक्ष ऐतिहासिक घडामोडींनी मार्क्सवाद अपुराच नव्हे तर चुकीचा ठरविला आहे. परंतु तरीही भोळ्या भावाने किंवा जाणूनबुजून विशिष्ट हेतूने मार्क्सचा गॉगल लावूनच इतिहासाकडे पाहिले की एक एक घटना कशा काळ्यानिळ्या दिसत असतील ह्याची कल्पनाच करावी ! असे काही मनोरंजक प्रयोग भारतीय इतिहासाच्या समालोचनाबाबतही झालेले आहेत.

**मार्क्सवादानुसारी इतिहासकथनाचा एक भारतीय प्रयोग :**

मार्क्सचे वर्गविग्रहाचे सूत्र पायाभूत मानून, सामाजिक जीवनाची आर्थिक बाजू ही निर्णायक स्वरूपाची धरून भारतातील ऐतिहासिक घडामोडींचे एक निराळे आणि नवीन दर्शन देण्याचे प्रयत्न झाले आहेत. खुद्द कार्ल मार्क्स पासून ह्या उद्योगाचा प्रारंभ दाखविता येईल. श्री. लालजी पेंडसे, श्री. श्री. अ. डांगे इत्यादी साम्यवादी विचारवंतांनी ह्या दृष्टिकोनातून भारतीय इतिहासाच्या काही भागांचे निराळे अर्थ लावले आहेत. अशा स्वरूपाच्या सर्व लेखनाचा आढावा घ्यावयास येथे जागा नाही. तथापि एकदा ह्या प्रकाराने इतिहास सांगावयाचा म्हटला की तो कसा सांगावा लागेल आणि कसा सांगितला जातो हे एखादे उदाहरण घेऊन पहाणे मनोरंजक आणि उद्बोधक होईल.

मार्क्सचे तत्त्वज्ञान शिरसावंद्य मानून भारतीय इतिहासाचे अवलोकन करण्याचा सर्वांत मोठा आणि सर्वात प्रसिद्ध उद्योग कै. प्रा. दामोदर धर्मानंद कोसांबी ह्यांनी केला. आपल्या त्या गाजलेल्या ग्रंथाच्या ( An Introduction to the Study of Indian History ) पहिल्या प्रकरणातच त्यांनी स्पष्ट केले आहे की त्यांच्या ग्रंथापुरता इतिहास म्हणजे दुसरे तिसरे काही नसून निर्मितीची साधने आणि तज्जन्य सामाजिक संबंध ह्यांच्या विकासाचा कालक्रमवार आढावा आहे. ( " For the purpose of this work, history is defined as the presentation, in chronological order, of successive developments in the means and relations of production " 1·1 ) आर्थिक हितसंबंधातून इतिहास घडत जातो, बदलत जातो. तो इतिहास जनता घडविते; कुणी धर्मसंस्थापक किंवा राजेमहाराजे ह्यांचे ते काम नव्हे. ( प्रस्तावना, पृ. Viii ) कुणी एखादा राज्यकर्ता सुधारणा करतो आणि म्हणून समाजस्थिति बदलते असे नाही तर उलट राज्यकर्ता कसा असावा हेच मुळी आर्थिक परिस्थितीने ठरते ( " The type of kingship as a function of the property relations and surplus produced, depends upon the method of agriculture, not conversly पृ. १३ )

सम्राट अशोकाचे उदाहरण घेऊन वरील मुद्दा प्रा. कोसांबींनी अधिक स्पष्ट केला आहे. अशोकाने पशुहत्त्येवर निर्बंध घातले, कारण ती एक त्या काळची गरज होती. एका शिलालेखातून अशोक काटकसरीचा संदेश देतो; कारण तीही त्या काळच्या घसरलेल्या आर्थिक परिस्थितीतील एक आवश्यक गोष्ट होती. रस्त्याच्या कडेने अशोकाने आमराया लावल्या, सावली देणारी इतर झाडी निर्माण केली, विहिरी खोदल्या, विश्राम स्थाने बांधली– का ? फिरत्या व्यापाऱ्यांच्या सोईसाठी, वाढत्या व्यापाराच्या सोईसाठी ह्या सर्व गोष्टी हव्याच होत्या. हे सर्व सिद्ध करण्यासाठी प्रा. कोसांबी आपल्या ग्रंथात खच्चून आणि खेचून मूळ ऐतिहासिक आधार देतात. ( पृ. १८८–१९३ ) पण तरीही त्यांनी शंकेखोर वाचकाची खात्री कशी पटावी ? त्याला अनेक प्रश्न पडतात ? पशुहत्त्याबंदीची काय गरज होती ? असेल तर ती अशोकाचे पूर्वी आणि नंतर नव्हती काय ? त्याच्या आधीच्या किंवा नंतरच्या काळी राजाला तशा तऱ्हेची बंदी घालायला जनतेने प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे भाग पाडले नाही हे कसे ? उलट पुढे पुष्यमित्र शुंग उघड उघड यज्ञसंस्थेचे पुनरुज्जीवन करण्यास धजतो ह्याचा अर्थ काय ? आणि तसेच काटकसरीविषयी अशोक जर इतका आग्रही होता तर धर्मप्रचारासाठी त्याने केलेला अवाढव्य खर्च न्याय्य कसा म्हणता येईल ? व्यापाराचीही तीच कथा. अशोकाने प्रवाशां-

साठी केलेल्या सर्व सुखसोयी वाढत्या व्यापाराच्या हितासाठी जर असतील तर मग हे एकदम अशोकाच्या कालीच कसे काय घडते ? त्याच्या आधी कित्येक शतके मगधात आणि मगधाबाहेर भरपूर व्यापार चालत असल्याचे हवे तेवढे अस्सल पुरावे आहेत. तेव्हा अशोकाला अशोक म्हणून; एक व्यक्ती म्हणून; काही ध्येये, धोरणे होती; सर्वसत्ताधीश असल्यामुळे तो त्यांचा पाठपुरावा करू शकत होता आणि करीतही होता हे लक्षात घेतल्याखेरीज त्याच्या काळातील सर्व घटनांचा नीट उलगडा होणेच शक्य नाही. अशोकाप्रमाणे पुष्यमित्र शुंग, समुद्रगुप्त, हर्ष अशा सर्वच स्वतःचे व्यक्तिमत्व असलेल्या राजांच्या कारकीर्दींच्या काळांविषयी म्हणावे लागेल. ह्या नृपतींप्रमाणेच बुद्ध, महावीर इत्यादी लोकोत्तर पुरुषही मार्क्सवादी साच्यात बसविता येणार नाहीत.

मार्क्सवादी पद्धतीने सर्व घडामोडींचा अर्थ लावण्याचे ठरविले की कसे विसंगत बोलावे लागते ह्याचे आणखी एक उदाहरण ह्याच ग्रंथातून घेता येईल. कोणत्याही सामाजिक संक्रमणाचा पाया आर्थिकच कसा असतो हे दाखविण्यासाठी प्रा. कोसांबींनी पुण्याजवळच्या फासे पारध्यांचे उदाहरण घेतले. सरकारने कसायला शेतजमीन देऊ केल्याबरोबर ह्या गुन्हेगारीकड प्रवृत्ती असलेल्या आदिवासी टोळीत क्रांती होऊ लागली, त्यांची जीवनपद्धती बदलू लागली. ( पृ. ३१ ) आता हे बरोबर धरले तरी मग असे विचारता येईल की सर्व आदिवासी टोळ्यांचे बाबतीत तुम्ही अशी ग्वाही देऊ शकाल काय ? तशी देता येणार नाही असे स्वतः प्राध्यापकमहाशयच भिल्ल, संताळ वगैरेंची उदाहरणे घेऊन अन्यत्र सांगतात; ( पृ. २४–२५ ) आणि त्या जमातींवर रूढींचे प्राबल्य फारच आहे असे त्याचे कारणही देतात ! असे असेल तर मग तो मार्क्सीय सिद्धांत कोठे राहिला ? आर्थिक लाभाच्या गणितापेक्षा रूढींचे सामर्थ्य अधिक ठरावे काय ?

प्रा. कोसांबींच्या ग्रंथातून विसंगतीची आणि विपर्यासांची अशी कितीतरी उदाहरणे काढता येतील. वर्गविग्रहात्मक असाच इतिहास लिहावयाचा अशी ग्रंथकाराची प्रतिज्ञाच आहे. त्याच्या इतिहासकथनाला काही विशिष्ट हेतूही आहे. प्रस्तावनेत भारतातल्या दारिद्र्याचे वर्णन करून लेखक म्हणतो : हे असे कसे चालणार ? नीट विचार करून ह्यावर उपाय शोधला पाहिजे, त्यासाठी इतिहासाचा अभ्यास अपरिहार्य आहे. उपाय सापडला की मग योग्य ती कृतीही करण्यासाठी सज्ज झाले पाहिजे. ( " How long can any country remain a democracy with this little sustenance for the average man ? The answer has to be worked out by correct thinking,

for which the study of history is quite indispensable. But the solution has then to be made a reality by correct action, which means a step beyond mere study of the past. " पृ. ix ) ह्यावर एवढेच म्हणता येईल की कै. प्रा. कोसांबींना जनतेला क्रांतीचा संदेश देण्याचा जरूर हक्क होता, पण त्यासाठी खोटानाटा इतिहास लिहिण्याची मात्र आवश्यकता नव्हती.

परंतु एकदा इतिहास राबवायचा म्हटले की सत्यासत्यविवेक कोठे येतो ? प्राचीन काळी ठिकठिकाणच्या पुरोहितांनी देवधर्माच्या नावाखाली इतिहासाचे जसे खेळ केले तसेच आता देशोदेशींचे साम्यवादी मार्क्सवादाच्या नावाखाली करीत आहेत; दुसरे काय ?

**मार्क्सवादी इतिहासभाष्यातील भलेबुरे :**

मात्र तरीही इतिहासविवेचनात मार्क्सचे आणि मार्क्सवादी विवेचनाचे काही एक महत्त्व नाकारता येणार नाही. मार्क्सने मानवी इतिहासातून ईश्वर काढून टाकला. धर्मासारख्या गोष्टी पुष्कळदा स्वार्थमूलक असतात, ते काही बुरखे असतात, पाठीमागचे सत्य काही वेगळेच असते हेही मार्क्सवादी इतिहासविवेचनातून स्वच्छ सांगितले गेले. ही जी मार्क्सवादातील मूलभूत ऐहिक भूमिका आहे ती निःसंशय महत्त्वाची आहे. अशी भूमिका मार्क्सवादातच प्रथम घेतली गेली असे मानण्याचे मुळीच कारण नाही. तथापि इतिहासाच्या ऐहिकतेवर आणि ऐहिकातील जीवनाच्या आर्थिक बाजूवर विशेष भर देण्याचे काम मार्क्सवादाने केले हेही नाकारता येणार नाही. वैचारिक इतिहासात हे मोलाचे मानले गेले पाहिजे.

मात्र मार्क्सवादाचे आकर्षण सर्वात अधिक वाढले ते त्यातील संदेशामुळे. आजपर्यंतचा सर्व इतिहास पिळले आणि पिळले जाणारे ह्यांच्यातील लढ्यांचा आहे. अशा प्रत्येक लढ्यात पिळल्या जाणाऱ्यांचा जय होतो. आणि ह्या अखेरच्या वर्ग-कलहातही पिळणाऱ्या भांडवलदारांविरुद्ध पिळल्या जाणाऱ्या कामगारांचा हमखास विजय होणार हे मार्क्सवादी सूत्र म्हणजे एक प्रकारची स्फूर्ती आणि चेतना ठरली. मार्क्सवादी इतिहासभाष्य इतर मार्क्सवादाबरोबरच लोकप्रिय झाले ते त्यातील ह्या चेतनेमुळेच. मार्क्सवाद हे आवाहन ठरले. संघटनेचा मंत्र ठरला. अर्थात् इतिहासाच्या अभ्यासकाला त्या मंत्राने मुग्ध होण्याचे काहीच कारण नाही. जर भोवतालच्या समाजात पिळवणूक असेल, जुलूम जबरदस्ती असेल तर ती भोगणाऱ्यांना इतिहासाचा दाखला न देताही अन्यायाविरुद्ध आणि जुलूमाविरुद्ध लढण्यासाठी एकत्र आणता येईल. तसे करावयास कोणतीच हरकत नाही. किंबहुना तसेच केले पाहिजे. परंतु

आपला आजचा लढ्याचा कार्यक्रम आणि आजवरच्या माणसाचा इतिहास ह्यांचा संबंध जोडण्याची काय जरूरी पडावी हे उलगडत नाही. असा अनाठायी संबंध जोडण्यातूनच अशास्त्रीय मार्क्सवाद जन्मास आला. इतिहासाच्या तर्कशुद्ध विवेचनात इतिहासाची नियमबद्धता सांगणारा आणि एक प्रकारचा नियतिवादच मांडणारा असा मार्क्सवाद स्वीकारता येण्यासारखा नाही. तो स्वीकारल्याने माणसाचे मनुष्यत्वच नाकारले जाते. म्हणूनच बर्ट्रांड रसेल म्हणतो :

" The most important error in his ( Marx's ) theory, to my mind, is that it ignores intelligence as a cause. Men and apes, in the same environment, have different methods of securing food; men practice agriculture, not because of some extra-human dialectic compelling them to do so, but because intelligence shows them its advantage... I do not wish to suggest that intelligence is something that arises spontaneously, in some mystical uncaused-manner. Obviously it has its causes, and obviously these causes are in part to be sought in the social environment. But in part the causes are biological and individual. Men of supreme ability are just as definitely congenitally different from the average as are the feable-minded. And without supreme ability fundamental advances in methods of production cannot take place.

( Understanding History पृ. ३५-६ )

-रसेलच्या ह्या मतातील काही भागांची विस्तृत चर्चा वर झाली असल्यामुळे आणि काही भागांची पुढील दोन प्रकरणातून व्हावयाची असल्याने अवतरणाचे शब्दशः भाषांतर दिले नाही तरी चालण्यासारखे आहे.

## संदर्भसाहित्य :


( 1 ) A History of Historical Writing
- Barnes. H. E., New York, 1962

( 2 ) Ideas and Men
– Brinton, Crane; New York, 1950

( 3 ) What is History
– Carr E. H.; London, 1962

( 4 ) Communism, Fascism and Democracy
– ed. Cohen, Karl; New York 1962
( 5 ) The Idea of History
– Collingwood R. G.; Oxford 1961
( 6 ) Theories of History
– ed. Gardiner, Patrick; Glencose Illinois, 1961
( 7 ) The Laws of Social development
– Glezerman, G., Moscow.
( 8 ) The Hero in History
– Hook, Sidney; New, York 1963
( 9 ) Cotemporary History in the Soviet Mirror
– ed. Keep John; London, 1965
( 10 ) An Introduction to the Study of Indian History
– Kosambi D. D.; Bombay, 1959
( 11 ) Marxism
– Lichtheim, George; London, 1961
( 12 ) Marxism and Contemporary Science
– Lindsay, Jack; London, 1949
( 13 ) Marx–Engels–Selected Works ( Vols. I–II )
– Moscow, 1950
( 14 ) Theory and History
– Mises L. V.; London, 1958
( 15 ) The Open Society and its Enemies ( Vols. I–II )
– Popper K. R.; London, 1945
( 16 ) A History of Russia
– Riasanovsky, Nicholes V., Oxford, 1963
( 17 ) Understanding Histoy
– Russell, Bertrand; New York, 1937
( 18 ) The Economic Interpretation of History
– Seligman, E. R. A; New York, 1902
( 19 ) An Introduction to Philosophy of History
– Walsh, W. H.; London, 1961

# प्रकरण ८ वे

# महापुरुषाचे कर्तृत्व आणि इतिहास

## ऐतिहासिक व्यक्ती आणि इतिहासाचे कालखंड :

इतिहास समजून घेण्याची एक बाळबोध पद्धत अशी आहे की, सिंहासनाधिष्ठित राजांच्या किंवा अन्य प्रकारे महत्त्वास पावलेल्या व्यक्तींच्या अनुरोधाने कालखंड कल्पून भूतकालाचा आढावा घ्यावयाचा. अकबराचा काळ, औरंगजेबाची कारकीर्द, नेपोलियनचे युग अशा प्रकारांनी इतिहास पुष्कळदा सांगितला आणि समजून घेतला जातो.

अशा तऱ्हेने इतिहासाची रचना करण्यात दोन हेतू असू शकतात. एक म्हणजे इतिहासाचे कालखण्ड पाडण्याची ती एक मोठी चांगली सोय असते. सातव्या हेन्रीची कारकीर्द आणि त्यानंतर आठव्या हेन्रीची कारकीर्द अशा पद्धतीने इतिहासाचा आढावा घेणारा सातव्या हेन्रीच्या कारकीर्दीतील इंग्लंड आणि आठव्या हेन्रीच्या कारकीर्दीतील इंग्लंड अगदी भिन्न होती असेच मानील असे नाही. इंग्लंडची परिस्थिती सातव्या हेन्रीच्या मृत्यूनंतर आठव्या हेन्रीच्या अंमलाखाली फारशी बदललेली नसेलही. कदाचित् आठव्या हेन्रीची कारकीर्द अर्धीमुर्धी झाल्यानंतर मधेच इंग्लंडच्या समाजजीवनात लक्षात येण्यासारखा बदल झाला असेल. दुसऱ्या एखाद्या दृष्टीने इंग्लंडच्या इतिहासाची रचना करताना जिथे समाजजीवन निश्चितपणे बदलले तेथूनही दुसरा कालखण्ड कल्पून इतिहासाचे अवलोकन करता येईल. कालखंड पाडणे ही एक सोय आहे. आणि प्रथम व्यक्तींच्या अनुरोधाने इतिहासाचे कालखंड पाडण्यात पुष्कळदा अशी नुसती एखादी सोय पाहिलेली असते.

तथापि ठळक व्यक्तींच्या जीवनानुसार कालखंड पाडण्यात कधी एक तत्त्व गृहीत धरलेले असते. ते असे की इतिहास घडतो तो कर्तबगार व्यक्तींमुळे. अलौकिक बुद्धीची आणि प्रचंड सामर्थ्याची माणसे आपल्याला हवा तसा इतिहास निर्माण करू शकतात. आपल्या मताप्रमाणे ते काळ वाकवू शकतात, फिरवू शकतात. अशा एका महापुरुषाच्या मृत्यूनंतर दुसरा एखादा महापुरुष पुढे आला की त्याच्या कल्पनानुसार व सामर्थ्याप्रमाणे इतिहासाची दिशा बदलते. प्रत्येक वेळी इतिहास घडविला जातो तो लोकोत्तर पुरुषामुळेच आणि म्हणूनच इतिहासाचे वास्तव अवलोकन महा-

पुरुषांच्या जीवनकालांच्या अनुरोधानेच झाले पाहिजे. अशी ही दृष्टी असते. " शिवाजी होता म्हणूनच मराठ्यांचे स्वराज्य स्थापन झाले ", " महात्मा गांधी होते म्हणूनच भारताला स्वराज्य मिळाले " आणि त्याचप्रमाणे " हिटलर झाला नसता तर जगावर दुसऱ्या महायुद्धाची आपत्ती ओढवलीच नसती " अशासारखी जी विधाने पुष्कळदा केली जातात त्यामध्ये अद्वितीय सामर्थ्याच्या व्यक्तींची कर्तुम-कर्तुम शक्ती गृहीत धरलेली असते.

खरोखरी इतिहास कोण घडवितो ? जे पुरुषोत्तम काल घडवितात असे वाटते ते वस्तुतः स्वतःच्या वैयक्तिक कर्तबगारीने तसे करतात काय ? की दुसऱ्या कोणत्या कारणांनी इतिहास घडतो आणि एखादा पुढारी हा केवळ साधनभूत आणि निमित्तमात्र असतो ? महापुरुष काळ घडवितो की काळच महापुरुष निर्माण करतात ? आणि आता ह्या ठिकाणी काल म्हणजे नेमके काय ? इतर सर्व माणसे की आणखीही काही नैसर्गिक किंवा दैवी कारणे ?

### दैववाद्यांचा दृष्टिकोन :

वरील प्रश्नांची अनेकविध उत्तरे दिली गेली आहेत. इतिहास म्हणजे ईश्वरी इच्छेचे खेळ किंवा ठराविक गतीने आणि दिशेने फिरणारे एक विश्वचक्र किंवा कालचक्र असे मानणारांना महापुरुषाच्या कर्तृत्वाची महती अर्थातच मान्य होण्यासारखी नाही. हिंदू पुराणातील अवताराची कल्पना ह्या संबंधात मुद्दाम लक्षात घेण्यासारखी आहे. एखाद्या माणसाने लोकोत्तर कामगिरी करून इतिहासाला काही निराळे वळण लावले असे जरी स्पष्ट दिसले आणि इतिहासाला कलाटणी मिळाली असे जरी मान्य केले तरीसुद्धा ती गोष्ट कुणा मानवामुळे झाली असे समजण्याचे काहीच कारण नाही. ते सारे ईश्वरी इच्छेनेच झाले आणि ज्याने काही महाकार्य केले असे वाटते तो करणारा दुसरा तिसरा कुणी नसून ईश्वराचाच एक अवतार होता अशी कल्पना मांडण्यात आली. म्हणूनच गौतम बुद्धाला दशावतारात स्थान मिळाले. अलीकडच्या इतिहासातही शिवाजीला अवतार मानण्याइतकी भावना शिवकालीन साहित्यात व्यक्त झालेली दिसते. इतिहास कसा घडवावयाचा, केव्हा कोणती घटना व्हायची हे सगळे ठरलेलेच आहे. कोणत्या तरी एका विशिष्ट कामगिरीसाठी विशिष्ट माणूस साधन म्हणून नियुक्त केलेला असतो. त्या पुरुषामुळेच ती गोष्ट होणे किंवा न होणे असा प्रकार नसतो. भगवद्गीतेत श्रीकृष्णाने अर्जुनाला स्वच्छ बजावले की, तू भ्रमात पडला आहेस. कौरवांना मारीत नाही म्हणतोस तर ठीक आहे, काही बिघडत नाही, कौरव मरायचे हे पक्केच आहे, त्यांना तू मारतोस की न मारतोस हा प्रश्न अगदी गौण आहे. तेव्हा भविष्यकाळाचे सबंध तपशील जेव्हा अगोदरच असे पक्के ठरलेले आहेत तेव्हा

कोणत्याच व्यक्तीच्या कोणत्याच कृतीची त्या विशिष्ट व्यक्तीचे कर्तृत्व म्हणून दखल घेण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

### वंशनिष्ठ आणि भूगोलनिष्ठ इतिहासमीमांसेतील दृष्टिकोन :

मागील प्रकरणातून उल्लेखिलेल्या भौगोलिक परिस्थिती आणि वांशिक वारसा ह्यांच्या अनुरोधाने जे इतिहासभाष्य केले जाते त्यातही व्यक्तीच्या कर्तृत्वाची स्वतंत्रपणे दखल घेण्याचे कारण उरत नाही. विशिष्ट भौगोलिक परिस्थितीत इतिहास विशिष्ट प्रकारे घडणारच. तो निराळा करून दाखविणे कोणत्याही व्यक्तीच्या हाती असू शकत नाही. कारण व्यक्ती कितीही समर्थ असली तरी नवा निसर्ग निर्माण करू शकत नाही. त्याचप्रमाणे विशिष्ट वंशाची माणसे आपल्या रक्तगुणामुळे महान् कामगिरी बजावणार. त्या उच्च वंशात काही व्यक्ती नेतृत्व करतील परंतु ते नेतृत्व हे इतिहास बदलण्याचे कारण नव्हे. तो वांशिक गटच इतिहास घडवायला स्वभावतः समर्थ असतो. तेव्हा अशा तऱ्हेच्या विचारसरणीतही कर्तबगार पुरुषांना मुद्दाम वेगळी दखल घेण्याइतके स्थान असू शकत नाही हे उघड आहे.

### इतिहासाचा सामाजिक अन्वयार्थ आणि महापुरुष :

इतिहासाचा काही सामाजिक आणि आर्थिक अन्वयार्थ लावणाऱ्या स्पेंग्लर, सोरोकिन, टॉयन्बी आणि मार्क्स वगैरेसारख्यांच्या इतिहासभाष्यांतूनही कर्तबगार माणसे महत्त्वाची ठरत नाहीत. सामाजात काही एक गरज निर्माण होते. त्या गरजेतून नेतृत्व निघते. ते नेतृत्त्व ती गरज भागवील असेच असावे लागते. म्हणजे नेतृत्वाचा प्रकार समाजाने ठरविलेला असतो. गरज निर्माण झाली की नेता निर्माण होतोच. ह्यामुळे 'क्ष' मनुष्य झाला नसता तर अमुक एक गोष्ट होऊ शकली नसती असे कधीही म्हणता येत नाही. 'क्ष' नेता झाला नसता तर त्याचे जागी 'ज्ञ' झाला असता. समाजाला विशिष्ट कामासाठी विशिष्ट पुढारी पाहिजे असतो. तो निर्माण होणे हे अटळ असते. कुणा एका व्यक्तीच्या इच्छेचा तो प्रश्न नसतो. उदाहरणार्थ भांडवलदार आणि कामगारवर्ग ह्यांच्यातील वर्गकलह शिगेला पोचला की कामगार क्रांतीसाठी सज्ज होतात. ते क्रान्ती करणारच आहेत. भांडवलशाही संपुष्टात यायचीच आहे. हे काम विशिष्ट गुणांच्या लोकोत्तर पुढाऱ्यावाचून अडून राहील असे मुळीच नाही. क्रांतिकार्य सुसूत्रपणे पुढे लोटण्यासाठी आवश्यक ते संघटनाचातुर्य असणारा माणूस पाहिजे हे खरे, पण तो निर्माण झाला नाही तर क्रांती कशी होणार म्हणून चिंतेत पडण्याचे कारण नाही. तसा नेता मिळणारच. तेव्हा नेते किंवा महापुरुष हे म्हणजे परिस्थितीतून आपोआप निर्माण होणारी मानवी साधने आहेत. स्वतंत्र कर्तृत्वाच्या अलौकिक व्यक्ती म्हणून त्यांचे कौतुक करण्याचे काहीच कारण नाही.

## महापुरुषवादी इतिहासभाष्य :

अशा तऱ्हेचे विचार मांडले जात असतानाच काही इतिहासभाष्यकार अगदी निराळ्या दृष्टिकोनातून हा प्रश्न पहात आले आहेत. एकोणिसाव्या शतकात कार्लाइलने इतिहास म्हणजे दुसरे तिसरे काही नसून एकामागून एक महापुरुषांची जीवनचरित्रे आहेत असे अगदी निःसंदिग्धपणे सांगितले. अलीकडे विल्यम जेम्स, ख्रिस्तोपर डॉसन वगैरेंनेही कार्लाइलइतक्या आग्रहीपणाने नव्हे तरी पुष्कळच ठामपणे इतिहासाच्या घडणीत स्वतंत्र प्रज्ञेच्या आणि कर्तृत्वाच्या पुरुषोत्तमांची दखल घेतली गेलीच पाहिजे असे प्रतिपादले आहे. एखादा अद्वितीय सामर्थ्याचा नेता काळाला कलाटणी देऊ शकतो ही गोष्ट लक्षात घेतल्यावाचून भूतकाळाचा आणि वर्तमानकाळाचाही खराखुरा अर्थ समजणार नाही अशी जेम्स, डॉसन वगैरेंची भूमिका आहे.

## महापुरुष कोण ?

वर विशद केलेल्या दोन्ही भूमिका लक्षात घेऊन ह्या प्रश्नाचे विवेचन हाती घेण्यापूर्वी प्रथम एकदोन लहानसे मुद्दे स्पष्ट करून घेतले पाहिजेत. पहिले असे की आपण लोकोत्तर व्यक्ती किंवा महापुरुष अशी जी संज्ञा वापरीत आहोत ती नेमकी कोणत्या प्रकाराच्या व्यक्तीला लागू आहे ह्याबद्दलची आपली कल्पना स्वच्छ असली पाहिजे. काही माणसे केवळ एखाद्या विशिष्ट जागेवर परिस्थितीचा फायदा मिळून आलेली असतात. उदाहरणार्थ, प्राचीन रोमचा एखादा कर्तृत्वशून्य सम्राट किंवा औरंगजेबानंतरचा एखादा मोंगल बादशहा. कदाचित् असा एखादा सत्ताधीश सिंहासनाधिष्ठित असताना पुष्कळ घडामोडी घडतील. राष्ट्राच्या आणि समाजाच्या जीवनात क्रान्तिकारक बदल होतील, पण ते सगळे त्या गादीवर बसलेल्या महाभागाने केलेले नसते. कायदेशीर भाषेत किंवा इतिहासकथनाच्या सोयीप्रमाणे ते त्याच्या नावावर मोडेल इतकेच. तेव्हा समाजात बदल घडविण्याच्या कार्यास ज्याचा प्रत्यक्ष हातभार लागलेला असतो, स्थित्यंतर घडवून आणण्यात ज्या व्यक्तींची कल्पना आणि कर्तबगारी प्रभावी झालेली असते त्याच व्यक्तीबाबत हा महापुरुष शब्द योजावयाचा आहे. त्याचप्रमाणे तो महापुरुष जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रातला असू शकतो हेही ह्या ठिकाणी लक्षात घेतले पाहिजे. महापुरुष म्हणजे फक्त पराक्रमी योद्धे आणि जगज्जेते एवढाच अर्थ घ्यावयाचा नाही. सामाजिक सुधारणांचा पुरस्कार करून सामाजिक संस्थांतून क्रांतिकारक बदल घडवून आणणारा जरूर ते लढे देऊन नवी सामाजिक, आर्थिक घडी बसविणारा किंवा सबंध जगाचा कायापालट होईल अशा तऱ्हेचा नवा विचार देणारा किंवा वैज्ञानिक शोध लावणाराही महापुरुषच होय. ताबडतोब किंवा कालांतराने ज्याच्या कृतीमुळे मानवेतिहासाला निश्चित अशी

कलाटणी मिळाली असा पुरुष, मग तो कोणत्याही क्षेत्रातला असला तरी, ह्या विवेचनाच्या संदर्भात महापुरुषच समजावयाचा आहे.

आणखी एक गोष्ट अशी की ह्या ठिकाणी महापुरुष हा शब्द रूढार्थाने घ्यावयाचा नाही. म्हणजे असे की सामान्यतः आपण मानवजातीवर उपकार करणारा, प्रगतीला हातभार लावणारा, उच्च नैतिक गुणांचा आदर्श असा जो लोकोत्तर माणूस असतो त्याच्याच संदर्भात महापुरुष हा शब्द वापरतो, आणि ते त्या संदर्भात ठीकही असते; परंतु इतिहासाला उलटसुलट कशीही कलाटणी मिळू शकते. मोठ्या प्रमाणावर मानवजातीची हानी करणाऱ्या, पुढे जाणाऱ्या मानवजातीला आपल्या राक्षसी सामर्थ्याने शेकडो मैल मागे खेचणाऱ्या अपकारकर्त्यालाही महापुरुषच म्हणावयाचे आहे. ह्या ठिकाणी 'महा' हे विशेषण सामर्थ्यवाचक आहे. त्यात कोणतेही नैतिक मूल्यमापन अभिप्रेत नाही. ज्याच्या कर्तृत्वामुळे इतिहास बदलला, मग तो चांगल्या प्रकारे असो की वाईट प्रकारे असो, असे म्हणता येईल तो महापुरुष.

### दोन्ही दृष्टिकोनांची तार्किक चिकित्सा :

उपरोक्त समाजशास्त्रीय नियम देणाऱ्यांचे महापुरुषांच्या इतिहासातील स्थानाविषयीचे मत आणि कार्लाइल वगैरेंनी महापुरुषाच्या इतिहासातील निर्णायक स्थानाविषयी घेतलेली भूमिका ही दोन्हीही प्रथम प्रत्यक्ष इतिहासातील दाखले न घेता केवळ तर्काचे कसोटीवर तपासून पाहिली पाहिजेत.

मार्क्स वगैरेंचे मते सामाजिक गरजेतून नेतृत्व आपोआप निर्माण होते. म्हणजे असे की समाजाची विशिष्ट गरज सबंध समाजाला जाणवते. त्या जाणीवेतून तो समाज कृतिप्रवण होतो. जी कृती करावयाची असते ती सबंध समाजाने, आणि त्यांना नेता हवा असतो तो फक्त त्या कार्याचे संघटन व व्यवस्थापन करण्यासाठी. म्हणजे ह्यात गृहीत धरले आहे ते असे की कोणतीही ऐतिहासिक घटना ही नेहमी सगळ्या समाजाने मिळून केलेली कृती असते. कृती कोणती व्हावयाची आणि ती कशी करावयाची हे सगळेच जवळ जवळ तपशीलवार ठरलेले असते. प्रथमतः हे गृहीत-कृत्यच तर्काचे कसोटीला टिकणारे नाही. एखादे प्रचंड कार्य एखादा लहानसा गट किंवा एखादी व्यक्तीसुद्धा योजू शकेल व प्रत्यक्षातही उतरवू शकेल अशी शक्यता सुद्धा मानली पाहिजे. दुसरे असे की समाजाला काही एका कृतीची आवश्यकता तीव्रतेने भासते असे जरी मानले तरी त्यामुळे त्या विशिष्ट कार्याला योग्य असा, अंगी योग्य ते गुण असलेला नेता निर्माण होईलच असे कसे मानता येईल ? कारण विशिष्ट गुणसमुच्चयाच्या व्यक्तीचा जन्म हा समाजावर मुळीच अवलंबून नाही. व्यक्ती जन्माला येते ती अगदी निराळ्या जीवशास्त्रीय कारणांनी.

ह्या जन्माला येणाऱ्या व्यक्तीत कोणते गुण असतील ते त्या नवजात व्यक्तीने माता-पित्यांकडून घेतलेल्या विशिष्ट द्रव्यगुणांवरून ठरते. त्याचा समाजाशी काहीही संबंध नसतो. समाज एखाद्या विशिष्ट वंशाचा किंवा विशिष्ट राष्ट्रीय गुणाचा आहे ह्यामुळेही त्यातील एका विशिष्ट व्यक्तीचे बौद्धिक आणि मानसिक गुणधर्म ठरत नाहीत. वंशाविषयी किंवा राष्ट्रीय गुणाविषयी मांडलेले सर्वसाधारण सिद्धान्त सर्व-साधारणपणे खरे असतात असे जरी वादासाठी मान्य केले तरीही एका विशिष्ट व्यक्तीमध्ये कोणते गुण असतील हे सर्वसाधारण स्वरूपाचे आकडेशास्त्र आणि संभाव्य-तेचे नियम ह्यावरून कधीही सांगता येत नाही. विशिष्ट गुणसमुच्चयाची व्यक्ती विशिष्ट परिस्थितीत काय करू शकेल ह्याचे काही आडाखे कदाचित् बांधता येतील. ती काय करील व कितीशी यशस्वी किंवा अयशस्वी होईल ह्याचे भविष्य वर्तविण्याचा उद्योगही कदाचित् हाती घेता येईल. परंतु हे सारे ती व्यक्ती अस्तित्वात असल्यानंतरच होऊ शकते. पण ती व्यक्ती अस्तित्वात असणे ही मात्र समाजाच्या हातातली गोष्ट नाही.

कार्लाइल वगैरेंचा महापुरुषविषयक सिद्धान्तही असाच तर्काच्या कसोटीला लावून पाहिला पाहिजे. महापुरुष सामाजिक परिस्थितीतून निर्माण होणारच हे आपण मानीत नाही. परंतु महापुरुषच परिस्थिती निर्माण करतात; महापुरुष निर्माण करतील तीच परिस्थिती आणि महापुरुष घडवितील तोच इतिहास अशी मीमांसा तरी मानता यईल काय? माणसामाणसांच्या शारिरिक, मानसिक आणि बौद्धिक गुणात आणि सामर्थ्यात फरक असतो ही उघड दिसणारी गोष्ट आहे. एक व्यक्ती इतर हजारो सामान्य जनांपेक्षा कितीतरी अधिक समर्थ असू शकते हे खरे. परंतु तरीही माणूस कितीही शक्तिशाली झाला तरी, त्याच्या शक्तीच्या ज्या स्वाभाविक मर्यादा आहेत त्या कशा नाकारता येतील? जगातील किंवा एका मोठ्या समाजातील एक व्यक्ती एका बाजूला आणि बाकी सर्व समाज दुसऱ्या बाजूला असे तट पडले तर सबंध समाजाला कोणत्याही अर्थाने गप्प करू शकेल असे सामर्थ्य कोणाही एका व्यक्तीत असू शकत नाही. तेव्हा व्यक्तीला जे करावयाचे असते ते समाजाच्या पाठिंब्यावर, समाजाचे साहाय्य घेऊनच पार पाडावयाचे असते. समाजाला कामाला जुंपल्याखेरीज कोणताही महापुरुष कोणतेही समाजकार्य तडीला नेऊ शकणार नाही. म्हणून मग आता मुद्दा असा उद्भवतो की, समाजातला धुरीण महापुरुष समाजाला कोणत्या प्रकारच्या कामाला जुंपू शकेल? समाजाला अगदी मान्य नसलेल्या आणि त्या एकटच्या व्यक्तीला पटलेल्या अशा एखाद्या कामासाठी त्या व्यक्तीला समाजाचे साहाय्य मिळणेच शक्य नाही. तेव्हा म्हणूनच नेत्याने, महापुरुषाने कोणते काम करावयाचे हे काहीअंशी तरी समाजच ठरवितो हेही बरोबर आहे. इथे मुद्दामच काही अंशी

असा शब्दप्रयोग केला आहे, कारण समाजाची गरज म्हणून आपण जी म्हणतो किंवा समाजाला काय मान्य होईल ह्याबद्दलचाही जो विचार आपण करतो त्यासंबंधात कधी असेही दाखवून देता येईल की समाजाची नेमकी गरज काय आहे आणि समाजाने काय केले पाहिजे हेच मुळी नेता ठरवितो. म्हणजे नेता प्रथम त्याला आवश्यक ती सामाजिक गरज समाजाचे मनात निर्माण करतो आणि मग त्याच स्वनिर्मित गरजे-साठी त्या समाजाचे नेतृत्व करतो.

एकूण तार्किकदृष्टचा समाजातून नेता निर्माण होतो किंवा नेत्यामुळे समाज बदलला जातो ह्यापैकी कोणतेही विधान अंतिम स्वरूपात सिद्धही करता येणार नाही किंवा खोडूनही काढता येणार नाही. महापुरुष आणि महाजनसमाज एकमेकांवर असा काही परिणाम घडवीत असतात की बहुधा ह्यात कुणी कुणाला घडविले अथवा बनविले ह्याचा संभ्रम पडावा. तर्काचे दृष्टीने कार्लाइल वगैरेंप्रमाणे महापुरुषच इतिहास घडवितात असे मानता येणार नाही त्याचप्रमाणे मार्क्स किंवा इतर समाज-शास्त्रीय नियम सांगणाऱ्यांप्रमाणे महापुरुष म्हणजे परिस्थितीच्या हातातील बाहुली मुळीच समजता येणार नाही.

## इतिहासातील उदाहरणे : लेनिन :

आता महापुरुषाचे इतिहासाच्या प्रगतीत किंवा अधोगतीत नेमके स्थान काय असते हे इतिहासातील प्रत्यक्ष काही उदाहरणे घेऊनच पहाणे अधिक फलदायी होईल. परिस्थितीच्या अपरिहार्यतेचा आणि त्यातून अटळपणे निघणाऱ्या आवश्यक त्या नेतृत्वाचा सिद्धान्त मार्क्स व त्याच्या अनुयायांनी अलीकडच्या काळात विशेष हिरीरीने मांडला, रशियातील राज्यक्रांती मार्क्सच्या ऐतिहासिक तत्त्वज्ञानाबरहुकूम झालेली असून सबंध मार्क्सवाद तेथे प्रत्यक्षात प्रत्ययास आलेला आहे असे सांगितले जाते. म्हणूनच मार्क्सची महापुरुषविषयक भूमिका तपासून पहाण्यासाठी रशियन राज्यक्रांती आणि तिचा नेता लेनिन ह्यांच्यातील संबंध अवलोकन करणे प्रशस्त होईल.

१९१७ च्या ऑक्टोबरमध्ये रशियामध्ये राज्यक्रांती होऊन फक्त रशियाच्याच नव्हे तर जगाच्या इतिहासालाही फार मोठी कलाटणी मिळाली. ही राज्यक्रांती पूर्वीच्या कोणत्याही देशातील कोणत्याही क्रांतीहून वेगळ्या प्रकारची होती. एक नव्या प्रकारची राज्यसंस्था आणि निराळ्या तऱ्हेची समाजरचना ह्या क्रान्तीने अस्तित्वात आली. ही क्रांती अपरिहार्य होती काय ? आणि ती क्रान्ती लेनिन नसता तर झाली असती काय ? ह्या प्रश्नाचा बराच ऊहापोह झालेला आहे. सिडने हुक याने आपल्या 'हीरो इन हिस्टरी' ह्या पुस्तकात ह्या प्रश्नाचा सविस्तरपणे खल करून वस्तुस्थिती मांडली आहे.

ऑक्टोबरमधील क्रांतीच्या आधी आठ दहा महिने रशियात अशा प्रकारची क्रान्ती होईल असे भाकित कुणीही केले नव्हते आणि तसे कुणाला पटलेही नसते. मार्क्स आणि मार्क्सवादी समाजवादी क्रान्ती झालीच तर ती औद्योगीकरणात विशेष प्रगत झालेल्या अशा जर्मनीसारख्या राष्ट्रात होईल असेच मानीत आले होते. ज्याने क्रान्ती केली तो खुद्द लेनिन ऑक्टोबर– क्रान्तीच्या पूर्वी काही थोडे दिवसच स्वित्झर्लंडमधील समाजवाद्यांसमोर भाषण करताना आपल्या आयुष्यात तरी आपण समाजवादी क्रान्ती अपेक्षित नाही असे स्पष्ट म्हणाला होता. परंतु तरीही ऑक्टोबर १९१७ मधे रशियात समाजवादी क्रान्ती झाली आणि ती लेनिनच्या नेतृत्वाखालीच झाली हे सत्य आहे. रशियात होती त्याहून कितीतरी अनुकूल अशी परिस्थिती अन्यत्र असतानाही तेथे क्रान्ती झाली नाही आणि रशियातच झाली ह्याचे रहस्य शोधले पाहिजे.

पहिली गोष्ट अशी की रशियातील क्रान्ती ही बहुतेक सर्व इतिहासकारांचे मते तेथील बोल्शेविक पक्षाने घडवून आणली. बोल्शेविक पक्षाला पाठिंबा देणाऱ्या जनतेचे सामर्थ्य ह्या ठिकाणी नाकारावयाचे नाही. तथापि त्या सामर्थ्याचा योग्य प्रकारे उपयोग करून क्रांतीची किमया केली ती बोल्शेविक पक्षानेच ह्यात संशय नाही. आणि ह्यापुढे पहावयाची गोष्ट ती अशी की एप्रिल ते ऑक्टोबर १९१७ मधील लेनिनचे वैयक्तिक कर्तृत्व वगळले तर बोल्शेविक पक्ष ह्याला काही अर्थही उरत नाही. बोल्शेविक पक्षाने जो कार्यक्रम हाती घेतला व पार पाडला तो लेनिनवाचून कधीही झाला नसता. केरेन्स्कीच्या तात्पुरत्या सरकारला पदच्युत करून सत्ता हातात घेण्याचा कार्यक्रम लेनिनने एप्रिलमध्ये आखला. हा कार्यक्रम बोल्शेविक पक्षाला अजिबात मान्य होण्यासारखा नव्हता. याला सडकून विरोध झाला. १९२४ मध्ये स्टॅलिननेही कबूल केले की त्यालाही लेनिनचा कार्यक्रम सुरुवातीला अजिबात पटलेला नव्हता. तेव्हा केरेन्स्कीचे सरकार उलथून पाडून ताबडतोब नवे समाजवादी सरकार स्थापन करण्याचा कार्यक्रम देणे आणि त्या दृष्टीने व दिशेने आपल्या पक्षाचा कार्यक्रम ठरविणे हे कर्तृत्व लेनिनचे आणि एकट्या लेनिनचेच आहे. जर्मनीबरोबर चालू असलेले युद्ध ताबडतोब बंद करून युद्धास सज्ज झालेल्या रयतेला आणि सैनिकांना परकी जर्मनांविरुद्ध लढण्याऐवजी स्वकीय सत्ताधाऱ्यांविरुद्ध लढण्याच्या कार्यात गुंतविण्याची कल्पनाही लेनिनचीच. जर्मनीबरोबरचे युद्ध बंद करण्याच्या ह्या विचाराबाबतही लेनिनवर खूपच टीका झाली, काही काल त्याच्यावर जर्मनीचा छुपा हस्तक असाही आरोप ठेवण्यात आला. परंतु कशालाही दाद न देता दृढ निश्चयाने आणि आत्मविश्वासाने लेनिनने यादवी युद्ध सुरू केले. ह्यावेळी मेन्शेविक वगैरे इतर पक्षांशी समझोता करून हा कार्यक्रम पुढे रेटावा

अशा तऱ्हेचा इतर बोल्शेविकांचा विचारही त्याने मानला नाही. क्रांतिकार्य करावयाचे ते ताबडतोब करावयाचे आणि ते फक्त बोल्शेविकांनीच करावयाचे वगैरे सर्व मुद्यांवर लेनिनने शेवटपर्यंत आपला हेका चालविला आणि यशस्वीपणे क्रांती करून दाखविली. पुढे क्रांतीचे सर्व तपशीलही त्यानेच ठरविले. कार्यक्रम ठरल्यानंतर जुलै १९१७ मधे उतावीळ झालेल्या बोल्शेविकांना लेनिनने स्पष्ट बजावले की, राजाला गोळी घालावयाची आहे तर नेम चुकता कामा नये, बंड सुरू केले आणि ते अयशस्वी झाले तर मृत्यूखेरीज दुसरा पर्याय नाही. सर्व प्रकारची अप्रियता पत्करून क्रांतिकारकांना ऑक्टोबरपर्यंत थोपवून धरण्याचे कर्तृत्वही एकट्या लेनिनचेच आहे.

तेव्हा हे तपशील लक्षात घेता रशियातील राज्यक्रांती ही मार्क्सवादी किंवा समाजवादी म्हणण्यापेक्षा लेनिननेच घडवून आणलेली लेनिनवादी क्रांती होती हेच म्हणणे अधिक बरोबर ठरेल. लेनिन नसता तर त्याचे जागी दुसरा कोणी उभा राहिला असता असा मुद्दा ह्यावर मांडता येईल. परंतु ट्रॉटस्की, स्टॅलिन वगैरे सर्व तत्कालीन बोल्शेविक पुढाऱ्यांची, तत्कालीन साधन-साहित्यावरून, जी धारणा दिसते ती लक्षात घेता असे विधान करणे म्हणजे निव्वळ धाडस !

## इतिहासातील उदाहरणे : शिवाजी :

भारताच्या इतिहासातील सर्वपरिचित अशा शिवाजीचे उदाहरण घेऊनही ह्या मुद्याचा थोडा खल करता येईल. शिवाजी उदयास आलाच पाहिजे अशी परिस्थिती फक्त काय ती सतराव्या शतकाच्या पूर्वार्धातच होती काय ? मुसलमानी सत्तेखाली हिंदुधर्मियांचा जो छळ होत होता तो शिवाजीच्या काळात होता त्याहून सोळाव्या शतकात किंवा पंधराव्या शतकात कमी होता असे नाही. महाराष्ट्रातील जनतेची आर्थिक स्थिती सतराव्या शतकाच्या पूर्वार्धातच काही विशेष बिघडली असे म्हणता यावयाचे नाही. तसेच शिवाजीच्या काळात महाराष्ट्राची जी दुःस्थिती असेल तितकी तरी निदान दुःस्थिती भारताच्या इतर भागात निश्चित होती. तर मग सतराव्या शतकाच्या पूर्वार्धातच आणि महाराष्ट्रातच शिवाजीचा उदय का व्हावा ? ह्या प्रश्नाला उत्तर नाही हेच खरे उत्तर. एक वेळ लोकांमधील असंतोषाला वाचा फुटणे अपरिहार्य होते आणि शिवाजीच्या रूपाने तो असंतोष व्यक्त झाला असे मानले तरी पुढे असा प्रश्न उद्भवतो की ज्याच्याकरवी हा असंतोष व्यक्त व्हावयाचा त्याच्या अंगी अमुक एक गुणसमुच्चय असलाच पाहिजे हे कसे ठरू शकेल ? शिवाजी शूर योद्धा होता, चतुर मुत्सद्दी होता आणि काही एका ध्येयवादाने भारलेला तत्त्वनिष्ठ असा शिपाई होता. त्याचप्रमाणे संघटनेचे आणि व्यवस्थापनचे कौशल्यही त्याचे अंगी

पुरेपूर होते. असंतोष कुणीतरी व्यक्त करील असे जरी गृहीत धरले तरी तो व्यक्त करणारी व्यक्ती नेमकी इतकी कर्तृत्ववान मिळेल ह्याला कुठल्या नियमाचा आधार शोधावयाचा ? तेव्हा महाराष्ट्राचा इतिहास पहाता सतराव्या शतकातील मराठ्यांचे स्वराज्य आणि त्यातून पुढे निघालेले मराठ्यांचे साम्राज्य ह्या सगळ्याचे मूळ कर्तृत्व शिवाजी ह्या एका व्यक्तीला देण्याखेरीज गत्यंतर नाही.

## महापुरुषावाचून अडेल काय ?

वरीलसारख्या उदाहरणांच्या संदर्भात केव्हाही एक प्रश्न विचारता येईल तो असा की, त्या माणसामुळे ते कार्य झाले हे जरी कबूल केले तरी तो माणूस नसता तर ते झालेच नसते असे तुम्ही कसे म्हणता ? लेनिनने रशियन राज्यक्रांती केली हे खरे. पण लेनिन नसता तर ती झालीच नसती काय ? तसेच शिवाजीने महाराष्ट्रात स्वराज्य संस्थापना केली हे मान्य, पण शिवाजी नसता तर ते घडलेच नसते काय ? आता ह्या प्रश्नांना उत्तरे देणे कसे शक्य आहे ? लेनिन किंवा शिवाजी नसते तर काय झाले असते हे आपण कसे सांगू शकणार ? कदाचित् लेनिनच्या जागी लेनिन आणि शिवाजीच्या जागी शिवाजी मिळालेही असते, परंतु मिळाले नसते हीही शक्यता तेवढीच बरोबर आहे, आणि म्हणूनच 'जरतर' च्या भाषेत विचार न करता अमुक व्यक्तीमुळे अमुक कार्य झाले असे जेव्हा इतिहासावरुन दिसते तेव्हा ते तसेच मांडणे योग्य असते. विशिष्ट परिस्थितीत , विशिष्ट प्रकारचा नेता उदयास आलाच पाहिजे हे सर्व इतिहासाचे अवलोकन करता, नियम म्हणून मान्य करता येण्यासारखे नाही. परिस्थिती अतिशय सोयिस्कर असूनही नेतृत्व लाभले नाही असे इतिहासातील अनेक घटनांवरून दाखवून देता येईल आणि त्याचप्रमाणे विशिष्ट प्रकारची ऐतिहासिक घटना त्यावेळी केवळ विशिष्ट व्यक्ती होती म्हणूनच घडली, अन्यथा घडली नसती हेही इतिहासावरून दाखविता येईल. वर घेतलेल्या दोन उदाहरणांपैकी पुन्हा एकदा शिवाजीचेच उदाहरण घेऊन असे म्हणता येईल की मुसलमानी सत्तेविरुद्ध बंड करून स्वतःचे राज्य स्थापण्याची कल्पना म्हणजे सार्वभौम स्वराज्य निर्माण करण्याची कल्पना फक्त शिवाजीचीच होती, आणखी कोणाचीही नव्हती. शिवाजी होता म्हणूनच ती कल्पना आली आणि त्यानुसार काही काळ मराठ्यांच्या इतिहासाची दिशा आखली गेली. तेव्हा अमुक महापुरुष जन्मास आला नसता तर त्याचे जागी दुसरा आला असता की नाही हा प्रश्न निरर्थक आहे. परंतु जो महापुरुष आला आणि त्याने जे कार्य केले ते केवळ परिस्थितीच्या संदर्भाने स्पष्ट करणे आणि वैयक्तिक कर्तृत्वाची दखल न घेणे हे मात्र चूक ठरेल.

**महापुरुषसिद्धान्तातील सत्यासत्य :**

वर चर्चिल्याप्रमाणे, महापुरुषाला स्वतंत्र कर्तृत्व असले आणि त्यानुसार परिस्थितीतील क्रान्तिकारक बदल घडत असले तरीही कार्लाइलप्रमाणे इतिहास म्हणजे महापुरुषांची चरित्रमालिका, इतिहास म्हणजे एकामागून एक येणारे महापुरुष जे करतील तेच आणि तेवढेच अशा प्रकारचे भाष्य मात्र मान्य करता येणार नाही.

लोकोत्तर सामर्थ्याचा पुरुषही चमत्कार करू शकत नाहीत. कोणते प्रश्न सोडवावयाचे आहेत, ते कशा प्रकारे सोडवावयाचे आहेत, त्यासाठी कुणाचा किती पाठिंबा मिळू शकेल, कुणाचा किती विरोध होईल आणि संघर्षातून शेवटी काय निघेल हे सगळे बऱ्याच प्रमाणात विशिष्ट परिस्थितीने ठरते हे नाकबूल करता येणार नाही. महापुरुषालाही आपली महत्त्वाकांक्षा पुरी करून घेण्यासाठी लौकिक मार्गांनी आणि व्यवहार्य साधनांनीच पुढे जावे लागते. हनुमानाप्रमाणे उड्डाण करून लंकादहन करणे हे पुराणातच शक्य आहे, इतिहासात नाही. इतिहासातील महान् नेत्यांनी जे विचार मांडले, जे पराक्रम गाजविले ते सर्व बहुधा परिस्थितिसापेक्षच होते. कितीही अद्वितीय बुद्धिमत्तेचा माणूस असला तरी सामाजिक परिस्थितीमुळे त्याचे विचारविश्व मर्यादित होतेच. उदाहरणार्थ शिवाजीला महाराष्ट्राचे कल्याण करावयाचे होते ह्यात वाद नाही. त्यासाठी आवश्यक ते सर्व उपाय तो योजित होता. तथापि काही झाले तरी त्या काळी महाराष्ट्रात समाजवादी सरकार स्थापन करण्याची कल्पना काही शिवाजीला येण्यासारखी नव्हती. त्याची कल्पनासृष्टी त्याच्या भोवतालच्या जीवनाने ठरली होती. ध्येयांप्रमाणेच साधनेही परिस्थितीनेच ठरत असतात. शिवाजीला आग्र्याच्या कैदेतून सुटून रायगडी परत यायचे ते चालत किंवा घोड्यावरूनच येणे शक्य होते. दिल्ली-मुंबई जनता एक्प्रेस किंवा हेलिकॉप्टर विमान अशी साधने असंभवनीय होती. तेव्हा कितीही लोकोत्तर सामर्थ्याचा महापुरुष असला तरी तो काय हवे ते करील आणि तो म्हणेल तसा इतिहास घडेल हे शक्य नाही.

क्वचित् माणसाच्या कल्पनेची भरारी फारच उंच जाईल. हजारो वर्षांपूर्वी ग्रीसमध्ये प्लेटोने काही एक कम्युनिझम सांगितला. त्यात स्त्रियांचीदेखील सामुदायिक मालकी सांगितलेली आहे. तथापि अशा तऱ्हेचा कम्युनिझम अद्यापही जगात अवतरलेला नाही, अजूनही कुणाच्या मनाला तो पटेल असे म्हणता यावयाचे नाही. तेव्हा महापुरुष परिस्थितीला वळण लावीत असले, परिस्थितीतून बाहेर पडून बंड करीत असले आणि हळूहळू परिस्थिती पूर्णपणे बदलायला कारणीभूत होत असले तरीही महापुरुष आणि फक्त महापुरुषच इतिहास घडवितात हे खरे नाही. महापुरुष किंवा

नेता हा लोकांच्या पाठिंब्यावरच मोठा होत असतो. नवीन कार्यक्रम सांगताना, कार्याची दिशा दाखविताना त्याला लोकमत निदान लोकमन विचारात घ्यावेच लागते. अयोध्येमध्ये सीतेच्या चारित्र्याविषयी अफवा उठल्या म्हणून रामाला सीतेचा त्याग करावा लागला. ह्यात व्यक्तिशः राम कितीसा न्यायाने वागला हा प्रश्न ह्या ठिकाणी महत्त्वाचा नाही. परंतु राजा राम म्हणून मला असे वागावे लागत आहे हे रामाचे आपल्या कृतीचे समर्थन निश्चित समजण्यासारखे आहे. भारतीय जनतेस आवडणार नाही म्हणून भारताच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी अमेरिकेत नृत्य करू धजत नाहीत. रामाला वाटणारी अयोध्यावासीयांची धास्ती आणि श्रीमती इंदिरा गांधींना वाटणारा भारतीय जनतेचा धाक हे दोन्ही प्रकार एकच आहेत. आपली वैयक्तिक मते, आपल्या आवडीनिवडी आणि आपली तत्त्वे व आपल्या पद्धती ह्या सर्वांनाच लोकनेता मुरड घालीत असतो. महापुरुष किंवा लोकनेता सांगतो आणि लोक ऐकतात असे नेहमीच आणि पूर्णार्थाने घडत नाही. लोक कधी ऐकतात कधी ऐकत नाहीत. जेव्हा ऐकतात असे वाटते तेव्हा लोकांना आवडेल असेच नेता बोललेला असतो. कित्येकदा लोकच नेत्याला ऐकायला लावतात. तेव्हा जी कृति घडेल ती लोकांकडून व लोकनेत्याकडून अशी दोघांकडूनही घडत असते. त्यात कुणाचा वाटा नेमका किती हे सांगणे कठीण आहे. ऐतिहासिक बनावासंबंधीची ही वस्तुस्थिती कार्ल गस्टॅव्हॅसन ह्याने खालील सहा सूत्रात व्यवस्थितपणे मांडून दाखविली आहे.

" ( 1 ) Some social forces are too powerful for any man; ( 2 ) the details of a single historical episode are determined largely by the work of the actors concerned; ( 3 ) the actual long–term trends are for less likely to be determined by the individual hero; ( 4 ) cases of obvious great influence are usually actually cases of the " right man at the right time"; ( 5 ) an occassional genius by extremely dexterous and willful actions, may achieve a historical mutation; ( 6 ) every instance must be judged in its own particular context, for no universal formula will cover all cases. " ( A Preface to History, पृ. १३० )

वरील विवेचनाच्या अनुरोधाने विचार करता लक्षात यावे की, महापुरुष इतिहास घडवितात हे मत आणि महापुरुषाला स्वतंत्र कर्तृत्व नाही, तो परिस्थितीच्या हातातील खेळणे असते हे मत ही दोन्हीही एकांगी अतएव चूक आहेत. इतिहास अनेक कारणांनी घडत असतो. त्याला महापुरुष हे एकमेव कारण नाही हे जेवढे खरे

तेवढेच महापुरुष हेही एक कारण होऊ शकते हेही खरे. तो महापुरुषच कसा आणि कोठून यतो ह्या प्रश्नात शिरूच नये. आहे त्याची दखल घ्यावी आणि इतिहास समजून घ्यावा असे विल्यम जेम्सने मुद्दाम बजावले आहे.

( " The causes of production of great men lie in a sphere wholly inaccessible to the social philosopher. He must simply accept geniuses as data; just as Darwin accepts his spontaneous variations " Great Men and their environment. )

The Meaning of Human History– पृ. २१९

मात्र अशा तऱ्हेने काही पुरुषोत्तमांचे क्रांतिकारक कर्तृत्व मानले तरी भूतकालाच्या (आणि वर्तमानकालाच्याही) घडणीचे सर्वच्या सर्व श्रेय चार महापुरुषांच्या पदरात टाकून इतिहास सोपा करता येणार नाही हेही लक्षात घ्यायला हवे.

## संदर्भसाहित्य :

( 1 ) The Cult of the Superman
– Bentley, Eric; London, 1947

( 2 ) History and Human Relatiom
– Butterfield, Herbert; London, 1951

( 3 ) The Hero with a Thousand Faces
– Campbell, Joseph; New York, 1949

( 4 ) The Meaning of Human History
– Cohen M. R; Chicago, 1961

( 5 ) A Preface to History
– Gustavson, C. G. ; New York, 1955

( 6 ) The Hero in History
– Hook, Sidney; New York, 1963

( 7 ) The Varieties of History
ed- Stern, Fritz; New York, 1956

---

प्रकरण ९ वे

# ऐतिहासिक स्थित्यंतरांचे वास्तव स्वरूप

## विविध सिद्धान्त आणि त्यांची अग्राह्यता :

मागील प्रकरणांतून इतिहासाच्या गतीला निश्चित नियम आहेत असे मांडणाऱ्या विचारवंतांच्या विविध भूमिका स्पष्ट केल्या आहेत. काहींनी सगळ्या मानवी घडामोडी ईश्वरी इच्छेने घडतात असे म्हणून आपली सुटका करून घेतली. परंतु तो ईश्वर, त्याची इच्छा वगैरे सर्व तुम्हाला कसे कळते ह्याचे उत्तर ईश्वरवादी देऊ शकत नाहीत. कुणी ग्रहगोलांच्या गतींवरून विश्वचक्राच्या किंवा कालचक्राच्या काही कल्पना रचिल्या आणि मानवी इतिहासही तसाच परिभ्रमण करीत रहातो असे म्हटले. निरनिराळ्या विद्वानांनी निरनिराळे चक्रसिद्धान्त सांगितले. फेऱ्यांचे स्वरूप आणि काळ सर्वांना सारखेच प्रतीत झाले नाहीत, त्याचप्रमाणे हे फेरे आणि त्यांचे कालावधी ह्यांची गणिते आपण कशी केली हे सांगण्याची तसदीही कुणी घेतली नाही. मानवाच्या आरंभापासून तर आजतागायतपर्यंतचा सर्व इतिहास पाहिला तर कुणाचाही कालचक्राचा सिद्धान्त खरा ठरतो आहे असे दिसत नाही. तसेच कुणी वंशश्रेष्ठतेच्या आधारावर, कुणी विशिष्ट राष्ट्रीय गुणांचे तत्त्व गृहीत धरून इतिहासाच्या गतीसंबंधीच्या नियमावली दिल्या. शास्त्रीय दृष्टया त्यांची गृहीतकृत्ये टिकणारी नाहीत व प्रत्यक्ष ऐतिहासिक घटनांतून त्यांचा पडताळा येत नाही, हेही आपण पाहिले. नैसर्गिक किंवा भौगोलिक परिस्थितीने इतिहास विशिष्ट प्रकारे घडतो आणि तो तसाच घडला पाहिजे असे शास्त्रही सांगण्यात आले पण तेही तर्काच्या आणि प्रत्यक्ष अनुभवाच्या कसाला उतरत नाही, हेही पाहून झाले आहे. मानवी समाज हा आर्थिक कारणांनी किंवा निरनिराळ्या सवयी आणि हेतू यांच्या समुच्चयाने काही विशिष्ट नियमांनी आणि विशिष्ट दिशेने पुढे जात असतो अशा तऱ्हेचे नियम देणारे काही समाजशास्त्रीय आणि अर्थशास्त्रीय स्वरूपाचे सिद्धान्तही आपण तपासून पाहिले आणि त्यापैकी काहीतील निरर्थकता आणि काहीतील अपुरेपणा ह्यांची दखल घेतली.

त्याचप्रमाणे लोकोत्तर पुरुष सर्व इतिहास घडवितात अशा तऱ्हेचे एकांगी निष्कर्षही मानवी इतिहासाचे स्पष्टीकरण देऊ शकत नाहीत हेही आपण पाहिले. कार्लाइल आणि त्याचे शिष्य ह्यांच्याप्रमाणे ऐतिहासिक स्थित्यंतरांचे सर्व श्रेय चारदोन महापुरुषांच्या पदरात टाकून मोकळे होणे चूकच. पण आपल्याला

स्थित्यंतरांचे काही समाजशास्त्रीय नियम गवसले आहेत असे सांगून पुरुषोत्तमांचे कर्तृत्व नाकारणे किंवा त्याला कमी महत्त्व देणे हेही तेवढेच चूक होईल हे बर्ट्रांड रसेलचे अत्यंत समतोल असे विवेचन ध्यानी घेणे आवश्यक आहे. ह्या संदर्भात त्याने आधुनिक जर्मनीच्या इतिहासातील बिस्मार्कच्या कर्तबगारीचे जे उदाहरण दिले आहे तेही अत्यंत समर्पक आहे. " ( " The part played in history of individuals, which was overemphasized by Carlyle, and is still exaggerated in our day by his reactionary disciples, tends on the other hand, to be unduly minimized by those who believe themselves to have discovered the laws of Sociological change. I do not believe that, if Bismarek had died in infancy, the history of Europe during the past seventy years would have been at all closely similar to what it has been. And what is true in an eminent degree of Bismark is true, in a some what lesser degree, of many of the prominent men of the nineteenth century. " – Freedom and Organization : preface ).

ज्यांना योगायोग म्हणता येईल अशा घटनाही दृष्टिआड करता येत नाहीत असेही रसेल बजावतो. पहिल्या महायुद्धाचे उदाहरण घेऊन तो म्हणतो की ते घडवून आणणारी पुष्कळ कारणे झाली; पण ती सगळी अटळच होती असे म्हणता यावयाचे नाही. जसे शेवटी क्षुल्लक कारणांनी युद्ध पेटले तसे क्षुल्लक कारणांनी ते टाळलेही गेले असते; किंवा पुढे ढकलले गेले असते. त्या मिळालेल्या कालावधीत कदाचित जागतिक शांतीच्या दिशेने जो उद्योग चालू होता तोही अधिक प्रभावी झाला असता ( " Nor can we ignore the part played by what may be called chance, that is to say, by trivial occurrences which happened to have great effects. The Great war was made probable by large causes, but not inevitable. Down to the last moment, it might have been postponed by minor events which did not take place, though nothing that we know of made them impossible; and if it had been postponed, the forces making for peace might have become predominant " – Freedom Organization : preface ).

प्रत्यक्ष इतिहासाचा प्रवाह हा असा अनियमितपणे चाललेला आहे. तरीही काहींना त्यात नियम दिसतात, शास्त्र दिसते ते कसे? ह्यावर रसेल एवढेच म्हणतो की, आपल्याला सोईस्कर तेवढ्या घटना घेऊन, गैरसोयीच्या तेवढ्या वगळून, आणि

घ्यायच्या त्या विपर्यस्त स्वरूपात सांगूनच इतिहासाचे शास्त्र बनविणे शक्य आहे. ( " History can only be made to seen scientific by falsifications and ommissions " – Freedom and organization : preface) आतापर्यंतच्या विवेचनावरून रसेलच्या ह्या अभिप्रायातील सत्यता स्पष्ट झाली असावी. सोयीचे तपशील घेणे, गैरसोयीचे सोडून देणे आणि वापरलेल्या तपशीलांनाही मनसोक्त अर्थ चिकटवणे ह्यातून नसलेली योजना इतिहासात कशी दिसू लागते ह्याचे उदाहरण हवे असेल तर आर्थर ओसबोर्ननामक लेखकाने अलीकडच्या काळात केलेल्या काही बौद्धिक कसरती पहाव्यात. ह्या इतिहासपंडिताने मानवी इतिहासाची काही एक ईश्वरी योजना विशद केली आहे. त्या योजनेप्रमाणे इतिहासाचे काही कालखंड पाडले आहेत. आणि विशिष्ट कालखंडात त्या ईश्वरी सूत्रानुसार काही विशिष्ट गोष्टीच घडल्या आणि असेच होत रहाणार हे काही दाखले घेऊन विस्तारपूर्वक सांगितले आहे. नमुन्यादाखल इ. स. पूर्वीचे सहावे व पाचवे शतक ह्या कालखंडाचे लेखकाने दाखविलेले वैशिष्टच पहावे. त्याच्या मते हा कालखंड म्हणजे महान प्रारंभांचा काल होय . ह्याच काळात चीनमधे लाओ-त्सु आणि कन्फ्युशिअस झाले. भारतात बुद्ध आणि महावीर अवतरले. इत्यादी इत्यादी.– ह्या पुस्तकाच्या माझ्या इंग्रजी समालोचनात (Review of Arthur Osborne's " Rhythm of History "; Orient Longman's publication; by Sadashiv Athavale– ' Quest ' monthly, Bombay, May, 1959 ) मी काही प्रश्न उपस्थित करून ठेवले आहेत. ख्रिस्ती आणि इस्लाम धर्मांच्या स्थापना ह्या गोष्टी –महान प्रारंभ– आहेत की नाहीत ? आणि असतील तर त्या ह्या इ. स. पूर्व सहावे आणि पाचवे शतक ह्या महान प्रारंभांच्या कालखंडात का घडत नाहीत ? एक ह्या कालखंडाच्या आधी सहा शतके घडते आणि दुसरी बारा शतके नंतर घडते हे कसे ? शेतीव्यवसाय आणि लेखनकला ह्यांचे प्रारंभ हे महान म्हणायचे की नाही ? आणि ते तसे असतील तर इ. स. पूर्व सहावे आणि पाचवे शतक ह्या काळापूर्वी कित्येक शतके त्या गोष्टी निघतात ह्याचा अर्थ कसा लावावयाचा ? ह्या आणि अशा अनेक प्रश्नांना दैवी किंवा अन्य स्वरूपाची इतिहासयोजना मांडणाऱ्या ओसबोर्नसारख्यांकडे काहीही उत्तरे नसतात.

तेव्हा मानवी इतिहास आतापर्यंत जसा घडत आला तसा शक्य तितक्या जास्त तपशीलात जाऊन सर्व बाजूंनी अवलोकन केला तर तो काही एका ईश्वरी योजनेत किंवा अन्य काही चार ढोबळ नियमात बसविता येईल असे वाटत नाही. अगदी सुरुवातीस म्हटल्याप्रमाणे एक अवस्था जाऊन दुसरी येते म्हणजेच एकाभागून एक स्थित्यंतरे होतात एवढेच विधान इतिहासाबाबत फार झाले तर करता येईल.

## इतिहासज्ञानाच्या मर्यादा :

ह्या स्थित्यंतरांचा आपल्याला कोणत्याही नियमांना बळी न पडता शास्त्रीय पद्धतीने अर्थ लावावयाचा असेल तर अनेक प्रकारे खबरदारी घ्यावी लागेल.

इतिहास ही होऊन गेलेली गोष्ट आहे. शिवाजीने अफजुलखानाचा वध केला ही गोष्ट आज प्रत्यक्षात आपल्या डोळ्यांनी कुणालाही पहाता यावयाची नाही. तो प्रसंग पुन्हा जशाच्या तसा समोर उभा करता यावयाचा नाही. दोन भाग हैड्रोजन आणि एक भाग ऑक्सिजन एकत्र आल्याने पाणी तयार होते हा प्रयोग कुणालाही केव्हाही करता येईल. त्याच्याविषयी शंका आली तर पाहिजे त्या आणि पाहिजे तेवढ्या लोकांसमक्ष तो प्रयोग करून दाखविता येईल. परंतु गारद्यांनी नारायणराव पेशव्यांच्या पोटात सुरी भोसकून त्याचा कोथळा बाहेर काढला किंवा नाही ह्याची शहानिशा वरील पाण्याच्या प्रयोगाच्या पद्धतीने कधीही होण्यासारखी नसते. इतिहासाच्या ज्ञानाच्या ह्या मर्यादेची अभ्यासकाला स्पष्ट जाणीव असली पाहिजे. उपलब्ध असलेल्या काही पुराव्यांवरून भूतकालाविषयीची माहिती आपण जमा करतो. ज्यावरून ती माहिती मिळते त्यांना इतिहासाची साधने असे म्हणतात. प्राचीन कालातील लोकांनी वापरलेल्या भांडीकुंडी, हत्यारे, खेळणी, अलंकार इत्यादी वस्तू; तत्कालीन लोकांनी एकमेकांशी केलेला पत्रव्यवहार, तसेच त्यांचे इतर लेखन; प्राचीन लोकांनी पाडलेली नाणी, कोरलेले शिलालेख, बांधलेली देवळे आणि इतर इमारती अशा अनेक प्रकारच्या साधनांवरून आपण माहिती जमा करीत असतो.

## अवशेषांवर आधारलेला इतिहास :

लेखनकला अस्तित्वात येण्यापूर्वीचा इतिहास तर सर्वस्वी त्या काळातील लोकांनी वापरलेल्या वस्तू व निर्माण करून ठवलेली शिल्पे आणि स्थापत्ये ह्यावरूनच बनविलेला असतो. त्यामुळे तत्कालीन जीवनासंबंधीचे आपले निष्कर्ष बरेचसे अनुमानाच्या स्वरूपाचे असतात. उदाहरणार्थ मोहेंजोदडो आणि हरप्पा वगैरे ठिकाणच्या अवशेषांच्या उत्खननांवरून सिंधु संस्कृतीविषयी जी माहिती मिळते ती सर्वस्वी तत्कालीन अवशेषांच्या स्वरूपातीलच आहे. आणि म्हणूनच अनेक बाबतीत अनुमानावर अवलंबून रहावे लागते. सिंधु संस्कृती नष्ट का झाली ह्याचे निर्विवाद असे उत्तर देता येणार नाही. ती संस्कृती कुणा मानवी शत्रूने भस्मसात केली असेल, सिंधूच्या पुरांनी ती बुडाली असेल किंवा अन्य कारणांनी कमकुवत होऊन सिंधु संस्कृतीचे लोक आपण होऊनच अन्य संस्कृतीत विलीन होऊन गेले असतील. असे काहीही घडले असणे शक्य आहे. सर्व अवशेषांचे काळजीपूर्वक निरीक्षण करून आपल्या दृष्टीने जास्तीत जास्त बरोबर किंवा कमीत कमी चूक अशी काही एक भूमिका आपण घेऊ शकतो. पण

ती शंकातीत आहे असे छातीठोक विधान कधीही करता यावयाचे नाही. सिंधुसंस्कृतीतील लोकांचे समाजिक जीवन कसे होते ? ज्याअर्थी तेथील उत्खननात पुष्कळ खेळणी सापडली आहेत त्याअर्थी तेथील लोकांना मुलांविषयी फार आस्था असावी, म्हणजेच संसारात मुलाबाळात सुखासमाधानाने रहाणारे, कुटुंबवत्सल असे ते लोक असावेत असा तर्क होतो. आणि तो बरोबर आहे अशी भूमिका घेता येईल. परंतु त्या संस्कृतीत स्त्रियांचे स्थान आणि दर्जा काय होता ? ह्या प्रश्नाचे उत्तर अवशेषांवरून देणे कठीण आहे. काही संशोधकांना अवशेषांवरून काही एक उत्तर सापडतेही. ज्याअर्थी तेथील अवशेषांमध्ये स्त्रियांचे विपुल आणि विविध प्रकारचे अलंकार सापडतात त्याअर्थी तेथील स्त्रियांना समाजात चांगला मान असावा व पुरुषांचे बरोबरीने वागविले जात असावे असा तर्क काही इतिहासकारांनी केला. परंतु हे मान्य करता येईल काय ? स्त्रिया पुष्कळ व तऱ्हेतऱ्हेची कर्णभूषणे वापरीत होत्या, गळयात परीपरीचे हार वगैरे घालीत होत्या ह्यावरून पुरुष त्यांना बरोबरीने वागवीत होते हे कसे सिद्ध होईल ? फार झाले तर स्त्रिया चांगल्या दिसाव्या म्हणून पुरुष त्यांना अनेक प्रकारांनी सजवीत होते असे विधान करता येईल. तेव्हा फक्त अवशेषांवरून जेव्हा आपण सांस्कृतिक जीवनाविषयी काही विधाने करतो तेव्हा त्यात आपल्या कल्पनेचा भाग बराच असतो ह्याची जाणीव ठेवलेली असावी. स्थापत्ये व शिल्पे पाहून प्राचीनांची कलादृष्टी व त्यांचे परिश्रम ह्यांची काहीशी कल्पना येऊ शकेल, पण ती निर्माण करणारे प्राचीन मन पूर्णपणे कधीच समजू शकणार नाही.

### तत्कालीन लेखांवरून मिळणारा इतिहास :

पुढच्या काळातील, म्हणजे लेखनविद्या अस्तित्वात आल्यानंतरच्या काळातील, लोकजीवनही प्रत्यक्ष तत्कालीन लेख आहेत म्हणून आपल्याला सर्वच्या सर्व आणि वास्तव स्वरूपात समजेल असे मुळीच नाही. तत्कालीन लोकांना लिहिता येत होते ह्याचा अर्थ त्यांनी किंवा त्यांच्याविषयी इतर तत्कालीनांनी सर्व काही लिहून ठेवलेच आहे असा होत नाही. जे लिहून ठेवलेले असेल ते तत्कालीन असले तरी बरोबर असेल असेही नाही. अज्ञानाने, प्रौढीने किंवा लबाडीने लिहिलेले कोणते आणि विश्वसनीय कोणते हे समजून घेणे आवश्यक आहे. आणि ते नेहमी समजेल असेही नाही. ह्याबाबत मेगॅस्थिनीसच्या लेखनाचे एक उदाहरण लक्षात घेण्यासारखे आहे. चंद्रगुप्त मौर्याचे काळात मेगॅस्थिनीस हा ग्रीक वकील भारतात राहिला, हिंडला व त्याने भारताविषयी काही लिहून ठेवले. त्याचे पुस्तक हे तत्कालीन लेखन म्हणून इतिहासाचे एक मौलिक साधन झाले. मेगॅस्थिनीसने लिहून ठेवले की भारतातील लोक इतके चांगले आहेत, इतके सद्‌गुणी आणि नीतीमान आहेत की त्यांना चोऱ्या करण्याचीसुद्धा माहिती नाही,

येथील लोक बाहेर जाताना घराला कलूप कधीच लावीत नाहीत. मौर्य कालातील जीवनाविषयी एका तत्कालीन ग्रीक लेखकाने दिलेली ही माहिती तत्कालीन म्हणून विश्वसनीय मानून आम्ही प्राचीन भारतीय नैतिक दृष्टया किती सुसंस्कृत होतो हे जगाला सांगत सुटतो. पण थोडा विचार केला आणि मेगॅस्थिनीसचे हे विधान तपासून पहायचे ठरविले तर निराळेही काही दिसेल. येथील लोक घराला कुलपे लावत नाहीत असे सांगणाऱ्या मेगॅस्थिनीसने भारतातील किती घरे, किती वेळा पाहिली ? पाटलीपुत्र नगरीतील एखादेच घर पाहून तर हे विधान केले नसेल ना ? ज्या घराचा माणूस कुलूप न लावता घर उघडे टाकून गेला तो डोकेफिरू किंवा विसराळू नसेल कशावरून ? किंवा कदाचित् असेही असेल की त्या दरिद्रयाच्या घरात चोरण्यासारखेच काही नसेल तर तो कुलूप कशाला लावील ? हे प्रश्न नुसते गंमत म्हणून उपस्थित केलेले नाहीत, मेगॅस्थिनीसच्या लेखनात इतर पुष्कळ गप्पा आहेत त्यातलीच ही एक असण्याचा संभव लक्षात घेतला पाहिजे. आणि मेगॅस्थिनीससारखा परकीय भारतात चोरी होत नव्हती असे म्हणतो तर ऋग्वेदापासून चाणक्याच्या अर्थशास्त्रापर्यंत स्वकीयांनी चोऱ्यांचे जे अनेक प्रकार वर्णन करून ठेवले आहेत ते काय सारे ललित साहित्य मानावयाचे ? चाणक्य वगैरे निरनिराळ्या प्रकारच्या चोऱ्यांसाठी निरनिराळ्या शिक्षा फर्मावितात त्या तरी कशासाठी ? एखाद्या राजाने मी पृथ्वी पादाक्रान्त केली असा शिलालेख कोरून ठेवला तर त्याचा अर्थ त्यान आसपासची दोनतीन गावेच जिंकली एवढाच घ्यायचा असतो हेही इतिहासाच्या अभ्यासकाला जाणता आले पाहिजे.

अलीकडच्या काळातील इतिहासासंबंधी तत्कालीन पत्रव्यवहार व लेखन विपुल प्रमाणात आढळते. त्या कागदपत्रांवरून भरपूर माहिती हाती येईल पण सत्य समजेलच असे नाही. अठराव्या शतकाच्या अखेरीस महाराष्ट्रात पेशवाई राजकारणात नाना फडणीस, सखाराम बापू, महादजी शिंदे वगैरे धुरीणांनी एकमेकांस लिहिलेली पत्रे पहावीत. प्रत्येक जण दुसऱ्यास लिहितो की तुम्ही आम्ही एक आहोत, आपल्यात कोणताही दुजाभाव नाही वगैरे. परंतु प्रत्येक जण दुसऱ्याचा पाय ओढण्यासाठी टपलेला आहे हेही दृश्य त्यांच्या इतर खाजगी लेखनांवरून व प्रत्यक्ष कृतींवरून दिसते. तेव्हा त्यांचे परस्परसंबंध निश्चित काय होते हे तत्कालीन सर्व लेखन पाहून ठरविता येणारच नाही असे नाही, पण ते ठरविणे हे मोठे नाजूक आणि अवघड काम आहे; आणि जे आपण ठरवू ते बरोबर असेलच असे नाही हेही लक्षात घेणे आवश्यक आहे.

तेव्हा ऐतिहासिक साधनांवरून जी माहिती मिळेल ती अपुरी असेल, त्याच्या आधारावर आपण जी विधाने करू त्यांना दुसऱ्या बाजू असू शकतील हे मान्य करूनच

इतिहासाविषयी बोलणे शक्य आहे. मात्र असे आहे म्हणून इतिहासाची जुळवाजुळव करायचीच नाही असे नाही. साधनांवरून काही मर्यादेपर्यंत का होईना पण भूतकालाचे ज्ञान होतेच. अगदी संपूर्ण माहिती मिळत नाही म्हणून कमी माहिती मिळवू नये असे होत नाही. साधनांनी योग्य ती चिकित्सा करून सत्याचा निर्णय कसा करावयाचा हा एक स्वतंत्र आणि मोठा विषय आहे. त्याच्या सर्व बारकाव्यात येथे जाता यावयाचे नाही. ज्या स्वरूपात जी माहिती मिळते तीवरून इतिहासप्रवाहाच्या गतीचा अर्थ आपल्याला कसा लागतो हे आपले लक्ष्य आहे. विविध साधनांनी मानवी इतिहाससंबंधी आजपर्यंत जी माहिती जमा झाली तिचे अनेक विचारवंतांना अनेक प्रकारचे एकांगी अर्थ कसे लागले हे पाहून झाल्यानंतर आता आपल्याला मान्य असलेला अर्थ आणि तो लावण्याची पद्धती पहावयाची आहे.

**वस्तुनिष्ठ इतिहासाची शक्याशक्यता :**

ह्यासंबंधात मुळातच एक प्रश्न उपस्थित करावा लागेल तो असा की ऐतिहासिक साधनांवरून भूतकालाविषयीचे जे तपशील मिळतात ते तुम्ही कितीही तपासून, घासून-पुसून घेतले आणि अत्यंत विश्वसनीय तेवढेच बाजूला काढले तरी ह्या तपशीलाचाही अन्वयार्थ देताना इतिहासकार, अगदी वस्तुनिष्ठ, निःपक्षपाती भूमिका घेतो काय ? घेऊ शकेल काय ? लोखंडाचा किंवा अभ्रकाचा अभ्यास जितका तटस्थपणे होईल तितकाच वैयक्तिक मते आणि ग्रह पूर्णतया बाजूला सारून मानवी घटनांचा अभ्यास कुणा माणसाच्या हातून होणे शक्य आहे काय ? ह्या प्रश्नाचे उत्तर अवघड आहे हे निश्चित. भूतकालाच्या अभ्यासाला अनेक अपरिहार्य अशा मर्यादा येतात. वर साधनांवरून मिळणाऱ्या माहितीच्या मर्यादा सांगितल्याच आहेत, परंतु आहेत त्या साधनांवरून जी काही थोडीबहुत अत्यंत विश्वसनीय अशी माहिती जमा होईल तिचा उपयोग करण्याच्या क्रियेलाही आणखी काही मर्यादा पडतात. इतिहासकाराला विशिष्ट क्षेत्र म्हणजे जीवनाचे विशिष्ट अंग अभ्यासासाठी निवडावे लागते. राजकीय इतिहास सांगणारा त्या कालातील वैज्ञानिक प्रगतीचे सर्वच्या सर्व तपशील पहात नाही. तसेच तत्कालीन धार्मिक आणि तात्त्विक मतमतांतरेही सर्व तपशीलांनिशी तो पहात नाही, पाहू शकत नाही. ह्यामुळे राजकीय इतिहासावर परिणाम करणारी एखादी वैज्ञानिक किंवा धार्मिक बाजू त्याच्या दृष्टीतून निसटणे सहज शक्य आहे. त्याचप्रमाणे आपल्या विवक्षित क्षेत्रात अध्ययन करणारा इतिहासकार तेवढ्या क्षेत्रापुरतेसुद्धा सर्वच्या सर्व तपशील पाहूच शकणार नाही. त्याला निवड करावीच लागते आणि तो महत्त्वाचे तपशील तेवढेच घेतो. मग इथे प्रश्न येतो तो असा की महत्त्वाचे तपशील म्हणजे काय ? हे महत्त्वाचे आहे आणि हे नाही हे कसे ठरते ? अर्थात ठरविणारा दृष्टिकोन हाच ह्या ठिकाणी निर्णायक असतो.

परंतु ह्या अडचणी मान्य करूनही वस्तुनिष्ठ किंवा निःपक्षपाती स्वरूपाचा इतिहास समाजापुढे येणारच नाही असे मानण्याचे मात्र कारण नाही. आपल्या राष्ट्राचे खरेखोटे वैभव रंगवून सांगणारे अनेक इतिहास होऊन गेले आहेत, होत आहेत. परंतु त्याचबरोबर स्वकीयांवर कडक टीका करणारे आणि इतर राष्ट्रांचे सद्गुण व सामर्थ्य प्रांजलपणे मान्य करणारे असे इतिहासकारही देशोदेशी होऊन गेले आहेत, होत आहेत. बहुतेक सर्व बुद्धिनिष्ठ इतिहासकार आजकाल इतिहासकारांनी निःपक्षपाती असावे असे आग्रहाने पुन्हा पुन्हा सांगत आहेत. एवढे करूनही इतिहासकाराचा वैयक्तिक दृष्टिकोन अगदी नकळत त्याच्या इतिहासकथनात येईल, भूतकालाचे समालोचन करण्यात ज्याची बुद्धी रागलोभापासून अलिप्त आहे, स्थिर आहे तोच खरा गुणवान श्रेष्ठ कवी असे राजतरंगिणीकर्ता कल्हण आवर्जून सांगतो (श्लाघ्यः स एव गुणवान् रागद्वेषबहिष्कृता । भूतार्थकथने यस्य स्थेयस्येव सरस्वती ।। १-७) खरा, पण काश्मीरच्या राजवंशाचा इतिहास सांगताना स्वतः कल्हण नेहमीच असा तटस्थ राहिलेला आहे असे मात्र नाही ! असे होणारच, आपले काही रागलोभ आहेत, काही पूर्वग्रह आहेत, काही समजण्याची असमर्थतता आहे हे इतिहासकाराच्या, स्वतःचे स्वतःच्या लक्षात न येणे आणि त्यामुळे त्याच्या निवेदनात त्याचा असा एक दृष्टिकोण येणे अपरिहार्य आहे. पण तरीही विशेषसे बिघडत नाही. कारण असे निरनिराळे दृष्टिकोन असतात आणि त्या सर्व दृष्टिकोनांतून लिहिलेले इतिहास समाजापुढे येत असतात. इतिहासकार एकमेकांपासून शिकून आपल्या निवेदनात योग्य तो बदल करू शकतात. आणि सर्व इतिहासकारांच्या निवेदनातून सामान्य वाचकही योग्य तो बोध घेऊ शकतो.

**ऐतिहासिक टीकेची पद्धती :**

आपण इतिहासकालात प्रत्यक्ष वावरत नसल्यामुळे त्या काळाची मनोभूमिका समजण्यास नेहमीच असमर्थ असतो आणि म्हणून इतिहासाकडे पहाण्याची आपली दृष्टी ही वर्तमानकालीन कल्पनांनी आणि मूल्यांनी ठरत असते. तेव्हा भूतकालाविषयीचा आपला अभिप्राय कधीच बरोबर असू शकणार नाही अशी भूमिकाही पुष्कळदा घेतली जाते. ह्यात सत्यांश आहे; पण ते पूर्ण सत्य मात्र नाही. आपण आपल्यावरील संस्कारांनी, आपल्या भोवतालच्या जगातील संस्थास्वरूपी व कल्पनास्वरूपी जीवनाने असे काही घडून जातो की अन्य प्रकारच्या संस्था आणि कल्पना ह्यांचे काही एक निराळे असे जग समजून घ्यायला आपणास बरेच जड जाईल हे मान्य करायलाच पाहिजे. परंतु जड जाईल म्हणजे ते करताच येणार नाही असे मात्र नाही. वर्तमानकाळी एखादा भारतीय आपल्याहून बरीचशी भिन्न अशी अमेरिकन संस्कृती किंवा आफ्रिकेतील रानटी जमातीची संस्कृतीही समजून घेऊ शकतो, प्रयत्नांनी तो तिच्याशी समरस

होऊन तीत पूर्णपणे मिसळूनही जाऊ शकतो, भूतकालीन सांस्कृतिक जीवनाशी ह्याच पद्धतीने एकरूप होणे अशक्यच आहे असे का मानले जावे ते कळत नाही. इतिहास सांगताना इतिहासकार त्या काळच्या भाषेतच बोलत असतो. त्या काळातील संस्था व साधने त्याने गृहीत धरलेली असतात. म्हणून इतिहासकार मराठ्यांनी इंग्रजाविरुद्ध गनिमी पद्धतीनेच लढा चालू ठेवावयास पाहिजे होता की त्यांनी कवायती पलटणी तयार करावयास हव्या होत्या अशा तऱ्हेचा प्रश्न उपस्थित करतात. मराठ्यांनी इंग्रजांच्या वखारीवर दोन अणुबॉम्ब का टाकले नाहीत असा प्रश्न कोणताही शुद्धीत असलेला इतिहासकार टाकीत नाही. त्याचप्रमाणे एखाद्या व्यक्तीने एखाद्या वादात कोणती भूमिका घ्यावयास पाहिजे होती ह्याची चर्चा करताना इतिहासकार तत्कालीन स्थिती व तत्कालीन मूल्ये ह्यांचीच दखल घेत असतो. राजघराण्यात गादीसाठी भांडण झाले तर दरबारातील अमुक व्यक्तीने राजघराण्यातील ज्या व्यक्तीचा हक्क तत्कालीन कल्पनेप्रमाणे न्याय्य होता तिची बाजू का घेतली नाही असेच इतिहासकार विचारील. दरबारातील त्या मुत्सद्याने राजघराण्यातील दोन व्यक्तींपैकी कुणाची बाजू बरोबर हे ठरविण्यासाठी सार्वत्रिक निवडणूक का घेतली नाही असे इतिहासकार विचारू शकत नाही, आणि विचारीतही नाही. तेव्हा भूतकालीन जीवन, प्राचीन मूल्ये ही वर्तमानकालीन अभ्यासकाच्या बुद्धीला कधीच न समजणारी किंवा न झेपणारी अशी गोष्ट आहे असे मानण्याचे काहीच कारण नाही.

### नैतिक मूल्यमापन :

वरील चर्चेच्याच अनुरोधाने आणखी एक विवाद्य मुद्दाही ह्या ठिकाणी स्पष्ट केला पाहिजे. इतिहासकालीन अमुक व्यक्तीने केलेली अमुक गोष्ट चूक होती, बरोबर होती, न्यायाची होती, अन्यायाची होती; समाजाचे हित करणारी होती, समाजाचे अहित करणारी होती अशी विधाने अनेकदा करण्यात येतात. इतिहासकाराला अशा तऱ्हेचे नैतिक मूल्यमापन करण्याचा अधिकार आहे काय ? ह्याचे उत्तर होय असेच आहे. मात्र हे नैतिक मूल्यमापन निःपक्षपातीपणे प्रामाणिकपणे आणि तत्कालीन जीवनपद्धती नीट लक्षात घेऊन करण्याची जबाबदारी मात्र इतिहासकारावर आहे. उपलब्ध असलेल्या सर्व माहितीचा व्यवस्थित उपयोग केला गेला पाहिजे. आपल्या सोयीसाठी काही तपशील वगळून चालणार नाही हे उघडच आहे. परंतु माहितीच्या बाबतीत काटेकोरपणा ठेवूनही इतिहासकार मूल्यमापन करताना आपल्या वैयक्तिक नैतिक भूमिकेमुळे घसरू शकतो. एखाद्या प्राचीन घटनेचे विश्लेषण करताना वर म्हटल्याप्रमाणे तत्कालीन जीवनपद्धती आणि तत्कालीन मूल्ये हीच प्रमाण मानली पाहिजेत. एखादी ऐतिहासिक व्यक्ती तत्कालीन जीवनपद्धती किंवा मूल्ये ह्यांच्या

विरुद्धच क्रांती करीत होती की काय हेही तपासून पाहिले पाहिजे. उदाहरणार्थ, समजा मराठ्यांच्या इतिहासातील महादजी शिंदे ह्या व्यक्तीच्या कृतीचे मूल्यमापन आपणास करावयाचे आहे तर किती प्रश्न उपस्थित करावे लागतील ? एक, स्वामिभक्ती हे तत्कालीन मूल्य होते की नाही ? दोन, ते मूल्य मानून महादजी शिंदे पेशवे दरबारशी एकनिष्ठ राहिला काय ? तीन, महादजी शिंदे एकनिष्ठ राहूच शकला नसता की शक्यता असूनही तो मुद्दाम वाकडे वागला ? चार, तो जर एकनिष्ठ राहिला नसेल तर मराठी समाजाच्या दृष्टीने किंवा मराठ्यांच्या सत्तेच्या दृष्टीने पेशव्यांशी निष्ठा हे मूल्यच चुकीचे आहे असे सांगून तो काही नवी मूल्ये देत होता काय ? असे प्रश्न उपस्थित करून त्यांची उत्तरे शोधावी लागतील. पण ती शोधल्यानंतर मग महादजीची कृती योग्य होती किंवा अयोग्य होती अशा तऱ्हेचे मतप्रदर्शन करण्यास काय हरकत आहे ?

मराठ्यांच्या इतिहासातील अफझलखानाच्या वधाच्या प्रकरणाबाबतही असेच प्रश्न उपस्थित करता येतील. त्या घटनेतील ऐतिहासिक सत्यासत्याचा निर्णय करणेही कठीण आहे. शिवाजीची आणि खानाची भेट झाली त्यावेळी शिवाजीच्या शस्त्रांनी खान मारला गेला एवढा इतिहास मान्य करावाच लागेल. मग हे कृत्य योग्य की अयोग्य, बरोबर की चूक ह्याबद्दल अनेक दृष्टींनी खल करता येईल. त्या भेटीत प्रत्यक्ष काय झाले ? खानाने आधी शस्त्र चालवले म्हणून स्वसंरक्षणार्थ शिवाजीला शस्त्र वापरावे लागले की शिवाजीनेच एकदम आक्रमक पवित्रा घेऊन दगा दिला ? समजा शिवाजीनेच आधी हल्ला केला असला तरी त्याला दगाबाजी म्हणता येईल काय ? शिवाजीने अधिक हुशारी दाखवून अगोदरच खानाला भोसकले नसते तर खानाने शिवाजीच्या बाबतीत तेच केले असते ही शक्यता नाकारता येईल काय ? आणि अगदी असे जरी मानले की त्या दोघांची ती भेट बोलणी करण्यासाठी होती आणि खानाने त्यावेळी विश्वासघात केला नसता; तरी देखील शिवाजीने तसा विश्वासघात केला म्हणजे काय चुकले की काय ? शत्रूशी वागण्याची तत्कालीन नीती जी होती तिला सोडून शिवाजीचे वर्तन झाले की काय ? खानासारख्या शत्रूंचा वाटेल त्या मार्गांनी निःपात करणे हे शिवाजीच्या अंगीकृत कार्याचे दृष्टीने न्याय्यच नव्हे काय ? 'विश्वासघात', 'खून' अशा नुसत्या शब्दांनी बिचकून जायचे की काय? अशा कृत्यांच्या मागची स्थल-काल-सापेक्षता पहायला नको काय ? शिवाजीची ती कृती परिणामी लोकहिताची झाली की नाही ? तशी दृष्टी ठेवूनच शिवाजीने ते कृत्य केले किंवा कसे ? आणि मग शिवाजीने जे केले ते त्याच्या ध्येयांशी आणि निष्ठांशी सुसंगत असेल आणि तत्कालीन राजनीतीला धरून असेल तर ते दोषार्ह म्हणता

येईल काय ? का आणि कसे ? अशा चर्चेला आणि नैतिक मूल्यमापनालाही प्रत्यवाय नसावा.

किंबहुना अशा तऱ्हेने ऐतिहासिक घटनांची आणि ऐतिहासिक व्यक्तींच्या कृतींची चिकित्सा होणे हा इतिहासकथनाचा एक आवश्यक भागच आहे.

## इतिहासातील संभवनीयता :

आजवर उपलब्ध असलेले मानवी इतिहासाचे बरेचसे तपशील पाहिले आणि ते वर विशद केलेल्या दृष्टिकोनातून तपासून घेतले तर मागे म्हटल्याप्रमाणे इतिहासासंबंधीचा कोणताही नियमवाद टिकत नाही हेच दिसून येईल. निरनिराळ्या इतिहासकारांनी निरनिराळ्या कोनातून इतिहासाचे काही अर्थ लावून दिले आहेत, आणि आपल्या त्या मताच्या समर्थनार्थ भूतकालीन घटनांचे काही पुरावेही दिले आहेत. परंतु ते 'काही' पुरावे आहेत हे मुद्दाम लक्षात घेतले पाहिजे, मागील एका प्रकरणी म्हटल्याप्रमाणे एखाद्या मताच्या बाजूने किती पुरावे मिळतात हे मुळीच महत्त्वाचे नाही, त्याच्या विरुद्ध जाणाऱ्या बाजूने किती पुरावे मिळतात हे अधिक महत्त्वाचे आहे. एखाद्या नियमाला एखादा जरी अपवाद असला तरी देखील शास्त्रीय दृष्ट्या तो नियम होऊ शकत नाही. एखादी गोष्ट पुष्कळदा घडली असेल तर ती पुढे पुन्हा तशीच घडेल असे आपण गृहीत धरतो. उद्या सूर्य नक्की उगवेल, संध्याकाळी तो नक्की मावळेल, माझ्या डोक्यावर जे छप्पर आहे ते नक्की आहे तेथे राहील अशा काही गोष्टी गृहीत धरूनच आपण जगत असतो. तेव्हा अशा पद्धतीने तरी आजवरचा इतिहास पाहून भविष्यकाळासंबंधी काही सर्वसाधारण संभवनीयता सांगणे शक्य आहे की नाही ?

मानवाचे इतिहासाचे संदर्भात अशा संभनीयतेला अनेक मर्यादा पडतात. जड, अचेतन वस्तूंबाबत काही निरीक्षण करून आपण जो सिद्धान्त किंवा संभनीयतेचे तर्क बांधतो त्याच्या आधाराने आपला व्यवहार निश्चितपणे सरळ आणि सुकर होऊ शकतो. समोरून विशिष्ट दिशेने आणि गतीने गडगडत येणारा एखादा मोठा दगड कुठे आणि कसा जाईल ह्याचा अंदाज घेता येतो आणि तो घेऊन बाजूला सरकल्यावर तो अंगावर येऊन आपल्याला धडकण्याची भीती रहात नाही. पण समोरून येणारा एखादा बैल कितीही सावकाश आणि निर्विकारपणे चालत आलेला दिसला तरी तो आपल्या अंगावर धाव घेऊन पोटात शिंग खुपसणार नाहीच अशी काही शाश्वती देता येत नाही. आणि मग बैलाहून कितीतरी अधिक बुद्धी आणि कितीतरी अधिक प्रमाणात स्वत्वाची जाणीव असलेल्या माणसाचा भरवसा कसा देता यईल ?

आता त्यातही एखादा विशिष्ट माणूस एखाद्या विशिष्ट प्रसंगी काय करील हे सांगणे थोडे तरी शक्य होईल. एखाद्या मुलाची बुद्धी, त्याची अभ्यासाची तयारी, परीक्षेसारख्या कसोटीच्या प्रसंगाला टिकणारा किंवा न टिकणारा असा त्याचा मनोधर्म हे सगळे लक्षात घेऊन तो पास होईल की नापास होईल हे थोडे बहुत सांगता येईल. परंतु ऐतिहासिक घटना अनेक माणसांच्या सामुदायिक कृती असतात. समुदायात माणूस निराळाच होतो. तिथे भ्याड नरवीर होतात. एरवी सभ्यपणे वागणारे समाजात आले म्हणजे चेकाळू शकतात, तसे चेकाळलेले चार लोकात नरमही पडू शकतात. म्हणूनच एकेका माणसाचे मत पूर्णपणे समजून घेऊन त्या प्रत्येकाच्या कृतीविषयी कदाचित् काही अंदाज बांधता येणे शक्य झाले तरी त्या सर्वांच्या एकत्रित कृतींविषयी भविष्य वर्तविणे अवघड म्हणजे जवळजवळ अशक्यच आहे. तथापि गतेतिहासावरून असा काही अंदाज बांधून पुढे पाऊल टाकण्याचा उद्योग करावा लागतो. त्याच्या इष्टतेची आणि उपयोगितेची थोडी अधिक चर्चा पुढील दोन प्रकरणात करावयाची आहे.

**इतिहासातील आकस्मिक घटना :**

आणि इतिहासात अनपेक्षितपणे, आकस्मिकरीत्या घडणाऱ्या गोष्टी ह्या इतिहासासंबंधी कुणी काही नियम शोधण्याच्या भानगडीत पडू नये असेच ओरडून सांगत असतात. मागील प्रकरणात सांगितल्याप्रमाणे लोकोत्तर पुरुष ही इतिहासातील एक आकस्मिक घटनाच होय. अद्वितीय सामर्थ्याचा पुरुष कोणत्या समाजात आणि कोणत्या काळी जन्माला येईल हे कधीच अगोदर सांगता यावयाचे नाही. समाजाच्या परिस्थितीमुळे त्या पुरुषाच्या कर्तृत्वाची काही प्रमाणात मर्यादा ठरेल हे खरे, पण त्या मर्यादेतूनही तो पुरुष सामाजिक परिस्थिती कशी आणि किती बदलवून टाकील ह्याचे गणित मांडणे कठीण आहे.

मोठ्या व्यक्तींप्रमाणेच त्या मानाने लहान व्यक्तीसुद्धा इतिहासाला अकल्पित अशी कलाटणी देऊ शकतात. क्लिओपात्रा ह्या ईजिप्तच्या सम्राज्ञीविषयी असे म्हटले आहे की तिचे नाक होते त्यापेक्षा अर्धा इंच लांब किंवा अर्धा इंच आखूड असते तर जगाच्या इतिहासाचा तोंडवळाच बदलून गेला असता. हे म्हणणे कदाचित् जास्त अलंकारिक असेल, पण क्लिओपात्राच्या अस्तित्वाने इतिहासावर परिणाम घडला हे कसे नाकारता येईल ? क्लिओपात्रा कुणी निरूपम लावण्यवती होती असे मुळीच नाही, पण तिच्यात काही विलक्षण मोहिनी होती हे निश्चित. सीझर आणि मार्क अँटनी ह्या दोन कर्तबगार रोमन जेत्यांना तिने आपल्या कपटजालात अडकवून खेळवले हे ऐतिहासिक सत्य आहे, त्यामुळे रोममधील घटनांना वेगळे वळण लागले,

रोमच्या साम्राज्याचा इतिहास बदलला आणि पर्यायाने यूरोपच्या आणि जगाच्या इतिहासाला निराळे वळण मिळाले हे दाखवून देता येईल.

पुष्कळदा एकामागून एक कर्तबगार व्यक्ती जन्माला येणे किंवा एका कर्तबगार व्यक्तीनंतर तिची जागा घेणारी दुसरी व्यक्ती जन्माला न येणे ह्या दोन्ही प्रकारच्या अपघातांमुळे दोन तऱ्हांनी इतिहास घडल्याचे दिसते. शिवाजीनंतर मराठ्यांच्या गादीवर येणारे संभाजी आणि राजाराम हे छत्रपती सर्व दृष्टींनी वडिलांसारखेच निपजले असते तर महाराष्ट्राचा इतिहास फारच वेगळा झाला असता. अठराव्या शतकात पेशवाई निर्माण झाली आणि वाढली ती का ? भटांच्या घराण्यात ओळीने चार पेशवे निदान पेशवाई टिकविण्याइतपत समर्थ निघाले म्हणूनच.

महापूर, दुष्काळ, साथींचे रोग अशा आकस्मित येणाऱ्या नैसर्गिक आपत्तींनी माणसाने कष्टाने निर्माण केलेली शेकडो वर्षांची संस्कृती बघता बघता कशी लयाला जाते ह्याचीही इतिहासातून शेकडो उदाहरणे दाखवता येतील. एक प्रकारच्या हिव-तापाने बेजार झालेल्या रोमनांना आपली सत्ता आणि आपली संस्कृती टिकविण्याची शक्ती उरली नाही असे दिसून येते. आणि पंधराव्या शतकात यूरोपभर पसरलेल्या प्लेगच्या साथीने त्या खंडाची लोकसंख्या अतिशय कमी झाली आणि उरलेल्यांना अभ्युदयाची उत्कृष्ट संधी प्राप्त होऊन समाजात सर्व बाजूंनी आश्चर्यकारक प्रगती घडून आली असेही इतिहास सांगतो. ( Social Change पृ. २८ ) साथीच्या रोगांसारख्या संकटांनी होऊ शकणाऱ्या विलक्षण परिणामांची ही गोष्ट इतकी उघड आहे की आणखी उदाहरणे घेऊन विस्तार करण्याचे काही कारणच नाही.

### शास्त्रीय शोध आणि मानवी इतिहास :

माणसांनी लावलेले निरनिराळे शोध हेही इतिहासातील आकस्मिकतेचेच एक मोठे प्रमाण आहे. परंतु ह्या मुद्याबाबत थोडी चर्चा करणे प्राप्त आहे. कारण सर्व शोध हे गरजेच्या पोटी लागतात; जरूर वाटली की आवश्यक तो शोध लागतोच लागतो असे मानणारा एक पक्ष आहे.

ह्याबाबतही मूलभूत प्रश्न असा विचारता येईल की, जी गरज म्हणून आपण म्हणतो ती समाजाची किंवा निदान समाजातील एखाद्या मोठ्या गटाची गरज असते आणि शोध लावणारी एक व्यक्ती असते; ती व्यक्ती समाजाची ती गरज लक्षात घेऊन मगच संशोधनाला प्रवृत्त होते असे कसे म्हणता येईल ? स्वाभाविक असे कुतूहल असणारा माणूस भोवतालच्या सृष्टीविषयी विचार करीत असतो. त्याला काही कल्पना सुचतात आणि काही सत्ये प्रतीत होतात. ही त्या व्यक्तीची क्रिया बहुधा पूर्णपणे

वैयक्तिक स्वरूपाची अशीच असते. आपण गुरूत्वाकर्षणाचा नियम शोधून काढला तर समाजाची कोणती तरी एक गरज भागविली जाईल अशा इच्छेने प्रेरित होऊन न्यूटनने तो सिद्धान्त हुडकून काढला असे म्हणता येणे शक्य नाही. सृष्टिव्यापाराविषयी विचार करणाऱ्या न्यूटनला झाडावरचे फळ झाडापासून तुटल्यावर वर न जाता खाली यावे ह्याचेच कोडे पडले. तो विचारमग्न झाला आणि सृष्टिव्यापाराचा अर्थ लावता लावता त्याला गुरूत्वाकर्षणाचा सिद्धान्त प्रतीत झाला. कित्येक शास्त्रीय शोध केवळ योगायोगाने अचानक लागलेले आहेत. लुई पाश्चरचा इनॉक्यूलेशनचा शोध आणि फ्लेमिंगचा पेनिसिलीनचा शोध ही अशासारखी दोन उदाहरणे दाखविता येतील. वस्तुतः देवी, कॉलरा, विषमज्वर असे रोग फार प्राचीन आहेत. हे रोग दूर करण्याची, त्यांच्यापासून मानवजातीचे रक्षण करण्याची गरज माणसाला पाचसात हजार वर्षे भासली नाही, एकाएकी एकोणिसाव्या शतकात तशी गरज वाटली आणि मग ताबडतोब शोध लागले अशासारखा इतिहास मांडणे हे फक्त कुठल्यातरी नियमांच्या गुलामगिरीतच शक्य होईल.

काही शोध गरजातून निर्माण होतात हे खरे पण गरज वाटली की शोध लागलाच पाहिजे असे शास्त्र बसविता येणार नाही. कापड तयार करण्याच्या उद्योगातले काही प्रश्न जुनेच होते. सूत कातणारा वेळेच्या मानाने फारच थोडे काम करू शकतो आणि त्याने कातलेले सूत त्या सुताचे कापड विणणारा फारच थोडचा वेळात संपवून टाकतो. विणकर कातणारांच्या पुढे सतत धावत राहतात. १७३३ मध्ये जॉन के याने उडत्या धोटयाच्या शोधाचे पेटंट घेतले. ह्यानंतर विणकरांचा वेग अधिकच वाढला आणि कातणारे विणकरांची सुताची गरज पुरी करूच शकणार नाहीत अशी स्थिती निर्माण झाली. पण म्हणून एक दोन वर्षात कातण्याच्या यंत्राचा शोध लागला असे काही झाले नाही. तो पुढे तीस पस्तीस वर्षांनी लागला. आगबोटी आणि छापखाने अस्तित्वात आले त्यापूर्वी कितीतरी आधी ते आले असते तर बरे झाले असते, परंतु प्रत्यक्षात तसे घडले नाही.

शोधांचा आणि गरजांचा संबंध दाखविताना वाफेच्या शक्तीच्या शोधाचे उदाहरण नेहमी देण्यात येते. कुणा एकाला काही एक शोध लागला तरी समाजाला गरज नसली तर त्याचा काहीही उपयोग होत नाही असा सिद्धान्त मांडण्यासाठी असे दाखविण्यात येते की प्राचीन काळी अलेक्झांड्रिया येथील हेरोला वाफेच्या शक्तीची कल्पना होती पण त्यावेळी गुलामांकडून कोणतेही काम चापून करून घेण्याची शक्यता असल्यामुळे त्या शक्तीचा उपयोग करावा असे वाटलेच नाही. पण अठराव्या शतकात मात्र सामाजिक परिस्थिती वेगळी असल्यामुळे जेम्स वॅटचा वाफेचा शोध

गरजेला धावून आला. बर्ट्रांड रसेलने म्हटल्याप्रमाणे दोन परिस्थितींचे हे तपशील बरोबर नाहीत. इंग्लंडमध्ये अठराव्या शतकात मजुरी खूप स्वस्त होती, मजूर हवे तेवढे मिळण्यासारखे होते. ग्रीक रोमन काळातल्यासारखी गुलामगिरी नसली तरी कामाला माणसेच नाहीत, काय करावे अशी दुरवस्था मुळीच आलेली नव्हती, ( Understanding History पृ. ३५). पुढे असेही म्हणता येईल की माणसाची वाण पडलीच तर यंत्राचा शोध लागला पाहिजे असे तरी का म्हणावयाचे ? माणसांना मारून, झोडून कामाला जुंपील असा एखादा सुलतान जन्माला येऊनही ती गरज भागू शकते !

तेव्हा शास्त्रीय शोध म्हणजे पुष्कळदा इतिहासामध्ये अनपेक्षितपणे अचानक घडणाऱ्या घटना असेच मानावे लागेल. त्या शोधांनी माणसाची जीवनपद्धती बदलते आणि निराळा इतिहास घडू लागतो हे नाकारता येणार नाही.

**स्थित्यंतरांचे वास्तव स्वरूप :**

वरील विवेचनाच्या अनुरोधाने पहाता मानवी इतिहास नियमबद्ध नाही. मानवी जीवन कोणत्या तरी अतिनैसर्गिक, नैसर्गिक किंवा सामाजिक स्वरूपाच्या विशिष्ट आखीव पद्धतीने, ठराविक अवस्थांतून जात असते असे म्हणता यावयाचे नाही. मानवी इतिहास विस्कळीत आहे. एखाद्या समाजाचे जीवन कधी भौगोलिक परिस्थितीने घडेल, कधी योगायोगाने मिळालेल्या नेतृत्वाच्या सामर्थ्यामुळे घडेल कधी आग किंवा महापूर ह्यांसारख्या आपत्तींनी ते होरपळून जाईल, कधी चांगला पाऊस, चांगले पीक अशा नैसर्गिक वरदानांनी मानवी कर्तृत्वाविना ते फुलूनही येईल. मिळालेल्या चांगल्या नैसर्गिक परिस्थितीचा माणसांनी चांगला उपयोग केला आहे असे दिसेल तर निसर्ग अनुकूल असूनही माणसे हातपाय हालवायला तयार नाहीत असेही आढळून येईल. कधी समाज सामुदायिक निर्णयाने विशिष्ट दिशेने आणि, योजनेने पुढे सरकताना दिसतो, परंतु अंतर्गत यादवी किंवा परकीयांची राक्षसी आक्रमणे ह्यामुळे सगळ्या योजना कोलमडल्या आणि समाजाची वाढ खुंटली आणि समाज रसातळाला गेला अशीही दृश्ये दिसतात. इतिहास नेमका कसा घडेल, कोणते कारण कोणत्या वेळी प्रबळ ठरेल, निर्णायक ठरेल हे मुळीच सांगता यावयाचे नाही.

एच्. ए. एल्. फिशर याने आपल्या यूरोपच्या इतिहासाच्या प्रस्तावनेत हे खालीलप्रमाणे मांडले आहे.

"I begin this book with neolithic man and conclude with Stalin and Mustapha Kemal, Mussolini and Hitler. Between these rough and rugged frontiers there are to be

found some prospects flattering to human pride, which it is a pleasure to recall to memory, the life-giving inrush of the Aryan peoples, the flowering of Greek genius, the long Roman peace, the cleaning tide of Christian ethics, the slow reconquest of classical learning after the barbaric invasions, the discovery through oceanic travel of the new world, the rationalism of the eighteenth and the philanthropy and science of the nineteenth centuries. One intellectual excitment has, however, been denied me. Men wiser and more learned than I have discerned in history a plot, a rhythm, a predetermined pattern. These harmonies are concealed from me. I can see only one emergency following upon another as wave follows upon wave, only one great fact with respect to which, since it is unique, there can be no generalizations, only one safe rule for the historian; that he should recognise in the development of human destinies the play of the contingent and the unforeseen"

इतिहास असा आहे म्हणून तो पहावयाचाच नाही असा मात्र वरील विवेचनाचा अर्थ नव्हे. इतिहासावलोकनाचा कुणाला कधी काही उपयोगच व्हावयाचा नाही असेही प्रतिपादन करावयाचे नाही. इतिहासाचा अभ्यास वास्तव दृष्टिकोनातून व्हावा हे सांगण्यासाठीच हा सारा विस्तार आहे. आपल्या इतिहाससंबंधीची योग्य दृष्टी नसेल तर इतिहासाचा दुरुपयोग होईल. तो अनर्थकारी, भयावह ठरण्याचाही प्रसंग येईल. त्याचप्रमाणे तशा दृष्टीच्या अभावी इतिहासाचा जो नेमका उपयोग व्हायला पाहिजे त्यालाही आपण पारखे होऊ. इतिहासाचे काय दुरूपयोग होत आहेत आणि होत रहाणे शक्य आहे आणि तसेच इतिहासाचे नेमके उपयोग ते काय आणि कसे व्हावेत ह्याची चर्चा आता ओघानेच प्राप्त होत आहे आणि पुढील दोन प्रकरणातून तीच करावयाची आहे.

## संदर्भसाहित्य :

( 1 ) A History of Historical writing
– Barnes H. E.; New York 1962
( 2 ) The Meaning of History
– Berdyaev, Nicolas; London, 1936

( 3 ) Man on His Past
- Butterfield, Herbert ; Cambridge, 1955
( 4 ) Historical Inevitability
- Berlin, Isaiah ; London, 1954
( 5 ) Philosophies of History
- Cairns, Grace ; London, 1963
( 6 ) The Meaning of Human History
- Cohen, Morris ; Chicago, 1961
( 7 ) History ; its Theory and Practice
- Croce, Benedetto ; New York, 1960
( 8 ) The Pleasures of Philosophy
- Durant, Will ; New York, 1962
( 9 ) Historical Change
- Einstein, Lewis ; Cambridge, 1946
( 10 ) Approaches to History
- ed. Finberg, H. P. R; London, 1962
( 11 ) A History of Europe (Vol.-1 )
- Fisher, H. A. L ; London, 1960
( 12 ) The Nature of Historical Explanation
- Gardiner, Patric ; London, 1952
( 13 ) The Intent of Toynbee's History
- ed. Gargan E. T. ; Chicago, 1961
( 14 ) A Guide to Historical Method
- ed. Garraghan G. J. and
Delanglez, Jean ; New York, 1957
( 15 ) Encounters in History
- Geyl, Pieter ; London, 1963
( 16 ) Generalizations in the Writing of History
- ed. Gottschalk, Louis ; Chicago, 1963
( 17 ) Philosophy and History
- ed. Hook, Sidney ; New York, 1963
( 18 ) Social Change
- Lapiere, Richard T. ; New York, 1965

( 19 ) Freedom and History
- Lewis, H. D.; London, 1962
( 20 ) Meaning in History
- Lowith, Karl. ; Chicago, 1949
( 21 ) On the Philosophy of History
- Maritain, Jacques; London, 1959
( 22 ) Theory and History
- Mises, L. V.; London 1958
( 23 ) Rhythm of History
- Osborne, Arthur; Oriont Longmans.
( 24 ) On the Meaning of History
- Papers of the Eductional Intitute No. 5 ; Geneva, 1950
( 25 ) The Historian's Business and Other Essays
- Pares, Richard.; Oxford, 1961
( 26 ) The Poverty of Historicism
- Popper, K. R; London, 1957
( 27 ) The New History
- Robinson J. H.; New York, 1923
( 28 ) Freedom and Organization
- Russell, Bertrand ; London, 1938
( 29 ) Understanding History
- Russell, Bertrand; New York, 1957
( 30 ) Historian and Scientist
- Salvemini, Gaetano; Cambridge, 1939
( 31 ) The Interpretation of History
- ed. Strayer, J. R.; Princeton, 1943
( 32 ) Theory and Processes of History
- Teggart, F. J.; Los Angeles, 1962

( 33 ) The Pattern of the Past :
Can We determine it ?
– Toynbee, A. with Geyl P. and
Sorokin, P. ; Boston, 1949

( 34 ) A Study of History ( Vol. I to 13 )
– Toynbee A. J. ; London, 1956–60

( 35 ) Interpretations of History
– Widgery A. G. ; London, 1961

( 36 ) Diogenes,
– Montreal, P. Q. ; Spring, 1966

( ३७ ) राजतरंगिणी–कल्हण.

---

## प्रकरण १० वे

# इतिहासाचे दुरुपयोग

### जीवनोपयोगी गोष्टींचे स्वरूप आणि प्रकार :

एखाद्या गोष्टीची उपयुक्तता ठरविताना तिचा अनेक बाजूंनी आणि अनेक तऱ्हांनी विचार करावा लागतो. काहींचे उपयोग अत्यंत उघड आणि वादातीत असतात. मनुष्यजीवनाला सूर्यप्रकाशाचा, हवेचा, पाण्याचा किंवा अन्नाचा उपयोग नेमका काय आणि कसा होतो ह्याचा शास्त्रीय दृष्टचा कितीही तपशीलवार अभ्यास व्हावा, पण मुळात त्याचा उपयोगच काय असा प्रश्न उपस्थित करणे मूर्खपणाचे होय. मनुष्यजीवन आज केवळ अन्न, पाणी आणि निवारा अशा जीवनाच्या अगदी प्राथमिक गरजाच तेवढचा लक्षात घेऊन विशद करता येणार नाही. मानवी संस्कृतीची आजची आहे ती घडण लक्षात घेतली तर कित्येक वस्तू, कित्येक संस्था आणि कित्येक प्रकारचे ज्ञान ह्यांचे स्वरूप अगदी मूलभूत गरजांचेच आहे असे नाही, पण तरीही ह्यांचा उपयोग स्पष्टपणे दिसणारा आणि साधारणतः कोणत्याही वादापलीकडचा आहे असेच म्हणावे लागेल. तलम कापड, शिवणाचे मशीन, निरनिराळ्या प्रकारचे रंग, कागद, आगगाडी, अशा विविध प्रकारच्या वस्तूंची गरज ही आजच्या जीवनात इतकी खरी आहे की त्यांच्या उपयोगितेची चर्चाच संभवत नाही. त्याचप्रमाणे माणसांनी आपल्या सुखी जीवनासाठी कुटुंबसंस्था, राज्यसंस्था वगैरे ज्या निर्माण केल्या आहेत त्याही अत्यावश्यक आणि जवळजवळ मूलभूत अशाच बाबी आहेत. समाजातले काही गट आपल्या विशिष्ट हेतूंसाठी वाचनालये, क्रीडांगणे, ट्रेड युनिअन अशासारख्या ज्या संस्था किंवा जे संघ निर्माण करतात त्यांचा व्यावहारिक उपयोग कुणालाही दिसणारा आणि पटणारा असाच असतो. आणि वरीलप्रमाणे विविध प्रकारच्या जीवनोपयोगी वस्तू निर्माण करण्यासंबंधीचे, त्यांचा योग्य रीतीने वापर करण्याबाबतचे तांत्रिक ज्ञान हेही तितकेच आवश्यक आहे. त्याचप्रमाणे वर ज्या संस्था आणि संघ ह्यांचा उल्लेख केला आहे ते प्रकार काय असतात, संस्थामय जीवन कसे असते, कसे असावे ह्यासंबंधी सर्व बाजूंनी विचार करणारे राज्यशास्त्र, अर्थशास्त्र ह्यांसारखे जे ज्ञानविषय असतात तेही माणसाला अत्यंत उपयोगी ठरतात हेही स्पष्ट आहे.

केवळ जिवंत रहाण्यासाठी आवश्यक अशा हवा, पाणी, अन्न वगैरेंची उपयुक्तता एका प्रकारची तर विशिष्ट सांस्कृतिक जीवनाला आवश्यक अशा इतर हजारो गोष्टींची

उपयुक्तता थोडी निराळ्या प्रकारची असते. पण काही असले तरी त्यांची उपयुक्तता नाकारता येत नाही. समाजिक जीवन हे एक सत्य आहे. सर्व माणसांचे जीवन संघटित-रीत्या सुखाने चालावे ह्यासाठी सामाजिक जीवनाचे जे विविध प्रकार अस्तित्वात येतात त्यांचा सर्व बाजूंनी विचार व्हावाच लागतो. म्हणूनच राज्यशास्त्र, समाज-शास्त्र, नागरिकशास्त्र ह्यांचा अभ्यास आवश्यकच असतो.

वाङ्मय, चित्रकला, संगीत इत्यादी मानवी जीवनात दिसणाऱ्या कला, क्रीडा आणि मनोरंजनाच्या निरनिराळ्या प्रकारांच्या उपयुक्ततेविषयी शंका घेता येईल. जगात साहित्य, शिल्प किंवा संगीत नसले तर मनुष्यजात नष्ट होणार नाही हे निश्चित. आजपर्यंत लिहिले गेलेले सर्व ललित साहित्य अचानक भस्मसात झाले तर मानवी समाजाचे म्हणण्यासारखे असे काही नुकसान होणार नाही हे मान्य करावयास हरकत नाही. तथापि साहित्य, संगीत इत्यादी कलाप्रकारांचे आणि छंदांचे द्वारा माणूस मनुष्य म्हणून आपली वैशिष्टचे व्यक्त करीत असतो. सुसंस्कृत माणसाच्या जीवनात साहित्य आणि कला ह्यांचे स्थान आता इतके पक्के आहे की त्यांची जरूरीच काय असा प्रश्न उपस्थित करणे कुणालाही पटणार नाही. समाजाला त्या गोष्टी हव्या आहेत. त्यांच्याशिवाय आपले निभणार नाही असे समाजाला वाटते हीच त्यांची उपयुक्तता. ह्यापैकी एखादी गोष्ट समाजातील बहुतेक सगळ्या किंवा निदान बहुसंख्य लोकांना हवी असेल तर दुसऱ्या एखाद्या गोष्टीत फारच थोडे लोक रस घेतील. चित्रपट ही भारतीय समाजातील लाखो माणसांची गरज आहे ; परंतु शास्त्रीय संगीत ही त्या मानाने फारच थोड्या लोकांची गरज आहे. परंतु एखाद्या विषयात रस घेणारे लोक किती आहेत हा मुद्दा तेवढासा महत्त्वाचा नाही. समाजातल्या एका माणसाला जरी एखाद्या विशिष्ट गोष्टीत रस असला आणि उरलेल्या सर्व समाजाला ती गोष्ट नको असली तरी त्या एका व्यक्तीचे दृष्टीने त्या गोष्टीची उपयुक्तता नाकारता येणार नाही. फक्त एवढेच होईल की त्या विषयात रस घेणारी इतर माणसे नसल्या-मुळे ती व्यक्ती एकाकी पडेल, तिला समाजाकडून कोणत्याही प्रकारच्या सहकार्याची किंवा साहाय्याची अपेक्षा करता येणार नाही, किंबहुना समाजाचा विरोधही सहन करावा लागेल. मुद्दा असा की गरज किती लोकांची आहे ह्यावरून त्या गरजेसाठी संघटित रीत्या किती प्रयत्न होऊ शकतील, त्यात किती प्रगती होऊ शकेल, किती यश मिळेल वगैरे गोष्टी ठरतील, पण केवळ चारच लोकांना एखादी गोष्ट आवश्यक वाटली तरी त्या लोकांच्या दृष्टीने असलेल्या तिच्या उपयुक्ततेविषयी शंका घेता येणार नाही.

तेव्हा आजच्या मानवी जीवनात एखाद्या गोष्टीची उपयुक्तता जीवनाची मूल-भूत गरज, समाजिक जीवनाची एक आवश्यकता आणि मनोरंजनाचे एक साधन असे

तीन प्रकारचे कस लावून ठरवावी लागेल. ह्या दृष्टीने तपासून पहाता काही गोष्टींचा उपयोग उघड आणि प्रत्यक्ष दिसणारा असा असतो. पहिल्या प्रकरणात म्हटल्याप्रमाणे साधी बेरीज वजाबाकी येत नसेल तर बाजारात गेल्यावर माणूस फसेल आणि विजेच्या उपकरणांचा वापर करण्याची माहिती नसेल तर धक्का बसून मरावेच लागेल. शेक्सपिअरचे नाव माहीत नसेल आणि भैरवीचे आरोह-अवरोह ठाऊक नसतील तर माणसाचे आर्थिक दृष्ट्या नुकसान काही नाही, आणि त्याच्या जीवालाही धोका नाही. परंतु साहित्यापासून आणि संगीतातून आपल्या जीवनाचा काही आनंद मिळवू इच्छिणाऱ्यांसाठी शेक्सपिअरचे नाव आणि भैरवीच्या सुरांची माहिती ह्या गोष्टी आवश्यक आहेत. आणि म्हणून त्यांची उपयुक्तताही निर्विवाद आहे. राज्य कसे चालते, एका व्यक्तीचा आणि राज्यसंस्थेचा संबंध काय, सरकारला कर का भरावयाचे, त्या करांच्या मोबदल्यात काय मागावयाचे, कसे मागावयाचे, मागून मिळाले नाही तर काय उपाय योजावयाचे हे सर्व ज्ञान आजचे सामाजिक जीवन आहे तसे लक्षात घेतले तर आवश्यक ज्ञानातच मोडते आणि म्हणून राज्यशास्त्राच्या अभ्यासाच्या उपयुक्ततेविषयी वाद होऊ शकत नाही. गरजांचे प्रकार निरनिराळे असतील. समाजात एखादी गोष्ट सर्वांची गरज असेल, बहुसंख्यांकांची असेल किंवा फारच थोडयांची असेल परंतु कोणाची तरी कोणत्या तरी प्रकारची गरज आहे हे निश्चित असेल तर तिच्यासंबंधीच्या ज्ञानाची उपयुक्तता मान्य करावीच लागेल.

### इतिहासाच्या उपयुक्ततेचे स्वरूप :

वरील विवेचनाच्या अनुरोधाने इतिहासाची उपयुक्तता तपासून पहावयाची आहे. इतिहासाच्या ज्ञानाची माणसाला अन्नपाण्यासारखी गरज नाही हे स्पष्टच आहे. इतिहासाचे ज्ञान नसले तर दैनंदिन जीवनात माणसांचे काही अडेल असे प्रथमदर्शनी तरी मुळीच वाटत नाही. माणसाच्या सामाजिक जीवनाला इतिहासाच्या ज्ञानाची जरूरी आहे काय ? सामाजिक जीवनासाठी संस्थांची जरूरी आहे. विवाहसंस्था पाहिजे; कुटुंबसंस्थेची आवश्यकता आहे. विशिष्ट गरजांप्रमाणे निरनिराळ्या लहानमोठ्या संघटनाही उभाराव्या लागतात. पण ह्यासाठी ज्यांच्या संघटना बांधावयाच्या त्या आजच्या माणसांसंबंधीचे ज्ञान पुरेसे आहे. त्या संस्थांचे नियम, त्यांच्या कार्यपद्धती, त्यांची उद्दिष्टे आणि ती साध्य करून घेण्याचे मार्ग ह्यांचा अभ्यास आजच्या माणसांच्या दृष्टीने आणि वर्तमानकालीन गरजांचे अनुरोधाने आवश्यक होईल. पण ह्यात तरी इतिहासाची म्हणजे भूतकालाच्या ज्ञानाची गरज पडते काय ? पडत असेल तर ती कशी ? ह्या प्रश्नाचे उत्तर जरासे अवघड आहे. ते थोडे पुढे बघू.

काही माणसांच्या मनोरंजनाचा किंवा ज्ञानानंदाचा एक प्रकार म्हणून इतिहासाची उपयुक्तता असेल तर ती अर्थातच नाकारता येणार नाही. मला दुसऱ्या

कशातही रस नाही फक्त बाजीराव पेशवा उत्तरेकडच्या कोणत्या तरी एका मोहिमे-साठी बाहेर पडला तेव्हा तो काळचा रंगाच्या घोडचावर बसला होता की तांबडचा रंगाच्या ह्याचा निर्णय करण्यातच मला ब्रह्मानंद आहे असे जर कुणी म्हणाला तर त्याला कुणी काय म्हणून अडवावे ? परंतु एखाद्या व्यक्तीचा एखादा छंद एवढचाच दृष्टीने काही आपण इतिहासाकडे पहात नाही. इतिहासाच्या उपयुक्ततेविषयी जेव्हा आपण चर्चा करतो तेव्हा भूतकालीन घडामोडींच्या माहितीचा आम्हाला आजच्या आमच्या सामाजिक जीवनाचे दृष्टीने काय उपयोग आहे असाच प्रश्न उपस्थित केलेला असतो.

वैयक्तिक, व्यावहारिक उपयोगाचे दृष्टीनेच बोलावयाचे तर असे म्हणता येईल की इतिहासाला काही अर्थ असो नसो; गुप्तांचे सुवर्णयुग, औरंगजेबाचे जुलूम, पिरॅमिड बांधणारे ईजिप्तचे राजे, जगभर धुडगूस घालणारे हूण लोक ह्यांच्या माहितीचा इतरांना काही उपयोग असो नसो पण ती पाठ करून परीक्षेत उत्तीर्ण होणारांना नोकऱ्या मिळतात. ते शाळाकॉलेजात इतिहासाचे शिक्षक किंवा प्राध्यापक होतात; जुने कागदपत्र, जुन्या वस्तु वगैरेचे संरक्षण करून त्यावरून नवीन इतिहास लिहिण्या-चेही काम त्यांना मिळते. पुरातत्त्वविद्या खात्यातून प्राचीन अवशेषांचे उत्खनन करण्या-साठीही त्यांना चांगल्या प्रकारच्या नोकऱ्या मिळू शकतात. ह्या कामातून आणखी इतिहास लिहिला जातो. आणखी इतिहासाचे विद्यार्थी तयार होतात. ते विद्यार्थी पुढे तसेच इतिहासाचे शिक्षक, प्राध्यापक, संशोधक वगैरे होतात आणि ही अशीच परंपरा चालू रहाते. पण ह्यावर समाजातर्फे असे विचारता येईल की काहींनी इतिहास शिकायचा, मग तो इतर काहींना शिकवावयाचा आणि त्यांनी पुन्हा तोच उद्योग करावयाचा म्हणजे केवळ एका विषयाचे शिक्षक आणि विद्यार्थी असे चक्र चालू ठेवण्यासाठीच हा सारा प्रपंच आहे की काय ? समाजाला जर ह्या विषयाच्या शिक्षक-विद्यार्थ्यांपासून, अभ्यासकांकडून काही मिळत नसेल, मिळण्यासारखेच नसेल तर ह्यांचा बोजा समाजाने का सोसावा ? म्हणून इतिहासाची उपयुक्तता ही ह्या दृष्टीने तपासून पाहून निश्चित करावी लागेल.

एखादी संस्था, एखादे शास्त्र किंवा तंत्र, एखादा शोध आणि एखाद्या प्रकारचे ज्ञान हे उपयुक्त आहे की नाही हे शेवटी नेहमी वापरणारावरूनच ठरत असते. निरीक्षणाने सृष्टीतील बहुविध व्यापारांचे स्वरूप आपल्याला समजते. मानवी जीवनाचे निरीक्षण करून त्यासंबंधीही काही आडाखे आपण बांधतो. जडसृष्टीविषयीचे किंवा मानवाविषयीचे हे ज्ञान आपण होऊन काहीच करू शकत नाही. त्या ज्ञानाचा वापर करणारे आपण त्याचा उपयोग करायला, उपयोग न करायला किंवा दुरुपयोग करायला समर्थ असतो. अगदी प्राथमिक अवस्थेत माणसाला अग्नीचा शोध लागला. अग्नीचा

उपयोग करून माणसाने ऊब मिळविली, प्रकाश मिळविला, शिजविलेले चवदार अन्न मिळविले आणि त्याचप्रमाणे एकमेकांची घरेदारे भस्मसात करण्याचे उद्योगही केले. अग्निनारायण स्वतःहून काही करीत नाही. तो तुमचा सेवक आहे. विस्तव हे माणसाच्या हातातले एक साधन आहे. ते कसे वापरावे हे ठरवावयाला माणूस स्वतंत्र आहे. आता माणसाने अणुशक्तीसारखे महान् शोध लावले आहेत. अणुशक्तीचा उपयोग माणसाच्या सुखसमृद्धीत भर घालण्यासाठी निश्चित करता येईल. परंतु मनात आले तर सारी मानवजात नष्ट करण्याची कामगिरीही त्याच शक्तीचा वापर करून उरकून टाकता येईल. भूतकालीन घडामोडींचे ज्ञान म्हणजे इतिहास हाही उपयोगी, निरूपयोगी किंवा घातक कसाही होऊ शकेल. हेही वापरणारावरच अवलंबून आहे. इतिहासाचा उपयोग काय ह्याची चर्चा करण्यापूर्वी इतिहासाचा संभाव्य दुरुपयोग काय ह्याचे विवेचन करणे अधिक चांगले. कारण इतिहासाचा उपयोग आहे की नाही हे कळण्यापूर्वी त्याचा दुरुपयोगच होत आहे, दुरुपयोग होत आला आहे आणि दुरुपयोगच होत राहील असे जर काही आपल्याला दिसले तर मुळातच त्या विषयाचा नाद सोडणे बरे.

**सदोष जीवनदृष्टी :**

भौगोलिक, वांशिक किंवा सामाजिक अशा कोणत्या तरी एका दृष्टिकोनातून एक आणि एकच कारण मूलभूत मानून केलेल्या इतिहासमीमांसांचे स्वरूप मागील काही प्रकरणातून कमीअधिक विस्ताराने पाहिले आहे; आणि प्रत्येक ठिकाणी ती ती कारणमीमांसा अपुरी, अशास्त्रीय आणि सदोष असल्याचेही दाखविले आहे. काही ठिकाणी अनुभवास येतो म्हणून सर्वच ठिकाणी एखादा नियम लागू करणे हा प्रकार तर्कदुष्ट आणि अशास्त्रीय आहे हे तर खरेच. पण मानवी जीवनाचे दृष्टीने त्यात खरा धोका आहे तो असा की खुद्द त्या मानवाच्या विचारसरणीवर त्या नियमांच्या मोहामुळे अनेक प्रकारे विपरीत परिणाम होण्याचा संभव निर्माण होतो. माणसाचे जीवन कसे असते ? त्यात बदल कसे होतात ? जीवनाची ध्येये कोणती असावीत ? ती ध्येये साध्य करण्यासाठी कोणते मार्ग चोखाळावे ? आपल्या ध्येयाप्रत पोचण्याचे सामर्थ्य आपल्याला आहे की नाही ? असेल तर ते अमर्याद आहे की त्याला काही अपरिहार्य अशा मर्यादा आहेत ? अशासारखे अनेक प्रश्न माणसाला आपल्या जीवन-प्रवासाच्या संदर्भात पडत असतात. माणसाचे हिताचे दृष्टीने ह्या प्रश्नांची वास्तव उत्तरे मिळणे आवश्यक आहे. माणसाच्या कर्तृत्वाला निष्कारण अडसर उत्पन्न होता कामा नयेत. त्याचप्रमाणे आपल्या कर्तृत्वशक्तीविषयी त्याच्या काही भलत्या समजुतीही होऊ नयेत. अशा वास्तव दृष्टिकोनातून मानवाने स्वतःच्या जीवनाकडे

पहाण्यास शिकणे आवश्यक आहे. परंतु वर उल्लेखिलेल्या एककारणात्मक इतिहासभाष्यांमुळे म्हणजेच पर्यायाने जीवनभाष्यांमुळ, जीवनाविषयी चुकीचे दृष्टिकोन दिले जाण्याची फार मोठी भीती आहे.

इतिहासाचा प्रवाह परमेश्वरी इच्छेप्रमाणे वहातो. सर्व गोष्टींचा, सामाजिक घडामोडींचा प्रत्येक माणसाच्या आशाआकांक्षाचा आणि यशापयशांचा, निर्माता तो एक परमेश्वर आहे, त्याच्या योजनेबरहुकूमच सर्व काही होत रहाणार अशा तऱ्हेच्या विचारांनी माणसात निष्क्रियता येईल. दैवगतीपुढे इलाज नाही असे म्हणून उगी रहावे आणि जे जे होईल ते ते पहावे अशा तऱ्हेची उदासीन वृत्ती बळावेल. त्या ईश्वराचे स्वरूप काहीही असो, कुणी त्याला अल्ला म्हणोत कुणी भगवान शंकर म्हणोत. नाव काहीही दिले तरी एक कर्तीकरवती परमोच्च शक्ती मानली आणि सर्व तिच्या इच्छेप्रमाणे होईल, माणसांनी व्यर्थ धडपड करू नये अशा तऱ्हेचे ज्ञान आले की, त्यामुळे माणसामध्ये एक दुबळेपणाची भावना निश्चितपणे येणारच. ईश्वर न मानता काही एक कुणालाही बदलता न येणारे आणि हमखास विशिष्ट गतीने आणि दिशेने फिरणारे विश्वचक्र किंवा कालचक्र मानले तरीही ह्या स्थितीत फरक पडत नाही आणि त्यानंतर ईश्वर सोडला, विश्वचक्राची किंवा कालचक्राची कल्पना टाकून दिली आणि त्याचे जागी नैसर्गिक, वांशिक, सामाजिक किंवा आर्थिक नियतिवाद आणला तरीही परिस्थितीत बदल होत नाही. स्वतःच्या नियमांनी फिरत रहाणाऱ्या विश्वचक्रात किंवा कालचक्रात माझ्यासारख्या एका क्षुद्र जीवाच्या धडपडीला काय अर्थ आहे ? तसेच इतिहास जर विशिष्ट नैसर्गिक, व भौगोलिक परिस्थितीत विशिष्ट प्रकारेच घडणार असेल तर मी माझ्यापुरते काय वेगळे ठरवू शकणार आहे ? सर्व समाजाचे मानाने मी किती लहान आणि एखाद्या प्रचंड आर्थिक उलाढालींच्या मानाने माझी कृती केवढीशी ! तेव्हा जर इतिहास नियमबद्ध असेल; जे घडायचे ते विशिष्ट प्रकारे घडणारच असेल आणि मी केवळ त्या प्रचंड योजनेचा एक लहानसा भाग असेन तर मी माझ्या इच्छेने ठरविलेला जीवनमार्ग असे काही असूच कसे शकेल ? वर उल्लेखिलेल्या इतिहासमीमांसांनी माणसाला असे कित्येक प्रश्न पडतील आणि सर्व प्रश्नांचे उत्तर नेहमी एकच राहील की माणसाच्या स्वतंत्र इच्छेला आणि स्वतंत्र कर्तृत्वाला इतिहासाच्या गतीत अर्थ नाही. त्याला जी आपली स्वतंत्र इच्छा आणि कृती वाटत असते त्यातले त्याचे स्वतःचे असे काहीही नसते. ती इच्छा त्याच्यामध्ये दुसऱ्या कुणीतरी निर्माण केलेली असते आणि माणसाला जे आपण करतो असे वाटते तेही त्याच्याकडून दुसरा कोणीतरी करवून घेत असतो. अशा तऱ्हेचा विचार बायबलमधून आला काय, भगवद्गीतेने सांगितला काय, किंवा स्पेंग्लर, हेगेल किंवा कार्ल मार्क्स

ह्यांनी मांडला काय, मनुष्यमात्राचे दृष्टीनें अशा तऱ्हेचा विचार जीवनात यांत्रिकता निरुत्साह आणि निष्क्रियता आणणारा आहे.

आता त्यातूनही मानवी जीवन खरोखरी हे भाष्यकार मानतात तसेच असते तर जीवनातील ही यंत्रबद्धताही मुकाटयाने मानून स्वस्थ बसणेंच बरोबर ठरले असते. पण मानवी जीवनाचा तसा घट्ट अर्थ लावता येत नाही हे मागील प्रकरणी अनेक ठिकाणी दाखवून दिले आहे. इतिहास अनेक कारणांनी घडत असतो. नैसर्गिक भौगोलिक परिस्थितीमुळे इतिहासावर परिणाम घडतो हे खरेच. माणसांनीच निर्माण केलेल्या एखाद्या मोठ्या सामाजिक आणि आर्थिक संक्रमणामध्ये एक व्यक्ती स्वतःच्या सामर्थ्यावर काही करायला फार लहान पडते हेही खरे. परंतु तरीही जे जे घडते ते शेवटी माणसांनीच केलेले असले आणि माणसे करू शकतात हे गृहीत धरून वैयक्तिक आणि सामाजिक जीवनात जगावे लागते. एककारणपर इतिहासमीमांसेमुळे मानवा-विषयीचे सर्व ज्ञान सोपे आणि सुटसुटीत करून टाकले जाते. कोणत्याही लहानमोठ्या घडामोडींचा संबंध चटकन त्या एकाच कारणाकडे लावला जातो. माणूस निष्काळजी-पणे किंवा घाईने आगाडीतून खाली उतरत असताना खाली पडून मेला तर त्याचे कारण काय ? त्या माणसाचा निष्काळजीपणा किंवा घाई हेच त्याचे खरे कारण. तशी घाई केली नसती तर तो माणूस वाचला असता. परंतु त्या माणसाच्या कपाळी त्या दिवशी मरणे लिहिलेलेच होते, ते कोण कसे चुकवू शकणार, अशी भूमिका घेतली तर सगळेच प्रश्न चुटकीसारखे सुटतात. आपण केव्हा मरणार हे जर परमेश्वराने आधीच योजून ठेवले आहे आणि काय वाटेल ते केले तरी त्या दिवशी , त्यावेळी त्या पूर्वनियोजित पद्धतीने आपले देहावसान होणारच अशी खात्री असेल आणि हे जर परमसत्य असेल तर मग बाधेल म्हणून कमी खावे, रस्त्याच्या डाव्या बाजूनेच वाहन हाकावे, फूटपाथवरूनच चालावे वगैरे बंधने कशासाठी पाहिजेत ? डॉक्टर-वैद्यांची काय जरुरी आहे ? ईश्वर नवकी मारणार असेल तर कुणी वैद्य कोणत्या अमृतवल्लीने मला वाचवणार आहे ? परंतु दैनंदिन जीवनात एकीकडे ईश्वरी सामर्थ्या-वर आणि इच्छेवर विश्वास ठेवूनही आपण आपल्या देहाची सर्वतोपरी काळजी घेतच असतो आणि त्यात आपले मरण आपण टाळू शकतो असा विश्वास असतोच.

आता इथे हेही लक्षात घेतले पाहिजे की नियतिवाद्यांच्या भाष्यांइतकीच प्रगतिवाद्यांची इतिहासभाष्येही घातक होऊ शकतात. इतिहासाचा प्रगतिपर अर्थ लावणारे असे सांगत असतात की, माणसाची उत्तरोत्तर उन्नती होत जाणे हा मुळी इतिहाक्रम आहे. ते अपरिहार्यच आहे. अशा तऱ्हेच्या विचारात प्रगतीवरचा जो विश्वास आहे तो निश्चितपणे उत्साह देणारा आणि विधायक आहे. परंतु तरीही प्रगतीचा नियम कसा सांगता येईल ? इतिहास विशिष्ट चक्रातून फिरत राहील हे

जितके अशास्त्रीय तितकेच इतिहासात सतत प्रगती होत राहील हेही अशास्त्रीय होय. प्रगती आपोआप कशी होईल ? ती कोण करणार ? माणसांनी केले तरच होईल, निश्चितपणे प्रगती होईल, आपोआप प्रगती होईल अशा विचारांचा दैववादी किंवा चक्रवादी विचारांच्या इतकाच वाईट परिणाम संभवतो. कारण त्यामुळे माणसे भ्रमात रहातील, गाफील राहतील.

## इतिहासाचा निर्माता मानव :

माणसाच्या जीवनाला निसर्गाची साथ असते. हवा, पाणी, प्रकाश, जमीन, खनिज संपत्ती, अरण्ये आणि पशुपक्षी वगैरे स्वरूपात कितीतरी लाभदायक गोष्टी निसर्गाकडून मिळतात. त्याचबरोबर वादळ, अतिवृष्टी, भूकंप वगैरे प्रकारांनी निसर्ग मानवी जीवनाला जबरदस्त तडाखेही देत असतो. हे तडाखे सहन करून किंवा चुकवून निसर्गाने देऊ केलेल्या सुखाच्या साधनांचा जास्तीत जास्त उपयोग करून माणूस जगत असतो. मानवेतर प्राण्यांजवळ नसलेले विशेष असे बुद्धिसामर्थ्य मानवात आहे. त्यामुळेच तो आपली स्थिती बदलण्यासाठी, सुधारण्यासाठी, अधिकाधिक सुखसमृद्धीसाठी सतत धडपडत असतो. निसर्गाने ठेवले तसेच रहावयाचे अशी त्याची धारणा नाही. निसर्गाला आपल्या सेवेला लावण्याची त्याची जिद्द आहे आणि त्याप्रमाणे शतकानुशतके तो उद्योग करतो आहे. मनुष्य हा समाज करून जगणारा प्राणी आहे. अनेक माणसे एकत्र आली की त्यांनी सगळ्यांनी मिळून तडजोडीने देवाणघेवाण करीत कसे जगावयाचे म्हणजेच सामाजिक जीवन कसे असावयाचे, ह्यासंबंधीने कित्येक प्रयोग तो शतकानुशतके करतो आहे. त्यांतूनच विवाहसंस्था, कुटुंबसंस्था, जातीजमाती, राष्ट्र, साम्राज्य वगैरे प्रकार उद्भवतात, वाढतात, टिकतात किंवा मोडतात. माणसाचे हे सगळे प्रयोग आणि त्यातील त्याचे यशापयश म्हणजे त्याचा इतिहास. असा इतिहास फक्त मनुष्यप्राण्यालाच आहे. वेदकालीन भारतीय माणूस आणि भारताचा आजचा नागरिक ह्यांची जीवनप्रेरणा कदाचित् एकच असेल, पण त्याच्या जीवनपद्धतीत कितीतरी बदल झालेला आहे. परंतु वेदकालीन बैल किंवा कावळा आणि आजचे तेच प्राणी ह्यात काहीही फरक नाही.

आणि हे जे सगळे केले ते माणसांनीच केले. कुणीतरी विस्तवाचा शोध लावला, कुणी तरी विजेचा दिवा तयार केला. कुणी तरी विमान तयार करून आकाशात उड्डाण केले. कुणी समाजसुधारणेचा विचार सांगितला. आणखी कोणीतरी त्याप्रमाणे प्रत्यक्ष सुधारणा घडवून आणल्या—असे सगळे होत आले आहे, होत आहे म्हणून इतिहास घडला आहे; घडतो आहे. माणसाने केले तरच होईल, केले नाही तर होणार नाही हे उघड आहे. आता हा जो करणारा आहे तो निमित्तमात्र आहे, खरा करविणारा

परमेश्वर किंवा करविणारे काही परमतत्त्व वेगळेच आहे असे कुणी म्हटले तर त्यावर ह्याला पुरावा काय एवढे विचारले तरी पुरे. मानवाच्या सर्व हालचाली नियोजित करणाऱ्या मानवबाह्य अशा कोणत्याही शक्तीचे अस्तित्व सिद्ध करता येणार नाही. त्याचप्रमाणे मानवाचा आजपर्यंतचा इतिहास अवलोकन करून माणसाच्या वैयक्तिक आणि सामाजिक वर्तनाचे काही पक्के नियम दिसतात आणि त्यानुसार सतत त्याचे वर्तन होत असते आणि होत राहील असेही दाखविणे कुणालाही शक्य झालेले नाही.

## इतिहासाची पुनरावृत्ती :

घटना पुन्हा पुन्हा तशाच किंवा निदान त्याच पद्धतीने घडत असतात किंवा इतिहासाची पुनरावृत्ती होत असते असाही एक सिद्धान्त नेहमी सांगितला जातो. परंतु प्रत्यक्ष इतिहास मात्र निराळेच सांगतो. प्रत्येक घटना अनेक प्रकारे नवीन असते. पूर्वी कुणी कधी न केलेल्या, कधी न घडलेल्या गोष्टी इतिहासात होऊ शकतात. एखादा नवीन प्रयोग माणसाला करावासा वाटला तेव्हा त्याला इतिहासाचा आधार आहे की नाही हे तो पहात बसला असता तर अनेक गोष्टी झाल्याच नसत्या. बुद्धाला नवीन धर्म सांगण्यासाठी, महात्मा गांधींना देशाला सत्याग्रहाचे तंत्र देण्यासाठी, एडिसनला निरनिराळे शोध लावण्यासाठी आणि विल्सनला राष्ट्रसंघ स्थापन करण्यासाठी इतिहासात आधार शोधावे असे वाटले नाही. ज्या वेळेस काही तत्त्वचिंतक इतिहासात फक्त चक्रनेमिक्रम आहे, न बदलता येणारी नियमबद्धता आहे असे लिहित बसले होते त्याचवेळी माणसे राजकीय आणि सामाजिक जीवनाचे निरनिराळे प्रयोग करीत होती, निरनिराळे शोध लावीत होती, जीवन बदलन टाकीत होती. त्याच वृत्तीने आणि जिद्दीने आजचा माणूस धडपडतो आहे. तो असाच प्रयत्नशील राहील असे मानायला काही हरकत नाही. तथापि ईश्वरी योजनेप्रमाणे किंवा कुठल्यातरी आर्थिक किंवा सामाजिक अवस्थेच्या तत्त्वाप्रमाणे तुमची आयुष्यातील इतिकर्तव्यता अशी आहे, ह्यापासून आजूबाजूला तुम्हास सरकता येणार नाही असे सांगणारे विचारवंत आजही आपल्यात आहेत. ते विचार ऐकून कुणी विचलित होणार नाही असे कसे म्हणावे ? म्हणूनच सावधगिरीची आवश्यकता आहे. इतिहासाचा असा दुरुपयोग होता कामा नये. व्यक्तीचा स्वतःच्या कर्तृत्वावरचा विश्वास उडता कामा नये. आणि तिची स्वतःवरच्या जबाबदारीची जाणीवही कमी होता कामा नये. आय्. बर्लिनने ह्यासंबंधात खालीलप्रमाणे मांडलेले आपले विचार मननीय आहेत :

"The matter is more serious when empirical arguments are advanced for an historical determinism which excludes the notion of personal responsibility....

"Belief in historical determinism of this type is, of course, very widespread, particularly in its Marxist, its psychological and its sociological forms; and in what I should like to call its 'historiosophical' form too, by which I mean metaphysico-theological theories of history, which attract many who have lost their faith in older religious orthodoxies....

"Those who hold them use history as a method of escape from a world which has, for some reason, grown odious to them into a fantasy where impersonal entities avenge their grievances and set everything right, to the greater or lesser discomfiture of their persecutors, real and imaginary. And in the course of this, they describe the normal lives lived by men in terms which fail to mark the most important psychological and moral distinctions known to us. This they do in the service of an imaginary science, and like the astrologers and magicians whom they have succeeded, cast up their eyes to the clouds, and speak in immense, unsubstantiated images and similes, in deeply misleading metaphors and allegories, and make use of hypnotic formulae with little regard for experience, or rational argument, or tests of proven reliability. Thereby they throw dust in their own eyes as well as ours, obstruct our vision of the real world, and further confuse an already sufficiently bewildered public about the relations of value to fact, and, even more, the nature, and methods of the natural sciences and historical studies".

(Historical Inevitability पृ. ७० ते ७९)

**विचारांचा प्रभाव आणि धोका :**

कुणा विद्वानाने काही पांडित्यपूर्ण जीवनतत्त्वज्ञान सांगावे आणि तमाम सगळ्या माणसांनी त्याप्रमाणे वागू लागावे असे काही होत नाही. माणसाच्या वैयक्तिक आणि सामाजिक कृती शेवटी बहुधा त्या व्यक्तीला आणि समाजाला ज्यामुळे आपले हित होईल असे वाटते त्यानुसारच ठरत असतात. कोणत्याही तत्त्वज्ञानापेक्षा स्वहिताची व्यवहारी दृष्टी हीच कृतीची प्रेरक असते ह्यात वाद नाही. परंतु हे लक्षात घेऊनही

समाजाच्या मनावर आणि परिणामी त्याच्या कृतींवरही निरनिराळ्या कल्पनांचा कमीअधिक प्रभाव पडतो हेही उघड दिसणारे आहे.

माणूस हा बुद्धिमान प्राणी खरा, पण इतर प्राणिमात्रांप्रमाणेच अन्नपाणी आणि निवारा मिळविण्यात आणि स्वतःचे संरक्षण करण्यातच त्याला बरीचशी शक्ती खर्चावी लागते. जीवनाविषयी मूलभूत विचार करायला फारसा वेळ नसतो आणि प्रत्यक्षात माणसाने आपले सामाजिक जीवन ज्या प्रकारे संघटित केले आहे ते लक्षात घेऊन पाहिले तर असे दिसते की विचार करण्याचे काम फार थोडी माणसे करू शकतात. काही मोजकी माणसेच ह्या प्रकारच्या कामासाठी बाजूला काढणे समाजाला परवडते. आणि त्यातही निसर्गाने माणसामाणसात जे फरक केले आहेत ते पाहिले तर तसा विचार करू शकणारी माणसे असतातही थोडीच. तेव्हा सर्वसामान्य माणूस आपले राजकीय किंवा सामाजिक कर्तव्य काय, आपल्याकडूनन काय अपेक्षित आहे, आपल्याला कोणती भूमिका करावयाची आहे ह्याविषयी स्वतः चिंतेत न पडता समाजात जे विचावंत म्हणून वावरतात त्यांच्याकडूनच मार्गदर्शनाची अपेक्षा करीत असतो.

ज्ञानाचा व्याप अफाट आणि गुंतागुंतीचा. तो सारा पसारा एक दोन सूत्रात कुणी बांधून दाखविला की तो मोठा चमत्कार वाटतो. त्याच्याकडे चटकन् मन आकर्षित होते. म्हणून सर्वसामान्य माणसाला सर्वव्यापी सिद्धांतांचा मोह पडतो. आणि त्यातच असे सिद्धांत आपल्या फायद्याचे आहेत असे सामान्य माणसाला वाटू लागले की तिथूनच धोका सुरु होतो. ते सिद्धांत खरोखरी अंती हिताचे ठरतील की नाही हे वेगळे. पण माणसांना तसे वाटले की ती त्यांचे बळी होऊ लागतात. इतिहासाच्या दैवी अन्वयार्थाचा पगडा समाजावर बसला तर आपले भवितव्य आपण घडवू शकतो हेच मुळी त्याला पटणार नाही. इतिहासाचा नैसर्गिक, भौगालिक अर्थ त्याच्या डोक्यावर मारण्यात आला तर आपण निर्जल, नापीक प्रदेशातले लोक, आपण कुठपर्यंत जाऊ शकणार अशा निराशावादी विचारांनी ते खट्टू होतील, वंशानुसारी इतिहासभाष्य ऐकून काळ्या माणसात उगाच न्यूनगंड निर्माण होईल आणि मार्क्सप्रणीत इतिहास-भाष्य मानले तर कामगार हुकूमशाहीखेरीज आपल्या कल्याणाचा दुसरा एखादा मार्गही असू शकेल हे पटेनासेच होईल. समाजातील सर्वच्या सर्व माणसांवर सदासर्वदा जरी असे परिणाम घडले नाहीत तरी बरीचशी माणसे थोडीशी आणि थोडी माणसे बरीचशी कोणत्या ना कोणत्या ठोकळेबाज तत्त्वज्ञानाच्या आहारी जाऊन स्वतःचे नुकसान करून घेतात हे भोवताली पहाता सहज दिसून येईल. हा धोका ओळखणे आवश्यक असते. विविध ऐतिहासिक तत्त्वज्ञानांचे अनेक प्रकारचे दुरुपयोग करण्यात

आलेले आहेत. सध्याही केले जात आहेत. माणसाचे हिताचे दृष्टीने माणसाला जखडणारी, त्याचा कोंडमारा करणारी आणि त्याचा तेजोभंग करणारी ही मनुष्यनिर्मित तत्त्वज्ञाने नामशेष झाली पाहिजेत.

**घातक अस्मितांची जपणूक :**

जीवनाविषयीच्या काही विशिष्ट दृष्टिकोनामुळे, स्थित्यंतरांकडे म्हणजेच मानवी इतिहासाकडे पहाण्याच्या काही विशिष्ट पद्धतीमुळे व्यक्तीत आणि पर्यायाने समाजातही एक प्रकारे निरुत्साह, उदासीनता आणि निष्क्रियता कशी येऊ शकेल हे पाहिले. इतिहासविषयक काही विचारांच्या प्रभावामुळे हे होत असेल तर मग काही निराळे विचार दिले तर अर्थातच व्यक्ती आणि समाजात योग्य ती कृतिप्रवणताही आली पाहिजे. तशी ती काही प्रमाणात येतेही. आजवर जगाच्या इतिहासात माणसांना विशिष्ट कार्याची प्रेरणा देण्यासाठी सोईस्कर रीत्या इतिहासाचा उपयोग भरपूर केला गेलेला आहे.

माणूस हा समाजजीवन जगणारा प्राणी आहे. प्रत्येकाला आपला स्वार्थ कोणत्या तरी एका किंवा अनेक गटांबरोबर राहून, गटापैकी एक म्हणून राहून, साधावा लागतो. प्रागैतिहासिक कालापासून आजतागायतच्या इतिहासापर्यंत सर्वकाल आणि सर्वत्र खरी असलेली अशी ही एक मूलभूत गोष्ट आहे. आदिमानवाला अगदी सुरवातीला कदाचित् इतर कोणत्याही प्रकारचे सामाजिक जीवन नसेल, पण क्रूर वन्य प्राण्यांशी सामना करणे एकटचा दुकटचाला अशक्यच होते. अशा संकटापासून स्वतःचे रक्षण करण्यास एकत्र येणे आणि एकत्रितपणे कार्य करणे आवश्यकच होते. माणूस अशा तऱ्हेने गट करून कार्यसिद्धी करीत होता ह्याचा आदिमानवांनी रेखाटून ठेवलेल्या चित्रातून स्पष्ट पुरावा मिळतो. ज्या कारणासाठी माणसे एकत्र येतात ते कारण पुढे चालू राहिले तर माणसांचे ते एकत्र रहाणेही तसेच पुढे चालू रहाते. वर्षांनुवर्षे अशा एकत्र रहाण्यामुळे परस्परांविषयी काही भावना निर्माण होतात. ह्या अवस्थेत माणसे फक्त गरजेपुरतीच एकत्र आहेत असे रहात नाही. त्या गटातील प्रत्येक माणसाचे मनात काही एक गटनिष्ठा निर्माण होते. काही व्यक्तींनी एकत्र रहाणे आणि ह्या एकत्र राहण्यासंबंधीची काही एक निष्ठा निर्माण होऊन ती स्थिर होणे म्हणजेच समाज आणि सामाजिक जीवन. अशा तऱ्हेने निर्माण झालेल्या गटाचे स्वरूप अनेकविध असते. जात, टोळी, राष्ट्र हे सर्व संवजीवनाचे, सामाजिकतेचे विविध प्रकार आहेत. प्रत्येकाच्या मुळाशी काही हितसंबंध निश्चितपणे आहेत, त्याप्रमाणे प्रत्येकात हळू हळू निर्माण झालेला आत्मीयतेचा असा काही एक भागही कायम आहे.

वर्षानुवर्षे एकत्र राहिलेल्या आणि एकत्रितपणे अनेक कामे पार पाडलेल्या प्रत्येक सामाजिक गटाला स्वाभाविकपणेच त्या गटाचा असा एक इतिहास निर्माण

होतो. एखादा माणूस जेव्हा "क्षत्रिय कुलात असा विश्वासघात आजपर्यंत कुणी केला नाही" असे म्हणतो तेव्हा तो आपले क्षत्रिय कुल हा एक गट मानीत असतो. आपल्या त्या गटातील लोकांनी काय करावे आणि काय करू नये ह्यासंबंधीच्या काही कल्पना बाळगून असतो आणि एखादे कृत्य का करावे आणि का करू नये हे ठरविण्यासाठी त्या कुलाने म्हणजे त्या गटाने आजपर्यंत काय केले किंवा काय केले नाही ह्याचा आधार घेत असतो. म्हणजेच तो इतिहास बोलत असतो. इतिहासाचा आसरा घेत असतो, इतिहासाचा अधिकार मान्य करीत असतो.

समाजातील व्यक्तीची वर उल्लेखिलेली जी भावना असते तिचा फायदा घेऊन चांगले वाईट काहीही करता येईल अशी स्थिती असते. प्रत्यक्ष दैनंदिन वागण्यात प्रत्येक माणूस प्रत्येक गोष्टीचा खोलवर विचार करू शकत नाही, तो बऱ्याच गोष्टी गृहीत धरून जगत असतो. अमुक गटाचे किंवा समाजाचे आपण घटक आहोत हे त्याला ठाऊक असते, तसे असण्याची आवश्यकता प्रत्यहीच त्याच्या अनुभवास येत असते आणि त्यातून निर्माण झालेली प्रेमभावना हीही त्याच्या जीवनातील एक सत्य असते. हा गट आणि त्या गटासंबंधीची आत्मीयता ह्यांचे मूळ गरजेतच आहे आणि गरज बदलली तर गट आणि गटासंबंधीची निष्ठा दोन्हीही बदलू शकतात किंबहुना नष्टही होऊ शकतात, हे काही प्रत्येक जण पाहू शकत नाही; आणि मग सामान्य व्यक्तीच्या गटासंबंधीच्या भावनेचा गैरफायदा घेणे केव्हाही शक्य असते.

## हुकूमशाहीतील इतिहासाची राबवणूक :

हुकूमशाही राजकारणात वरील परिच्छेदात वर्णिलेला प्रकार विशेषत्वाने दिसतो. जनतेच्या भावना चेतवून, त्यांना खेळवून, त्यांना गतकालाची स्मृती देऊन हुकूमशहा इतिहास कसा बनवितात हे थोडे तपशीलात जाऊन पहाण्यासारखे आहे. अगदी प्राचीन कालापासून महत्वाकांक्षी नेत्यांनी कमीअधिक यशस्वीपणे हे उद्योग केले आहेत. ह्या उद्योगाचे स्वरूप काय असते हे विसाव्या शतकातील तीन मोठ्या हुकूमशाह्यांच्या संदर्भात पहाणे अधिक सोईचे; आणि नजिकच्या भूतकालातीलच असल्याने समजायला अधिक सुलभ होईल.

विसाव्या शतकाच्या प्रथमार्धात मुसोलिनीने इटालियन जनतेला संघटित करून एक हुकूमशाही निर्माण केली. पहिल्या महायुद्धानंतर इटालियन लोकांची आर्थिक अवस्था दारुण होती. त्याचप्रमाणे जगाच्या दृष्टीने आपल्याला फारसे मानाचे स्थान नाही अशा एका जाणिवेनेही तेथील सर्वसामान्य माणूस थोडासा नाउमेद होता. ह्याठिकाणी जनतेला थोडीशी भाकरी दिली आणि त्याचबरोबर त्याच्या भावनांचा फायदा घेऊन काही एक कार्यक्रम आखला तर तो यशस्वी होईल असे

गणित मुसोलिनीने मांडले. मुसोलिनीने आखलेला सबंध कार्यक्रम आणि त्याचे सगळे मार्ग ह्यांची चर्चा ह्या ठिकाणी तपशीलवार करता येणार नाही.

ह्या हुकूमशाहीत इतिहासाचा फायदा कसा घेण्यात आला हाच भाग येथे सांगावयाचा आहे. स्वतः मुसोलिनी आणि मॅरिओ पामीरीसारखे त्याच्या भजनी लागलेले इतिहासकार ह्यांनी इटालियनांना कार्यप्रवण करण्यासाठी इतिहासाला कामाला जुंपले. इटालियनांना सांगण्यात आले की, " तुम्ही फार मोठे आहात, जगावर राज्य करण्यासाठीच तुमचा सगळ्यांचा जन्म आहे. प्राचीन रोमचे वैभव हा तुमचा वारसा आहे. आपल्याच पूर्वजांनी रोमचे जागतिक साम्राज्य निर्माण केले, ती दोन हजार वर्षांची परंपरा आहे. आणि म्हणून जगावर वर्चस्व गाजविणे हा तुम्हा इटलियनांचा इतिहासाने सिद्ध झालेला असा हक्कच आहे. कॅथलिक पंथ हाच खरा धर्म. तेच अंतिम सत्य. ते जगाला सांगण्याचे काम तुमचे आहे. परमेश्वराने त्यासाठी तुमचीच नेमणूक केली आहे, आणि त्याबरोबर ऐहिक, भौतिक जीवनातील आदर्श निर्माण करण्याचे कार्यही तुम्हाला करावयाचे आहे. आजपर्यंत असे आदर्श देण्याचे काम तुमच्या पूर्वजांनी, आणि फक्त त्यांनीच, केले आहे. इटालियनांखेरीज इतरांनी काही बाबतीत काही काल प्रगती केलेली तुम्हला दिसत असेल, पण लक्षात ठेवा की, त्या सर्वांनी आपापले दिवे रोमच्या प्रतिभेच्या पेटत्या ज्योतीवरच लावून घेतलेले होते ".

ज्या काळात मुसोलिनी आणि त्याचे भक्त इटालियनांना वरीलप्रमाणे इतिहास सांगत होते त्याच काळात जर्मनीत हिटलर हा हुकूमशहा आणि आल्फ्रेड रोझेमबर्ग वगैरे सत्तापूजक इतिहासकार आपल्या जर्मन लोकांनाही काही निराळा इतिहास सांगत होते, " जर्मनहो, जगावर राज्य करण्याचा हक्क तुमचा आहे, कारण तुम्ही शुद्ध नॉर्डिक रक्ताचे आहात. तुमच्याखेरीज इतर कोणाच्याही शरीरातून तसे शुद्ध रक्त वहात नाही. आणि आजपर्यंतच्या मानवजातीचा इतिहास काय सांगतो? राजकारण, समाजकारण, साहित्य, विज्ञान, कला वगैरे सर्व क्षेत्रात ज्या ज्या महान गोष्टी घडल्या त्या कुणी केल्या? चर्चा करण्याचेच कारण नाही. उत्तमोत्तम गोष्टी फक्त शुद्ध नॉर्डिक लोकच करू शकतात. त्यांनीच त्या केलेल्या आहेत. इतरांनी काही उद्योग केले पण त्याला काय अर्थ आहे? मानवी इतिहासातून नॉर्डिक जर्मन आणि त्यांचे कर्तृत्व काढून घ्या, मग काय उरते? उरतात त्या फक्त मर्कटलीला. "

वरील मुसोलिनीप्रणीत आणि हिटलरपुरस्कृत इतिहास शास्त्रीयदृष्ट्या आणि प्रत्यक्ष भूतकालीन घटनांच्या आधारे तपासून पहाता टिकण्यासारखे आहेत काय? परंतु हिटलर, मुसोलिनीच्या दृष्टीने हा प्रश्न चुकीचा आहे. त्या प्रकारच्या इतिहासरचनेने लोकांच्या भावना चेतवल्या जातात ना? ते कार्यप्रवण होतात ना?

त्यांना काही एक कैफ चढतो ना ? आणि त्या धुंदीत ते आपल्यामागे येतात ना ? हे सगळे होत असेल तर आम्ही लोकांना सांगतो तो इतिहास खरा की खोटा, वास्तव की विपर्यस्त असे फालतू प्रश्न उपस्थित करण्याचे कारणच काय ?

## कम्युनिस्टांची इतिहासाची राबवणूक :

पहिल्या महायुद्धानंतर रशियातही एक हुकूमशाही निर्माण झाली, पण तिचे स्वरूप वरील दोन हुकूमशाह्यांहून बरेच निराळे आहे. रशियात त्या सुमारास जे सत्तांतर झाले त्याला काही एक तात्त्विक बैठक होती असे लेनिनप्रभृती त्या क्रांतीचे नेते मानीत. ती तात्त्विक बैठक म्हणजे मागील एका प्रकरणात सांगितलेला मार्क्सवाद ही होय. नव्या रशियाला जुन्या रशियन परंपरांशी काही कर्तव्य नव्हते. परंतु नव्या रशियन जनतेला संघटित ठेवण्यासाठी काही नवे मंत्र, नव्या निष्ठा देणे आवश्यक होते. आणि परंपरेचा फायदा मिळत नसल्यामुळे हे जे नवे लोकांच्या डोक्यात घालावयाचे होते ते डोकी फोडून आत भरण्याखेरीज गत्यंतर नव्हते.

मार्क्सच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे मानवी इतिहासातील ह्या अंतिम वर्गकलहाच्या अवस्थेत कामगारांना भांडवलशाहीविरुद्ध लढा द्यायचा आहे, भांडवलशाहीच्या रक्षक अशा लोकशाही, धर्म इत्यादी सर्व संस्था नष्ट करावयाच्या आहेत, ह्याची स्पष्ट जाणीव रशियनांना द्यावयाची होती. आणि म्हणून जनतेची इतिहासविषयक दृष्टीही बदलून टाकणे भाग होते. मानवी इतिहासाकडे मार्क्सवादी दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे हे नव्या इतिहासकारांनीही जाणून घेतले पाहिजे. आणि त्याप्रमाणेच इतिहासरचना केली पाहिजे. हा आग्रह रशियात कम्युनिस्ट क्रांतीपासून आजतागायत पक्का राहिलेला आहे. १९६२ साली रशियाच्या इतिहासपरिषदेत अभ्यासकांना आणि प्राध्यापकांना कम्युनिस्ट पक्षाच्या एका पदाधिकाऱ्याने खणखणीत संदेश दिला, " विद्वज्जनहो, इतिहासपंडितहो, तुमचे काम काय आहे ते आम्ही ठरविले आहे. भांडवलशाही उखडून लावणे क्रमप्राप्त आहे आणि त्यासाठी भांडवलशाहीने निर्माण केलेला, तिचा पाठीराखा अशासारखा जो जो इतिहास दिसेल तो तो नेस्तनाबूत करून नवा, विशुद्ध मार्क्सवादानुसारी इतिहास लिहिणे हे तुमचे कर्तव्य आहे." अशा प्रकारे लिहिलेले इतिहास कसे असतील ? एक दोन उदाहरणांवरून कल्पना येऊ शकेल. अमेरिकेच्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा म्हणजे इतिहासातील एक फार मोठी घटना असे आपण मानतो. पण रशियन इतिहासकारांचे मते तो जाहीरनामा प्रतिगामी आहे ; कारण त्यात ईश्वराचा उल्लेख आहे. अमेरिकन भांडवलशाहीवर आणि साम्राज्यवादावर टीका करताना अमेरिकेने फिलिपाईन्सचा कबजा घेतला हे रशियन इतिहासात येते, पण फिलिपाईन्सला हळू हळू स्वायत्तता मिळावी अशी

जी योजना अमेरिकेने पहिल्यापासूनच दिली होती ती मात्र वगळली जाते. (Contemporary History in the Soviet Mirror पृ. ३०८–३१४)

**इतिहासाचे हत्यार :**

विसाव्या शतकातील हुकूमशाही राजवटींनी आपापल्या पद्धतीने इतिहासाची राबवणूक कशा प्रकारे केली आहे हे वरची तिन्ही प्रकरणे पाहून लक्षात येते. ह्यातील महत्त्वाकांक्षी सत्ताधाऱ्यांचे हेतू सहज समजण्यासारखे आहेत. जनता आपल्या पाठीमागे यावी व आपल्या मागे रहावी ह्यासाठी योजिलेल्या अनेक हत्यारांपैकी एक म्हणजे इतिहास. पण हे हत्यार आहे आणि एक दिवस हे आपल्या मानेवरून फिरण्याचा संभव आहे ह्याची जाणीव कितीतरी काळ सामान्य माणसाला येत नाही. सामान्य माणसाची ह्यात फार मोठी हानी होत असते.

महत्त्वाकांक्षी नेत्यांच्या इतिहासपर भुलभुलावणीने लोक पूर्णपणे फसतात आणि सतत फसत रहातात असे नाही, प्राचीन परंपराची स्मृती ही नेहमीच आणि कोणत्याही कार्याला प्रेरणा ठरेल असेही म्हणता यावयाचे नाही. ज्या हुकूमशहांनी लोकांना भूतकालाचे स्मरण दिले त्यांनी त्यांचे वर्तमानकालीन प्रश्न थोडेबहुत तरी समाधानकारकपणे सोडवले हे मान्य केलेच पाहिजे. त्या कार्याच्या जोरावरही त्यांना काही काळ प्रभुत्व गाजवता आले असते. इतिहासनिष्ठ आवाहनाखेरीज इतरही शस्त्रे त्यांचे हाती होती. पण इतिहास हेही एक शस्त्र होते आणि ते वापरले गेले हाही इतिहास ध्यानी घ्यायला हवा. आणि म्हणूनच समाजाचे दृष्टीने त्याबाबत योग्य ती खबरदारी घ्यायला हवी हेही ओघानेच येते. ती कशी घेतली पाहिजे हे थोडे पुढे पहावयाचे आहे.

**राष्ट्रीय दुरुपयोग :**

इतिहासाचा दुरुपयोग फक्त हुकूमशहांनीच केला आहे असे मानण्याचे मात्र कारण नाही. इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स, भारत ह्यासारखी लोकशाही राष्ट्रेसुद्धा इतिहासाचा खेळण्यासारखा उपयोग करू शकतात. कारण ती लोकशाही पद्धतीने जगत असली तरी राष्ट्रे म्हणून जगत असतात हे लक्षात घेतले पाहिजे. वास्तविक राष्ट्र हा सामाजिक जीवनाच्या अनेक प्रकारांपैकी एक आहे, आणि मूलतः तीही माणसाची काही एक गरज भागविणारी अशी संस्था आहे. प्रारंभी म्हटल्याप्रमाणे गटाच्या जीवनात व्यक्तींमध्ये जो परस्परनिष्ठेचा आणि परिणामी गटनिष्ठेचा भाग असतो त्यानुसार राष्ट्राच्या नागरिकात राष्ट्रीयत्वाची, राष्ट्रप्रेमाची काही एक भावना निर्माण होते. राष्ट्रीयत्वाच्या मूल्यामुळे स्वजनांसाठी कोणतेही कष्ट आणि त्याग करण्याची मनाची तयारी होते. परंतु त्याचबरोबर परकीयांना कमी लेखणे, त्यांची अवहेलना करणे, त्यांचे कर्तृत्व अमान्य करणे, स्वकीयांच्या नसलेल्या पराक्रमांचे

पोवाडे गाणे आणि असे कितीतरी प्रकार देशभक्तीतच मोडतात. अतिरिक्त राष्ट्रवादाने परराष्ट्रीयांना सदासर्वदा शत्रू लेखण्याचे, त्यांचा द्वेष करण्याचे आणि त्यांचा नायनाट करण्याचेच शिक्षण दिले जाते, आणि ह्या विघातक कार्यासाठी इतिहासाचा सवंगपणे उपयोग केला जातो. यूरोप-अमेरिकेत अशा प्रकारच्या इतिहासलेखनाचे किती गंभीर परिणाम झाले ते बार्नेसच्या खालील उताऱ्यावरून स्पष्ट होईल.

HISTORY AND NATIONALISM

" The net result of growth of nationality and of nationalism upon historiography has been very diverse and a mixed blessing. Its fortunate results have been, above all, the provision of a great collection of source material which would otherwise never have been made available, and the training of many excellent historians in the process of compiling and editing of the sources. The deplorable effects have centered about the creation of a dangerous bias of patriotism. This has not only hampered the calm, objective and accurate handling of historical facts even by highly trained historians, but it also contributed in no small degree to the great increase in chauvinism which led to the calamity of 1914. The responsibility of the nationalistic historians in this regard was well stated by Professor H. Morse Stephens: " Woe unto us ! professional historians, professional historical students, professional teachers of history, if we cannot see written in blood, in the dying civilization of Europe the dreadful result of exaggerated nationalism as set forth in the patriotic histories of some of the most eloquent historians of the nineteenth century ". It would be fortunate, indeed, if this were all, but for every patriot made by a Treitschke, a Michelet, a Froude or a Bancroft, hundreds have been charmed by the naive but vicious bumptiousness of third–rate textbook compilers who have imitated the bias of the masters without their literary virtues. The nature and the effect of these textbooks upon the past generation have been indicated for this country by Mr. Charles Altechul and Miss Bessie L. Pierce, and for

France and Germany by Professor J. F. Scott. England has not fallen behind any of these nations in this respect. With the rise of totalitarianism in both Fascist and Communist countries and the coming of the second World War nationalistic fervor and bias returned on a scale unprecedented in contemporary times.

( A History of Historical Writing– पृ. २३६ )

**भारतातील राष्ट्रीय इतिहासलेखन :**

राष्ट्रीयत्वातून अतिरंजित इतिहास निर्माण करण्याचे काम भारतातही भरपूर झाले आहे. भारतावर ब्रिटीशांची सत्ता स्थापन होईपर्यंत आम्ही आमच्या इतिहासाकडे फारसे कधी लक्षच दिले नव्हते. आमच्या इतिहासाकडे प्रथम लक्ष पुरविले ते इंग्रज राज्यकर्त्यांनी आणि जर्मनांसारख्या इतर काही परकीयांनी. जेत्यांना आम्ही लोक सर्व बाबतीत कुचकामी, असंस्कृत आणि गुलामासारखे वागविण्यास योग्य असे वाटणे स्वाभाविकच होते. त्या पूर्वग्रहातून निर्माण झालेला इतिहास विकृत होणे हेही अर्थात अपरिहार्यच होते; आणि ब्रिटिशांची परकी सत्ता डाचत रहाणे आणि त्यातून आमच्या प्राचीन वैभवाच्या अद्‌भुतरम्य वर्णनात आम्ही रंगून जाणे हेही तेवढेच स्वाभाविक आणि अपरिहार्य मानावे लागेल.

वेदकाल व त्यावेळचे जीवन आणि १८५७ चा उठाव ह्या दोन ऐतिहासिक प्रकरणांविषयी बोलताना आणि लिहिताना ब्रिटिश दृष्टिकोनातून आणि भारतीय दृष्टिकोनातून कसे विलक्षण निरनिराळे इतिहास लिहिले गेले–आणि लिहिले जातही आहेत ते पहाणे मोठे मनोरंजक होईल. त्यासाठी दोन्ही बाजूंनी लिहिली गेलेली चार-दोन पुस्तके जरी पाहिली तरी त्यातील भिन्नभिन्न दृष्टिकोन आणि धोरण स्पष्ट दिसतील. ऋग्वेद केव्हाचे? आर्य संस्कृतीचा काल कोणता? भारतीय विद्वान हा काळ जितका जुना दाखवितात येईल तितका दाखविण्याचा आटोकाट प्रयत्न करताना दिसतील. मानवजातीचा आणि सर्व संस्कृतीचा प्रारंभच ऋग्वेदकालापासून होत असल्याचे त्यांना प्रतीत झालेले दिसेल. परकीय पंडित मात्र तो जितका अलीकडे ओढता येईल तितका ओढण्याच्या उद्योगात मग्न झालेले दिसतील. आमची संस्कृती फार प्राचीन असा आमचा दावा तर तुमची संस्कृती काही असलीच तर ती जुनी नाही, कालपरवाची आहे असा इतरांचा अट्टाहास, हे झाले काळापुरते; पुढे त्या संस्कृतीच्या मूल्यमापनातही अशीच आग्रही मते येतात. वेदकालीन जीवन म्हणजे वेडगळ समजुती आणि जादूटोणा, आपसातील भांडणे आणि क्रौर्य, संघटनेचा अभाव, प्रगत विचारांचा अभाव अशा स्वरूपाचे अगदी प्राथमिक, अविकसित असे समाजजीवन

असे अभारतीय विद्वानांना दिसले तर भारतीयांना ऋग्वेदकाली मोठी मोठी साम्राज्ये होती, मनुष्यजीवनाचे अंतिम तत्त्वज्ञान सांगून झालेले होते, विज्ञान आजच्यापेक्षाही पुढे गेलेले होते, सर्व प्रकारची यंत्रे होती, विमाने होती, अणुशक्ती होती असे एकामागून एक सर्व शोध लागतील.

१८५७ च्या उठावासंबंधीही स्वार्थसाधूंचे ते एक बंड होते आणि ते महान स्वातंत्र्ययुद्ध होते अशा दोन पक्षांच्या दोन भूमिका सारख्याच आवेशाने मांडल्या गेल्या आणि आजही मांडल्या जात आहेत. १८५७ च्या उठावाला आपण कारणीभूत झालो असू, आपली धोरण आणि राज्य करण्याची आपली पद्धती चुकली असेल असा विचार ब्रिटिश इतिहासकारांना शिवला नाही. आणि ह्या उठावामागे बंडवाल्या संस्थानिकांचे स्वतःचे हितसंबंध रक्षण करण्यापलीकडे खरोखरीच काही मोठे हेतू होते का हे तपासून पहाण्याची गरज भारतीय इतिहासकारांना वाटली नाही.

मागचे आणि सध्याचे सर्व इतिहासकार एकाच माळेचे मात्र म्हणता येणार नाहीत. भारताच्या इतिहासातील उज्वल प्रकरणांची मोकळेपणाने दखल घेणारे परकीय इतिहासकारही आहेत आणि भारताच्या प्राचीन वैभवाप्रमाणे त्याचे प्राचीन दारिद्र्यही स्पष्टपणे दाखविणारे भारतीय इतिहासकार आहेत. परंतु तरीही बहुतेक सगळे कमीकधिक अभिनिवेशानेच लिहिणारे असतात हे खरेच.

लिहिणारे असे का लिहितात ? कारण ते ज्या समाजाचे घटक असतात त्या सबंध समाजात तो राष्ट्रीय अभिनिवेश असतो, तेथील भावजीवनाचे ते एक अंग असते. ते राष्ट्रीयत्व नावाचे मूल्य म्हणजे त्या समाजाच्या सहजीवनाचे मूलभूत कारण आणि अंतिम साध्य असेच समजण्यात येत असते. राष्ट्रीयत्व केव्हातरी कोणत्या तरी गरजांतून निर्माण होऊन वाढले, त्याची काही एक उपयुक्तता होती, आजही असेल, परंतु राष्ट्रीयत्व ही एकमेव निष्ठा असू शकत नाही, असण्याचे कारण नाही, राष्ट्रीयत्व हे अनाद्यनंत नाही, माणसाच्या नव्या गरजांनुसार आणि नव्या जाणीवेनुसार हे मूल्य बदलेल, त्याला मुरड घालावी लागेल, कदाचित् ते सोडूनही द्यावे लागेल असाही विचार मांडला जातो. ( " After all Nationalism is not innate with humankind; people got along for untold ages without it and it may at last disappear along with other phenomena " — Contemporary World Politics, पृ. ४०७ ) पण हा फार थोडचा बुद्धिवाद्यांचा, मानवतावाद्यांचा विचार झाला. सर्वसाधारण मनुष्य हा आज राष्ट्रीयत्व हे मूल्य पक्के धरून आहे, आपले पोषण आणि रक्षण करते ते राष्ट्र. त्या राष्ट्राविषयी त्याला कृतज्ञता असते. तो त्याचा मानबिंदूही होऊन बसलेला असतो.

**राष्ट्रीयत्व आणि इतिहास :**

भाषिक किंवा अशा कोणत्या तरी कारणांनी कोणत्या तरी एकतेची भावना निर्माण करणाऱ्या परिस्थितीतून राष्ट्र जन्माला येते, त्या राष्ट्राच्या त्या त्या नागरिकांना ऐहिक सुखासमाधानाचे दृष्टीने काही प्रत्यक्ष उपयोगही होत असतो. माणसाच्या भरणपोषणादी सर्व जीवनावश्यक गरजा आणि साहित्य, कला, क्रीडा वगैरे सांस्कृतिक जीवनाच्या आवश्यकता भागविणारी राष्ट्र ही एक संस्था आहे. हे सगळे करणारी दुसरी एखादी तिजी जागा घेणारी संस्था किंवा यंत्रणा अस्तित्वात येत नाही तोपर्यंत माणसांनी राष्ट्रीयत्व धरून रहाणे हे स्वाभाविकच आहे आणि बरोबर आहे असेही म्हणता येईल.

परंतु आपल्याला गरजा आहेत तशा इतरांनाही म्हणजे इतर राष्ट्रातल्या माणसांनाही आहेत ह्याची जाणीव राष्ट्रीयत्वात रहात नाही. राष्ट्रापुरती आपण सगळी एक आहोत ही जाणीव तीव्रतेने रहाते. राष्ट्रवाद आक्रमक होतो. दुसऱ्यांना लुटून आपला समाज समृद्ध करणे हे राष्ट्रीयत्वात बसते. ती राष्ट्रभक्तीच मानली जाते. ह्याच वृत्तीतून कित्येक युद्धे उद्‌भवली. ह्यातून जित राष्ट्रांचा नाश तर होतोच पण स्वतः त्या जेत्या राष्ट्रालाही कालांतराने भोगावे लागते. सर्वच राष्ट्रे ह्या वृत्तीने वागत असली की प्रत्येक राष्ट्रालाच नेहमी युद्धसज्ज रहाणे भाग आहे. आणि अशा स्थितीत कोणते राष्ट्र केव्हा रसातळाला जाईल हे सांगणे कठीण. राष्ट्रीयत्व हा चालू जागतिक राजकारणातील एक प्रचंड अविवेक आहे असे नॉर्मन हिल म्हणतो ते ह्याच अर्थाने ("Nationalism is the outstanding irrational factor in contemporary World politics"–Contemporary World Politics ; पृ. ३७७ ) तथापि, आता नव्या युगात राष्ट्रे अधिकाधिक प्रमाणात परस्परावलंबी होत आहेत. जीवनाचे आजचे स्वरूप, माणसाच्या आजच्या बहुविध गरजा लक्षात घेतल्या तर एक जग, एक मानवजात असा सामाजिक गट धरूनच सर्वांना आणि म्हणून कोणत्याही एका राष्ट्रीय गटालाही जास्तीत जास्त सुख होईल: आणि म्हणूनच राष्ट्रीय दृष्टिकोनातून इतिहास लिहिणे, राष्ट्रीय अभिमानाच्या भावनेने इतिहासाकडे पहाणे घातक ठरेल. राष्ट्र डोळ्यासमोर ठेवून केलेल्या इतिहासरचनेत सत्याचा अधिक्षेप असतो आणि ज्या राष्ट्रकल्याणाच्या दृष्टीने जाणूनबुजून असत्य सांगितले जाते तेही त्यातून साधण्यासारखे नसते.

**परंपरा आणि स्फूर्ती :**

आता वादासाठी आपण राष्ट्रीयत्व हे खरे आणि राष्ट्र ही चिरकाल टिकणारी अशी संस्था आहे असे जरी मानले तरीही असत्य, अतिरंजित आणि विपर्यस्त असा

राष्ट्रेतिहास सांगून त्या त्या राष्ट्रांचे कल्याण साधता येईल ही कल्पना मात्र भ्रामक आहे आणि शेवटी ती राष्ट्राला मारक ठरणारी अशीच आहे.

पहिली गोष्ट अशी की एखाद्या राष्ट्राचे प्राचीन वैभव कितीही मोठे असले तरी त्याचा वर्तमानकाळाशी नेमका संबंध काय हे लक्षात घेतले पाहिजे. पूर्वजांनी काही पराक्रम केले असतील, पण त्यांच्या पराक्रमाचे कारण त्यांचे पूर्वज होते किंवा काय ? मग त्यांच्या पूर्वजांमागे त्यांचे पूर्वज असे कोठपर्यंत जाणे शक्य आहे ? केव्हातरी आपल्या कोणत्या तरी पूर्वजांनी त्यांच्या पूर्वजांनी काहीही केलेले नसताना प्रथमच काही विक्रम केले हे मानल्याशिवाय गत्यंतरच नाही. कारण कोणत्याही राष्ट्राचा इतिहास मागे मागे जाऊन तपासून पाहू लागले की केव्हा-तरी एकादा त्या राष्ट्राला मागची काहीही परंपरा नव्हती, असली तरी उज्वल, स्फूर्तिदायक असे तिच्यात काही नव्हते, कधी तर लाजिरवाण्या वाटाव्या अशाही काही गोष्टी तेथे होत्या किंवा ते राष्ट्रच अस्तित्वात नव्हते अशी अवस्था आढळतेच.

पुष्कळदा असे दिसते की प्राप्त परिस्थितीत जे एखादे कार्य राष्ट्राला करणे प्राप्त असते ते किंवा तसे एखादे कार्य त्या राष्ट्राच्या इतिहासात पूर्वी कधीही झालेले नसते, जेव्हा मोठ्या प्रमाणावर उद्योगधंदे नव्हते, गिरण्या कारखाने नव्हते तेव्हा एका ठिकाणी एका प्रकारचे काम करणारा मोठ्या संख्येचा मजूरवर्गही अस्तित्वात नव्हता, तेव्हा आजच्या काळात मजुरांनी संघटित होऊन प्राण पणाला लावून आपल्या मागण्यांसाठी लढण्यासारखा एखादा कार्यक्रम असेल तर त्याला ऐतिहा-सिक परंपरा मिळणेच शक्य नाही. कोणत्या तरी कार्यासाठी एकत्र येऊन झगडण्याचे कार्य त्या समाजाने केलेले असेल पण ते जुने मूल्य आणि आजची ही नवी आघाडी ह्यांचा काही एक संबंध नसतो. आजच्या मजुरांचे पूर्वज पूर्वी धर्मासाठी किंवा जातीसाठी, एखाद्या राजासाठी किंवा राजाच्या जुलमाविरुद्ध उठलेल्या बंडखोरां-साठीही लढले असतील, पण आजच्या कामगारांना स्वतःच्या मागण्यांसाठी जो लढा द्यावयाचा आहे त्याचे नैतिक आणि सामाजिक स्वरूप इतके भिन्न आहे की त्या कार्यासाठी इतिहासात स्फूर्तिस्थान शोधायचे म्हणजे उगीच काही तरी बादरायण संबंध लावावयाचा इतकेच.

शिवाय असे की, आजचे जे ज्वलंत प्रश्न आहेत, ज्या निकडी आहेत, त्यांच्यासाठी लढा होतो तेव्हा लढणारे का लढतात ? पूर्वज लढले होते, आपणही लढले पाहिजे असा काही पोरकट प्रकार नसतो तो. आजचे प्रश्न हे खरेखुरे प्रश्न असतात. प्रत्यही जाणवणारी दुःखे असतात. कोणत्याही लढ्याची प्रेरणा बहुधा त्या लढ्यामागील त्या लढ्याला कारणीभूत होणाऱ्या अन्यायातून, जुलूमातून येत

असते. ती आपत्ती खरी असेल, जाणवणारी असेल, तर इतिहासाच्या आधाराशिवाय लोक संघटित होऊन झगडू शकतात. अशावेळी घोषणेला सोईस्कर असे एखादे ऐतिहासिक नाव मिळाले नाही तरी काम अडत नाही; लढा थांबत नाही. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचे वेळी शिवाजीच्या नावाचा जास्तीत जास्त वापर झाला. महाराष्ट्राची अस्मिता आणि एकता दाखविण्याची ती एक खूण लोकांना पसंत पडली. पण समजा असे ऐतिहासिक स्फूर्तिप्रद नाव आपल्याजवळ नसते तर ते कार्य काय थांबून राहिले असते ? मराठी–भाषिक एक महाराष्ट्र ही वर्तमानकाळी निकडीने जाणवलेली गरज होती. तिच्या पूर्ततेसाठी लोक बद्धपरिकर झाले होते. शिवाजीने संयुक्त महाराष्ट्र निर्माण केला नव्हता. शिवाजीनंतर मराठेशाहीत तसा तो कधीच निर्माण झाला नाही, संयुक्त अशा एकभाषिक महाराष्ट्र राज्याची गरजही त्याकाळी कधी भासलेली दिसत नाही. पण संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती हा कार्यक्रम पूर्वी कधी नव्हता म्हणून आता नको असे कुणी म्हणत नाही. त्याला इतिहासात दाखला नाही म्हणून ते काम कोणी हातीच घेऊ नये असे होत नाही. म्हणूनच स्फूर्तिस्थान म्हणून इतिहासाचा उपयोग होतो असे जे आपण मानतो तेच भोंगळपणाचे आहे. आजच्या विशिष्ट कार्यासाठी लोकांना त्या कार्याचे महत्त्व पटवून संघटित करता येते. तसे लोक संघटित होऊन कार्ये होतही असतात, त्यासाठी जे आवाहन केले जाते त्याची भाषा कधी इतिहासाने घडते, पण ती भाषाच. भाषेत त्या ऐतिहासिक विशेष नामांचे शब्द नसते तर दुसरे शब्द वापरले गेले असते इतकेच.

### प्राचीन स्मृतींचे दुष्परिणाम :

आणि त्याचप्रमाणे समाजाला त्याच्या प्राचीन वैभवाचे आणि पराक्रमाचे स्मरण देण्याने काही उपयोग होईल असे मानणारांनी त्याचा दुरुपयोग किती होऊ शकेल हेही लक्षात घेतले पाहिजे. किंबहुना दुरुपयोगाची गंभीरता लक्षात घेऊन त्याबद्दलच विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे. प्राचीन वैभवाच्या जाणिवेतून समाजाच्या स्वतःविषयी काही अवास्तव कल्पना होऊन बसणे शक्य आहे. इतिहास-लेखनात राष्ट्रीय दृष्टिकोन येत असल्यामुळे राष्ट्राने न केलेल्या पराक्रमांची, न मिळविलेल्या वैभवाची, कधी न पाहिलेल्या भरभराटीची वर्णने ऐकून त्या राष्ट्राचे नागरिक क्षणभर सुखावतील. पण त्याच कैफात राहून वस्तुस्थितीकडे आणि सद्यः-कालीन आपत्तीकडे डोळेझाक करण्याचीही प्रवृत्ती होईल. "ज्या राष्ट्राला उज्वल भूतकाल असतो त्याला उज्वल भविष्यकालही असतो; किंबहुना त्यालाच तसा भविष्यकाल असू शकतो" अशा तऱ्हेचे विचार अनेक दृष्टींनी माणसाचे नुकसान करणारे आहेत. ह्यामुळे भूतकालाचे असत्य चित्र निर्माण करण्याचा मोह होतो. आपला

भविष्यकाल उज्वल आहेच म्हणून मशगूल राहून माणसात एक प्रकारचा गाफीलपणा आणि निष्क्रियता येण्याचा संभवही लक्षात घेतला पाहिजे. उपयोग झालाच तर कदाचित खऱ्याखुऱ्या इतिहासाचा थोडाबहुत उपयोग होईल. तोही नुसता इतिहास न सांगता इतिहासाबरोबरच वर्तमानाचे योग्य दर्शन दिले तरच होईल. परंतु हा मुद्दा थोडा विस्ताराने पुढच्या प्रकरणात यावयाचा आहे. ह्या ठिकाणी एवढेच लक्षात घ्यावयाचे आहे की स्फूर्तिस्थान म्हणून इतिहासाकडे पाहणे आणि त्या दृष्टिकोनातून राष्ट्रीय वृत्तीने लिहिलेले वगैरे इतिहास निर्माण करणे हे ज्ञानाशी, सत्याशी तर प्रतारणा आहेच पण ज्या समाजासाठी ते करावयाचे त्याचेही अंती अहित करणारे असेच आहे.

**प्रांतीय आणि जातीय इतिहास :**

पुष्कळदा एखाद्या राष्ट्राच्या नागरिकांपैकी काही लोक भाषिक, धार्मिक, सामाजिक किंवा आर्थिक कारणांनी स्वतःचा असा एक वेगळा गट मानताना दिसतात. उदाहरणार्थ कोणाही भारतीयाची भारत ह्या राष्ट्राचे नागरिकत्व एवढी एकच निष्ठा नाही. तो भारतीय असतो त्याचबरोबर मराठी, गुजराथी, बंगाली, कानडी अशी एखादी भाषा बोलणारा त्या भाषिक राज्याचा नागरिकही असतो त्या नात्याने त्याच्या काही वेगळ्या आणि आणखी संकुचित अशा निष्ठा असतात. इतिहासलेखनात त्यांचाही प्रवेश होतो आणि हितसंबंधांप्रमाणे प्रांताच्या किंवा प्रदेशाच्या अभिमानाने भारलेले आणि म्हणून कितीतरी असत्य किंवा अप्रामाणिक तपशीलांनी भरलेले इतिहास निर्माण होतात. भारताचे समाजजीवन प्रांतीयतेप्रमाणे जातीयतेनेही ग्रासलेले आहे, आणि म्हणूनच येथील इतिहासलेखनात हिंदुत्वनिष्ठेचा किंवा हिंदु द्वेषाचा, तसेच ब्राह्मणत्वाचा किंवा ब्राह्मणेतरत्वाचा असा एखादा पूर्वग्रहही शिरतो आणि इतिहासाऐवजी रटाळ प्रचारसाहित्य निर्माण होते. एकदा समाजाला कार्यप्रवण करण्यासाठी, त्याच्यात कसला ना कसला अभिमान निर्माण करण्यासाठी, त्याची कोणती ना कोणती अस्मिता जागृत ठेवण्यासाठी आणि त्या स्वाभिमानाच्या मूल्यासाठी झगडण्याचे शिक्षण देण्यासाठी इतिहासाचा उपयोग करावयाचा असतो असे मानून चालले म्हणजे कोणत्या प्रकारच्या अभिमानासाठी त्याचा उपयोग व्हावा हे ठरविणे कोणाही विचारवंताचे हाती रहात नाही. ज्या सामाजिक गटाला त्याचा जसा उपयोग करणे शक्य आहे तसा तो करू लागतो. ह्याचा प्रत्यय जगभर अनेक बाबतीत आणि अनेकदा आलेला आहे.

**धर्मवेड आणि इतिहास :**

धार्मिक आघाडीवर तर इतिहासाचा अत्यंत भयानक असा वापर झालेला आहे. कोणत्याही धर्माच्या अनुयायांमध्ये धर्मसंस्थापकाबद्दल, त्याने दिलेल्या उपदेशातून

निर्माण झालेल्या किंवा परंपरेने चालत आलेल्या धर्मग्रंथांबद्दल आणि त्या धर्माने ज्या स्वरूपात ईश्वर किंवा परमतत्त्व वर्णिले असेल त्याबद्दल एक विलक्षण जाज्वल्य अशी भावना असते. केव्हा तरी, कुणी तरी विश्वाविषयी आणि मानवी जीवनाविषयी जे म्हटले ते अंतिम सत्य मानले जाते. नव्या विचारांनी, नव्या शोधांनी विश्वाचे काही निराळे स्वरूप सबळ पुराव्यांनी सिद्ध करता येण्यासारखे असले आणि मानवी इतिहाससंबंधी काही निराळे, तर्कदृष्टया निर्विवाद ठरलेले असे तपशील हाती आले असले तरी हे सर्व सांगायला धर्मामुळे अडचणी निर्माण होतात. धर्मग्रंथाला विरोधी असे कोणतेही ज्ञान पाखंडी म्हणून त्याज्य ठरत असते आणि मग धर्मनिष्ठेतून जे इतिहास निर्माण होतात ते स्वाभाविकपणेच एकांगी, आग्रही आणि तर्कदुष्ट असेच असतात. विश्वाचा आणि मानवजातीचा प्रारंभ कसा झाला ह्याविषयी बायबल, कुराण किंवा वेदपुराणे अशा धर्मग्रंथांतील मते आज मान्य करता येणेच शक्य नाही. विश्वशास्त्राचा आणि जीवशास्त्राचा आजचा अभ्यास, प्रत्यक्ष प्रयोगशाळेत सिद्ध करता येण्यासारख्या काही गोष्टी आणि उत्खननात मिळालेल्या अवशेषांवरून आज हाती असलेला माणसाचा इतिहास हे सगळे लक्षात घेतले तर कोणत्याही धर्मग्रंथातील विश्व आणि जीवनासंबंधीची आणि मानवी इतिहाससंबंधीची माहिती टाकाऊच ठरेल. प्राचीन मानवाने विश्वाचे कोडे उलगडण्याचे केलेले प्रयत्न म्हणून त्यांची दखल अवश्य घ्यावी. त्यातील ग्राह्यांशांची नोंद जरूर व्हावी, परंतु धर्मवीर एवढ्यावर कधीच थांबत नाहीत. धर्मप्रेमाच्या आंधळेपणाने ती सर्व माहिती खरी, शास्त्रशुद्ध ठरविण्याचा आटोकाट प्रयत्न केला जातो. वेदांत विमाने आहेत, भोजनाचे वेळी नेसावयाचे सोवळे रेशमी वस्त्र विद्युत्प्रवाह निर्माण करून अन्नपचनाला मदत करते वगैरेसारखे जे मनोरंजक शोध लावले जातात त्यामागे आधुनिक बुद्धिवादी जगतात धर्मनिष्ठा कायम रहावी आणि धर्मसंस्थापकाबद्दलचा किंवा धर्मग्रंथांबद्दलचा आदर टिकून रहावा असे काही हेतू असतात. आणि अशा हेतूंपोटी जो इतिहास सांगितला जातो तो मानवी प्रगतीला अनेक प्रकारे मारक ठरतो. नवे प्रयोग, नवे संशोधन नवे विचार ह्यांची मुस्कटदाबी होते. आज विद्येची जी प्रगती दिसते आहे ती सगळी ग्रंथप्रामाण्य नाकारून बंडे करणारांचीच देणगी आहे हे लक्षात घेऊन इतिहासाचा धर्मवेड्यांकडून अजूनही जो गैरवापर केला जात असेल त्याविरुद्ध सावधगिरी बाळगिली गेली पाहिजे.

धार्मिक दृष्टीने लिहिलेले इतिहास म्हणजे मानवी एकतेलाही फार मोठा धोका होय. धर्मनिष्ठ माणूस पुराणग्रंथात लिहिलेले सगळे त्रिकालाबाधित सत्य मानीत असतो हे खरे, पण ते फक्त त्याच्या स्वतःच्या धर्मग्रंथातीलच. प्रत्येक धर्मग्रंथात जगाविषयी, जीवनाविषयी आणि माणसांच्या इतिहासाविषयी जे जे सांगितले

आहे ते शंकातीत मानायचे म्हटले तर मोठी आपत्तीच ओढवेल. कारण परस्परविरोधी निरनिराळी दहाबारा मते आली की ती सगळीच शंकातीत व सत्ये कशी होतील ? आणि म्हणूनच प्रत्येकाचा आग्रह असा की, आमच्या धर्मात आहे ते संशयातीत असे पूर्ण ज्ञान. इतर धर्मग्रंथही खोटे, आणि मुळात ते धर्मही खालच्या दर्जाचेच. अशी भूमिका घेतल्यानंतर मग आपला धर्म मुळात कसा मोठा आहे आणि शतकानुशतके त्याची श्रेष्ठता कशी कायम राहिली आहे आणि इतर धर्मपंथ कसे नामोहरम झाले आहेत असा आणि असाच इतिहास सांगणेही ओघानेच येते. कधी भोळ्या-भाबड्या भाविकतेने तर कधी उद्दाम स्वाभिमानाने ' न भूतो ' असा इतिहास सांगितला जातो. मुसलमान, ख्रिस्ती, हिंदू वगैरे सर्वच धर्मांच्या अंधानुयायांनी असे कितीतरी इतिहासग्रंथ निर्माण करून ठेवलेले आहेत. त्यांच्या तपशीलवार समीक्षेत शिरण्याने फारसे काहीही साधणार नाही. स्वधर्माचा झेंडा उंच फडकविण्यासाठी इतिहास राबविण्याचा उद्योग होऊ शकतो आणि त्याचा परिणाम म्हणजे मानवजातीत अधिक द्वेष, अधिक भेद निर्माण होतात हे लक्षात घेतले तरी पुरे.

माणसाला स्वतःच्या इतिहासाचा काय उपयोग होण्यासारखा आहे हे पुढील प्रकरणात पहावयाचे आहे. परंतु अनेक प्रकारांनी होणारा इतिहासाचा दुरुपयोग टाळला तरच त्याच्या खऱ्याखुऱ्या उपयोगाबद्दलचा विचार फलदायी ठरेल. म्हणूनच वरील थोड्याशा चर्चेचा प्रपंच केला. इतिहासापासूनचे कोणते धोके टाळले पाहिजेत आणि कोणते दुरुपयोग थांबविले पाहिजेत ह्याची स्पष्ट जाणीव ठेवूनच त्याच्या निश्चित उपयोगाबद्दलच्या विवेचनाला लागावयाचे आहे.

## संदर्भ साहित्य


( 1 ) A History of Historical Writing
– Barnes, H. E. ; New York, 1962

( 2 ) Historical Inevitability
– Berlin, Isaiah ; London, 1954

( 3 ) Attitudes towords History
– Burke Kenneth ; New York, 1937

( 4 ) History and Human Retalions
– Butterfield, Herbort ; London, 1951

( 5 ) Contemporary World Politics
– Hill, Norman ; New York, 1954

( 6 ) Contemporary History in the Soviet Mirror
– ed. Keep, John ; London, 1964

( 7 ) Reflections on Modern History
– Kohn, Hans ; New York, 1963

( 8 ) Theory and History
– Mises L. V. ; London, 1958

( 9 ) The Open Society and its Enemies ( Vol. I–II )
– Popper K. R. ; London, 1945

( 10 ) Undarstanding History
– Russell, Bertrand ; New York, 1957

( 11 ) Political Thought Since World War II
– ed. Stankiewiez P ; London, 1964

( 12 ) Nationality and History
– Stephens H. M ; American
Historical Review, Vol. 21, 1916

## प्रकरण ११ वे

# इतिहासाचे उपयोग

### रंजनात्मक उपयोग :

आतापर्यंतच्या चर्चेवरून असा ग्रह होण्याचा संभव आहे की इतिहास हा एक मनुष्यमात्राचा घात करणारा विषय आहे. किंवा निदान मनुष्याला ज्याचा काही एक उपयोग नाही अशापैकी तो काही एक उद्योग असावा. परंतु आतापर्यंतच्या विवरणात इतिहासापासून काय धोके संभवतात हे बरेच सांगितले असले आणि इतिहासाचा कसा आणि किती दुरुपयोग होऊ शकेल हेही दाखवून दिले असले तरी इतिहास म्हणजे पूर्णपणे निरुपयोगी असा विषय आहे असे कोठेही म्हटलेले नाही. इतिहासापासून माणसाला काही लाभ नक्कीच होतात, पण ते निश्चित काय तेच पहावयाचे आहे.

माणूस ज्या विषयांवर विचार करतो आणि ज्या गोष्टीत रस घेतो त्यांपैकी काही व्यवहारात उपयोगी पडणाऱ्या, कोणती ना कोणती जीवनविषयक गरज भागविणाऱ्या अशा बाबी असतात, तर काही म्हणजे माणसांची नुसती कुतूहले किंवा छंद असतात. अशा प्रकारच्या कुतूहलांच्या आणि छंदांच्या व्यावहारिक उपयोगितेची चिकित्सा करावयाचीच नसते. त्या कुतूहलामुळे माणूस जो उद्योग करतो किंवा त्या छंदापायी तो जो वेळ व शक्ती खर्च करीत असतो त्यात एकच विचार असतो आणि तो म्हणजे त्यापासून मिळणारा आनंद.

जगात आज पोष्टाची तिकिटे गोळा करण्याचा छंद इतक्या मोठ्या प्रमाणावर आहे की कुणीतरी हे सगळे कशासाठी करायचे, ह्याचा उपयोग काय असा प्रश्न उपस्थित केला तर तो काही चूक म्हणता येणार नाही. आणि त्या प्रश्नाला उत्तरही फक्त एकच संभवते आणि ते म्हणजे तिकिटे गोळा करणारांना त्यापासून काही आनंद मिळतो हे होय. हा आनंद पुष्कळांना समजणार नाही. पण ज्यांना तसा आनंद समजत नाही किंवा मिळत नाही त्यांनी तिकिटे गोळा करू नयेत आणि ती जमा करण्यापासून ज्यांना काही विशेष आनंदाची प्राप्ती होते त्यांच्या मार्गातही येऊ नये अशीच भूमिका ह्या बाबतीत घ्यावी लागेल. पुष्कळ वेळा अशा प्रकारचे कित्येक छंद आणि हौशी ह्यांविषयी आपण ऐकत असतो. अनेकदा त्या विशिष्ट गोष्टीचा अर्थही समजेनासा होतो. कुणीतरी एकजण सतत बहात्तर तास सायकल चालवित बसण्याचा विक्रम करतो. ह्या ठिकाणी सरळच असा प्रश्न उपस्थित होतो की सतत बहात्तर तास सायकल चालवून मिळते काय ? तो विक्रम

पहाणारांनी काही देणग्या दिल्या आणि सायकलवाल्याला काही आर्थिक लाभ झाला तर गोष्ट वेगळी. परंतु असे घडतेच असे नाही. बहुधा हा विक्रम करणारा स्वतःचे पैसे खर्च करूनच जे करायचे ते करीत असतो आणि विक्रम करण्याच्या समाधानापलीकडे त्याला काहीही नको असते. व्यावहारिक दृष्टया ह्याबाबत असे विचारता येईल की जी मानवी शक्ती बहात्तर तास सायकल चालविण्यात गेली तिचा दुसरा काही उपयोग झाला नसता काय ? त्या सायकलची जी झीज झाली तीही टाळता आली नसती काय ? आणि बहात्तर तास सायकल चालवायचीच होती तर ती एका जागी वाटोळी वाटोळी कशासाठी ? ती सायकल तो माणूस राजरस्त्याने सरळ नेता तर बहात्तर तासात त्याला मुंबई ते दिल्ली प्रवासही करता आला नसता काय ? परंतु हे सर्व प्रश्न त्या विक्रमाच्या संदर्भात निरर्थक आहेत. त्या विशिष्ट उद्योगापासून माणसाला आनंद मिळतो ह्यापेक्षा अधिक काहीही म्हणता येणार नाही. आणि एखाद्या गोष्टीपासून जोपर्यंत कुणाला तरी आनंद मिळतो आहे तोपर्यंत ती गोष्ट त्या अर्थाने उपयोगीच आहे.

**इतिसहातून मिळणारा आनंद :**

इतिहासापासून असा आनंद मिळतो काय ? ह्याचे सरळ आणि एकदम उत्तर मिळतो असेच आहे. बुद्धिमान माणसाला अनेक कुतूहले असतात, मी कोण, माझे पूर्वज कोण आणि कोठचे, समोर दिसणारे घर किती जुने आहे, पलीकडचे देऊळ कुणी, केव्हा आणि का बांधले असावे अशा प्रकारची अनेक कुतूहले माणसाला असतात आणि त्यांच्या मागोव्याने तो इतिहास जमा करू लागतो. असा इतिहास नेहमीच कोणत्या तरी स्वाभिमानातून किंवा कोणत्या तरी हेतूने तयार झालेला असतो असे नाही. अगदी निर्मळ कुतूहलातूनही माणूस भूतकालाचा शोध घेत असतो आणि अशी कुतुहले पडणे आणि त्यासाठी हरप्रयत्नाने प्राचीन कालासंबंधीची माहिती मिळविण्याचे मागे लागणे ह्यात काही चूक आहे किंवा पाप आहे असे वाटण्याचे मुळीच कारण नाही. कुणी तिकिटे जमा करून खूष रहात असला, कुणी बहात्तर तास सायकल चालविण्यात परमानंद मिळवीत असला; आणि तिसऱ्या कुणाला एकशे चार तास पोहण्यात ब्रह्मानंद मिळत असला तर मग कुणाला ही मूर्ती जुनी आहे असा प्रश्न पडून त्याच्या उत्तरासाठी शतकानुशतकांचा इतिहास धुंडाळण्यात आनंद मिळत असेल तर तो कसा नाकारता येईल ? हा आनंद आहे की नाही असा प्रश्न उद्भवत नाही. आनंद हा ज्याचा त्याने ठरवावयाचा आहे. बहात्तर तास गरगरा फिरत राहणाऱ्या सायकलस्वाराचा आनंद इतिहासकाराला समजू शकत नाही तसाच शिवाजी आग्र्याहून रायगडी आला तो नेमक्या कोणत्या मार्गाने हे

हुडकण्यात वर्षानुवर्षे घालविणाऱ्या इतिहासकाराचा आनंद त्या बिचाऱ्या सायकलवाल्याला तरी कसा कळावा ?

**छंद आणि समाज :**

मागे म्हटल्याप्रमाणे व्यक्तीची अशी कुतुहले, माणसाचे असले छंद सबंध समाजाला न परवडणारे किंवा त्याची प्रत्यक्ष काही हानी करणारे असे असतील तर त्यांचे कौतुक करता येणार नाही. परंतु समाजाचे ज्यात नुकसान नाही आणि काही व्यक्तींना मात्र त्यामुळे आनंद प्राप्त होतो अशा गोष्टी समाजात चालू रहातात आणि त्या चालू रहाण्यास काही हरकतही नसावी. अगदी काटेकोर हिशेब केला तर एका व्यक्तीच्या किंवा चारदोन माणसांच्या एखाद्या छंदासाठी समाजाचे अगदी थोडेसे का होईना पण नुकसान होत असते. पण समाजाला ते चालवून घेणेच भाग आहे. कारण जवळजवळ सगळ्यांनाच असे काही छंद असतात, की जे इतरांना आवडतील किंवा पटतीलच असे नाही. समाजातील माणसे एकमेकांचे छंद चालवून घेतात, आणि म्हणूनच सायकलविक्रम आणि इतिहाससंशोधन ह्या दोन्ही गोष्टी समाज-जीवनात असू शकतात. आता एखाद्याचा छंद विलक्षणच काही असेल आणि त्याने समाजजीवनाला भयंकर धक्का पोचत असेल तर तो अर्थातच चालू शकणार नाही. एखाद्याला माणसांची नाके कापण्याचा छंद लागला तर त्याचे कौतुक समाज करणेच शक्य नाही. उलट त्या छंदिष्टाचेच नाक कापून त्याला कारागृहात किंवा वेड्यांच्या इस्पितळात टाकावे लागते. तेव्हा इतरांना दुःखदायक नसलेल्या, दुसऱ्याची गैरसोय न करणाऱ्या, इतरांवर आर्थिक भार न टाकणाऱ्या आणि काही व्यक्तींना आनंद देणाऱ्या अशा सर्वच छंदांना समाजात जागा आहे. निदान तेवढी तरी जागा इतिहासाला मिळायला पाहिजे.

**इतिहासाचे विशिष्ट उपयोग :**

माणसाची काही कुतूहले ही शेवटी मनुष्यजातीला उपकारकही ठरत असतात. आकाश केवढे आहे, त्यात ग्रह तारे किती आहेत, सूर्य, चंद्र कोण आहेत, दिवस-रात्र का होतात, झाडे कशी वाढतात, माणूस का मरतो असे अनेक प्रश्न माणसाला स्वाभा-विकपणे पडत असतात आणि तो त्यांची उत्तरे शोधित असतो. ती उत्तरे शोधण्यात त्याला आनंद मिळत असतो हे तर खरेच, परंतु अशी उत्तरे शोधून ते ज्ञान सर्व मानव-जातीला देऊन जगाचे काही भले करण्याचा विचारही त्यात असू शकतो. आणि असा विचार असो किंवा नसो पण मिळणाऱ्या उत्तरातून आणि लागणाऱ्या शोधातून अनेकदा मनुष्यजातीचे कल्याणच होत असते हे लक्षात घेणे आवश्यक आहे. सध्या विश्वाविषयी व जीवनाविषयी माणसाचे जे ज्ञान आहे ते सगळे अशाच अनेकविध कुतूहलांच्या मागोव्याने सतत परिश्रम होऊन जमा झालेले आहे.

माणसाच्या आपल्या भूतकालासंबंधीच्या कुतूहलाने जी माहिती जमा होईल तिचा त्या माणसाला मिळणाऱ्या आनंदाखेरीज इतरांचे दृष्टीने अगदी व्यावहारिक असा उपयोगही पुष्कळ प्रकारांनी होऊ शकतो.

'प्रारंभ कसा झाला ?' 'ह्याचे मूळ काय ?' अशा तऱ्हेची जी कुतुहले आहेत ती मानवसहज अशी आहेत. दुसरा कोणताही हेतू मनात न धरिता मनुष्य इतिहासासाठी इतिहास अशा वृत्तीने हे असले प्रश्न विचारू शकतो आणि त्यांची उत्तरे मिळविण्यात काही एक आनंद मिळविता येतो, सर्वच प्रश्नांची उत्तरे मिळतीलच असे नाही. पण ती शोधण्यात, त्यासंबंधी विचार करण्यातही आनंद असतोच.

पुष्कळदा माणसाचे त्याच्या इतर काही उद्योगातूनही इतिहासाकडे लक्ष वळते. चित्रकला किंवा शिल्पकला जाणणारा, त्यात रस घेणारा जेव्हा एखादी प्राचीन मूर्ती किंवा मंदिर पहातो तेव्हा त्या कलावस्तूमागील प्रेरणा समजावी, त्या कलाकृतीच्या तपशीलातील सर्व भागांचा अर्थ समजावा, कलाकाराचे मन समजावे, त्याचा आशय जाणून घ्यावा ह्यासाठी तो धडपडू लागतो. त्यातून मग ती कलावृत्ती निश्चितपणे कोणत्या काळात तयार झाली, कुणी तयार केली, ती कृती कलाकाराच्या स्वतःच्या इच्छेने निश्चित झाली की राजाच्या अथवा कोणा तत्कालीन धनिकाच्या आज्ञेने तयार झाली, त्या कलाकाराच्या भोवतालचा समाज कसा होता, त्या समाजाचे जीवन कसे होते अशी सर्व पृच्छा अपरिहार्यपणे निघते. अनेक साधनांवरून इतिहासकारांनी परिश्रमाने जमा केलेल्या माहितीचा तो कलाकार अशा वेळी मोठ्या कृतज्ञतेने उपयोग करतो. फक्त मोठ्या कलावंतांनाच तेवढा अशा माहितीचा उपयोग असतो असे नाही. सुंदर कलाकृतींच्या दर्शनाने जीवनाचा आनंद वाढविणाऱ्या सर्वसामान्य माणसालाही प्राचीन कृतीतील सौंदर्य समजून घेण्यासाठी इतिहासाची मदत मागावी लागते. अजिंठा पहायला जाणाऱ्या सर्वसामान्य हौशी प्रवाश्याला बुद्धाचे जीवन, बौद्ध साहित्य इत्यादीविषयींची निदान जुजबी तरी माहिती तेथील 'गाइड' ने सांगितली नाही तर त्या लेण्यातील त्या प्रचंड मूर्तीतले आणि भिंतीवरच्या आणि छतावरच्या त्या बहुरंगी चित्रातले सौंदर्य आणि त्यातले आशय त्याला कसे समजावे ? कलेप्रमाणे प्राचीन वाङमयाचा रसास्वादही प्राचीन इतिहासाच्या संदर्भातच घ्यावा लागतो.

इंजिनियर, डॉक्टर, वकील, शिक्षक वगैरे विविध प्रकारचे व्यवसाय करणारांनाही आपापल्या व्यवसायाचा इतिहास वाचणे व्यावहारिक दृष्टया फायदेशीर ठरेल किंवा ठरणार नाही, पण मनोरंजक तरी निश्चित होईल. आज मोठमोठ्या गगनचुंबी इमारती उभारणाऱ्या, धरणे बांधणाऱ्या आणि नगररचनेची आखणी

करणाऱ्या स्थापत्यशास्त्रज्ञाला, आग्र्याचा ताजमहाल, विजापूरचा गोलघुमट, मदुरेचे मीनाक्षीमंदिर, मोहेंजदडोची नगररचना, गिरनारनजिकचा सुदर्शन तलाव वगैरे जुन्या उभारणी कशा झाल्या, कुणी केल्या, त्यांनी कोणत्या प्रकारचा दगड, माती वगैरे माल वापरला, कोणत्या तंत्राने, कोणत्या गणिताने बांधकामाची आखणी केली आणि ते कसे पुरे केले ह्याबद्दलचे प्रश्न पडणे अगदी स्वाभाविकच आहे. इतर सर्व व्यवसायांचे बाबतीतही हेच म्हणता येईल.

जुन्या तत्त्वांच्या आणि जुन्या तंत्रांच्या अभ्यासातून ह्या व्यावसायिकांच्या प्रत्यक्ष काही हाती पडेलच असे सांगता येत नाही, परंतु पुन्हा इंजिनियरचेच उदाहरण घेऊन बोलायचे तर प्राचीन बांधकामाचा, त्यात अंतर्भूत असलेल्या तत्त्वांचा आणि तंत्रांचा अभ्यास करता करता त्याच्या बुद्धीला एक विशिष्ट प्रशिक्षण मिळत रहाते. बांधकामे किती प्रकारांनी आणि किती पद्धतींनी केले गेली आहेत ह्याच्या चिकित्सेतून त्याची बांधकामाविषयी विचार करण्याची काही एक रीत बसत जाते. इंजिनियरला प्राचीन वास्तुशास्त्राचा अभ्यास अपरिहार्यच आहे असा मात्र ह्याचा अर्थ नाही. जुन्या वास्तुशास्त्राचा गंधही नसलेला माणूस आजचा चांगला इंजिनिअर होऊ शकेल हे खरेच, पण त्याचबरोबर जुन्याच्या अभ्यासातून त्याचा वर स्पष्ट केल्याप्रमाणे काही फायदा होईल हेही नाकारता येणार नाही. क्वचित असेही होण्याचा संभव आहे की एखाद्या इंजिनियरला आज लुप्त झालेले पण अजूनही उपयोगी ठरू शकेल असे एखादे तंत्र जुन्या अभ्यासातून गवसेल. सध्याचे इंजिनिअर कित्येक जुन्या वास्तू पाहून हे कसे बांधले असेल असे आश्चर्य करीत असलेले दिसतात. इतिहासकालीन बांधकामाच्या अधिकाधिक अभ्यासाने ती किमया समजेलही आणि तिचा आजही उपयोग करता येण्याची शक्यता निर्माण होईल. त्याचप्रमाणे प्राचीन वैद्यकाच्या अभ्यासातून आज वैद्यकीय व्यवसायाला अज्ञात असलेल्या एखाद्या वनस्पतीचे, एखाद्या खनिजाचे काही अद्भूत गुण समजतील. प्रत्यक्ष प्रयोगांनी ते पडताळून पहाता येईल. आणि त्या व्यवसायाला उपकारक अशी एखादी नवी औषधी किंवा क्लृप्ती जुन्यातूनच हाती लागेल ही शक्यता तरी कशी नाकारता येईल ?

## इतिहासाचे वाङ्मयमूल्य :

आणि आपल्यापैकी बहुतेकांना इतिहासात रस वाटतो तो अगदी निराळ्या दृष्टीने. ज्या कारणाने आणि ज्या प्रकारे बहुधा सर्वांना ललित वाङ्मय आवडते त्याच प्रकारे इतिहास हवा असतो, इतिहासातील गोष्टी हव्या असतात, आपल्यासारख्या आणि आपल्याहून काहीशा निराळ्याही माणसांच्या कथा प्रत्येकाला ऐकायला हव्या असतात. ही इच्छा इतिहास पुरवितो. देशोदेशींच्या असंख्य माणसांच्या जीवन-

कथा इतिहास सांगतो. माणसामाणसातील प्रेम आणि हेवेदावे, समाजातील सहजीवन आणि संघर्ष ह्यांचे अनेक नमुने इतिहास दाखवितो, कमीजास्त सामर्थ्याची आणि निरनिराळ्या हेतूंनी कार्यप्रवण झालेली कित्येक माणसे कालपटावर येऊन जात असतात. एकेका व्यक्तीचा स्वभाव, तिची आंतरिक द्वंद्वे, तिच्या आशाआकांक्षा, तिची ध्येये आणि स्वप्ने, तिचे यशापयश इतिहास आपणापुढे उभे करीत असतो. साहित्यातून मिळते तसेच जीवनदर्शन इतिहासातूनही होत असते.

इतिहासातून मिळणारे वाङ्मय कल्पित कथांपेक्षाही अधिक हृदयस्पर्शी होऊ शकते. साहित्यात समाजजीवनाचे दर्शन असते. माणसाची अवघी धडपड आणि तडफड साहित्तिक आपल्या वाङ्मयकृतीतून साकार करीत असतो. हे करताना लेखकाला हवे तेवढे स्वातंत्र्य घेता येत असल्यामुळे आपल्या कथा-कादंबरीला आल्हाददायक, सुडौल असा घाट तो देऊ शकतो. इतिहासकाराला अशी मुभा घेता येत नाही. त्याला आदि, मध्य आणि अंत असलेली, चढत जाणारी, पकड घेत जाणारी अशी गोष्ट सांगता येणार नाही; कारण मुद्दाम रचवून तो काहीच सांगू शकत नाही. जे झाल ते आणि तेवढच, आणि जसे घडल तसेच सांगायला तो बांधलेला आहे. आणि तरीही त्याची कथा कृत्रिम रम्यकथेपेक्षाही अधिक पटणारी, अधिक भिडणारी अशी होऊ शकते. कारण इतिहास वाचणाराला आपण वाचतो आहोत ती एक खरीखुरी हकीकत आहे ह्याची जाणीव असते. मानवी जीवनाचे असे खरेखुरे दर्शन घडविणारा इतिहास निरुपयोगी कसा म्हणता येईल ?

मात्र इथे हे मुद्दाम लक्षात ठेवले पाहिजे की इतिहास हे एक महान्, भव्य असे साहित्य आहे ते त्यातील वास्तवतेमुळे; नागड्याउघड्या सत्यामुळे. खरा संभाजी किंवा खरा माधवराव पेशवा पाहूनच इतिहाससाहित्याचा आनंद घेता येईल. नाटकाकरिता किंवा कादंबरीकरिता ललित लेखकांना आपल्याला हवे तसे संभाजी आणि माधवराव बेतून घेता येतील. ती संभाजी आणि माधवरावाची पात्रे कित्येक रसिकांना कित्येक वर्षे झुलवीतीलही. पण तो साराच मामला निराळा आहे. अशा ठिकाणी विशेषनामे आणि काही सोईचे तपशील इतिहासातून घेतलेले असतात पण प्रत्यक्षात अवतरतात ती वाङ्मयीन पात्रेच. हाडामासांच्या माणसांतील सामर्थ्य आणि दुर्बलता; गुण आणि दुर्गण; आणि भोग आणि त्याग सगळ उघड उघड दाखविणाऱ्या इतिहास-साहित्याची परिणामकारकता काही वेगळीच असते.

**इतिहासकाराचे कर्तव्य :**

तथापि इंजिनियर, डॉक्टर हे काही आपला व्यवसाय सोडून इतिहासाच्या सखोल अभ्यासाला लागू शकत नाहीत. तशा व्यावसायिकांना त्यांचे व्यवसायांचे

संदर्भात इतिहासात जो रस वाटतो त्यासाठी आणि त्याचप्रमाणे जुन्याच्या अभ्यासातून कदाचित काही प्रत्यक्ष लाभही होण्याची शक्यता आहे म्हणूनही त्याचे हाती इतिहासग्रंथ पडला पाहिजे, त्यांना जुनी माहिती उपलब्ध असली पाहिजे. पण ती दुसऱ्या कोणीतरी गोळा करून ठेवलेली असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे इतिहासात कथावाङ्मय म्हणून रस घेणारा जो सर्वसामान्य माणूस वर उल्लेखिलेला आहे तोही आपल्या दैनंदिन जीवनातून आणि नित्याच्या व्यवसायातून वेळ काढून इतिहाससंशोधनास लागू शकत नाही. त्याला गोष्ट हवी असते, पण ती दुसऱ्या कोणी तरी त्याचे हाती देणे आवश्यक आहे. म्हणूनच प्राचीन काळी जीवनाच्या सर्व क्षेत्रातून जे जे घडले त्या सर्वांची शक्य तितक्या जास्त तपशीलांनी आणि शक्य तितकी बिनचूक माहिती जमा करून ठेवण्याचाच व्यवसाय करणारे असे काही लोक समाजात असणे आवश्यक आहे. हेच इतिहासकारांनी करावयास पाहिजे. इतिहासाचा अर्थ लावण्याचे काम इतिहासकार स्वतः करोत वा न करोत पण ज्यातून काही अर्थ काढावयाचा आहे ती सगळी भूतकालाविषयीची माहिती मात्र इतिहासकारांनी समाजाला पुरविली पाहिजे. जुने अवशेष, शिलालेख, नाणी, कागदपत्र वगैरे साधनांवरून जुळविलेला शक्य तितका बिनचूक असा इतिहास समाजाचे हाती असला पाहिजे. त्याचा उपयोग अनेक लोक अनेक प्रकारे करतील. पण ज्याचा थोडा तरी उपयोग व्हायचा आहे ती मूळ वस्तूच नसून कसे चालेल ?

## इतिहासनिष्ठ निदान :

इतिहासाचा एक नेहमी सांगण्यात येणारा उपयोग असा की वर्तमानकालीन प्रश्न चांगले समजण्यासाठी भूतकालाचे ज्ञान अटळ आहे. आजची राज्यव्यवस्था, सध्याची समाजरचना, सांप्रतची आर्थिक परिस्थिती ही सगळी हळूहळू घडत आलेल्या अशाच घटनांचा परिणाम आहे. दुखण्याचे निश्चित निदान करण्यासाठी डॉक्टरही रोगाचा सगळा इतिहास तपासून पहात असतो. त्याच पद्धतीने समाजाचे सध्याचे दुखणे नेमके काय आहे हे त्या व्यथेची संपूर्ण पार्श्वभूमी माहित असल्याखेरीज ठरविता येणे शक्य नाही. हा मुद्दा कितीसा टिकणारा आहे हे पाहिले पाहिजे. आपल्या भोवतालच्या समाजात आज जातिभेद आहेत, काही प्रमाणात जातीय तेढही आहे. आपली सध्याची आर्थिक स्थिती हलाखीची दिसते. परकीय मदतीवाचून स्वतःच्या पायावर आपण आपली उन्नती करू शकणे अवघड म्हणजे जवळ जवळ अशक्य अशी गोष्ट आहे. आपल्या राज्ययंत्रणेत ढिलेपणा, दिरंगाई, वशिलेबाजी आणि भ्रष्टाचारही काही एका प्रमाणात स्पष्ट दिसतो. अशी ही जी एकंदर स्थिती आहे ती भोवतालच्या समाजाचे काळजीपूर्वक निरीक्षण करून समजणार नाही काय ? त्याच्यासाठी इतिहासच

जाणून घेतला पाहिजे काय ? तशी अगदी जरूरीच आहे असे मुळीच म्हणता येणार नाही. आजच्या समाजाची स्थिती डोळसपणे समोवती पहाणाराला आहे तशी दिसायला काहीच हरकत नाही.

परंतु भूतकालाच्या आवश्यक तेवढ्या ज्ञानाने ती अधिक चांगली समजते हेही मान्य करावयास हवे. आज भारतीय समाजात असंख्य जातिपोटजाती दिसत आहेत, हे ज्ञान, आणि दोन हजार वर्षांपूर्वीपासून तर आजतागायत भारतीय समाज असंख्य जातिपोटजातीत विभागलेला आहे हे ज्ञान, ह्यांत निश्चित फरक आहे. ज्या समाजाने जातिसंस्था शेकडो वर्षे टिकवून धरली आहे तो ती सहजासहजी सोडणार नाही असे ह्यावरून वाटू लागते. अर्थात माणसाने आजतागायत जे बाळगून ठेवले ते तो आज किंवा उद्या सोडणारच नाही असा याचा मुळीच अर्थ नाही. कित्येक कल्पना, तत्त्वे, संस्था माणसांनी बदलल्या आहेत, सोडल्या आहेत असे इतिहासच सांगतो. जातिसंस्थेचे स्वरूपही दोन हजार वर्षे तसेच्या तसे राहिलेले नाही, ते बदलत आलेले आहे; ती संस्था कायम असली तरी त्यातील तीव्रता आज जवळजवळ नाहीशी झाली आहे हीही स्पष्ट दिसणारी परिस्थिती आहे. तेव्हा जातिसंस्थेसारख्या गोष्टीचे बाबतीत इतिहास माणसाच्या एवढेच नजरेस आणू शकेल की व्यक्तीसारख्याच समाजालाही काही सवयी जडलेल्या असतात. जातीत विभागून रहाणे ही हिंदू समाजाची एक सवय आहे, फार जुनी खोड आहे, हवे तरी व्यसन आहे म्हणावे. काही म्हटले तरी ती चटकन्, सहजासहजी सुटणारी बाब नाही एवढा अंदाज निश्चित होतो. भारतीय जातिजमातींपैकी एखादा समाज–उदाहरणार्थ मुसलमान समाज – आज भारतीय जीवनात कोणते धोरण ठेवून राहील ? त्या समाजाची आजची वागणूक पाहून काही एक ज्ञान निश्चित होतेच, पण तो समाज गेली काही शतके अशाच वृत्तीने वागतो आहे असा इतिहास हाती लागला तर आहे त्याहून अधिक आणि थोडे निराळ्या प्रकारचे ज्ञान होते. त्या विशिष्ट समाजाची ती खोड जुनीच आहे, ते व्यसन शरीरात मुरलेले आहे हे चांगले लक्षात येते. ह्याही ठिकाणी हे लक्षात घेतले पाहिजे की तो समाज आजपर्यंत असा वागला म्हणजे वर्तमानकाली असाच वागतो आहे आणि भविष्यकाली असाच वागत राहील असे मुळीच नाही. हा समाज अशा प्रकारे वागण्याचा संभव आहे, तेव्हा सावधगिरी बाळगणे चांगले एवढी फार तर सूचना मिळाली. पण एवढेच झाले तरी ते महत्त्वाचे नाही असे कसे म्हणता येईल ? विशिष्ट सामाजिक गट आज उद्या कसा वागण्याचा संभव आहे हे जर इतिहास सांगत असेल तर ते संभवाच्या स्वरूपातले असले तरी फार उपयुक्त आहे हे मान्य केलेच पाहिजे.

वरील उपयुक्तता मान्य केली, तरी त्यातून प्रत्येक माणसाला संपूर्ण मानवी इतिहासाच्या सांगोपांग ज्ञानाची आवश्यकता आहे असे मात्र मुळीच निघत नाही. उदाहरणार्थ मुसलमान समाज आज भारतात कसा वागतो आहे आणि उद्या कसा वागेल हे ठरविण्यासाठी भारतीय मुसलमान समाजाचा गेल्या शंभर वर्षांचा इतिहास जाणून घेतला तरी पुरेसे आहे. आता गेली शंभर वर्षे तरी तो असाच का वागत आला हे पाहाण्यासाठी त्याच्या मागच्या शंभर वर्षांचा इतिहास पहायचा, मग तो समजण्यासाठी आणखी मागे जायचे हा उद्योग करायला हरकत काहीच नाही. पण ज्यांना इतिहासातून जे काही थोडे बहुत मिळते त्याचा उपयोग करावयाचा आहे त्या राजकीय नेत्यांचे दृष्टीने, राजकीय, सामाजिक आणि आर्थिक धोरणे ठरविण्याचे दृष्टीने इतके मागे जाण्याचे काही कारण आहे असे दिसत नाही. त्यासाठी नजिकच्या भूतकालाचे ज्ञान पुरेसे असते.

मात्र नजिकचा भूतकाल अवलोकन करून जो अंदाज आपण बांधू तो एक अंदाजच आहे हे केव्हाही विसरून चालत नाही. माणसे बदलू शकतात, बदलत असतात, कधी परिस्थितीच्या दडपणाने तर कधी स्वतःच्या निर्णयाने त्यांच्यात स्थित्यंतरे होत असतात हे इतिहासही सांगतो आणि वर्तमानकालीन समाजाच्या निरीक्षणावरूनही तेच दिसते. परिस्थितीचे दडपण असे जे आपण समजतो त्यात कधी माणसाच्या हाताबाहेरचा निसर्गनिर्मित असा भाग असतो, पण पुष्कळदा ती परिस्थितीही माणसांनीच निर्माण केलेली असते.

## माणसाचे कृतिस्वातंत्र्य :

माणसाची बुद्धी, त्याच्या इच्छा आणि त्याचे प्रयत्न ह्यातूनच बहुतेक सर्व मानवी इतिहास घडत असतो, आजपर्यंत न केलेल्या गोष्टी माणूस करू शकतो, म्हणूनच आजपर्यंत कधीही न घडलेले घडू शकते आणि म्हणूनच ज्या चुका घडल्या तशा पुन्हा होऊ न देण्याचा इशारा इतिहास देत असतो आणि तो लक्षात घेऊन माणसांनी योग्य ते शिकायचे असते असा पोक्त सल्ला काही विचारवंत देत असतात. हा सल्ला कितपत मोलाचा आहे त्याचाही विचार आता प्राप्त झाला आहे. आपल्या वैयक्तिक जीवनात, अनुभवातून आपण काही शिकतो. मागच्या वेळी एखाद्या वस्तूला हात लावून तो होरपळला असला तर साधारणतः माणूस पुन्हा तिला स्पर्श करीत नाही. साधारणतः म्हणण्याचे कारण असे की हात होरपळला तरी पुन्हा पुन्हा तेच करावयाचे आणि हाताला त्या धगीची संवय करावयाची असेही आपण ठरवू शकतो किंवा ती वस्तूच थंड करण्याची काही युक्ती शोधण्याच्या उद्योगालाही आपण लागू शकतो. अनुभवाने काही एक वस्तुस्थिती दिसते एवढेच. त्यातून शिकावयाचे की

नाही आणि शिकावयाचे असेल तर काय शिकावयाचे हे ठरविण्याचे स्वातंत्र्य माणसाला असते, वाघसिंहासारख्या शूर प्राण्यांशी संबंध आल्यावर त्यांच्या वाटेला गेल्याने काय होईल हे माणसाला दिसते. पण मग त्यांना भिऊन दूर पळत रहायचे, की त्यांना ठार मारायचे, की त्यांना पकडून सर्कशीत कामाला लावावयाचे हा निर्णय शेवटी माणूस आपल्याला पाहिजे तसाच घेत असतो. हिलेरी आणि तेनसिंग यांनी गौरीशंकर जिंकले. ते जिंकण्याचे त्यापूर्वीचे अनेक प्रयत्न फसलेले होते म्हणून काही त्यावरून त्याच्या नादी लागण्यात अर्थ नाही असा धडा त्या पर्वतवीरांनी घेतला नाही. पूर्वी काहीही घडलेले असले तरी निराळ्या पद्धतींनी, निराळ्या साधनांनी मी मला वाटते ते करून दाखवीन, मला हवे ते मिळवून दाखवीन अशी माणसाची जिद्द असते. इतिहासात एकामागून एक कितीतरी हुकूमशहा पडले. जग जिंकण्याची महत्त्वाकांक्षा बाळगून जीवनभर झुंजलेल्या आणि अखेरीस रसातळाला गेलेल्या कितीतरी वीरांची उदाहरणे इतिहास ओरडून सांगत असतांनाही हिटलर, मुसोलिनी निर्माण होतातच, आणि पुढेही होऊ शकतील. नवा वीर जुन्या उदाहरणावरून, इतिहासावरून योग्य तो बोध कसा घेत नाही ? ह्याचे कारण असे आहे की, प्रत्येक नवीन हुकूमशहा जुने सर्व हुकूमशहा कोसळले असले तरी आपण पडणार नाही असेच मानीत असतो. माणसाचा आशावाद आणि त्याची इच्छाशक्ती इतिहासाच्या कोणत्याही तथाकथित धड्याहून प्रबळ असते.

जी कथा व्यक्तीची तीच थोड्याशा फरकाने समाजाचीही. समाज व्यक्तींचाच बनलेला असतो आणि म्हणून व्यक्तींनी आपल्यात स्थित्यंतरे केली की त्या प्रमाणात समाजाचे स्थित्यंतर होणार हे उघडच आहे, परंतु एखाद्या समाजाच्या आणि त्यातील एखाद्या व्यक्तीच्या जीवनक्रांतीच्या प्रक्रियेत फरक दिसतो तो वेगाचा. आंतर्जातीय विवाह जिथे अजिबात मान्य नाहीत अशा एखाद्या समाजात सर्व अडचणी, धोके पत्करून, समाजाला ठोकरून दोन व्यक्ती तशा प्रकारच्या विवाहाने एकत्र येऊन राहू शकतील. सगळ्या समाजात आंतर्जातीय विवाह रूढ होण्यापूर्वी शंभर वर्षे आधीही दोन व्यक्तींपुरती अशी क्रांती होऊ शकेल. परंतु सामान्यतः समाजात रहायचे आहे हे लक्षात घेऊन माणसे भीत असतात, आणि सगळ्या समाजाला चालेल अशी परिस्थिती निर्माण होईपर्यंत रूढ नसलेल्या गोष्टी करायला ती धजत नाहीत, परंतु हळूहळू का होईना समाजही बदलत असतोच. आणि तो बदल घडवून आणणारी कारणे कशाही प्रकारे दाखविली गेली तरी तो बदल माणसांनी आपल्या निर्णयांनी आणि आपल्या कृतींनीच घडवून आणलेला असतो हे मूळ सत्य अबाधितच रहाते.

**इतिहासाच्या वापराचे स्वरूप :**

तेव्हा म्हणूनच शेवटी माणसांच्या वर्तमानकालीन जीवनाचे आणि भविष्य-कालीन योजनांचे संदर्भात त्यांचा भूतकाळ आणू नये असे म्हणावे लागते. आपले सध्याचे प्रश्न सोडविण्यासाठी भूतकालाच्या तोंडाकडे पहात बसण्याची काहीही आवश्यकता नाही. उलट भूतकालाच्या भूताने पछाडलेली माणसे स्वतंत्रपणे विचार करायला असमर्थ होण्याचा धोका संभवतो. समाजाला विघातक अशा अनेक गोष्टी –अनेक पूर्वग्रह, द्वेष, संघर्ष–माणूस त्यांची स्मृती आहे म्हणून पुढे चालू ठेवतो. समजा काही चमत्काराने सर्व भारतीयांना एक स्मृतिभ्रंश झाला आणि प्रत्येक माणूस आपली जातपात विसरला तर काय नुकसान होणार आहे ? तोटा तर नाहीच पण नवसमाजरचनेचे दृष्टीने अनुकूल अशी भूमिका तयार होऊन फायदाच होईल. परंतु असे चमत्कार वगैरे घडत नाहीत. ती स्मृती कायमच रहाते आणि म्हणनच आपल्या नव्या जीवनाचे संदर्भात तो इतिहास विसरा असे समाजाला सांगणे आवश्यक होते.

आपले भवितव्य आपल्या हाती आहे आणि भविष्यकालीन घडणीच्या व्याव-हारिक शक्याशक्यता लक्षात घेऊन आपले जीवन आपण आखावयाचे आहे, त्यासाठी परंपरांची आणि प्राचीन वैभवाचा वारसा वगैरे सांगण्याची काहीही आवश्यकता नाही. एखादा समाज असाही असेल की ज्याला कोणतीही परंपरा किंवा कोणतेही जुने वैभव सांगता यायचे नाही. जनतेत स्वाभिमान निर्माण करता येईल अशा प्रकारचे सांगण्यासारखे असे त्याच्या भूतकालात काही नसेलही. आता अशा समा-जाला भूतकाल नाही म्हणून त्याला भविष्यकालही नाहीच असे मानावयाचे की काय ? काय म्हणून ? पूर्वजांनी काही केले नाही हा काही चालू पिढीचा दोष होऊ शकत नाही. अशा ठिकाणी आजची माणसे केशवसुतांप्रमाणे सरळ सरळ म्हणू शकतात की "आम्ही नव्हतो आमुचे बाप; उगाच का मग पश्चाताप ?" तेव्हा ज्यांना काही भूतकाल आहे त्यांना त्याच्या कैफात ठेवणे आणि ज्यांना नाही त्यांचा त्या मुद्यावर तेजोभंग करणे या दोन्ही गोष्टी चुकीच्या आहेत; मानव-जातीची हानी करणाऱ्या आहेत. म्हणूनच इतिहासाचा असा वापर थांबलाच पाहिजे.

ह्यावर काही विचारवंत असे म्हणतील की इतिहासाला आपल्या वर्तमान-कालीन समाजजीवनाचे संदर्भात काही अर्थ नसला तरी आपल्या ध्येयधोरणांचे अनुरोधाने त्यात आपण अर्थ घालायला काहीच हरकत नाही. बर्ट्रांड रसेल, हॅन्स कॉन्ह, के. आर्. पॉपर अशा मोठमोठ्या विचारवंतांनी इतिहासाचा असा वापर

करण्यासंबंधी जोरदार शिफारशी केल्या आहेत. हा दृष्टिकोन कशा प्रकारचा असतो हे समजून घेण्यासाठी के. आर. पॉपरने मांडलेली आपली स्वतःची भूमिका जाणून घेतली तरी पुरेसे होईल. कमीअधिक फरकाने इतरांची इतिहासविषयक धारणा तशीच आहे. पॉपर म्हणतो :

"Neither nature nor history can tell us what we ought to do. Facts, whether those of nature or those of history, can not make the decision for us, they cannot determine the ends we are going to choose. It is we who introduce purpose and meaning into nature and into history. Men are not equal; but we can decide to fight for equality. Human institutions such as the state are not rational, but we can decide to fight to make them more rational. We ourselves and our ordinary language are, on the whole, emotional rather than rational; but we can try to become a little more rational, and we can train ourselves to use our language as an instrument not of self-expression (as our romantic educationists would say) but of rational communication. History itself- I mean the history of power politics, of course, not the non-existent story of the development of mankind-has no end nor meaning, but we can decide to give it both, we can make it our fight for the open society and against its antagonists we can interpret it accordingly. And it is up to us to dedide what shall be our purpose in life, to determine our ends.

"History has no meaning, I contend. But this contention does not imply that all we can do about it is to look aghast at the history of political power, or that we must look on it as a cruel joke. For we can interpret it, with an eye to those problems of power politics whose solution we choose to attempt in our time. We can interpret the history of power politics from the point of view of our fight for the open society, for a rule of reason, for justice, freedom, equality, and for the control of international crime. Although history has no ends, we can impose these ends of ours upon it; and although history has no meaning, we can give it a meaning".

(The Open Society and its Enemies पृ. २६४–२६८)

( वरील उताऱ्याचा थोडक्यात आशय असा : आपण काय करावे हे इतिहास सांगू शकत नाही. तो आपल्यासाठी काही निर्णय घेऊ शकत नाही. इतिहासातील अर्थ आणि हेतू म्हणजे दुसरे तिसरे काही नाही; आपण त्यात जे पाहू ते. माणसे समान नाहीत; पण त्यांच्यात समानता आणण्यासाठी आपण झगडे करू शकतो. सामान्यतः विचारापेक्षा विकारांचाच पगडा आपल्यावर अधिक असतो; पण अधिकाधिक विवेकनिष्ठ होण्याचा प्रयत्न करणे आपल्या हाती आहे. इतिहासाला अर्थ नाही हे खरेच. पण म्हणून सगळा राजकीय इतिहास म्हणजे एक क्रूर थट्टा आहे असे धरून त्याकडे पाठच फिरविली पाहिजे असे नाही. बुद्धिनिष्ठेसाठी, स्वातंत्र्यासाठी, समतेसाठी आपल्याला झगडे करावयाचे आहेत. सर्व राजकीय इतिहासाला आपण आपल्या ध्येयांच्या अनुरोधाने अर्थ देऊ शकतो. इतिहासाला अर्थ नसला तरी आपण त्याच्यावर तो लादू शकतो ).

## इतिहाससंबंधीची योग्य भूमिका :

इतिहास आपल्याला आपले कर्तव्य दाखवून देऊ शकणार नाही. इतिहासातील घटना आपले भवितव्य ठरवीत नाहीत. आपली ध्येये आपली आपण ठरवावयाची असतात; इतिहासाने नव्हे, ही जी पॉपरची विचारसरणी आहे ती वास्तव, तर्कशुद्ध अशीच आहे. ह्याबद्दल वादच नाही. परंतु पॉपर त्याला स्वतःला मान्य असलेल्या ध्येयांसाठी इतिहासात विशेष अर्थ भरावा आणि इतिहासाची काही एक उपयुक्तता निर्माण करावी असे जे म्हणतो ते मात्र त्याच्या स्वतःच्या विचारसरणीशी सुसंगत असे नाही. कारण एकदा लोकशाही, मानवी एकता अशा तुमच्या ध्येयासाठी तुम्ही इतिहासाचा उपयोग करणार असे ठरविले तर हुकूमशाही, वांशिक राष्ट्रवाद, जातीयवाद इत्यादी मूल्यांच्या पुरस्कर्त्यांना तुम्ही त्यांच्या ध्येयांसाठी इतिहासाचा उपयोग करण्याचे स्वातंत्र्य कसे नाकारू शकाल ? इतिहास राबवायाचा नाही अशी एकदा भूमिका घेतली की तो विशिष्ट कारणासाठी मात्र राबवायला हरकत नाही अशा तऱ्हेचा युक्तिवाद मुळीच चालता कामा नये.

लोकशाही, समता, मानवी ऐक्य ही मूल्ये मानवजातीला उपकारक असतील तर त्यांचा प्रचार करणे, जनतेला त्यांच्यासाठी झगडण्याचे आवाहन करणे ह्यात काहीच चूक नाही. त्याबद्दलचे जास्तीत जास्त प्रयत्न जरूर करावेत. मुद्दा इतकाच आहे की तो प्रचार आणि ते आवाहन इतिहासाच्या आधारे होऊ नये. एवढ्यासाठी की ही मुभा मग प्रतिगामी तत्त्वे बाळगणारे आणि त्यांचा प्रचार करणारेही घेतील आणि त्याबद्दल त्यांना दोष देता येणार नाही. आपआपल्या हेतूंनी सोईस्कर असे इतिहास रचण्याचे काम अव्याहत चालूच राहील. लोकशाही, समानता अशी जी

काही ध्येये आपल्याला प्रिय असतील तीच प्राचीनांना होती असे सांगणे किंवा भूत-कालातून वर्तमानकाळाकडे आपण असा प्रवास केला आहे की ह्या मूल्यांप्रत येणेच प्राप्त आहे अशा तऱ्हेने इतिहास मांडून दाखविणे शक्य आहे; पण ते चुकीचे आणि धोक्याचे आहे. हेगेल, मार्क्स इत्यादिकांनी इतिहास हवा तसा 'वापरला' म्हणून पॉपर, रसेल वगैरे विद्वान त्यांच्यावर तुटून पडतात; मग त्यांना तरी आपल्या ध्येयासाठी आणि मूल्यांसाठी इतिहास राबवायचा अधिकार कसा काय पोचतो ? तेव्हा अगदी तर्कशुद्ध भूमिका घ्यायची म्हणजे इतिहासाचा संबंध न आणताच नव्या ध्येयांचा आणि नव्या मूल्यांचा पुरस्कार झाला पाहिजे.

भूतकालाच्या ज्ञानाचे काही उपयोग निश्चित आहेत. त्यासंबंधी थोडासा विस्तार आतापर्यंत केलाच आहे. पण सामाजिक पुनर्रचनेचे कार्यात इतिहास आणणे म्हणजे आणखी आपत्ती ओढवून घेणेच होय. भविष्यकाळी आपले जीवन अधिक सुखी आणि अधिक समृद्ध करण्यासाठी वर्तमानकाल चांगला समजून घेतला पाहिजे. ज्या मानवासाठी सारे करावयाचे तो अधिक चांगला समजण्यासाठी त्याचा भूतकाल जाणणे आवश्यक वाटत असेल तर इतिहासाचे परिशीलन जरूर करावे. पण इतिहासावरून माणूस पूर्णपणे समजतो, इतिहासावरून धडे मिळतात, मार्गदर्शन मिळते, पुढील कार्याची दिशा दिसते अशा तऱ्हेचे भ्रम असू नयेत. इतिहासापासून स्फूर्ती घ्यायची असते आणि त्याचा उपयोग करून इतरांच्यात स्फूर्ती निर्माण करायची असते अशा कल्पनाही उराशी बाळगू नयेत. माणूस कसा आहे ते दाखविणाऱ्या अनेक ज्ञानप्रकारांपैकी एक प्रकार म्हणून इतिहासाकडे अवश्य वळावे. त्यातून मिळेल तेवढे ज्ञान घ्यावे. इतिहासमुक्त होऊन इतिहास वाचावा.

अनर्थकारी इतिहासापासून समाजाला वाचविण्यासाठीही इतिहासाचे योग्य परिशीलन होत राहिले पाहिजे. अणुबॉम्बला अणुबॉम्ब ह्याप्रमाणे इतिहासालाही इतिहासानेच उत्तर द्यावे लागेल. सत्तेच्या राक्षसी महत्त्वाकांक्षांनी प्रेरित झालेले खलपुरुष इतिहासाची तलवार उपसून केव्हाही उभे ठाकतील. त्यांच्या खड्गाचे घाव इतिहासाच्या ढालीवरच झेलून घेतले पाहिजेत. ह्याबाबत हर्बर्ट बटरफील्ड म्हणतो :

" History, in fact, is so dangerous a subject and so often it is the sinister people like a Machiavelli or a Napoleon or a Lenin who learn 'tricks of the Trade' from it, before the majority of the people have thought of doing so–that–we might wonder whether it would not be better for the world

to forget all of the past, better to have no memories at all, and just to face the future without ever looking back. We must teach history, however, precisely because so much, bad history exists in the world already "

( History and Human Relation.... पृ. १७१ )

इतिहासाचा जो जो दुरुपयोग होण्याची शक्यता आहे तो तो टाळला गेला पाहिजे. आणि त्यासाठी भूतकालाविषयीची जास्तीत जास्त माहिती माणसाचे हाती पाहिजे. इतिहासापासून होणारे सर्व अनर्थ चुकविण्यासाठी इतिहासाचाच फार मोठा उपयोग होऊ शकतो.

माणसाच्या सुखदुःखांच्या, तळमळींच्या आणि धडपडींच्या, यशांच्या आणि अपयशांच्या असंख्य कथा सांगणारा इतिहास म्हणजे एक मौल्यवान रत्नांचा खजिना आहे. त्याच्यावर तमाम मानवजीतीची मालकी आहे. पण त्याच्यावर मानवतेचे शत्रू केव्हा डल्ला मारतील ते सांगता यायचे नाही. त्या डाकूंपासून त्या भांडाराचे रक्षण झाले पाहिजे. डाकू अनेक नावांनी आणि अनेक रूपांनी येतील, त्यांना ओळखले पाहिजे आणि ओळखून हाकलले पाहिजे. आणि लुटारूंपासून हा जो अमोल ठेवा रक्षावयाचा आहे तो रक्षकांनाही वाटेल तसा उधळता येणार नाही. म्हणूनच कोणत्याही ध्येयधोरणांच्या सिद्धीसाठी इतिहासाकडे मदतीची हाक मारली जाऊ नये. इतिहास काय देऊ शकतो ह्याचे विवेचन आतापर्यंत केले आहे. इतिहास जे देऊ शकतो तेच आणि जेवढे देऊ शकतो तेवढेच त्याच्याकडे मागा; अधिक मिळावे म्हणून त्याला ओरबाडू नका. इतिहास ही आपल्या पूर्वजांनी काय केले त्याची कथा आहे. ती जरूर ऐकावी, पण हे पक्के लक्षात असावे की पूर्वज भूतकाळाचे मालक होते, त्यांना हवा तसा तो काळ त्यांनी घडविला; आपण वर्तमानकाळाचे धनी आहोत आणि आपला काळ आपल्याला पाहिजे असेल तसा आपण बनवायचा आहे. आपण स्वतंत्र आहोत, इतिहासाचे अंकित नाही. माणसाने इतिहासाची वास्तपूस्त करावी पण त्याच्या पाशात अडकू नये. मानवाने इतिहासाचा योग्य तो मान अवश्य राखावा पण त्याचा गुलाम होऊ नये.

## संदर्भसाहित्य :

( 1 ) Introduction to the Philosophy of History
– Aaron, Raymond ; London, 1961
( 2 ) A History of Historical Writing
– Barnes, H. E ; New York 1962

( 3 ) Historical Inevitability
- Berlin Isaiah ; London 1954

( 4 ) A History of Freedom of Thought
- Bury, J. B. ; New York, 1913

( 5 ) History and Human Relations
- Butterfield, Herbert ; London, 1951

( 6 ) The Meaning of Human History
- Cohen, M. R. ; Chicago, 1961

( 7 ) The Idea of History
- Collingwood R. G. ; London, 1961

( 8 ) History, its Theory and Practice
- Croce, Bendetto ; New York 1960

( 9 ) History as a System
- Gasset, Jose Ortegay ; New York 1961

( 10 ) Use and Abuse of History
- Geyl, Pieter ; New Haven, 1955

( 11 ) Encounters in History
- Geyl, Pieter. ; London, 1963

( 12 ) History and Historians in the Nineteenth Century
- Gooch, G. P. ; London, 1952

( 13 ) Generalizalions in the Writing of History
- ed. Gottaschalk, Louis. ; Chicago, 1963

( 14 ) A Preface to History
- Gustavson G. G. ; New York, 1955

( 15 ) The Problem of History and Historiography
- Joshi V. V. ; Allahabad, 1946

( 16 ) Freedom and History
- Lewis H. D. ; London, 1962

( 17 ) Germany, Yesterday and To-morrow
- Merkl, Peter H. ; New York, 1965

( 18 ) The Origin of the West German Republic
- Merkl, Peter H. ; New York, 1963

( 19 ) Theory and History
- Mises L. V.; London, 1958

( 20 ) The Uses of the Past
- Muller H. J-; New York, 1957

( 21 ) The Poetry of History
- Neff, Emery; New York, 1947

( 22 ) The Poverty of Historicism
- Popper, K. R.; London, 1957

( 23 ) The Open Society and its Enemies ( Vol. I–II )
- Popper K. R.; London, 1947

( 24 ) Nature and Historical Experience
- Randall J. H.; New York, 1962

( 25 ) The Use of History
- Rowse, A. L.; London, 1946

( 26 ) Understanding History
- Russell, Bertrand.; New York, 1957

( 27 ) History of Historical Writing
- Thompson J. W.; New York, 1942

( 28 ) Civilization on Trial.
- Toynbee A. J.; New York, 1948.

( 29 ) The Historian's use of Nationalism and vice verses.
- American History Reviews LXVII ( 1962 ).

( 30 ) The Future uses of History.
- American Historical Reviews LXV ( 1959 ).

## इतिहासाचे तत्त्वज्ञान

# सूची


अकबर १२७
अग्नीचा शोध १६२, १६३
अजिंठा १८८
अठराशे सत्तावनचा उठाव १, १७६, १७७
अणुबाँब १४८, १९८
अणुशक्ती १०७, १६३
अथेन्स ५५, ८२
अनार्य ५०
अपघात, इतिहासातील–योगायोग, इतिहासातील
अफगाणिस्तान ५१
अफझलखान १४३, १४९
अमेरिका ८०
अमेरिका, मध्य ८१
अमेरिका ( संयुक्त संस्थाने ) ४५, ४९, ५०, ६४, ७०, ८१, १०२, १०४, ११९, १७३, १७४
अमेरिकेच्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा १७३
अयोध्या १३८
अरब ७७
अरबस्तान ७७, ८२, ८३, ८५
अरविंदबाबू ६७
अर्जुन १२८
अर्थशास्त्र १५९
अर्थशास्त्र, चाणक्याचे १४५
अलेक्झांडर १,६,८४
अलेक्झांडरची भारतावरील स्वारी ६
अलेक्झांड्रिया १५३
अल्ला ३२, ३३, १६४
अवतार कल्पना २८, १२८
अवशेष, ऐतिहासिक १४३, १४४
अशोक १, ११, १२२, १२३
अश्मयुग ८५
अँडियन पठार ८१
अॅक्विनास ३६
अॅडलर ११३
अॅन बोलिन ११८,११९
अॅनॅटोलियाचे पठार ८१
अॅरिस्टॉटल ७७, ८१
आंतरराष्ट्रीयत्व ९५
आंतर्जातीय विवाह १९४
आकस्मिक घटना–योगायोग, इतिहासातील
आग्रा १३७, १८६, १८९
आजीविक ३१
आठवले, सदाशिव १४२
आत्मा २७
आदिमानव १७०
आदिवासी ४२, १२३
आधिभौतिक जीवनमूल्ये १०१–१०३
आध्यात्मिक जीवनमूल्ये १०१–१०३
आनुवंशिकता ४६, ४७, ४८
आफ्रिका ६५, ६६, ८२, ८३

आफ्रिका, ईशान्य ५१
आफ्रिका, उत्तर ४५
आफ्रिका, पूर्व ८१
आर्य ४१, ४४, ४८, ५०, ५७, ८३, १५५
आल्टेचुल १७५
आल्पस् ८३
आशिया ६५, ६६
आशिया, पश्चिम ८४
ऑगस्टस ९३
ऑगस्टाइन ३६
ऑस्ट्रेलिया ८३
इंग्रजी भाषा ६४
इंग्रजी भाषिक ४३
इंग्रजी सत्ता, भारतातील ६
इंग्लंड ९, ४१, ४४, ४५, ४९, ५०, ६४, ६६, ७०, ८३, ११७, ११८, १२७, १७४
इंग्लिश लोक ५४, ७०, ७१, ७२, ८२, १४८, १७६
इंद्र ४१
इटली ४५, ५३, ६६, ७०, १७१, १७२
इतिहास, आर्थिक ३, १०८, १०९, ११३, ११५
इतिहास : उपयोग १, ५, १२, १९, १८५-२०१
इतिहास, कलांचा ३, ८
इतिहास, घटनात्मक ८
इतिहास : छंद ५, १८६, १८७
इतिहास, जागतिक ८, ९
इतिहास, जातीय १८१
इतिहास : दुरुपयोग १०, ११, १९, १२४, १२५, १५९-१८४
इतिहास, धार्मिक ८, १०
इतिहास प्रकार २, ३, ५-११
इतिहास, प्रादेशिक ८, ९, १०, १८१
इतिहास, राजकीय २, ३, ५, ६, ७, ८, ८९, १४६
इतिहास, राष्ट्रीय ९, ६२-७४, १७४ -१८०
इतिहासलेखन ३, ४, १२, १३, १४३-१४८
इतिहास, वाङ्मयीन ८
इतिहास, वैचारिक ८
इतिहास : व्याप्ति १, २, ३, ५
इतिहास : व्याख्या २, ३, ४
इतिहास, शैक्षणिक ८
इतिहास, सांस्कृतिक ८, ९, १०
इतिहाससाधने १३, १४, १४४-१४६
इतिहास, सामाजिक २, ६, ७, ८, ८९-९३
इतिहासाचे तत्त्वज्ञान १९, २०, ६७
इथिओपियन ५२
इब्न खाल्दुन ३२, ३३, ८१, ८२
इराण २६, २८, ८१, ८४
इलियड ९९
इल्बेरियन द्वीपकल्प ८५
इस्लाम ३२, ३३, १४२
ईजिप्त २४, २५, ५०, ८०, ८१, ८४, ८५, ९४, ९७, १५१, १६२
ईश्वरी योजना १८, १९, २३-३९, १२८, १४०, १४२, १६४, १६७
उत्क्रांती २५, २६, ४७, ५५, १०४

उत्खनन १४३
उत्पादन ११०, ११४, १२५
उपयुक्तता १५९–१६१
ऋग्वेद १४५
ऋग्वेदकाल ३१, ४१
एंगल्स ११२, ११३, ११७, ११८, १२०
एकत्र कुटुंबपद्धती १६
एकेश्वरवाद ८३
एपिक्यूरस ३०
ऐनू ५१
ओडिसी ९९
ओसबोर्न, आर्थर १४२
औद्योगिक क्रांती ३६, ९३, ११६, ११७
औरंगजेब, ११, १२७, १३०, १६२
कंबोडिया ८१
कन्फ्युशिअस ५९, १४२
कम्युनिझम, प्लेटोचा १३७
कर १६१
कला १६०
कलियुग ३१, ९५
कल्हण १४७
कवायती पलटणी १४८
कॅथलिक पंथ १७२
कॅनडा ८१, ८३
कामगार ११०, १११, ११४, ११६, १२०, १२४, १२९
कारणमीमांसा १७
कार्लाईल १३०, १३२, १३३, १३७, १४०, १४१
कालखंड १२७
कालचक्र २३-३९, १४०
काश्मीर १४७
कॉकेशस पर्वत ४५
कॉकेसाइड वंश ४४, ४५, ४८
कॉन्स्टँटिनोपल ८४
कॉन्ह, हॅन्स १९५
कॉम्टे १०४
किप्लिंग, रड्यार्ड ६४
कुटुंबसंस्था १६१, १६६
कुतूहल १८६, १८७
कुराण ३३, १८२
कुर्दलोक ४५
कुर्दस्तान ५१
कून ४९
कूळ ११४
कृष्णवर्णीय ५०, ५१, ५३, ५४
के, जॉन १५३
केमाल, मुस्ताफा १५४
केरेन्स्की १३४
केशवसुत १९४
कोलोरॅडो ८१
कोसांबी १२२, १२३, १२४
कोहेन, मॉरिस ८०, ८७
कौरव १२८
क्रीडा १६०
क्लिओपात्रा १५१
खाजगी मालकी ११०, १११, १२१
ख्रिश्चन ६४, ११६, १८३
ख्रिस्त २७, ५१
ख्रिस्ती धर्म २८, १४२, १५५
गंगा ७९
गंथर ४५
गनिमी पद्धती १४८
गस्टॅव्हसन १३८

गांधी, इंदिरा १३८
गांधी, महात्मा १२८, १६७
गारदी १४३
गिब्रन ८२
गिरनार १८९
गुप्त १६२
गुप्तपूर्वकाल ९९
गुप्तसम्राट ६
गुप्तोत्तरकाल ९९
गुलामगिरी १५४
गेल, पीटर १००
गोबिनो ४५, ४८, ४९, ५०, ६६, ७०
गोबेल्स ४५
गोल्घुमट १८९
गौरीशंकर १९४
ग्रट ४५, ४८, ४९, ५०, ५५
ग्रीकसत्ता, भारतातील ६
ग्रीस २९, ३०, ४२, ५०, ७७, ८४, ८५, ८९, ९२, ९७, ९९, १३७, १५४, १५५
चंद्रगुप्त १, १४४
चर्च, ख्रिस्ती ३६
चाणक्य ३५, १४५
चित्रकला १६०
चिनी लोक ८२
चीन २५, ५०, ८०, ९६
चुअंगत्सु २५
चेंबर्लेन ४५, ४८, ५१, ५२
चैतन्यशक्ती ६७, ६८
छंद १८५, १८७
जपान ४७, ४८, ५४, ७२, ८१
जमीनदारी ११०, ११४, ११६
जर्मनभाषा ६४
जर्मन लोक ६६, ७२
जर्मनी ९, ४५, ५२, ५३, ५८, ६५, ६६, ७१, ११७, १३४, १४१, १७२, १७६
जातीजमाती १६६, १७०, १९१, १९२, १९४
जॉर्डन खोरे ८०
जीवनमूल्ये १४८
जीवशास्त्र ४६, ४८, ६०, १३१, १३२
जेम्स, विल्यम १३०, १३९
जेरुसलेम १०६
जेरेमिया ५२
जैन ३१
ज्यू ९, २७, २८, ४२, ४५, ५१, ५२, ५३, ५६
झरतुष्ट्र २६, २७
झाशीची राणी १
टायबर ७९
टॉयन्बी ४९, ८०, ९७, ९८, ९९, १००, १०३
टिटो ८५
टुंगचुंग शू २५
टोळी १७०
ट्यूटन ५१
ट्युटॉनिक ४८, ४९
ट्राइश्के १७५
ट्रॉट्स्की ११७, १३५
ट्रॉय ९९
ट्रेव्हेलियन ६
डांगे श्री. अ. १२१
डार्विन १०४, १३९

डॉसन १३०
ड्यूरंट, विल ८०
ड्रॉयसेन ६५
ड्रे, विल्यम ३८
तर्कशास्त्र ३९, ४२
ताजमहाल १८९
ताम्रवर्णीय ५०, ५३
तार्तर ८२
तेनसिंग १९४
तैग्रिस ७९
तोडा ५१
त्रेतायुग ३१
दस्यु-दास ४१
दुष्यंत-शकुंतला ९६
देवदेवता २४, २५, २६
दैव २७
द्वापारयुग ३१
धनानंद ११
धर्मगुरू २४, २७, २८, ३४
धर्मग्रंथ १८२
धर्मयुद्धे ११६
धर्मवेड १८१, १८२
धर्मसुधारणेची चळवळ (यूरोपीय) ३६
धर्मोपदेशक २७
नगररचना १८९
नदी ७९, ८०, ८१
नाईल ७९
नाझी ४५, ५२, ५३, ५६, ६६
नाना फडणीस १४५
नारायणराव पेशवा १४३
नॉर्डिक ४५–५३, ५५, ५६, ६६, १७२
नॉर्वे ४५
निग्रॉइड ४४, ५०
निग्रो ५१, ५५, ९६
निवृत्तिमार्ग ७२, ७८
निसर्गचक्र–कालचक्र
नेतृत्व ११७, ११८, १२९, १३१, १३२, १३३, १३६, १३८
नेपोलियन १, ११७, ११८, १२७, १९८
नेबूर ३६, ३८
नेहरू, जवाहरलाल ६७
न्यू गिनी ४२
न्यूझीलंड ८३
न्यूटन १५३
पंजाब ८३
परंपरा १७८, १७९, १८०
पॅलेस्टाइन २७, ८५
पाकिस्तान ९, १०, ५१, ८३, ११५, ११६
पाटलीपुत्र १४५
पानिपतचा संग्राम १, ४
पापुअन ४२
पामीरी मॅरिओ १७२
पायथागोरस ३०
पारंपरिक इतिहास ९१
पारशी ९
पाश्चर, लुई १५३
पाश्चिमात्य संस्कृती ६६, ७२, ९३ ९४, ९६, १००
पॉटर ७०
पॉपर ६९, १०३, १९५, १९६, १९७, १९८
पिअर्स १७५
पिरॅमिड, ९७,

पीतवर्णीय ५०, ५३, ५४
पुनरावृत्ती, इतिहासातील १८, १६७
पुराणे २६, ९५, १२८, १८२
पुरातत्त्वविद्याखाते १६२
पुरोहित १२४
पुष्यमित्र १२२, १२३
पेंडसे, लालजी १५२
पेशवाई १२, १५२
पोप ११९
पोर्तुगाल ११९
पोलंड ४५
पौर्वात्य संस्कृती ७२
प्रगतिवाद १०४, १६५, १६६
प्रशिया ६८, ६९
प्राणिशास्त्र ५, ५५
प्राथमिक समाज ११०
प्लेटो ३०, ७७, ८२, १३७
फलज्योतिष ३७, ३९
फारो २५
फासेपारधी १२३
फिलिपाइन्स १७३
फिशर १०५, १५४
फ्रान्स ९, ४५, ४९, ५३, ६५, ६६, ७०, ११८, १७४, १७६
फ्रॉइड ११३
फ्रॉग्द १७५
फ्रेंच राज्यक्रांती १, ११७, ११८
फ्रेंच लोक ७१
फ्रेडरिक, विल्यम ६९
फ्लेमिंग १५३
बंगाल ८३
बकल ७८, ७९, ८२, ८३
बटरफील्ड ७३, १९८
बर्लिन, इसा १६७
बहुपत्नीकत्व १६
बॅंक्रॉफ्ट १७५
बॅबिलोनिया २५
बागायत ७६
बाजीराव, दुसरा ११
बाजीराव, पहिला १६२
बायबल ३६, १६४, १८२
बार्नेस १७५
बिस्मार्क १४१
बुद्ध १२३, १२८, १४२, १६७, १८८
बेनेडिक्ट ४९, ५८
बेल्जम ८३, ११५, ११६
बोल्शेविक १३४, १३५
बौद्धमत ३१
बौद्ध सत्ता, भारतातील ६
बौद्ध साहित्य १८८
बौद्धिक चाचणी ५५, ५९, ६०
ब्राझील ५६
ब्राह्मणत्व १८१
ब्राह्मणेतरत्व १८१
ब्रिटन-इंग्लंड
ब्रिटिश साम्राज्य ८३
भगवद्गीता १२८, १६४
भविष्यपुराण ४१
भांडवलदारी ११०, १११, ११४, ११६, १२०, १२१, १२४, १२९
भारत १, ४, ६, ९, १०, ३०, ४१, ५०, ५१, ६६, ६७, ७०, ७२, ७३, ८०, ८२, ८३, ९६, ९९, १२१, १२३, १३५, १६६, १७४, १७६, १९३

भारतीय लोक ७०, ७१, ७८, १३८
भाषाकुल ४४
भिल्ल १२३
भूगोल ३९, ७६
भूगोलनिष्ठ विवरण, इतिहासाचे १८, ३७, ७६–८७, १००, १२९, १६३, १६४, १६९
भूदास ११४, ११६
भूतपिशाच्चे २४
भैरवी १६१
मंगोलाइड ४४, ४७, ४८
मच्छीमारी ७६
मदुरा १८९
मध्ययुग ३६, ११६
मध्ययुग, यूरोपीय ९२, १०२, ११६
मनोरंजन १६०, १६१
मय ८१
मराठी भाषिक ४३
मराठे १४८, १४९
मराठ्यांची सत्ता ४, १३६, १८०
महंमद पैगंबर ८३
महादजी शिंदे १४५, १४९
महापुरुषकर्तृत्वसिद्धांत, इतिहासाचा १८, ७७, ११८, १२५, १२७–१४०
महायुद्ध, पहिले १४१
महाराष्ट्र ४, १०, ६६, १३५, १३६, १४५, १८०
महावीर १२३, १४२
मॅकिआव्हेली १९८
माधवराव पेशवा १९०
मानवप्राणी १४, १५, १६, २२, २३, ४८, ७६, ७९, १६६, १६९
मानववंशशास्त्र ६१
मायझेस २०
मार्क अँटनी १५१
मार्कंडेय पुराण ४१
मार्क्स आणि मार्क्सवाद ६६, १०८–१२५, १३१, १३३–१३५, १६४, १६८, १६९, १७३, १९८
मॉटेग्यू ४९, ६०
मॉटेस्क्यू ७७–८०, ८२
मिठागर ७६
मिल १०४
मिशलेट १७५
मीनाक्षीमंदिर १८९
मुसल्मान ६४, ११६, १८३, १९३
मुसल्मानी सत्ता १३५
मुसल्मानी सत्ता, भारतातील, ६, ९९, १३६
मुसोलिनी ६६, १७१, १७२, १९४
मूर ४२
मेकॉले ६६
मेक्सिको ८१
मेगॅस्थिनीस १४४, १४५
मेन्शेविक १३४
मेसोपोटेमिया ८०
मोगल बादशहा १३०
मोन्शिअस २६
मोर्ले ७०
मोहेंजदडो संस्कृती ९, ५०, १८९
मोक्ष ३२, ७८
मौर्य १४५
यंत्रे १६
यवन ४२

यांगत्से ७९
युगकल्पना, ख्रिस्ती २८
युगकल्पना, ग्रीक २९
युगकल्पना, जैन ३२
युगकल्पना, बॅबिलोनियन् २५
युगकल्पना, बौद्ध ३२
युगकल्पना, हिंदू ३१, ३२
युगोस्लाव्हिया ८५
युद्ध २७
युनेस्को ५८
युफ्रेटिस ७९
युफ्रेटिसचे खोरे ८५
यूरोप ४५, ६५, ७८, ८०, १०२, १५२
योगायोग, इतिहासातील १५, ९३, ११७, ११८ १५४–१५४
रशियन राज्यक्रांती ११७–११९, १३३, १३४, १३६
रशिया ९, ४५, ६६, ८१, १०२, ११७, १७३
रसेल ३५, ११८, ११९, १२५, १४१, १४२, १५४, १९५, १९८
रॅंडाल २, १९
रॅटझेल ७९, ८३
राजतरंगिणी १४७
राजसत्ता ७, १६, २५, ३४
राजाराम १५२
राज्यविहीन समाज १११, १२१
राज्यशास्त्र १५९, १६१
राज्यसंस्था ७, १६१
राधाकृष्णन् ३७
राम ११५, १३८
रामायण १३८
रायगड १३७, १८६
रावण ११५
राष्ट्र १६६, १७०
राष्ट्रराज्य ६५
राष्ट्रसंघ १६७
राष्ट्रीयत्व ९, १०, ११, ५४, ६३, ६४, ६५, ६९, ७१, ९५, १३२, १७४, १७५, १७७, १७८
रिओग्रॅंड ८१
रोझेनबर्ग १७२
रोमन लोक ८५, १००
रोमन संस्कृती ६, २९, ५०, ६६, ७७, ८४, ९७, ९९, ११९, १४०, १५१, १५२, १५४, १५५, १७२
रोम, शहर ९७
रोमिओ–ज्युलिअट ९६
लॅमाराईट ६५
लाओत्सु १४२
लापिअर ८५
लिव्हिंगस्टोन ५६
लुक्रेशस ३०
लेखनकला १४२, १४३
लेनिन १, ७, १६, ९६, ११७–११९, १३३; १३५, १३६, १७३, १९८
वंशश्रेष्ठत्वाचा सिद्धांत, इतिहासाचा, ३७, ३९, ४१–६१, ७३, १२९, १३२, १४०, १६३, १६४, १६९
वंशसंकर ४३, ४६, ४९, ५०
वनस्पतिशास्त्र, ५, ५५, ८४
वराहमिहिर ४२
वर्गसंघर्ष ११०, १११, ११४, ११६, ११८, १२०, १२१, १२४, १२९

वॅट, जेम्स १५३
वाङ्मय १६०, १८९, १९०
वाहतुकीची साधने १६
वॉटर्लूची लढाई १
वॉशिंग्टन, जॉर्ज १
विजापूर १८९
विभक्त कुटुंबपद्धती १६
विरोधविकासवाद ६७, ११०
विल्सन, प्रेसिडेंट १६७
विवाहसंस्था १६१, १६६
विवेकानंद ६७
विश्वधर्म १००
विष्णुपुराण ४१
विज्ञानपद्धती ३३, ३९, ४२
वेद १८२
वेदकाल ९९, १६६, १७६, १७७
वेदान्त ७८
वेद्द ५१
वेल्स, एच. जी. १०४
व्यक्तिचरित्रे ८
व्हॉल्तेअर ७२
व्हिट्रुव्हिअस ७७, ८१
व्हीको ९१–९३, १०३, १०४
व्हीलर ९
व्हेजिटिअस ८१
शंकर १६४
शासनसंस्था १११
शास्त्रीय शोध १५२–१५४
शिवाजी १, ११, १२, १२८, १३५–१३७, १४३, १४९, १५२, १८०, १८६
शेक्सपिअर १६१
शेती ७६, १४२
श्रीकृष्ण १२८
श्वेतवर्णीय ५०, ५३, ५४
संगीत १६०
संघटना, सामाजिक १६१
संताळ १२३
संभवनीयता, इतिहासातील १५०, १५१, १९१, १९२
संभाजी १५२, १९०
संयुक्त महाराष्ट्र चळवळ १८०
सखाराम बापू १४५
सत्तांतर ७
सत्ययुग ३१
सन् यत सेन ६६
समाजवाद १११, १२१, १३५
समाजशास्त्र ३९
समुद्रगुप्त १२३
सरंजामशाही ११०, ११४, ११६, ११७
सामाजिक जीवन १६१, १७०
सामाजिक मूल्ये २७
सामाजिक-सांस्कृतिक गतिनियम, इतिहासाचे १८, ८८–१०६, १२९, १४०, १६३, १६४
साम्यवाद १११, १२१, १२४
साम्राज्यवाद ६५, ६६, ७०, १६६
सार्वत्रिक निवडणूक १४८
सॉक्रेटिस ३०
सिंध संस्कृती १४३, १४४
सीझर १, ६, ११७, १५१
सीता ११५, १३८
सीली ६
सीलोन ११५

सुदर्शन तलाव १८९
सुमेरिया २४, ८१
सेमिटिक ५७
सैनिकशाही ७
सोरोकिन १०१–१०४
स्कँडिनेव्हिया ५०
स्कॉट १०६
स्टॅलिन ६६, १३४, १३५, १५४
स्टीफन्स १७५
स्टोइक ३०
स्थित्यंतर, ऐतिहासिक १४–१९, १४०–१५५
स्पार्टा ५५
स्पेंग्लर ९३–९८, १०१, १०३, १६४
स्पेन ११९
स्पेन्सर १०४
स्फूर्तिप्रदता, इतिहासाची १७८–१८१, १९८
स्वित्सर्लंड ६४, ८३, १३४
हंटिंग्टन ७९, ८०, ८४, ८५
हर्डर ७०
हर्ष १२३
हॅड्रियन ९७
हॅन-फी-त्से ३५
हॉलंड ८३, १००, ११५
हिंदुत्वनिष्ठा १८१
हिंदुद्वेष १८१
हिंदुस्तान ७८
हिंदू ६४, ७८, ८१, ८३, ९९, १३५, १८३, १९२
हिंदू सत्ता, भारतातील ६
हिटलर ४५, ५२, ५३, ११७, १२८, १५४, १७२, १९४
हिटाइट ८१
हिप्पोक्रेटस ७७, ८०
हिल, नॉर्मन १७८
हिलेरी १९४
हूक, सिडने १३३
हूण ८२, १६२
हेगेल ३७, ६७–७०, १०९, १६४, १९८
हेन्री, आठवा ११८, ११९, १२७
हेन्री, सातवा १२७
हेरो १५३
हेरोडोटस ८९
होएंगहो ७९
होमर ९२
क्षत्रिय १७१
ज्ञानानंद १६१, १६२

१५८४८
४१९४२ निबंध
१७९८ १६।१।६७

REFBK-0015947
REFBK-0015947